# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १९/१२/२००३

आज दि. १९/१२/२००३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सुचना क्र. ०९ दि. ११/१२/२००३ रोजीच्या विषय पत्रिकेवर विचार विनीमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. मेंडोसा मायरा गिल्बर्ट | महापौर |
| २) | श्री. मॉरस रॉड्रीक्स | सभापती |
| ३) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ४) | श्री. परशुराम पाटील | विरोधी पक्षनेता |
| ५) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | गटनेता |
| ६) | श्री. पाटील चिंतामण कमलाकर | सदस्य |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ९) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| १०) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ११) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १३) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १४) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १५) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १६) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १७) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १८) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| १९) | श्री. मदन उदितनारायण सिंग | सदस्य |
| २०) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २१) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २२) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २३) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २४) | श्री. नलावडे दिनेश द. | सदस्य |
| २५) | श्री. हंसुकुमार पांडे | सदस्य |
| २६) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २७) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २८) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २९) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३०) | श्रीम. सावळे निर्मला बाबुराव | सदस्या |
| ३१) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३२) | श्रीम. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३३) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३४) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३५) | श्रीम. पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ३६) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३७) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३८) | श्री. पटेल आसिफ गुलाम | सदस्य |
| ३९) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ४०) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ४१) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४२) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४३) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४४) | श्री. स्टिवन जॉन मेंडोंसा | सदस्य |
| ४५) | श्री. पाटील रोहीदास आत्माराम | सदस्य |
| ४६) | श्री. कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ४७) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४८) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सदस्या |
| ४९) | श्रीम. भामरे उर्मिला कोमल | सदस्या |
| ५०) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| ५१) | श्री. जेम्स इजिदोर कोलासो | सदस्य |
| ५२) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५३) | श्री. शहा शशिकांत रतिलाल | सदस्य |
| ५४) | श्रीम. शहा रिटा सुभाष | सदस्या |
| ५५) | श्री. महेंद्रसिंग चौहाण | सदस्य |
| ५६) | श्री. ध्रुवकिशोर पाटील | सदस्य |
| ५७) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५८) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६०) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६१) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६२) | श्री. भोईर शशिकांत जगन्नाथ | गटनेता |
| ६३) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्य |
| ६४) | श्री. पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ६५) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६६) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६७) | श्री. म्हात्रे तुळशिदास दत्तू | सदस्य |
| ६८) | श्रीम. रक्षा एस. शाह | सदस्या |
| ६९) | श्री. मिलन गोंविंदराव पाटील | सदस्य |
| ७०) | श्री. जैन रमेश धरमचंद्र | सदस्य |
| ७१) | श्री. ठाकुर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. माळी रविंद्र भिमदेव | गटनेता |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | गटनेता |
| ३) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ४) | श्री. संजय नारायण पांगे | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सय्यद मुझफर हुसेन | उपमहापौर |
| २) | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ३) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ६) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |

वरील प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांस सांगितले. त्यानुसार वंदेमातरम् या राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार मा. आयुक्त विरोधी पक्ष नेते सभापती उपआयुक्त व सर्व उपस्थित सदस्य म.न.पा. अधिकारी व पत्रकार बंधु आपले सर्वांचे स्वागत. आपल्या सर्वांना व मिरा भाईंदर वासियांना नाताळ व नुतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. नविन वर्ष आपण सर्वांना सुखाचे व भरभराटीचे जावो ही सदिच्छा सर्व गटनेत्यांची एक बैठक आयोजित करण्यात येईल. सदर बैठकीमध्ये महासभेत प्रत्येक पक्षाच्या सदस्यास चर्चेत भाग घेणे बाबत ठरविण्यांत येईल. प्रत्येक सदस्याने पाच मिनीटेच बोलावे. धन्यवाद. सचिव साहेब सभेचे कामकाज सुरू करावे.

**प्र. सचिव :-**

महापौरांच्या परवानगीने प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात करीत आहे.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, मी अभिनंदनाचा एक ठराव मांडत आहे. भारत देशामध्ये आपल्या भारताचे लाडके पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या भारतीय जनता पार्टी हा पक्ष आता झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यामध्ये भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली तिन्ही सरकार स्थापन झालेले आहे. त्या तिन्ही सरकारच्या मुख्यमंत्र्याच्या अभिनंदनाचा मी ठराव मांडत आहे. चौथे राज्य दिल्ली यांच्याही मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

माझे त्याला अनुमोदन आहे.

**जयंत पाटील:-**

अध्यक्ष महाशय राजकारणामध्ये चढ उतार असतात. अनेक वेळा घडलेले आपण पाहिलेले आहेत. तरीसुध्दा ज्या दिल्लीमध्ये केन्द्र सरकार आपले कार्यकर्ते त्या दिल्ली शहरावर त्या दिल्ली राज्यावर कॉंग्रेसची सत्ता आहे. प्रचंड प्रमाणामध्ये विजय स्थापन केलेला आहे. त्याबददल अभिनंदनाचा ठराव मी मांडत आहे.

**लिआ कोलासो :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने या सभागृहाच्या कामकाजाला सुरूवात करताना ही चर्चा होणे आवश्यक होते की अभिनंदनाचा ठराव आणि दुखवट्याचे ठराव आपण केंव्हा घ्यायचे? सुदैवाने महापौरसाहेबा आपण गटनेत्यांची सभा बोलाविली होती आणि सन्मा सदस्य रोहिदास पाटील सदर सभेला हजर होते. त्यांनी त्यावेळी जर व्यक्त केले गेले असते की, आम्हालासुध्दा एक अभिनंदनाचा ठराव मांडायचा आहे तर आम्हीसुध्दा त्यामध्ये सहमत झालो असतो. तथापि त्यांनी मांडलेल्या ठरावाला औचित्याच्या रुपाने काही का होईना आपण परवानगी दिलेली आहे. आम्ही आपल्या रुलिंगचा आदर बाळगतो. पण मी सभागृहाच्या निदर्शनास असे परत आणू इच्छितो की भारतीय जनता पार्टीने देशभरातल्या चार राज्यापैंकी तीन राज्यामध्ये आपले काही प्रमाणामध्ये सत्तांतर घडवून आपली सत्ता नव्याने आणण्याचा प्रयत्न केला आहे पण एक सभागृहाच्या निदर्शनास मी आणून देऊ इच्छितो की भारतीय जनता पक्षाला झालेल्या संपूर्ण देशव्यापी मतदानामध्ये चार राज्यामध्ये तसे बघायला गेलो तर

सर्वात जास्त मते ही काँग्रेस पक्षाला मिळालेली आहेत ती ४३ टक्के आहेत आणि बीजेपीला ३७ टक्केच मतदान झालेले आहे. तरीसुध्दा त्याच्या हया उत्साही वातावरणामध्ये आम्ही काय त्यांना असहमत होऊ इच्छित नाही परंतु ही वस्तुस्थिती देखील आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. त्याप्रमाणे मला मुद्दाम उल्लेख करावा लागेल की या शहरामध्ये इथे जी सत्ता आहे सत्ता स्थानी राष्ट्रवादी काँग्रेस आहे. मला आनंद आहे आणि सांगायला अभिमान वाटतो की महाराष्ट्राचे बुजुर्ग आणि जाणते नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अखिल भारतीय अध्यक्ष संस्थापक मा. शरदचंद्रजी पवार यांनी या सर्व राजकीय व्युव्ह रचनेमध्येसुध्दा छेद करुन राजकीय प्रक्रियेमध्ये उडी टाकून केवळ इतर राज्यामध्ये तीन महिन्याच्या कालखंडामध्ये आम्ही राष्ट्रवादी पक्षाने मा. शरद पवारजींच्या नेतृत्वाखाली १५ टक्के मतदान मिळविले ही खरोखरच आनंदाची गोष्ट आहे याही गोष्टीचा ठरावामध्ये अंतर्भाव व्हावा अशी मी विनंती करतो.

**अभिनंदन ठराव क्र. ४२ अ :-**

आपल्या भारताचे लाडके पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या भारतीय जनता पक्षाचे विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड या तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली तीन सरकार स्थापन झालेले आहेत. या तीन्ही सरकारच्या मुख्यमंत्र्यांचे तसेच चौथे राज्य दिल्ली यांच्याही मुख्यमंत्र्यांचे ही मा. महासभा अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील.** **अनुमोदन :- श्री. धनराज अग्रवाल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरूवात होत आहे. ११.१५ वाजले आजच्या सभेला सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले यांचा आहे दुसरा प्रश्न सन्मा. नगरसेवक परशुराम दामोदर पाटील यांचा आहे तिसरा प्रश्न सन्मा. सदस्य हेलन जॉर्जी गोविंद यांचा आहे. यांचा रजेचा अर्ज आहे. चौथा प्रश्न सन्मा. सदस्य संजय नारायण पांगे यांचा आहे. ते ही गैरहजर आहेत. पाचवा प्रश्न सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांचा आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, हा माझा प्रश्न आहे १ चा (अ) जागा ताब्यात घेण्यास कारवाई कोणामार्फत करण्यात येते. अशा जागा हस्तांतरित करुन घेतल्या आहेत का? नसल्यास कधीपर्यंत जागा ताब्यात घेणार? आपण याच्यामध्ये उत्तर दिलेले आहे. मंजुर विकास योजनेतील आरक्षित जागा हया शासकीय व खाजगी असतात. शासकीय जागेवर प्रस्तावित केलेल्या आरक्षणाखाली जागा ताब्यात घेण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांचा प्रस्ताव सादर करावा लागतो. अशा शासकीय जागा आरक्षणामध्ये किती आहेत आणि किती आरक्षण जागा मा. जिल्हाधिकाऱ्यांनी डिमांड केली आहे आणि खाजगी किती आहेत? याची मला नोंद दयावी.

**एस. आर. शेंडे :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो या मंजूर विकास योजनेअंतर्गत ३८६ आरक्षणे आहेत. त्यापैकी २७ आरक्षणे शासकीय जागेवर आहेत. त्या २७ शासकीय जागेवरील आरक्षणापैकी ५ जागा इतर संस्थानी विकसित करावयाच्या आहेत. त्यामुळे त्याची ॲप्रोप्रिएट ॲथोरिटी अदर संस्था आहेत आणि २२ आरक्षणे महापालिकेने विकसित करायची आहेत. .

**शशिकांत भोईर :-**

मग ह्या ज्या २७ जागा आरक्षणाच्या आहेत त्यापैकी ५ जागा फक्त घेतल्या. आतापर्यंत बाकीच्यावर कारवाई का केली नाही?

**एस. आर. शेंडे :-**

त्यापैकी सहा जागा हस्तांतरित झालेल्या आहेत आणि दोन जागा आपल्या ताब्यात आहेत. उर्वरित ज्या जागा आहेत त्यापैकी दहा आरक्षित जागेची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आलेली आहे त्याच्या मोजणीसाठी जी रक्कम त्यांनी मागितली आहे ती मोजणीची रक्कम २ लाख ९७ हजार भरण्यात आलेली आहे तिची मोजणी सुरू झाल्यानंतर ती जागा आपल्याला हस्तांतरित होईल.

**शशिकांत भोईर :-**

तरी त्याला किती वेळ लागेल?

**एस. आर. शेंडे :-**

आता सांगता येणार नाही. परंतु मोजणी एक महिन्याच्या आत होईल असे डी.एल. आर. च्या अधिकाऱ्यांनी सांगितलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

धन्यवाद.

**अनंत पाटील :-**

या शासकीय जागेमध्ये सॉल्ट डिपार्टमेन्टच्या जागा किती आहेत? त्याच्यामध्ये आरक्षित वगैरे आहे का?

**एस. आर. शेंडे :-**

शासकीय जागा वेगळया आणि सॉल्ट डिपार्टमेंटच्या जागा वेगळया ३८६ आरक्षणापैकी २० आरक्षणे सॉल्ट डिपार्टमेंटच्या जागेवर आहेत. आणि त्या जागेची मागणीसुध्दा संबंधित सॉल्ट डिपार्टमेन्टच्या अधिकाऱ्यांकडे करण्यात आलेली आहे?

**अनंत पाटील :-**

पोर्ट ट्रस्टच्या जागा वगैरे त्याच्यामध्ये आहेत का? बंदर विभागाच्या जागेचा इन्क्लुड त्यामध्ये आहे का?

**एस. आर. शेंडे :-**

सॉल्ट डिपार्टमेंटच्या ज्या जागा आहेत.

**अनंत पाटील :-**

सॉल्ट डिपार्टमेंट नाही. पोर्ट ट्रस्ट म्हणजे बंदर विभाग.

**एस. आर. शेंडे :-**

रिपोर्ट मध्ये माहिती उपलब्ध मिळालेली नाही.

**अनंत पाटील :-**

आपल्या टाउन प्लॅनिंगमध्ये तर पोर्ट ट्रस्टच्या जागेचे आहे. आपण बऱ्याचशा ठिकाणी झोपडपट्टी बसवताना पोर्ट ट्रस्टच्या जागा आहेत. सॉल्ट डिपार्टमेन्टच्या जागा आहेत. खाजगी पॉपर्टी आहे या कुठल्या कुठल्या प्रॉपर्टीमध्ये काय काय वसलेले आहे ते आपल्याला माहिती पाहिजे.

**एस. आर. शेंडे :-**

पोर्ट ट्रस्टच्या जागेचा उल्लेख आरक्षित जागेमध्ये नाही.

**अनंत पाटील :-**

आरक्षित जागा नाहीच आहे.

**एस. आर. शेंडे :-**

नाही.

**प्र. सचिव :-**

भोईर यांचा दुसरा प्रश्न आहे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्याप्रमाणे कामे सुरु आहेत का? नसल्यास त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यात येणार आहे?

**शशिकांत भोईर :-**

अशी अनधिकृत बांधकामे कुठे कुठे चालू आहेत आणि त्याचा आपल्याकडे तपशील आहे का? आणि आपल्या महापालिकेतर्फे त्याच्यावर काय कारवाई करण्यात आली?

**एस. आर. शेंडे :-**

अनधिकृत बांधकामाचा फक्त आरक्षित जागेवर किंवा सर्वसाधारणपणे सर्व शहरामध्ये या बाबत आपला ठराविक प्रश्न काय आहे? आरक्षित जागेवरील पाहिजे का?

**शशिकांत भोईर :-**

अनधिकृत बांधकामे आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये होतात. त्याचा तपशिल आहे का? आणि अशी बांधकामे आपल्याकडे किती आहेत आणि त्याच्याविरुध्द आपण काय कारवाई केली?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. महापौर महोदय यांच्या परवानगीने अनधिकृत बांधकामासंबंधी ज्या ज्या वेळी अनधिकृत बांधकाम सुरु होतात. त्याचवेळेला लगेच कारवाई करण्यात येते अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे काढून टाकण्यात येतात. मात्र त्यामध्ये फक्त कोर्ट मॅटर जे झालेले आहेत ते कोर्टाकडून जी स्थगिती आलेली आहे की नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी तोडू नये किंवा ऑफिसरने जाऊ नये. तेवढी बांधकामे हात लावलेली नाहीत. मात्र यामध्ये परवानगी घेऊन जी बांधकामे केलेली आहेत. त्यामध्ये जी इलिगल आहेत त्याचा सर्व्हे करणे चालू आहे. जस जसे उपलब्ध होतात तस तसे तोडण्याचे सुद्धा काम चालू आहे. परंतु अशी लिस्ट आम्ही बनविलेली नाही की अनधिकृत किती तोडली? यादी मात्र आम्ही देऊ शकतो. आणि किती तोडायची बाकी आहेत आणि कोर्ट मॅटर किती आहेत? याची संख्या पुढील सभेत उपलब्ध करुन देउ

**शशिकांत भोईर :-**

धन्यवाद. त्याबददल माझा दुसरा प्रश्न आहे. गोडदेव स्मशानरोडला एक अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले आणि पुन्हा तिकडे ते उभे राहिले त्याच्यावर आपण पुन्हा कारवाई का केली नाही?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

ज्यावेळी पाडण्यात आले. त्यावेळी कोर्टाचा स्टे वगैरे नव्हता. नंतर कोर्टाचा स्टे आल्यानंतर आम्ही हात लावू शकलो नाही कारण कंन्टेम्प्टचे केसेस फार होतात आणि ते त्रासदायक ठरते कारण कोर्ट कंन्टेम्प्ट झाल्यानंतर आम्ही हात लावू शकत नाही याबाबत गोडदेवचे जे बांधकाम आहे याबाबत कागदपत्र तपासून सांगतो.

**शशिकांत भोईर :-**

जेव्हा आपण स्टे करतो. तेंव्हा कॅव्हेट महापालिकेने फाईल केलेले आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

कॅव्हेट दाखल केल्याशिवाय नोटीसच देत नाही. कॅव्हेट दाखल पहिल्यांदा करतो आणि मग नोटिस देतो.

**शशिकांत भोईर :-**

कॅव्हेट फाईल केल्यावर त्याच्यावर आपण काय काय कारवाई करु शकतो?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

तरीदेखील स्टे मिळतो.

**शशिकांत भोईर :-**

मग आपण उच्च न्यायालयात दाद मागितली का? समजा, ठाणे सत्र न्यायालयामध्ये आपल्याला दाद मिळत नसेल तर पुढच्या कोर्टामध्ये दाद मागितली का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मी व्यक्तिगत वकिलांशी चर्चा केली. स्टेवर जाता येणार नाही. पूर्ण दाव्याचा निकाल झाल्यानंतर जाता येईल. स्टे जर मिळाला त्यावर येता येणार नाही. असे त्यांचे म्हणणे आहे. तरीदेखील मी त्यांना अपिल करण्याविषयी सांगितले आहे.

**शशिकांत भोईर :-**

कृपया आपण जी माहिती दिली त्यावर सविस्तर माहिती मी ज्याप्रमाणे विचारली.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

सविस्तर माहिती देईन.

**शशिकांत भोईर :-**

पुढच्या सभेत दया.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आणि जवळजवळ जेवढी बांधकामे अनधिकृत होत होती म्हणजे कोणतीही परवानगी न घेता त्यावर ९० टक्के कंट्रोल आम्ही केलेले आहे. फक्त आता परवानगी घेऊन जी बांधकामे करता त्यामध्ये इलिगल आहे. त्याचा सर्व्हे चालू आहे. जस जसे आढळतात तसतसे तोडतो. आपल्या सर्व सभासदांना माहिती आहे की, गाव कसे निर्माण झाले? किती परवानग्या घेतल्या? आणि कशा बिल्डींग उभ्या राहिल्या हे नवीन सांगण्याची आवश्यकता नाही आहे. कारण सर्व सभासदांना माहिती आहे की हायवे पासून खाडीपर्यंत किती बांधकामे कशी उभी राहिली आणि कोणत्या पध्दतीने उभी राहिली? पण यावर आम्ही सर्व तऱ्हेने कंट्रोल केलेला आहे एक बांधकाम तोडायचे असेल तर दहा फोन येतात तरीदेखील आम्ही त्याचा विचार करित नाही. तोडूनच टाकतो. हे आपल्या सर्वांना माहितसुध्दा आहे आम्ही जास्तीत जास्त कंट्रोल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. जसे जसे होतात तस तसे तोडायला देखील पाठवतो आणि त्यामध्ये फक्त कोर्टाची अडचण आणि नोटिस दिल्याशिवाय तोडता येत नाही. कारण सुप्रीम कोर्टाची २६० खाली जजमेंट आहे की, तुम्ही नोटिस दिल्याशिवाय तोडायला जाऊ नका. म्हणून नोटिस दिल्याबरोबर लोक कोर्टात जातात. कोर्टातली जी अडचण आहे ती आम्ही वकिलांशी सविस्तर सांगितले आणि वकिलांना पत्रही पाठविले आहे की, यामध्ये सब इंटरेस्ट करण्यापूर्वी म्हणजे थर्ड पार्टी इन्टरेस्ट क्रिएट करु नका आणि स्टे दाखल मात्र लवकर करा असे विनंती पत्र देखील पाठविले आहे. आता लवकर स्टे पण दाखल होतात आणि थर्ड पार्टी इन्टरेस्ट करु नका म्हणून पंधरा वीस दिवसापूर्वी आम्ही पत्रदेखील लिहिलेले आहे. जेवढे प्रिकॉशन घेता येईल, अनधिकृत बांधकामासंबंधी त्यावर कंट्रोल करण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

नवघर गावामध्ये एक पूर्वापार रस्ता नगरपालिकेने तयार केलेला होता. अशा रस्त्यावरती एका महाशयाने त्याच्यावर बांधकाम करुन तो रस्ता बंद केला होता. नगरपालिकेने कारवाई करुन तो रस्ता तोडला. त्या रस्त्यावरचे बांधकाम तोडले. आणि त्याने मग परत कोर्टात गेल्यानंतर स्टे आणला महानगरपालिकेने त्या स्टेच्या विरोधात काहीही केलेले नाही. मधल्या काळामध्ये सन्मा. आयुक्त साहेबांना हे प्रकरण दाखविले. त्यांनी सांगितले की या रस्त्यावर त्यांनी नवीन गेट लावले आहेत ते काढून टाकावेत आणि त्यांच्यावर १३३ खाली कारवाई करावी. त्या दिवसापर्यंत आपल्या अतिक्रमण विभागाने त्या केसमध्ये काय झाले हे सुध्दा मा. आयुक्तांच्या निदर्शनास आणले नाही. या गोष्टीला फक्त तीनच दिवस झाले. बराच वेळ कर्मचारी तो गेट काढायला गेले नाहीत. कारण सार्वजनिक रस्त्यावर असा गेट लावता येत नाही. तो रस्ता १९९७-९८ च्या दरम्यान आताचे उपआयुक्त तत्कालिन मुख्याधिकारी केळकर साहेब यांच्या कालावधीत झाला होता त्याच्यावर नगरपालिकेच्या दिवाबत्तीचीसुध्दा स्ट्रीट लाईटसुध्दा लावलेली आहे आणि जेंव्हा दोन चार तासाने फाईल आली तेंव्हा त्याच्यावर असे कळले की निकालसुध्दा लागलेला आहे आणि त्या निकालाची प्रत आजपर्यंत या महानगरपालिकेत नाही आहे. ही एकदम खेदाची बाब आहे मला वाटते अनधिकृत बांधकामाबाबत आपले अशा प्रकारचे धोरण का आहे? आपण कोणाला पाठीशी घालता की काही राजकीय दबाव आपल्यावर आहेत आणि ही जेंव्हा ऑर्डर मी पाहिली तेंव्हा त्या ऑर्डरमध्ये स्पष्टपणे अस दिसत आहे की नगरपालिकेसाठीच काम करणारी लोक हे त्या पिटीशनरच्या बाजूने साक्ष देतात ही तर आणखीन महत्वाची बाब आहे उद्या आयुक्तानी जाउन त्यांची बाजू कोर्टात मांडावी बरे आहे म्हणजे अनधिकृत बांधकाम करण्यासाठी नगरपालिकेबरोबर ज्या संस्था एजन्सी काम करतात. तिथे लोक जाऊन त्यांच्या बाजूने साक्ष देतात आणि ऑर्डर झालेली आहे ती आज ही नगरपालिकेमध्ये उपलब्ध नाही आहे आणि मग आपण कोणत्या जोरावर अनधिकृत बांधकाम करणाऱ्यावर आपण कारवाई करणार? अशा प्रकारे आपले हे डिपार्टमेंट चालत असेल तर कृपया आपण त्याची दखल घ्या. ऑर्डर झाल्यानंतर आता अपिल करण्याची वेळसुध्दा निघून गेलेली आहे, हे पण तुम्हाला सांगतो. तरीसुध्दा आम्हाला कळले नाही फक्त वकिलांचे पत्र आहे. त्या वकीलांना ज्या डॉक्युमेंट द्यायच्या होत्या त्या दिल्या नाहीत आणि ज्या डॉक्युमेंट दिल्या त्या ठिकाणी असलेल्या क्षेत्रीय अधिकाऱ्याने एकदम चुकीची माहिती दिली आहे. म्हणजे खोटी माहितीसुध्दा क्षेत्रीय अधिकारी देतात की, ज्याच्यामुळे पिटीशनरला एक फायदा मिळतो. तर तिथे असणाऱ्या क्षेत्रीय अधिकाऱ्याने ए बी सी डी असे चार रस्त्याचे भाग दाखविलेले आहेत आणि बी टू सी एवढ्याच ठिकाणी नगरपालिकेचा रस्ता आहे. दुसऱ्या ठिकाणी नाही आहे असे नकाशावर प्रमाणित केलेले आहे आणि म्हणून ही केस कोर्टामध्ये आपल्या नगरपालिकेच्या विरोधात लागलेली आहे आणि

म्हणून अशा क्षेत्रीय अधिकाऱ्यावर आपण ताबडतोब कारवाई करा. नाईक साहेब आपण एक बिल्डींग पाडली होती. धाराशाही गेलेली. पूर्ण स्लॅप सगळे तोडलेले. ती बिल्डिंग आता परत टुमदारपणे उभी राहिलेली आहे. मला वाटते आपण पाडली ती चुकीची पाडली का? मग त्याचे कॉन्ट्रीब्युशन देण्याची व्यवस्था करू या आणि ती जर चुकीची पाडली असेल तर पुन्हा तिन्ही स्लॅप काय पटापट टाकता येत नाहीत हीसुध्दा बाब माझ्या वार्ड मधील आहे. अशा प्रकारे अनधिकृत बांधकामाला क्षेत्रीय अधिकरीच पूर्णपणे पाठींबा देत आहोत. त्यामुळे या क्षेत्रीय अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित करावे. त्याची चौकशी पेन्डीग ठेवावी आणि त्यांना ताबडतोब निलंबीत करावे. मी ठराव मांडत नाही मी पुढच्या वेळी प्रस्ताव नक्कीच आणेल की, अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा आणि सर्वांना माहिती आहे तीन तीन माळे झाले त्याला लाईटसुध्दा लागली इलिगल कनेक्शनसुध्दा लागत होते. पण त्यावेळी अधिकाऱ्यांना मी कळविले त्यामुळे ते सर्व पाईप ते काढून घेऊन गेले. अशा परिस्थितीमध्ये क्षेत्रीय अधिकारी आपले काम बरोबर करतात की नाही ही संशयाची बाब आहे. म्हणून आपण सगळया विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे याबाबत जाब विचारणे गरजेचे आहे असे मला वाटते.

**रिटा शाह :-**

माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील साहेबांनी सांगितले नगरसेवकाकडे माहिती आहे. पण आपल्याकडे एवढे इंजिनिअर होते. आता त्याच्यावर सिटी इंजिनिअर आले. तीन तीन उप आयुक्त आपल्याकडे आहेत आणि खेदाची गोष्ट आहे, दुःखाची गोष्ट आहे की, त्यांच्याकडे अनधिकृत बांधकामाबाबत काही माहिती नाही जेंव्हा ते नगरसेवक एवढे एवढे पत्र टाकतात त्याचा काही जवाब त्यांच्याकडून नाही विचारायला गेले तर माझ्यापर्यंत पोहाचले नाही माझ्या टेबलापर्यंत आले नाही ठिक आहे तुमच्याकडे माहिती नाही आम्ही लोकप्रतिनिधी आहेत आणि आमच्याकडे माहिती आहे. गार्डन रिझर्वेशन ५२६ पार्ट २ आणि गार्डन रिझर्वेशन ५२६ पार्ट ३, तिथे बिल्डींग झालेली आहे? अनधिकृत बांधकाम प्रथमेश बिल्डिंग मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या समोरच बांधलेली आहे. तिथेही वाढीव बांधकाम झालेले आहे. मिरा रोड सर्व्हे नं ४९८ डी. पी. रोडचे ते रिझर्वेशन आहे. तिथेही बिल्डींग झालेली आहे. त्याचा सर्व रिपोर्ट सुध्दा मी आणून दिलेला आहे. थोडासा स्टिल तोडले. थोडीशी वॉल तोडली आणि ते डी. पी. रोड करायला नको की करायचा आहे तो प्रश्न वेगळा आहे. पण तिथे देखील आपण काय कारवाई केली. नगरसेवकांना खुश करायला सांगतात की, आम्ही वॉल तोडले. स्टिल तोडले. तुम्ही तो रस्ता मोकळा करणार आहात की नाही. तो प्रश्न आहे जैसल पार्क रमेश अपार्टमेंट तिथेही वाढीव बांधकाम झालेले आहे. सर्वे नं ५०० रुडा अपार्टमेंट तिथे देखील वाढीव बांधकाम झालेले आहे. निलम पार्क तिथेही वाढीव बांधकाम झालेले आहे. ते कोर्टात गेले त्यानी स्टे आणला. त्याच सर्वे नंबरमध्ये निलकमल बिल्डिंग बांधली आहे त्याला कशी सी.सी. दिली आपण. संघवी टॉवर, त्याला ए बी सी डी इ ही बिल्डिंगला सी.सी. आहे. एफ बिल्डींग अशीच उभारली. आपले एरिया ऑफीसर काय करतात? ते रिपोर्ट सादर करतात की नाही. साहेब हे जे सर्व चालले आहे ते चुकीचे चालले आहे. शेवटी नगरसेवक फोन करतात, हे फोन करतात, ते फोन करतात, हे सर्व चुकीचे चाललेले आहे. ज्यांना बांधकाम तोडायचे आहे. त्यांना रिझर्व्हेशन मोकळे करायचे आहे. आपण आरक्षणाबाबत एवढ्या मोठ्या मोठ्या बोंबा मारतो. आरक्षण आपल्याला ताब्यात घ्यायचे, हे करायचे, ते करायचे. आपल्या रोडचे आरक्षण नाही. आपल्या गव्हर्नमेंट गार्डनचे आरक्षण नाही. तिथे बिल्डींग उभारतात. आपण झोपा काढतो आणि शेवटी बोलतो आमच्याकडे काही कलेक्शन नाही. आम्ही कलेक्शन घेणार आहे आणि अनधिकृत बांधकामाची आमच्याकडे जेंव्हा कम्लेंट आली की आम्ही तोंडतो हे उत्तर बरे नाही कारण आपल्याकडे एरिया ऑफिसर आहे. नगरसेवकांनी कशाला कम्प्लेंट करायला पाहिजे आणि साहेब नगरसेवकानी कम्प्लेंट केली तर ती दुःखाची गोष्ट आहे. काल मी स्थायी समितीमध्ये कम्प्लेंट केली. काल माझ्याकडे रात्री धमकीचा फोन येणे बरे आहे का? काल मी स्थायी समितीमध्ये सर्व अनधिकृत बांधकामाबददल कम्प्लेंट केली. काल माझ्याकडे धमकीचा फोन आलेला आहे. त्याची मी कम्प्लेंट करायला जाणार आहे. मी ऑफिसरचे नाव त्यामध्ये टाकणार आहे. त्यासाठी मी सभेची मंजूरी मागत आहे. कारण ही सर्व गोष्ट आपले ऑफिसरच करतात. मग कुठल्या ऑफिसरचे नाव टाकायचे? आणि कुठल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कुठे नाव टाकायचे कम्प्लेंट दाखल करताना हे मला पहिले नक्की कळू द्या. कारण एका महिला नगरसेविकेने डेरिंग करुन आपल्या शहरामध्ये चाललेल्या एवढे पत्र टाकले. तर एकाही पत्राचे उत्तर माझ्याकडे नाही आहे आणि

साहेब सांगतात की, अनधिकृत बांधकामाचे जसे जसे फोन आले तशी तशी आमची तोडफोड चालू आहे तुमची तोडफोड चालू असेल तर हे काय चालले आहे?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. महापौर महोदय, ही पत्र १३ तारखेला आलेली आहेत. १३ तारखेला जी पत्र आली आहेत ती बांधकामे केंव्हा झाली आहेत? कोणत्या सालात झाली आहेत? आणि किती वाढीव झालेली आहेत? आणि कुठला पार्ट तोडायचा हे संबंधित इंजिनिअरना पाठवून पत्र आल्यानंतर कोणत्या सालात ती झाली आहेत ही खात्री करुन घेतल्यानंतर त्याला कोर्टाची मनाई आहे की नाही? स्टे आहे की नाही हे ते बघून कुठला पार्ट तोडायचा? हे १३ तारखेला आलेली पत्राची उत्तर हे आठ दिवसातच अपेक्षित करणे. आम्ही नागपूरला दोन दिवस होतो. तीन दिवसानंतर आम्ही आलो आणि पत्र ही आम्हाला काल मिळाली. काल मिळाल्यानंतर संबधित अधिकाऱ्यांना बोलावून तपासणी करायला सांगितले म्हणजेच १३ तारखेला आलेल्या पत्राचे उत्तर लगेचच पाहिजे आणि आम्ही काय इललिगल आहे? काय इलिगल नाही. हे खात्री करुनच उत्तर द्यावे लागेल. कोणत्या सालातील बांधकाम आहे हे बघायला लागेल. कारण काही काही ठिकाणी पूर्वीच्या बांधकामात थर्ड पार्टी इन्टरेस्ट क्रिएट झालेली आहे. काहीच्यावर मनाई आहे. आम्ही तोडले तर आमच्यावर कन्टेम्प्ट होईल आणि टोटली बांधकाम परवानगी मी यापूर्वीही पाटील साहेबांच्या उत्तरामध्ये सांगितले होते की, परवानगी घेउन बांधले परंतु त्यात अनधिकृत काय आहे? आणि किती आहे? याचा सर्व्हे करायचे काम चालू आहे. जसा जसा सर्वे आम्हाला प्राप्त होतो. तस तसे तोडायला पाठवतो आहे त्यामधील हे असतील तर तोडायला पाठवू आणि गार्डन रिझर्व्हेशन मधील तीन वेळा बांधकामे तोडली होती. तीन वेळा तोडल्यानंतरसुध्दा कोर्टातून मनाई आली. मनाई असताना देखील आम्ही तोडली तर कंन्टेम्प्ट होईल. आपल्याला सर्व वॉर्डमध्ये सर्व कौन्सिलरना माहिती आहे की, टोटल अनधिकृत बांधकामे कोणतीही परवानगी न घेता उभी राहतात का? पूर्वी काय होत होते आणि आता काय होत आहे याचे मी खोटे प्रदर्शन करू इच्छित नाही. पण आपल्याला सर्व कौन्सिलरना माहिती असेल की, आपल्याला टोटल अनधिकृत किती बांधकाम आणि परवानगी घेऊन केलेली बांधकामे यामध्ये अनधिकृत बांधकामाचा पार्ट आपण तोडायचा आहे? याचा अहवाल आम्ही ए.डी.टी.पी. कडून घेऊ आणि त्यावर कारवाई करू आणि आपल्याला कारवाई केलेली कळवू देखील. परंतु १३ तारखेला आलेली पत्रे आज शहानिशा करुन मला मिळावी हे योग्य होणार नाही आणि अनधिकृतवर कारवाईच करत नाही हे ही म्हणजे योग्य ठरणार नाही. कारण आपल्याला सगळयाना माहिती आहे की, अनधिकृत बांधकामावर सर्वसाधारणपणे सगळया कौन्सिलरनासुध्दा कल्पना आहे की, तक्रार आल्याबरोबर आम्ही पाठवतो. टोटल अनधिकृत असेल तर लगेचच तोडतो. मात्र परवानगी घेउन बांधले असेल तर थोडासा उशीर होतो.

**महेन्द्रसिंग चौहान :-**

मा. महापौर महोदय नाईक साहबने जो बताया की सब नगरसेवकोको मालुम है किस तरह के अनधिकृत बांधकाम पे कार्यवाही की जाती है। मै आपको समक्ष बताता हुँ। आयुक्त महोदय एक सालसे सतत एक बिल्डिंग की कम्प्लेंट करने पे जिसका संबंधित लेटर मधुकर पिचड साहब का आया। दस बार आपसे रिक्वेस्ट की। सारी सोसायटी आयी। उनका गटर का पानी थोडासा तोडने से क्षेत्रीय अधिकारीने गलत रिपोर्ट देकर उनका स्टे दिलवा दिया। अभी तक पुरी की पुरी बिल्डिंग खडी है। मिस्टर नाईक साहब का ये बोलना की नगरसेवकोको सबकुछ मालुम है। ऐसा कुछ मालूम नही है। आपके अधिकारी आपके क्षेत्रीय अधिकारी को सब मालुम है। आपके नीचे लोगो को मालुम है। आपके पास दस बार केबीन मे आया। आपने आज तक रॉयल कॉलेज बिल्डिंग के पिछे का पोर्शन जो बिल्डिंग बनाके खडी है। उसके दरवाजे खिडकी चोरी से लग रहे थे। उसकी भी रिपोर्ट की। मधुकर पिचड का संबंधित लेटर आपके पास भी आया। आपने कोई कारवाई नही की।

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

कितनी बार तोडा।

**महेंद्रसिंग चौहान :-**

ये पुछिए अपने अधिकारीयो को ये तोडना होता है? एक जरासा तोड के चले जाना। बाद मे मजे करना। शामको होटल मै बैठना। दिस इज नॉट द प्रॉपर वे। ये जो अनधिकृत डिपार्टमेंट है। उसके लिए आप चौकशी करिए। एक साल हो गया। दुसरा मॅटर भाईन्दर वेस्ट मे एक बिल्डिंग सोसायटी है। उसके नीचे चार मजदुरोको रहने का रुम बना दिया। सोसायटीने व्यवस्थित इनके

पास ये किया। सन्मा. सदस्य मिलन पाटील को मालुम है, लेकिन इनके क्षेत्रीय अधिकारीयोंने इनको कोशिश करके एक थर्ड पार्टी के नाम से स्टे ले के यहॉ सबमिट कर दिया। मिस्टर म्हात्रे है उनको पुछिए किस तरह से इन्होने उनको बता दिया की ये काम आप करिए। आपका बच जाएगा। चार सर्व्हेन्ट रह रहे है। सोसायटीसे कुछ मतलब नही है और अभी तक नही तोडा गया। एक साल हो गया।

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

तीन बार वो बिल्डिंग तोडा।

**महेंन्द्रसिंग चौहान :-**

नाईक साहब ये सभागृह ये नगरसेवकोने आपको प्रस्तुत किया है। इस तरह की बात बोलना मुझे ठिक नही लगता। ये हमारे नगरसेवकोका अपमान है की, हमको मालुम है और बांधकाम चल रहा है। मुझे मालुम है मेरे पास किसी का फोन आया। किसीको बोला क्या? नाईक साहब बिल्डिंग मत तोडीये।

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.) :-**

किसका आता है यह बोलने की जरुरत नही है।

**महेन्द्रसिंग चौहान :-**

आयुक्त महोदय कायदा कानुन के लिए हमारे यहॉ आयुक्त महोदय, उपआयुक्त है। पुरा डिपार्टमेंट है। बांधकाम है। टि.पी. प्लॅनिंग है। उनके सबके होते हुए भी ये हालत है। एक साल सतत मधुकर पिचड की शिफारस है की, यह बिल्डिंग तोड दी जाय। ये गार्डन का प्लॉट है। इसमे गार्डन बनाया जाए। आज तक तोडी नही गयी। उसका संरक्षण क्षेत्रीय अधिकारी वहाँ पर दे रहा है। तो ऐसे हम लोग बोल के रह जाते है। हमारे उपर आक्षेप आ जाता है। अभी उन्होने शिकायत की लेकीन हम लोग उसको कहाँ तक सहन करे। हमने आज मि. नाईक को पुरस्कृत किया। अब ये सुनने के लिए बैठे है। हमको मालुम है अनधिकृत काम हो रहा है। प्लीज ऐसा मत बोलिए।

**रिटा शाह :-**

महापौर मॅडम, उपआयुक्त साहेबांनी सागितले आमचा त्यांच्यावर आरोप नाही आहे. ते वेगळे समजतात. फक्त खेदाची गोष्ट अशी आहे की ते काही उठून सर्व्हे करायला जाणार नाहीत. त्यांना ऑफिसमध्ये बसून जेवढी माहिती देणार तेवढीच माहिती ते घेणार. आपल्याकडे क्षेत्रीय ऑफिसर आहेत. जेव्हा नगरसेवकाला माहिती पडते की, एवढे वाढीव बांधकाम झाले आहे. एवढे वाढीव बांधकाम चालू आहे. ते क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे काम आहे. क्षेत्रीय अधिकारी धनेगावे साहेबांना सांगतात. धनेगावे साहेब सिटी इंजिनिअरला सांगतात. पण खेदाची गोष्ट अशी आहे की, नगरसेवकांनी कम्प्लेंट केली की दुसऱ्या दिवशी ते लिक आऊट होते आणि ते बिल्डरच्या अमुक तमुक लोकांचे धमकीचे फोन येतात. त्याच्याबद्दल नाईक साहेब आपण काय उत्तर देणार? तुमच्यावर आम्ही आरोप लावत नाही की, तुम्ही काय करतात. तुम्ही ऑफिसमध्ये बसुन तुम्हाला काहीच माहिती पडत नाही. तुमच्या क्षेत्रीय अधिकाऱ्याची जबाबदारी आहे की, कुठे वाढीव बांधकाम चालू आहे. वाढीव बांधकाम करतात, चालू आहे आणि झालेले आहे. गार्डन रिझर्व्हेशनमध्ये आपण आता मान्य केले की बिल्डिंग झाली.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

त्या केसमध्ये काय झाले की, तटकरे साहेबांच्याकडे हेअरिंग झाली.

**रिटा शाह :-**

आपण मला बोलू द्या. नंतर जवाब द्या. कुठलाही उपआयुक्त बोला की कमिशनर बोला. कुठलाही ए ग्रेडचा ऑफिसर ऑफिसच्या बाहेर जाऊन सर्व्हे करीत नाही. सर्व्हे करायचे काम क्षेत्रीय अधिकाऱ्याचे आहे. त्यानंतर इंजिनिअर आणि सिटी इंजिनिअर येतात. वेस्ट आणि ईस्टचे पण हे लोक संपूर्ण माहिती ह्याच्याकडे पुट अप करित नाही. दुसरी गोष्ट जेव्हा तोडायचे गळ्यापर्यंत येतात. तेंव्हा ते तोडायला जरुर जातात. पण जायच्या अगोदर बिल्डरला सांगून जातात. साहेब ही खरी गोष्ट आहे की, आम्ही तुमच्याकडे अमुक अमुक तारखेला तोडायला येणार आणि आमची ती मजबुरी ते आम्हांला तोडावे लागेल आणि नुसती वॉल तोडणार, हे तोडणार, भिंत तोडणार. कॉलम आणि बीम तोडणार नाही. नुसते दाखविण्यासाठी ते तोडतात. हे असे चालले असेल तर साहेब ह्याच्यामध्ये चांगल्या ऑफिसरचे नाव खराब होणार. कारण मी कोणावर क्लेम लावत नाही. कारण हा शहराचा प्रश्न आहे. नाईक साहेबांनी आता सांगितले की, सरपंचाच्या वेळी आणि आमच्या पहिल्या इलेक्शनच्या

वेळी दुसरे इलेक्शन त्या तीन्ही वेळी मी होती. त्यांना कमी माहिती असेल. मला जास्त माहिती आहे. पण जेव्हा महानगरपालिका आल्यानंतर, आपल्याकडे आलेले ऑफिसर आल्यानंतर अशा प्रकारचे काम चालू राहणार. ती दुःखाची गोष्ट आहे. कारण तुमचे क्षेत्रीय अधिकारी तुमच्यापर्यंत गोष्ट पोहोचवत नाहीत. ते मोजमाप करत नाही. कारण आपण त्यांना ओ.सी. देत नाही का? सी.सी. देत नाहीत का? बी.पी. रोडवर संपूर्ण बिल्डींग आली. बिल्डींग एका दिवसांत होत नाही. दिड वर्षामध्ये बिल्डिंग होते. दिड वर्षामध्ये झाली तर आपले क्षेत्रीय अधिकारी काय करत होते? आमच्या नगरसेवकांना १३ तारीख माहिती पडले. पण आपले क्षेत्रीय अधिकारी आपल्या महानगरपालिकेचा पगार घेतात. मग ते काम काय करतात. मग तुम्ही त्यांच्यावर काय कार्यवाही करणार आहेत?

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते आताच आपल्याला नाईक साहेबांनी सांगितले की, सर्व नगरसेवकांना माहिती असते बांधकाम कशी होतात? काय होतात. कुठल्याही नगरसेवकाला माहिती नसते की, बांधकामे कशी बांधली जातात. परंतु यामध्ये आपले अधिकारीच जबाबदार आहेत असे मला तरी वाटते. कारण माझ्या प्रभागामध्ये मागच्या वेळी दोन तीन महिन्यापूर्वी एक बांधकाम झाले. त्यावेळी मी आपल्या अधिकाऱ्यांना येऊन सांगितले सुध्दा. पण अधिकाऱ्यांनी कोणीही या ठिकाणी लक्ष दिले नाही. फक्त एवढेच सांगितले की, एखादा क्लार्क किंवा कोणी असले तर तो सांगतो की, बांधकामाला परमिशन या माणसाने दिली, त्या माणसाने दिली, ज्या कोणी दिली असेल त्याची शहानिशा करा आणि त्याची चौकशी करा. कारण हे बांधकाम माझ्या प्रभागामध्ये झालेले आहे आणि त्या गोष्टीचे मी म्हात्रे साहेबांना पण तीन महिन्यापुर्वी सांगितलेले होते, म्हात्रे साहेब हे बांधकाम झालेले आहे. तर या गोष्टीकडे म्हात्रे साहेबांनी देखील दुर्लक्ष केलेले आहे.

**नितीन ठाकूर :-**

महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो, आता नगरपालिकेची महानगरपालिका झालेली आहे. जे बिल्डर लोक आपल्याकडे प्लॅन पास करुन घेण्याकरिता येतात. त्याचे प्रोसिजर काय आहे? प्लॅन पास करायला टाकल्यानंतर तो किती दिवसामध्ये नगरपालिकेने किंवा महानगरपालिकेने पास करुन दिला पाहिजे. याची माहिती आम्हाला मिळेल का?

**एस. आर. शेंडे :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो. बांधकाम परवानगी मिळविण्यासाठीचे प्रोसेस आपल्या शासनाने मंजुर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये दिलेले आहे आणि एम. आर.टी.पी. ॲक्टमध्येसुध्दा तरतुद आहे. संपूर्ण कागदपत्रासह प्रस्ताव सादर झाल्यानंतर साठ दिवसाच्या आत परवानगी दिली जावी अशी कायद्यात तरतुद आहे.

**नितीन ठाकूर :-**

अशी तुम्ही किती प्रकरणे साठ दिवसामध्ये पूर्ण केली.

**एस. आर. शेंडे :-**

संपूर्ण कागदपत्रासह जर आली तर कारवाई करण्यात येईल .

**मा. आयुक्त :-**

आपल्याला जी काही माहिती हवी आहे. आम्ही लेखी दयायला तयार आहोत.

**नितीन ठाकूर :-**

साहेब याला जबाबदार प्रशासन आहे. हा जो विषय चाललेला आहे.

**मा. आयुक्त :-**

मला उत्तर देता येणार नाही. कारण वेळ संपलेली आहे.

**नितीन ठाकूर :-**

आता आयुक्त साहेब बोलले सर्व नगरसेवकांना माहिती आहे की, अनधिकृत बांधकामे कशी होतात? याचा अर्थ नगरसेवकांना हे माहिती नाही की, अनधिकृत बांधकामे कशी करायची? तुम्ही माहिती द्या ना. किती वेळा तुम्ही रिव्हाइस प्लॅन पास करता? रिव्हाइस प्लॅन पास करायला किती वेळ लागतो. तुम्ही मला माहिती द्या. किती रिव्हाइसची पेन्डीग प्रकरणे आहेत. तुम्ही काय करता? अधिकारी लोक काय करतात? त्याची फी किती आहे? ते तुम्ही सांगा. ऑफिशिअली किती? अनऑफिशिअली किती? तुम्ही फी सांगा.

**एस. आर. शेंडे :-**

ऑफिशिअल अनऑफिशिअल प्रश्न नाही. आपण विचारले किती दिवसाची तरतुद आहे? तर साठ दिवसाची तरतुद आहे. सर्व कागदपत्रासह प्रस्ताव सादर झाल्यानंतर आणि रिव्हाईस करण्याची सुध्दा तीच प्रोसिजर आहे.

**नितीन ठाकूर :-**

साहेब, तुम्ही अशी प्रकरणे पूर्ण करता का? साठ दिवसामध्ये तुम्ही रिव्हाइस प्लॅन पास करण्याचे काम पूर्ण करता का?

**एस. आर. शेंडे :-**

सर्व कागदपत्रासह सबमिट झाले तर करु.

**नितीन ठाकूर :-**

आता तुमच्याकडे प्रकरणे आहेत. त्याचे पेपर क्लिअर आहेत का? तुम्ही बिल्डर लोकांना कळविता का की, हे कमी आहे, ते कमी आहे.

**एस. आर. शेंडे :-**

ते आम्ही त्यांना कळवितो.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो माझा प्रश्न नाही आहे. सभागृहाच्या दृष्टीने एक अत्यंत चांगली माहिती मिळाली म्हणून त्याचा खुलासा मागतो आहे. मघाशी जसे नाईक साहेबांनी सांगितले की, कॅव्हीट दाखल केल्यानंतर सुध्दा स्टे मिळतो. म्हणजे आमच्यासारखा सरळ माणूस म्हणजे कॅव्हीट दाखल झाले म्हणजे सगळे काही झाले असेच समजत होता. याचे नीट जर सविस्तर असे विश्लेषण केले तर सभागृहाला नक्की माहिती मिळेल की, महापालिकेचे अधिकारी त्यामध्ये कुठेतरी अडकतात. आमचा गैरसमज होतो किंवा नाही होतो किंवा मग ते कॅव्हेट दाखल केल्यानंतर जर स्टे मिळतो. तर त्याचे पुढील पर्याय काय? आपण कॅव्हेट दाखल केल्यानंतर स्टे मिळाला मग आपण त्याला पुढे कुठेतरी अपील करु शकतो का? जर ही नियमावली असेल तर ती सांगा आणि एक छोटासा प्रश्न असा की, कॅव्हेट दाखल केल्यानंतरसुध्दा किती लोकांना स्टे मिळाला. म्हणजे मी कशासाठी विचारतो लक्षात आले असेल की, मान्यवर लोकच त्यामध्ये एक्सपर्ट आहेत आणि त्यांच्याकडून काम होऊ शकते. दुसऱ्या सर्वसाधारण माणसाला एकदा कॅव्हेट दाखल केले. तो अर्धा मेला झाला आणि मग माझ्यासारखा स्टे घेतला. अशा कोणकोणत्या प्रकरणामध्ये स्टे मिळालेला आहे. तर ह्याच्याकडे कॅव्हेट दाखल करुनही ह्या कंपनीलाही स्टे मिळतो. आम्ही मग त्यांचादेखील सल्ला घेऊ किंवा आम्ही त्यांच्याकडे पाठवू.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

जे कॅव्हेट घेऊनही स्टे मिळालेले आहे.

**प्र. सचिव :-**

जयाबाई यशवंत भोईर, सौ. हेलन जॉर्जी गोविंद, भानु भगवान पाटील, अशोक पाटील यांचे रजेचे अर्ज आलेले आहेत. मंजुर झालेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम, मागच्या वेळी मी मा. आयुक्त साहेबांना विचारले होते. माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. अजूनही माझ्या तीन प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. म्हणजे मी प्रश्न विचारलेला आहे. दि. १७/१०/२००३ आणि आज बारावा महिना आहे. काल स्थायी समितीची सभा झाली. त्या सभेमध्ये रिझर्व्हेशन प्लॉटवर बोर्ड लावण्याच्या प्रकारच्या टेन्डरची मंजुरी होतो की, आपण आरक्षित जागेवर बोर्ड लावायचे आहे. मी त्याबद्दल दहाव्या महिन्यात प्रश्न विचारलेला आहे. बोर्डाची स्थायी समितीने मंजुरी दिली. म्हणजे ती आरक्षित जागा त्या ठिकाणी आहे का नाही? कारण आता जो उल्लेख झाला तीन आरक्षित जागेवर बिल्डिंग झालेली आहे. म्हणजे एक प्रशासन काम करतो. भूखंड नाहीच आहे. दुसऱ्या ठिकाणी तो बोर्ड लावायला सुरुवात करतो. म्हणजे बोर्ड लावणार तरी कुठे भूखंड नाहीच आहे. तर बोर्ड कुठे लावणार आहेत, म्हणून माझे तीन प्रश्न आहेत. त्याची अजून माहिती मला मिळालेली नाही. साहेब मागच्या वेळी आपण मला सांगितले होते की मी तुम्हाला लेखी उत्तर देणार. साहेब माझा प्रश्न क्र. आहे ५३ चा २.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

सगळे जे स्टे मिळतात. ते ग्रामपंचायतीच्या प्लॅन मंजूरीनंतर.

**मोहन पाटील :-**

महापौर मॅडम, प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे आणि आता हा कोणता विषय चालू आहे? नाईक साहेब इतिवृत्तांताचा विषय या ठिकाणी आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

५३ चा २ माझा हा प्रश्न आहे. मिरा भाईंदर मंजूर विकास योजनेत एकूण ३७६ आरक्षणे असून त्यापैकी शासकीय जागेत २७ आरक्षणे टाकून अन्य खाजगी आरक्षण म्हणजे या आरक्षणसंबंधी मी प्रश्न विचारलेला आहे. मला अजून उत्तर मिळालेले नाही. दुसरा पाण्याबद्दल मी प्रश्न विचारलेला आहे. त्यानी सांगितले पुढच्या महासभेत सविस्तर टिपणी देऊ. पण अजूनपर्यंत टिपणी दिलेली नाही. काल स्थायी समितीमध्ये विषय होता. आरक्षित भुखंडावर बोर्ड लावणे. बोर्ड कुठे लावणार? झाले असेल तर बोर्ड लावणार.

**मा. आयुक्त :-**

भुखंडाची साधारण जागा माहिती असते. सर्व्हे एवढ्यासाठी करायचा असतो की, त्याचे निश्चित क्षेत्र आपल्याला उपलब्ध करुन घ्यायचे असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण माझे उत्तर तर दिले पाहिजे. ३७६ आरक्षण किती खाजगी आहे? किती जागा आज उपलब्ध आहे? नाही आहे. आताच सभागृहापुढे हा विषय झाला की, भूखंडावर बिल्डींग झालेली आहे. ती माहिती मिळालेली नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, आपला प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. असे आपण बेल वाजवून आम्हाला सुचित केलेले आहे. मी मान्य करतो सन्मा. सभागृहाची भावना आहे. आयुक्त साहेब मी आपल्याकडे मुद्दामहून मा. महापौराच्या माध्यमातून आपलेही लक्ष वेधू इच्छितो की, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर, सन्मा. सदस्या रिटा शाह, त्याचप्रमाणे सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल ह्या मंडळीने या शहरातील अनधिकृत बांधकामे, बेकायदेशीर बांधकामे डि.पी. साईटवरची अतिक्रमणे वगैरेबद्दल ज्या गोष्टी व्यक्त केल्या ती खरोखर चिंतेची गोष्ट आहे. तथापि आपण एका विशिष्ट विषयावर मा. आयुक्त साहेब मी आपले लक्ष वेधू इच्छितो की, आपण कृपया आपल्या प्रशासनाला या बाबतीत अतिदक्ष राहायला सांगा. त्याना डोळे उघडे ठेवून काम करायला सांगा. कारण या शहराला आपल्याला चांगले रुप द्यायचे आहे. स्वरुप द्यायचे आहे. मा. महापौरांनी आपण प्रश्नोत्तराचा तास संपविलेला आहे. त्यामुळे मी आपल्याला विनंती करतो की, आम्हाला हा जो दुसरा मागील इतिवृत्तांत मंजुरीचा जो विषय आहे. त्याला आपण पुकारावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

आरक्षित बांधकामे झालेली आहेत. ही डि.पी. मंजूर होण्यापूर्वीच झालेली आहेत आणि डि.पी. मंजूर झाल्यानंतरही काही कालावधीत झालेली आहेत आणि आता जी आरक्षित जमिनी आहेत. टोटल ३८६ त्यावर झाल्या गेल्या आता आम्ही नोटिस न देता देखील कारवाई केली. तर आमच्या अंगलट येईल. म्हणून आपण आरक्षित जमिनीवर नोटिस दिल्यानंतर आता जे परवा मॅडमने जे उपस्थित केले. त्यामध्ये ले आऊट ग्रामपंचायतीचे मंजुर आहे. ग्रामपंचायतीचे एन.ए. आहे. आरक्षित जमिनीवर इलिगल बांधकाम होऊच देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी प्रश्न विचारलेला आहे आणि दोन-दोन महिने झाले तरी प्रशासनाकडून उत्तर मिळत नाही आहे. मागच्या सभेमध्ये साहेबांनी सांगितले मी उत्तर देतो. माझ्याकडे उत्तर आलेले नाही आहे. असेल तर मला कॉपी देऊन टाका.

**मा. महापौर :-**

उत्तर देणार. नसेल तर द्यायला सांगते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रश्न क्र. ४९ आणि ५३ या दोन्ही विषयाची माहिती.

**मा. आयुक्त :-**

माहिती दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझ्याकडे आहे. दिलेली आहे. पण एका प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही. दोन प्रश्न आहेत. आरक्षित जागेचा आणि पाण्याचा प्रश्न आहे.

**मा. आयुक्त :-**

उत्तर सगळी रेडी आहेत. सचिवांकडे दिलेली आहेत. आपल्याला मिळतील.

(प्र. सचिवानी प्रकरण ५५ चे वाचन केले.)

**मोहन पाटीलः-**

१७/१०/२००३ चे मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे आपल्या महापालिकेची मागील सभा दि. १७/१०/०३ रोजी घेण्यात आली होती. सदर सभेचा जो वृत्तांत यापूर्वी सर्व मा. सदस्यांना देण्यात आला होता व जो वृत्तांत आता सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे. तो वृत्तांत बरोबर असून आलेल्या दुरुस्त्यासह कायम करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. जेष्ठ सदस्य माजी सभापती मोहनजी पाटील यांनी आता जो या ठिकाणी ठराव मांडलेला आहे. दुरुस्तीसाठी आता सुरुवात होणार आहे. सगळया दुरुस्ती विचारात घेऊन या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ही जी पध्दत आहे. ती चुकीची आहे. सभागृहामध्ये आपण बसलो आहे. कोणीतरी उठायचे आणि डिक्लेअर करायचे. उद्या माझे वक्तव्य चुकीचे छापले असेल तर त्याला तो सदस्य जबाबदार आहे का? माझा पूर्ण नगरसेवक म्हणून अधिकार आहे की, माझे हे वक्तव्य चुकीचे आहे. हे सुधारा. बोलायचे काय एवढी घाई केली?

**मोहन पाटील :-**

कोणाला दम देता? असे बोलण्याची पद्धत बंद करा.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही बोलायचे ते बोलतो.

**मोहन पाटील :-**

बोलण्याची पध्दती बदला. ठराव या ठिकाणी मांडलेला आहे. त्या ठरावामध्ये दुरुस्त्यांसह ठराव बोलले आहे आणि सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी सांगितले. आपण चर्चा करावी. चर्चा करण्यापूर्वी कोणी गप्प बसले होते. चर्चा करावी.

**मिलन म्हात्रे :-**

पेज वाइस करा ना. नियम कायदा बदलणार. ते चालणार नाही

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, मी आपल्या सभागृहाच्या हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सभागृहाचे आजच्या तारखेचे कामकाज कशा पध्दतीने चालवावे यासाठी मा. महापौर साहेबांनी सर्व गटनेत्यांची बैठक बोलाविली होती. सन्मा. सदस्य रोहिदासजी पाटील, सन्मा. सदस्य आणि विरोधी पक्षनेते परशुरामजी पाटील याखेरीज अन्य सभासद, गटनेते या सभेला उपस्थित नव्हते. परंतु आम्ही अगोदरच्या मागच्या सभेत अशा प्रकारे आपण ठरविले होते की, वृत्तांत वाचताना दहा दहा पानाची स्लॉट आपण घेऊन त्याचा निचरा करावा. परंतु सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी अत्यंत तन्मयतेने गटनेत्यांच्या बैठकीत असे सांगितले की, आपण पाच पाच पानाचे स्लॉट पाडून त्यामधील काही दुरुस्त्या असतील. तर त्या जरुर घ्याव्यात. त्यामुळे आता विषय पुकारल्यानंतर प्रथेप्रमाणे ठराव आणि अनुमोदन हे पहिल्यांदाच होणार. आपल्याला जे काही व्यक्त करायचे तर संधी आहे. आपण ते व्यक्त करावे. त्या काही दुरुस्त्या असतात. आपणच नाही तर अन्य सभासदांनी सुध्दा इथपर्यंत की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी सांगितले, ग्रॅमॅटिकल मिस्टेकसुध्दा विचारात घेण्यात याव्यात. त्यामुळे महापौर साहेब आपण परवानगी द्यावी आणि ज्यांच्या कोणाच्या दुरुस्त्या असतील क्लेरिकल म्हणा, शब्दांच्या म्हणा, तर ती दुरुस्ती जरुर करुन घेण्यात यावी.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम, आता जे सभागृह नेत्यांनी सांगितले पुढचा विषय सुरु झाल्यानंतर मी बोललो आहे. परवा मला यायला मिळाले नाही. हायकोर्टाला माझी केस होती. मी फोनवर निरोप दिला होता. म्हणून मी येऊ शकलो नाही आणि मी स्पष्ट सांगितले. पण हे सभागृह चालू होताना तुम्ही कालच्या गटनेत्यांना सभेमध्ये काय झाले हे तुम्ही कळविले पाहिजे. आम्हाला कसे कळणार? मी त्या सभेला नव्हतो आणि जेव्हा सन्मा. सदस्य मोहन पाटील उभे राहिले किंवा सचिवांनी उठून पुढच्या प्रस्तावाचा नंबर वाचला. तेंव्हा तुमचे काम होते की, आमचे असे ठरलेले आहे आणि असे कामकाज होउ द्या. म्हणजे हा विषय उत्पन्नच झाला नसता. तुम्ही कृपा करुन जसे ठरले आहे. पाच पाचचा स्लॉट तुम्ही करा. आयुक्त साहेब कालच्या स्थायी समितीमध्ये अनुमोदक म्हणून माझे नाव होते. तिकडे गैरहजर असलेल्या सन्मा. सदस्य हरेश गावंडचे नाव प्रिन्ट केले गेले. या चुका ग्रॅमॅटिकल नाहीत आणि त्या अक्षम्यसुध्दा नाहीत. जाणूनबुजुन आहेत. उद्या एखादी जर सर्टिफाईड कॉपी कुठे गेली. कायदयाचे पुरावे म्हणून लागली तर त्याला जबाबदार कोण आहे? आपण म्हणतो तसे नाही. प्रशासनात कुठे सुसुत्रता आली पाहिजे. म्हणून आमची कळकळ आहे. आपण कृपया कामकाज सुरु करावे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की मघाशी माझी काही अडचण होती. म्हणून मी सभेला उशीरा आलेलो आहे. तरी माझा जो हा सुलभ शौचालयाचा प्रश्न आहे. हा प्रश्न पुढच्या सभेत ठेवण्यात यावा, अशी नम्र विनंती आहे. दोन नंबरचा पास झालेला नाही. त्याबददल मला उत्तर दिलेले आहे. ते समाधानकारक नाही. तरी हा प्रश्न पुढच्या सभेत ठेवण्यात यावा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की सभागृह नेते श्री. लिओ कोलासो यांनी सांगितले की, गटनेत्यांच्या बैठकीत जे ठरले त्याची पहिली अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही सभागृह नेत्यांची असते असे आम्ही मानतो. सभागृह नेत्यांच्या बाजूला त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष बसलेले असतात. त्यांना जर त्यांनी नीट समजावून सांगितले तर काही चुकायचे कारण होणार नाही. आता सभागृहात सन्मा. सदस्य मोहन पाटीलदेखील होते. पण त्यांनी तांत्रिक शब्द वापरला होता. मी सावध होतो की, इतरांच्या सुचना घेऊन पण ठराव मांडण्याचे, घाई करण्याचे काहीही कारण नाही. आपले नक्की ठरले होते की, पाच पाच पाने वाचायची. त्यामध्ये काही प्रशासकीय चुका असतील त्याही घ्यायच्या. सभासदांची वाक्यरचना चुकली असेल तर तीही घ्यायची आणि त्यासाठी जर वेळ जात असेल तर फार काही चुक होते असे होत नाही. असे मी नीट सांगितले. आपण मान्य केले. आपण उगाच सभागृहाचे चित्र तयार करतो की, आपण भांडतो. आपण कुणाशी भांडत नाही. आम्ही सभागृहात कमी असल्यामुळे आम्हाला दोन शब्द बोलण्याची संधी मिळायला पाहिजे. ही आमची अपेक्षा असते. तुम्ही जोरात बोलू शकता. सगळयांना ऐकायला जाते. आम्ही कधी अस्पष्ट बोलतो काही जणांना समजत नाही आणि समजावून घेत नाही. हे दुर्दैव होते म्हणून सन्मा. सदस्य लिओ कोलासो आम्ही पुन्हा विनंती करतो की, हे सभागृह पुढे चालवायचे आहे. आपण दखल घेतली तर आमच्यापैकी कोणाचे किलमिश होण्याचे कारण नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान २३ वर शेवटून सहावी ओळ दीस इज वन काइन्ड ऑफ क्रिएटेड बाय द ॲडमिनिस्ट्रेशन इज रायबल लिहिले आहे. त्या जागी लायबल म्हणा. पान क्र. २८ वर उपआयुक्त कल्याण केळकर साहेबांचे निवेदन आहे. १०/४/०३ पासून मध्यान्हानंतर मला वाटते ते चुकीचे आहे. त्यांनीच जरा खुलासा करावा. कारण त्यानी मध्यान्ह म्हटले नाही. मध्यरात्रीनंतर असेल. दुपारनंतर असे काही करता येत नाही. रात्री बारा नंतरच करता येते. कारण रात्री बारानंतर उपवास सुटतात. यामध्ये महत्वाची बाब अशी आहे. हा विषय ज्या वेळी आपण सभागृहात नव्हता आपण सुट्टीवर होता आणि आपल्या जागी सन्मा. खामतकर साहेब यांना चार्ज दिला होता आणि आपण निलंबनाची मुदत वाढविण्याची किंवा सभागृहातील कळविण्याची जी आपण माहिती दिली होती ती माहिती आपल्या प्रशासनाने जाणूबूजून लपवून ठेवली. असे त्या ठिकाणी आलेले आहे. पण त्याच्यानंतर एक महत्वाची बाब अशी घडली की, एकदा निलंबित केलेल्या माणसाला पुन्हा निलंबित करता येते का? तर असे करता येत नाही. आपण पूर्वी त्याना १०/४ पासून निलंबित केल्याचे पत्र दिलेले आहे. असे आहे की,

हा निलंबनाचा आदेश व जी निलंबनाची माहिती आपण कॉर्पोरेशनला बॉडीला द्यायला पाहतात. तर याच्यामध्ये प्रशासनाचा प्रामाणिक हेतू पाहिजे. सचिवांनी स्टेटमेन्ट केले आहे की, माझ्याकडे हा सभेच्या आदल्या दिवशी आला. म्हणजे प्रशासन तुमचेसुध्दा आदेश लपवून ठेवते का? सभागृहाकडे असे होता कामा नये. कृपया आपण त्याची दखल घ्या.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. २४ मध्ये ओळ क्र. ६ त्यास डिसमिसील असे झालेले आहे. बहुतेक डिसमिस किंवा डिसमिसल असेल. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांचे ओळ क्र. ६ मध्ये असे म्हणणे होते आणि त्याच्यापुढे ओळ क्र. ६ मध्ये कारण त्याना खालच्या पोस्टवर चुकीचे आहे. पोस्टवर म्हणजे डेजीग्नेशन असे आहे आणि पान क्र. ८ मध्ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलतात खालून तिसऱ्या ओळीवर आय.ए.एस. ऑफिस पाहिजे तर आय.एफ. झालेले आहे.

**मा. महापौर :-**

मंजूर आहे.

**प्रकरण क्र. ५५ :-**

दि. १७/१०/२००३ रोजीचे मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ४३ :-**

आपल्या महापालिकेची मागील महासभा दि. १७/१०/२००३ रोजी घेण्यांत आली होती. सदर सभेचा जो वृत्तांत यापुर्वी सर्व मान. सदस्यांना देण्यांत आला होता व जो वृत्तांत आता सभागृहाचे पटलावर ठेवण्यांत आलेला आहे तो वृत्तात (बरोबर असून आलेल्या दुरुस्त्यांसह) कायम करण्यांत यावा.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवानी प्रकरण ५६ चे वाचन केले. )

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम, आपल्या अनुमतीने मी बोलू इच्छितो. प्रकरण क्र. ५६ मध्ये तिसऱ्या ओळीत ज्या ठिकाणी जात पडताळणी पत्र आलेले आहे त्या ठिकाणी छोटीशी दुरुस्ती करुन घ्यावी. जात प्रमाणपत्र पडताळणी समिती असे आले पाहिजे. कास्ट सर्टिफिकेट व्हेरिफिकेशन कमिटी किंवा स्क्रुटीनी कमिटी असा शब्द आहे. त्यामध्ये ३१ डिसेंबर २००३ ही शेवटची मुदत आपल्याला देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मी आपल्याला सांगू इच्छितो आणि आपल्याकडून मला थोडीशी क्लेरिफिकेशन पाहिजे. पदोन्नती म्हणजे प्रमोशन हे खरे का? तर या ठिकाणी विभागीय जात पडताळणी समितीकडून तीन महिन्यात निर्णय प्राप्त न झाल्यास तपासणी समितीच्या निर्णयाच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्याची तरतूद आहे. तिथे तीन महिने म्हणजे जवळ जवळ बारा आठवडे. पण हल्ली मुंबई उच्च न्यायालयाने एक खंडपीठाने दिलेला निर्णय सी. के. ठक्कर व्हर्सेस सी.के टक्कर व श्रीमती रंजना देसाई मुख्य न्यायाधिश या खंडपीठाने दिलेला निर्णय सरकारी किंवा निम सरकारी म्हणजे सेमी गव्हर्नमेंट किंवा गव्हर्नमेंट नोकऱ्यामध्ये राखीव जागेवर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या जातीच्या दाखल्याची पडताळणी संबंधित कार्यालयाने दोन वर्षाच्या आत करावी असे आदेश मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ मा. मुख्य न्यायाधिश सी. के. ठक्कर व श्रीमती रंजना देसाई यांनी दिलेली आहे. हे जरा आपण शासन लेव्हलवर चौकशी करुन घ्यावी. तसेच महाराष्ट्र अधिनियम नं. २३/२००१ महाराष्ट्र एस.सी, एस.टी., ओ.बी.सी. व एस.सी. बी.सी. जाती प्रमाणपत्र अधिनियम २०००, २३ मे २००१ रोजी महाराष्ट्र सरकार राज्यपत्र सरकारी अधिनियमातील कलम १०(१) हे ज्या तारखेला सदर अधिनियम अस्तित्वात आला तेंव्हापासून लागू होते. कलम १०(१) तरतुदीनुसार जात प्रमाणपत्र पडताळणी समिती मुंबई विभाग मुंबई किंवा अन्य समिती एखादया व्यक्तीची जात दाखला अवैध ठरविल्यास किंवा तो खोटा असल्याचे घोषित केल्यास तो दाखला सादर करणाऱ्या व्यक्तीचा तो जिथे नोकरी करित असेल किंवा करीत आहे ती नोकरी जाऊ शकते. या अधिनियमातील तरतुदीच्या आधारे

महानगरपालिका आयुक्तांनी कर्मचारी यांना सेवेतून कायमचे मुक्त करण्याचा निर्णय घ्यायचा आहे. असा सेक्शन ९ मध्ये देखील उल्लेख आहे. तरी आपण समाजकल्याण विभाग किंवा सामाजिक न्याय विभाग येथून ही माहिती उपलब्ध करुन घ्यावी अशी माझी नम्र विनंती आहे व कलम ५३ (१) मध्ये पदोन्नती असा शब्द कुठेही नाही. ५३ (१) दी पॉवर ऑफ ॲपॉइंटिंग म्युनिसिपल ऑफिसर, व्हेदर टेम्परररी ऑर परमनन्ट हुज मिनिमम मंन्थली सॅलरी एक्स्लुझिव्ह ऑफ अलाउन्सेस इज ऑल एक्सीड फोर हन्ड्रेड रुपीज शॅल बेस इन द कार्पोरेशन. तर बहुतेक प्रमोशन हा शब्द नसल्यामुळे आपण जरा याबद्दल खुलासा करावा अशी मी विनंती करीत आहे.

**प्रकाश दुबोले :-**

महापौर मॅडम, प्रकरण क्र. ५६ शासनाच्या धोरणानुसार मागासवर्गीय अनुशेष भरतीकरिता मुलाखती द्वारे निवडलेल्या उमेदवारांची निवड यादीस मान्यता देणे. मॅडम मुलाखती २१ मे , ७ जून, २८ जुलै या दरम्यान घेतल्या जवळ जवळ मुलाखती घेउन जे सात महिने झाले. सात महिन्यानंतर आता जे अनुशेष भरलेला आहे. त्याच्या मंजूरीसाठी सभागृहात हा विषय आणलेला आहे. मग सात महिने ह्या ठिकाणी प्रस्ताव आणण्यास विलंब का झाला? आणि दुसरी बाब जात पडताळणी समितीकडे जे या कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव पाठविले आहेत. तर त्यांची तीन महिन्याची वाट बघण्याची आवश्यकता होती का? इथे तुम्ही म्हटलेले आहे तीन महिने वाट बघितली आणि त्यानंतर त्यांना तात्पुरत्या स्वरुपात सामावून घ्यायचे. इथे म्हटलेले आहे. पान क्र. ९ नुसार विभागीय जात पडताळणी समितीकडून तीन महिन्यात निर्णय प्राप्त न झाल्यास तपासणी समितीच्या निर्णयाच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्याची तरतुद आहे. जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या उमेदवारांना वैधता तपासणी समितीच्या निर्णयाच्या अटीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्याची शिफारस करण्यात येत आहे. मग आता जर ह्या कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात कामावर घेतले आणि ज्यांची जात पडताळणी तपासून आलेली आहे. तर ज्येष्ठता यादी बनविताना तुम्ही सिनिअरीटी कोणाला देणार? कारण सर्वांची इन्टरव्हयू एकाच वेळी झालेली आहे. जॉईनिंग आहे तो त्यांना जर आता आपण त्यांना सामावून घेतो. मग त्यावेळेलाच घेउन जात पडताळणीचा रिझल्ट येईल तेव्हा आपण घेऊ शकत होतो. पण प्रस्ताव सात महिने उशीरा आल्यामुळे त्या मुलाचे नुकसानच झाले आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. महापैार महोदय, एकूण अनुशेष १४६ पदांचा होता. त्यामध्ये १०६ पदे हे जात पडताळणी सर्टिफिकेट आणून दिल्यामुळे त्यांना रुजू करुन घेतलेले आहे. ४० कर्मचाऱ्यांनी जात पडताळणी सर्टिफिकेट आणून दिलेली नाहीत. त्यामुळे त्यांना रुजू करुन घेण्यात आलेले नाही. त्यांना पत्र दिलेले आहे. तुमची नेमणूक केलेली आहे. मात्र जात पडताळणी झाल्यानंतर त्यांना रुजू करून घेण्यात येईल असे त्यांना कळविले आहे. १०६ जणांना जे जात पडताळणी सर्टिफिकेट आणून दिले. त्यांना रुजू करुन घेतलेले आहे. ४० जणाना अजूनही रुजू करुन घेतलेले नाही. मात्र गव्हर्नमेंटचे जे परिपत्रक आहे. जी.आर. आहे. त्या जी.आर. मध्ये अशी प्रोव्हिजन आहे की, आपण त्यांना पत्र दिले की, जात पडताळणी तीन महिन्यांत करुन आणून द्या आणि ते तीन महिन्यानंतरही आणून दिले नाही. तर त्यांना रुजू करुन घेण्याची तरतूद आहे, अटीवर की, जात पडताळणी जर बोगस आढळली तर कारवाई करण्याच्या अटीवर असा जी.आर. निघालेला आहे. त्या जी.आर. प्रमाणे नेमणूक करुन घेता येते. हे महासभेच्या निदर्शनास आणून महासभेने जर सांगितले की, तीन महिन्याच्या अटीप्रमाणे रुजू करुन घ्या आणि जात पडताळणी जर आणली नाही तर त्यांना कारवाई करा. त्या अटीवर नेमणूक करायलासुध्दा परवानगी आपल्याकडे सभागृहाची परवानगी मागितली आहे.

**प्रकाश दुबोले :-**

त्यांना जॉइन करुन घेण्याबद्दल आमचे काही मत नाही. परंतु हे कर्मचारी जॉईन करुन घेताना दुसरा मुद्दा असा आहे. ज्यावेळी या कर्मचाऱ्यांच्या इंटरव्ह्यू घेतल्या त्यावेळी इंन्टरव्हयूला आयुक्त साहेब, उपआयुक्त आणि संबंधित खात्याचे हेड आणि शासनाचे प्रतिनिधी म्हणून प्रकल्प अधिकारी समाजकल्याणची जिल्हा रोजगार योजना या अधिकाऱ्यांच्या इंटरव्ह्यू जवळ जवळ आठ ते दहा दिवस सतत चालू होत्या. त्यामध्ये काही तांत्रिक इन्टरव्ह्यू घेतले गेले. त्यामध्ये फिटर आहेत, वाहन चालक आहेत, कनिष्ठ अभियंते आहेत, यंत्र चालक, पंप चालक. मग ह्या कर्मचाऱ्यांच्या ज्यावेळी इन्टरव्हयू घेतल्या त्यावेळेला त्यांच्याकडून हे काम त्यांना जमते की नाही हे तपासले की नाही. तपासून घेतले की, फक्त इन्टरव्ह्यूला आले म्हणून इन्टरव्ह्यू घेतले आणि त्यामध्ये सिलेक्शन केले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तांत्रिक जे इसम आहेत. त्यांना प्रॅक्टिकल वर्किंग करुन घेतलेले आहे. ड्रायव्हर असेल तर ड्रायव्हिंग करता येते की नाही. प्रॅक्टीकल गाडीवर बसून आपण तपासून घेतले आहे. फिटर असेल तर प्रत्यक्षात नळ कनेक्शन देता येते का? दुरुस्ती करता येते हे पण तपासून घेतलेले आहे. ज्या ज्या तांत्रिक गोष्टी आहेत आपल्या सिटी इंजिनिअरना बोलावले होते. पाणी पुरवठयाच्या इंजिनिअरना बोलावले होते. ज्या ज्या विभागाचे इन्टरव्ह्यू असेल त्या त्या विभागाच्या इन्टरव्ह्यूच्या वेळेला तांत्रिक इसमाला उपस्थित करुन त्यांचे प्रॅक्टीकल करुन घेऊनच सिलेक्शन केलेले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मग आयुक्त साहेब या ठिकाणी उपआयुक्त साहेबांनी सांगितले की, प्रॅक्टीकल घेऊन जे पंप चालवितात त्यांना चालवता येते ते पाहिले. ड्रायव्हर आहे त्यांना गाडी चालविता येते की नाही ते पाहिले. मग जर असे असताना आपल्या महापालिकेत आस्थापनेतून १/१२/०३ ला दोन कर्मचाऱ्यांना नोटिसा बजावल्या की, तुम्हाला वाहन चालविता येत नाही. तर तुमच्यावर का कारवाई करण्यांत येऊ नये? मग त्यांना सिलेक्शन कोणत्या बेसवर घेतले? आलेल्या अधिकाऱ्यांच्या वशिल्यावर घेतले की मनात आले म्हणून घेतले की बाकी काय झालेले आहे?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. यामध्ये खास करुन जे तांत्रिक कर्मचारी आहेत. त्यांच्या वैधतेबाबत आपण या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे. ड्रायव्हिंग टेस्ट आपल्या अधिकाऱ्यांनी घेतल्या होत्या. आणि त्या ड्रायव्हिंग टेस्ट मध्ये हे उमेदवार यशस्वी झाले होते ही पहिली गोष्ट . दुसरी गोष्ट अशी की आपण ड्रायव्हिंग टेस्ट घ्यायला कॉम्पीनेंट नाही असे जर समजले तरी आर.टी.ओ. ही शासनाची ॲथोरिटी आहे. या ॲथोरिटीने देखील त्यांना ड्रायव्हिंग लायसन्स हे ट्रायल घेतल्यानंतरच दिलेले आहे अशी आपली धारणा आहे. असे झाले असावे पण त्यातही काही लोकांना मुंबई मधील रस्ते माहिती नाहीत. काही लोक ड्रायव्हिंगने आम्हाला घबराट होते. आम्हाला त्रास होतो. अशा प्रकारच्या एक दोन केसेस आम्हाला आढळल्या. त्याच्यामध्ये कामचुकारपणा या कर्मचाऱ्यांकडून झालेला आम्हाला आढळला. त्यानंतर मीच उपआयुक्तांना सांगितले की, इन्टरव्ह्यूच्या वेळेला जरी टेस्टमध्ये ते पास झाले असतील किंवा इतर त्यांची जी तांत्रिक क्षमता आहे, ती व्यवस्थित असेल. तरी ते जर ड्रायव्हर म्हणून काम करायला सक्षम नसतील तर त्यांना नोटिसा द्या. एक वर्षाचा जो त्यांचा कालावधी आहे. हा पण मुळातच तात्पुरता ठेवलेला आहे. नेमणूकीमध्येच जर आम्हाला आढळले की, ते तांत्रिक दृष्ट्या सक्षम नाहीत. तर नक्कीच त्यांच्यावर कार्यवाही उचित राहणार आहे. कारण ती ड्रायव्हरची पोस्ट आहे. इतरांच्या बाबतीमध्येही अशा टेस्ट घेतल्या गेल्या आहेत. वॉल्व्हमनच्या बाबतीमध्ये तसेच ज्या ज्या तांत्रिक पोस्ट आहेत त्याच्यामध्ये संबंधिताने फिल्डमध्ये जाऊन अशा टेस्ट घेतलेल्या आहेत. परंतु तरी देखील एखादी दुसरी व्यक्ती जर आपल्याला आढळली तर ॲक्शन घेणे आवश्यक आहे. इतकी पदे भरल्यानंतर एखादी दुसरी व्यक्ती याच्यामध्ये आली असेल तर त्याला नक्कीच आपल्याला वगळण्याची तरतुद आहे आणि असे आदेशातही नमुद केलेले आहे. दुसरा जो विलंबनाचा मुद्दा आहे, त्यावर मी खुलासा करू इच्छितो की, वेळोवेळी ही जी अनुशेष भरतीची जी मुदत आहे. ही शासन वाढवत गेले. दरम्यानच्या काळामध्ये आपण जात पडताळणी समितीच्या सर्टिफिकेटवर अवलंबून राहत होतो. ते सर्टिफिकेट अद्यापही बऱ्याचशा उमेदवारांची प्राप्त झालेली नाही. हा एक मुददा आणि त्यामध्ये दोन महिने मी स्वतः प्रशिक्षणामध्ये होतो. मला वाटले की, माझ्यासमोरच हा विषय महासभेत आला तर आपल्याला अधिक चांगल्या रितीने चर्चा करुन अनेक प्रश्नांची सोडवणूक करुन घेता येईल. हा एक मुद्दा. ज्युनिअर इंजिनिअर्सची लिस्ट आपल्याला आली. ती लिस्ट या मागच्या महिन्यामध्ये आली. त्यांच्यानंतर त्यांना कॉल लेटर देणे., त्यांना बोलावून घेणे, आणि मग सगळी भरती आटोपल्यानंतर शासनाने डिसेंबर एन्डपर्यंतची मुदत दिली होती. या मुदतीमध्ये महासभेच्या ठरावासहित सर्व गोष्टी तांत्रिकदृष्ट्या पूर्ण करुन शासनाला अहवाल सादर करायचा हा हेतू त्याच्या पाठीमागे होता आणि जे योग्य उमेदवार आढळले. जे पात्र उमेदवार होते. ज्यांची वैधता प्रमाणपत्र आली अशांना नेमणुका दिल्या. बाकीच्या नेमणुकाचे प्रश्न आता सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा साहेबांनी एक गोष्ट निदर्शनास आणली की, हायकोर्टाने जो निर्णय दिलेला आहे त्यामध्ये जात पडताळणी समितीचे सर्टिफिकेट आल्याशिवाय उमेदवारांना रुजू करुन घेउ नये. त्याचीदेखील तपासणी आमच्यामार्फत आम्ही करुन घेऊ. हा प्रश्न जास्त अनुसुचित जमातीबददल उपस्थित केला

जात होता. सन्मा राज्यमंत्री महोदयांनी ठाण्याला बैठक घेतली आणि त्या बैठकीतही त्यांनी सांगितले की जोपर्यंत वैधता तपासणी होत नाही तोपर्यंत त्यांना आपण रुजू करुन घेऊ नये. फक्त त्यांचे सिलेक्शन झालेले आहे असे त्यांना पत्र देउन त्यांची ओरिजनल कागदपत्र ताब्यात घेऊन संबंधित त्या त्या विभागाच्या पडताळणी समितीला पाठवायची आणि त्यांचे रिपोर्ट आल्यानंतरच त्यांना नेमणुका द्यायच्या. परंतु हा एक शासन निर्णय होता तो सभागृहापुढे आम्ही मांडलेला आहे. जर सभागृहाला मान्य असेल तर त्यांना जात पडताळणी समितीच्या सर्टिफिकेटच्या अधीन राहून नेमणुका करता येणे शक्य आहे नसेल तर जात पडताळणी समितीचा अहवाल आल्यानंतर आपल्याला त्यांना रुजू करुन घेता येईल. दोन्ही गोष्टी आम्ही आपल्या निर्णयासाठी ठेवलेल्या आहेत.

**प्रकाश दुबोले :-**

आयुक्त साहेब या ठिकाणी वाहन विभागात नेमून दिलेले वाहन व्यवस्थित चालविता येत नाही. अशा विभाग प्रमुखाच्या तक्रारी आहेत असे स्पष्ट त्या नोटिसीमध्ये म्हटलेले आहे. त्यांच्याकडे फक्त लाइट ड्रायव्हिंगचे लायसन्स आहे आणि त्यांना आपण हेवी गाडया चालवायला पाठवतो आहे. त्यामुळे त्यांना हेवी गाडया चालविता येणार नाहीत. मग तुम्ही ज्यावेळी कर्मचाऱ्यांना लाईट व्हेइकल किंवा हेवी व्हेइकल चालविण्याऱ्या इन्टरव्ह्यूसाठी बोलावले की, लाईट व्हेइकलवाल्याला तो महत्वाचा मुददा आहे.

**मा. आयुक्त :-**

दोन्ही आहे.

**प्रकाश दुबोले :-**

हेवी चालविणे कम्प्लसरी होते ना.

**मा. आयुक्त :-**

असे कंम्प्लसरी नव्हते.

**प्रकाश दुबोले :-**

कोणतेही लायसन्स असेल तरी.

**मा. आयुक्त :-**

हो.

**प्रकाश दुबोले :-**

आता या कर्मचाऱ्याच्या बाबतीत आपण काय निर्णय घेणार?

**मा. आयुक्त :-**

आता त्याला खुलासा विचारलेला आहे. तसा खुलासा आणि मग प्रत्यक्ष आम्ही त्याची ट्रायल घेऊ. जर आम्हाला योग्य आढळले तर ठिक आहे. नाहीतर आमच्या तरतुदीनुसार त्यांना आम्हाला कमी करता येणे शक्य आहे.

**प्रकाश दुबोले :-**

आयुक्त साहेब हा जो अनुशेष असा आहे यात कोणताही कर्मचारी आहे. कर्मचारी भरत असताना आपण समाजकल्याण किंवा या डिपार्टमेन्टकडून कॉल मागवतो. त्यापेक्षा आपण पेपर जाहिरात देऊन का अर्ज मागवत नाहीत. कारण इतर महानगरपालिकेत सर्व ठिकाणी पेपर जाहिरात देउन मागविले जातात. त्यामध्ये स्थानिकाला जास्त प्राधान्य मिळू शकते. पण या ठिकाणी आपण एम्प्लॉयमेंट समाजकल्याण थ्रु अधिकारी परस्पर यादी पाठवितात. कधी इथल्या स्थानिक लोकांना माहिती होत नाही आणि वर्षानुवर्षे ज्यांनी कार्ड काढलेली आहेत त्यांना कॉल मिळत नाही. परंतु ज्यांची तिथे वशिलेबाजी चालते त्यांना कॉल येतात, अशी परिस्थिती आहे.

**मा. आयुक्त :-**

सुशिक्षित बेकारांची नोंदणी ही रोजगार विनिमय केंद्रामध्ये त्या त्या जिल्ह्याची केली जाते आणि त्या ठिकाणी नोंदणी करुन पाच-पाच सहा-सहा वर्षे उमेदवार वेटिंगमध्ये असतात. त्यानां कुठे संधी मिळत नाही. वयोमर्यादा जी त्यांची आहे ती ओलांडल्यानंतर त्यांचे नाव आपोआपच रद्द होते. ह्या रोजगार विनिमय योजनेची जी स्थापना शासनाने केलेली आहे. त्याचा आपल्याला या भरतीसाठी योग्य रितीने वापर करणे शक्य होते हा त्यातील एक मुद्दा. दुसरी गोष्ट, जर आपण या पदांसाठी जाहिराती काढल्या असत्या तर कदाचित हजारो नव्हे लाखो अर्ज आले असते आणि त्यांची प्रक्रिया पूर्ण करुनदेखील सॉर्टिंग करुन तेवढयांना कॉल पाठविणे देखील प्रशासनाला ह्या पाच सहा महिन्यामध्ये

शक्य झाले नसते. त्यामुळे जो रितसर मार्ग एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजचा आहे. तोच आम्ही स्वीकारण्याचे ठरविले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

पण इथुन कुठल्या भरती करताना पेपर जाहिरात देऊन अर्ज मागवून करावी.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले असे आहे की, पेपर जाहिरात जर आम्ही दिली तर हजारो नव्हे लाखो अर्ज आपल्याला प्राप्त होतात आणि त्याचे प्रोसेस करणे हे अवाक्याच्या बाहेर होते.

**प्रकाश दुबोले :-**

पण साहेब, या प्रक्रियेमध्ये स्थानिकांना वाव मिळत नाही.

**मा. आयुक्त :-**

स्थानिकांना वाव मिळतो. स्थानिकांनी जर एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजमध्ये जर नाव नोंदविलेले असेल तर या शहरात नसेल तर दुसऱ्या शहरात कॉल येईल या ठिकाणी मिरा भाइंदर शहरातील कितीतरी तरुण असतील.

**प्रकाश दुबोले :-**

कॉलची प्रक्रिया काय आहे? ते तुम्हाला माहिती आहे की, कॉल कसे येतात ते.

**मा. आयुक्त :-**

असे आहे की, ते एक शासकीय ऑफिस आहे. त्या ऑफिसरवर आपण या ठिकाणी बसून कमेन्ट करणे हा आपल्या अखत्यारित असू शकत नाही.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब आम्ही कुठे कमेन्ट करतो. ऑफिसबददल आम्ही दोष देतो असे नाही. जो आजपर्यंत अनुभव आलेला आहे त्याच्यावर आम्ही सांगतो आमच्याकडे पण काही कार्यकर्ते आहेत. मिरा भाईंदर मधील मुले आहेत. त्यांचे आपण कार्ड पाहिले तर तीन तीन वेळा नुतनीकरण झाले. पण कॉल आले नाही. ह्या जागा आधीच भाईंदरमध्ये भरल्या गेल्या.

**मा. आयुक्त :-**

असे होऊ शकते. त्यांच्या वेगवेगळया कॅटेगीरीज आहेत. अजुनही काही असे उमेदवार आमच्याकडे आहेत जे त्यांच्याकडे उपलब्ध नाही. जसे मला वाटते मिस्त्री ही एक कॅटेगिरी आहे जी आमच्याकडे उपलब्ध नाहीत. त्या पर्टीकुलर कॅटेगिरीमध्ये म्हणजेच अनुसुचित जमातीमध्ये आपल्याला तक्त्यावरुन दिसेल की, काही जागा शिल्लक राहिलेल्या आहेत. तर असे होऊ शकते. आपल्या या भागातील उमेदवारांना आपण कृपा करुन असे मार्गदर्शन करा की, त्यांनी ताबडतोब नाव नोंदवावे आणि नाव नोंदविल्यानंतर जर काही लोकांना असे वाटत असेल की, डावलून दुसऱ्या कोणाला इतर ठिकाणी रेकमेन्ड केले असेल तर आपण स्वतः एम्प्लॉयमेंट ऑफिसला मी त्यांच्याशी चर्चा करेन आणि त्या उमेदवाराला न्याय मिळवून देईन.

**प्रकाश दुबोले :-**

आयुक्त साहेब, यामध्ये जो पदोन्नतीचा विषय आहे आपण ज्या पदोन्नत्या दिल्या. त्यामध्ये आपल्या महानगरपालिकेत काही वरीष्ठ लिपीक आहेत. त्यांना बारा वर्षे होऊन गेलेली आहेत. परंतु त्यांना पदोन्नती दिली नाही. परंतु जे लिपीक आहेत त्यांना वरिष्ठ लिपीकावर पदोन्नती दिली गेली आहे. मग पहिले वरीष्ठ लिपीक मागील जे लिपीक होते त्यांना वरीष्ठ लिपीक केले. आता ते दोन्ही एक श्रेणीत झाले आणि काही कर्मचारी कोर्टात गेले. त्यामुळे कोर्टात गेल्यामुळे त्यांना पदोन्नती दिली गेली. परंतु आपल्या प्रशासनाच्या विरोधात जे कर्मचारी कोर्टात गेले त्यांना आपल्या प्रशासनाने सहकार्यच केले. जे आपल्या विरोधात गेले म्हणून त्यांना कुठेही क्रॉस केले नाही. त्यांना जे सहकार्य करता येइल तेवढे आपल्या प्रशासनाने केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात आपण हायकोर्टात देखील गेलो नाही. पण ते जे काही कर्मचारी आहेत ते पदोन्नतीमुळे पुढे आलेले आहेत. परंतु जे वरीष्ठ लिपीकाच्या लेव्हलला आलेत, ज्या वरिष्ठ लिपीकांना बारा वर्ष पूर्ण झाल्यामुळे त्यांना पदोन्नती दिली नाही. मग त्याना पूर्वलक्षी इफेक्ट जर दिला तर ते त्या वरिष्ठ लिपीकाच्या लेव्हलला आहेत मग आज त्यांची पण पदोन्नती त्यांच्याबरोबर करणे भाग आहे. मग जर असा प्रकार घडला तर जे वरिष्ठ लिपीक म्हणून गेले बारा वर्ष या नगरपालिकेची सेवा करित होते त्यांच्यावर अन्याय होईल की नाही.

**मा. आयुक्तः-**

बारा वर्ष ज्यांना झालेली आहेत. हा विषय जो आहे तो वेगळा आहे आणि रितसर पदोन्नती देणे हा विषय वेगळा आहे. पदोन्नतीला पात्रता आहे. परंतु पद उपलब्ध नाही. अशा केसमध्ये त्यांना वेतनश्रेणी देण्याचा जो प्रस्ताव असतो त्याला आपण ती पदोन्नती देतो. त्याच्यातदेखील शासनाने एक वेगळा प्रकार केलेला आहे की, आश्वासित पदोन्नती ज्याला आपण बोलतो असा एक शासन निर्णय आहे. ज्यामुळे त्यांना वरिष्ठ लिपिकाची जी वेतनश्रेणी आहे. कुठल्याही स्ट्रक्चरमध्ये वरच्या ग्रेडची जी वेतनश्रेणी आहे ती त्यांना मिळणार नाही. या आश्वासित पदोन्नतीच्या या शासन निर्णयामध्ये आहे. त्यामुळे ते एकाच रांगेत बसु शकणार नाही.

**प्रकाश दुबोले :-**

पण त्यांचे म्हणणे आहे एक इन्क्रीमेंट दया. तेही आपण देत नाही.

**मा. आयुक्त :-**

आता आम्ही ते लोक निवडलेले आहेत. त्यांची लिस्ट तयार केलेली आहे. त्यांचे सी.आर. घेतलेले आहेत आणि मला वाटते २३ तारीख आम्ही समितीची लावलेली आहे. त्यामध्ये सर्व प्रकरण आम्ही निकाली लावतो.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब त्यामध्ये असे आहे की ते जे कर्मचारी आहेत. त्यांना क्षेत्रीय अधिकार म्हणून ही चार्ज आहे आणि कर निरीक्षक म्हणूनही चार्ज आहे. मग हे कर्मचारी दोन-दोन पदावर काम करतात. अशी या नगरपालिकेपासून प्रथा आलेली आहे. महानगरपालिका झाली तर त्यात काही सुधारणा नाही. त्यामध्ये जी आपण आता पदोन्नती दिली त्यांना ती जबाबदारी द्या ना. कारण ती जबाबदारी त्यांना देत नाही. फक्त पदोन्नती घेतली. जबाबदारी घेत नाहीत आणि काम व्यवस्थित करतात. अशी प्रथा चालली आहे. ह्याच्यावर कुठेतरी बदलत रहावे एवढीच मी या ठिकाणी विनंती करतो.

**मा. आयुक्त :-**

आपल्या प्रस्तावाचा नक्की विचार करु.

**परशुराम पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. आयुक्त साहेबांकडून खुलासा मागवत आहे की, आपण केलेल्या भरतीमध्ये स्थानिक उमेदवार किती होते? आणि तसे स्थानिक उमेदवार किती भरती झालेले आहेत याबाबत माहिती द्यावी. मगच सभागृहाने मान्यता द्यावी. तसेच अनुशेष भरताना शहरामध्ये मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध नव्हते का? याचा खुलासा दयावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला आहे तशा प्रकारची स्थानिक उमेदवार नावाची कुठलीही कॅटेगिरी ही शासनामध्ये नसते. या जिल्ह्याच्या कार्यक्षेत्राच्या अंतर्गत जे रोजगार विनिमय केन्द्र आहे. त्याच्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील वेगवेगळया परिसरातील जे उमेदवार आहेत, ते स्थानिक उमेदवार अशी त्यांच्याकडे व्याख्या आहेत. त्यामुळे मिरा भाईंदर परिसरातील उमेदवार असे जर आपले म्हणणे असेल तर तशी कॅटेगिरी कुठेही उपलब्ध नाही. त्यामुळे अशी माहिती देता येणे शक्य नाही.

**परशुराम पाटील :-**

पण मागच्या नगरपालिकेच्या सभेमध्ये मला वाटते केळकर साहेब होते. त्यावेळेची तारीख माझ्या लक्षात नाही. पण असा ठराव झाला होता की, मिरा नगरपालिकेच्या हद्दीतील जे स्थानिक लोक आहेत त्यांना आपण पहिले प्राधान्य द्यावे, असा आमचा ठराव झाला होता. तो ठराव काढून आपल्याला मी त्याची तारीख पण सांगेन.

**मा. आयुक्त :-**

मला वाटते या प्रश्नाचे उत्तर मी आपल्याला दिलेले आहे. अशा प्रकारचा भेदभाव करता येत नाही. कायद्याने तो मान्य नाही. याचे कारण असे आहे की, इथल्या उमेदवारांना देखील बाजुच्या नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये नोकरी मिळू शकते.

**परशुराम पाटील :-**

साहेब जेव्हा एम्प्लॉयमेंट यादी आली. तेंव्हा त्या यादीमध्ये स्थानिक लोक किती होते? याची जरा आपण शहानिशा केली होती का?

**मा. आयुक्त :-**

तसे करण्याची आवश्यकता नाही.

**परशुराम पाटील :-**

मग स्थानिक लोकांना प्राधान्य देता येणार नाही असा याचा अर्थ होतो.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला मी पुन्हा सांगतो स्थानिक आणि बाहेरचा अशी कॅटेगिरी कायदयाने करता येत नाही.

**जयंत पाटील :-**

महापौर मॅडम, विरोधी पक्षनेते परशुराम पाटील यांनी जे सांगितले कायदयात काही गोष्टी शक्य नसतात. हे मलादेखील मान्य आहे. मध्ये रेल्वे भरतीमध्ये जो प्रचंड गोंधळ झाला आणि शिवसैनिकांनी जो हिसका दाखविला . मग तेंव्हा कायदा कुठे गेला होता?

**मा. आयुक्त :-**

तो परप्रांतियांचा प्रश्न होता. तो प्रश्न वेगळा होता.

**जयंत पाटील :-**

या शहरामध्ये पाच सहा कॉलेजेस आहेत. या शहरातील गरिब विदयार्थी आपल्या कष्टाचा पैसा टाकून त्यांचे आईवडिल त्यांना शिकवितात. पुढे मागे त्याने आईबापाचे भले करावे म्हणून या शहरात जर भरती होत असेल, या महापालिकेत जर भरती होते आणि इथल्या तरुणांना जर नोकरी मिळत नसेल मला मान्य आहे. कायदयामध्ये संपूर्ण भारतीयांमध्ये बिहारचे, यु.पी.चे मी कुठल्या जातीबददल जात नाही नाहीतर चौहानसाहेब मला पुन्हा शिव्या घालतील. तेंव्हा असे न करता स्थानिक तरुणाना अगोदर प्राधान्य दिले पाहिजे. अशा तऱ्हेची जाहिरात किंवा विनंती आपण जिल्हा नियोजन केन्द्राला केली पाहिजे. तिकडून ही भरती होते या शहरामध्ये सुध्दा मागासवर्गीय भरपूर आहेत. आम्ही तर ओ.बी.सी. मध्ये आहोत. आज दुर्देवाने मागच्या सभेमध्ये बोललो होतो की, आम्ही नगरसेवक असूनही एकाही तरुणाला आम्ही नोकरी लावू शकलो नाही आणि असा प्रसंग येतो जेंव्हा नोकरी लागायची जेंव्हा संधी असते तेंव्हा भरती प्रचंड प्रमाणात बाहेरुन केली जाते. त्यांना येण्याजाण्याचा प्रश्न त्यांची गैरहजेरी त्यांना या शहराची काही माहिती नाही आणि सगळया दृष्टीने ते आपल्याला त्रासदायक होते. आता नगरसेवकांनी सांगितले की एकाची इन्टरव्ह्यू झाली त्याला ड्रायव्हिंग करता येत नाही. मी ही गोष्ट ऐकली होती. ते बहुतेक वशिल्याने असावेत असे वाटते. नाही तर ड्रायव्हिंग न करणारा माणूस गाडीवर बसतो आणि कुठेतरी दोन चार लोकांना मारले नाही, नशीब. तर अशा तऱ्हेची भरती होताना मला तर आजही वाटते की, इथल्या तरुणाला आपण प्राधान्य द्यावे. त्याचे कारण आपल्या सगळया दृष्टीने सोयीस्कर होईल आणि त्या शहरातील तरुणांना आपण नोकरी लावली अशा तऱ्हेचे समाधान आपल्या मनाला वाटेल. एवढीच माझी आपल्याला विनंती आहे.

**मिलन पाटील :-**

महापौरांच्या परवनगीने बोलतो की मागच्या वेळेला सुध्दा टॅक्सच्या बाबतीत आम्हाला एक अशी संधी आली होती की, आमचे जे स्थानिक उमेदवार आहेत किंवा जे स्थानिक लोक आहेत. त्यांना नोकऱ्या लावायची आम्ही विनंती आयुक्तांना केली होती. परंतु आयुक्त आमच्या स्थानिक लोकांच्या विरोधात का असे करतात? सरकार तुमच्यावर कारवाई करणार आहे का? इतर लोक आयुक्तसुध्दा त्या पेपरमध्ये नोटिसा देतात ना. तर त्या स्थानिकांना प्राधान्य देण्यासाठी ते आमच्या मागे लागतात. तर स्थानिकांना प्राधान्य देण्यासाठी तुम्ही काहीतरी थोडी योजना आखा की, जे आमचे तरुण बेकार आहेत त्यांना आम्ही जबाब देउ शकू. तर प्रत्येक वेळी तुम्ही आम्हाला कायद्याचा बडगा दाखविता आणि आमचे कारण धुडकावून लावता हे आयुक्त साहेब योग्य नाही. तर आता जे आमचे तरुण फार बेकार आहेत. शिकलेले आहेत. आई वडिल त्यांना नोकऱ्या करुन भांडी घासून त्यांना बारावीपर्यंत शिकविलेले आहे. त्यांना डिग्र्या दिलेल्या आहेत. तर त्यांच्या बाबतीत आमचे काय कर्तव्य आहे. त्या बाबतीत कुठेतरी नोकऱ्या मिळाव्या. तर ह्याबाबतीत जरुर विचार करावा.

**मा. आयुक्त :-**

सभागृहाचा एकंदर सेन्स लक्षात घेता अशी विनंती एम्प्लॉयमेंटच्या अधिकाऱ्यांना करायला काही अडचण नाही की स्थानिक उमेदवारांना शिफारशीमध्ये प्राधान्य दयावे.

**मिलन पाटील :-**

दुसरी गोष्ट अशी की, आपण ऑटोमोबाईल इंजिनिअर जो नेमलेला आहे तो आपण या अनुशेषामधून भरलेला आहे का कसा आहे? ऑटोमोबाईल इंजिनिअर जो आपण वाहन विभागामध्ये नेमलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

ती भरती नाही आहे.

**मिलन पाटील :-**

पण त्याला काहीच अजिबात येत नाही. पण तो आला कसा? आणि तुम्ही त्याची नेमणूक केली कशी? त्याला हे काय कळत नाही तो ऑटोमोबाईल इंजिनिअर म्हणून आपल्याकडे नेमला.

**मा. आयुक्त :-**

त्या मुद्यावर आपण वेगळी चर्चा करु.

**मिलन पाटील :-**

साहेब मुददा आता जे नेमलेले आहेत. त्याबाबतीतच आहे की, तो जो ज्या पेट्रोलच्या गाडया रिपेअरिंग करतो जो मेस्त्री पेट्रोलच्या गाड्या रिपेअरिंग करतो. त्याच्याकडे आपली दहा दहा लाखाची वाहने तो उभी करतो तर त्याला जरासुध्दा ज्ञान नाही? त्याने ऑटोमोबाईल इंजिनिअरचे काम घेतलेले आहे. याबाबतीत मी तुम्हाला लेटर दिलेले आहे. त्याचे तुम्ही साधे उत्तर पण दिले नाही. मी नगरपालिकेच्या हिताची गोष्ट मांडलेली आहे आणि त्याबददल तुम्ही काहीच तक्रार केलेली नाही. पेट्रोलचे काम करतो त्याच्यावर दहा लाखाची गाडी दिली आहे आणि तो दहा लाखाच्या कामाचे करतो. त्याला पेट्रोलच्या गाडीचे काय कळणार? डिझेलचे काम तो काय करणार? आणि एक गेअर बॉक्सची किंमत काय आहे? किंवा एक गट्ठाची किंमत काय आहे? एक बेरिंगची किंमत काय? त्याला काय समजते आणि तो तुम्ही असा नेमलेला आधिकारी आहे आणि त्याला कुठल्या बाबतीत कळत नाही. आपण काय करावे? कुठल्या बाबतीत हे करावे का कोणाकडे काम करुन घ्यावे हे सुध्दा कळत नाही. तर मी याबाबत पत्र दिलेले आहे. त्याची दखल घेऊन तुम्ही ताबडतोब त्याची कारवाई करा.

**उर्मिला भामरे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते. आता जो जात पडताळणीचा विषय चालला आहे. तर महापालिकेने जे उमेदवार इंन्टरव्हयू घेउन निवडलेले आहे. त्यांचे जात पडताळणीचे सर्टिफिकेट त्यांनी जात पडताळणी ऑफिसला पाठविलेले आहेत. परंतु संबंधित खात्याकडून कधी विलंबही होते. दोन तीन वर्षाचा कालावधी लागतो त्या कालावधीपर्यंत ज्याची सर्टिफिकेट अजून जमा झालेली नाहीत. त्यांना तसेच ठेवायचे का? तात्पुरत्या स्वरुपात जर शासनाचे परिपत्रक आहे की, तीन महिन्यानंतर तुम्ही त्यांना नियुक्तीवर घेउ शकता किंवा त्यांच्या सर्टिफिकेटमध्ये काही दोष आढळला तर त्यांना महापालिका कामावरुन काढून टाकू शकते. तर अशा उमेदवारांचे नुकसान करु नये असे मला वाटते आणि निवडले गेलेले आहेत त्यांना तात्पुरत्या स्वरुपात कामावर घ्यावे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापैार मॅडम, प्रकरण क्र. ५६ वर अगोदरच निवडलेले उमेदवारांच्या यादीला मान्यता द्यायची आहे. म्हणजे निवडण्यासाठी सभागृहापुढे काही ठेवलेले नाही आणि जात प्रमाणपत्र पडताळणी करायलासुध्दा ती नाही केली तरी चालेल. पण त्यांनासुध्दा मंजूरी द्यायची असे मॅरेथॉन शर्यत एकंदरीत चालली आहे. ६२ आणि १०६ म्हणजेच १६८ पदांची आपण मंजूरी निवडीची मागता. ही सरळसेवेतून आणि पदोन्नतीने ३२ पदांची आपण निवड मागत आहात. मा. महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब आणि निवड समितींचे जे काही घटक होते. त्यांना मी प्रश्न विचारतो. कृपया त्यांनी खुलासा करावा. कारण मी खात्याकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला. ती काही मिळाली नाही. आमचे गटनेते गेले होते. माझा असा समज आहे की, महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर नगरपालिकेवरती जो आस्थापना वर्ग होता. त्यासंबंधी नवीन आस्थापना वर्ग महानगरपालिकेसाठी काय असेल? याच्यासाठी आपण स्टाफ पॅटर्न मंजुर करुन घेतला असेल. असावा आणि त्याला शासनाने मंजुरी दिली असेल आता. या स्टाफ पॅटर्नला शासनाने मंजुरी दिल्यानंतर शासनाने कुठल्या संवर्गासाठी, किती पदांसाठी, किती पदे नव्याने निर्माण केली? किंवा संवर्ग नसले तरी एकूण किती पदे निर्माण केली? त्यासंबंधी माहिती दिली असेल ती सभागृहापुढे आज आलेली नाही. त्यानंतर ही पदे भरीत असताना याच्यामध्ये आरक्षण वेगवेगळया संवर्गासाठी किती पदांना लागू आहे त्याचीसुध्दा

माहिती या सभागृहापुढे आलेली नाही. दुर्देवाने महानगरपालिका स्थापन होण्यापूर्वी नगरपालिकेने आरक्षणाच्या बाबतीत जे काही रोस्टर रजिस्टर तयार करुन त्याची वेळोवेळी मंजूरी सक्षम अधिकाऱ्याकडून तपासणी करुन घ्यायच्या असतात. त्याच्यानंतर अनुशेष फिक्स होतो. अनुसुचित जातीचा किती? जमातीचा किती? विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग आणि इतर मागासवर्गीय अशा प्रकारे कुठलीही माहिती आजपर्यंत सभागृहापुढे आलेली नाही की, मागासवर्गीयांचा किती अनुशेष बाकी आहे? माझ्या मते महानगरपालिकेची बॉडी स्थापन झाल्यानंतर मा. आयुक्त साहेबांवरती जी जबाबदारी आहे की, कुठली नवीन पदे भरावयाची आहेत किंवा पदनिर्मिती करायची आहे. अशा संबंधिचा अहवाल कुठल्याही स्थायी समितीपुढे आलेला नाही किंवा कुठल्याही कार्पोरेशनच्या महासभेपुढे आलेला नाही. कदाचित मला वाटते नगरपालिका आणि महानगरपालिका स्थापन होताना मधल्या काळामध्ये सन्मा. आयुक्त नाईक साहेब यांच्या काळामध्ये ते स्टाफ पॅटर्न मंजूर केले गेले असेल. म्हणून ते पुन्हा सभागृहापुढे आणले नसेल तर त्याला आमची मान्यता आहे. पण जर ते नंतर स्टाफ पॅटर्न मंजुर झाले असेल, तर कृपया ते सभागृहापुढे आणायला पाहिजे होते की, एकूण आस्थापनावर किती जागा आहेत? किती जागा मागासवर्गीयासाठी आहेत? किती जागा बिगर मागासवर्गीयांसाठी आहेत? हे जर सभागृहाच्या लक्षात आले असते तर आजच्या सभेमध्ये निर्णय घेणे फार सोपे झाले असते. पण माझ्या मते शासनाने मंजुरी दिलेली आहे ती २/११/२००२ रोजी दिलेली आहे. मग मंजुरी दिल्यानंतर दिलेली मंजुरीसुध्दा सभागृहाच्या निदर्शनास कधी आणली नाही. आम्हाला सगळे नगरसेवक विचारतात की, दोन उपआयुक्त आले, तीन उपआयुक्त आले. असे किती उपआयुक्त, किती सिटी इंजिनिअर किती येणार आहेत? हे सगळे शेवटी या मंजूरीच्या आधीन राहूनच येणार आहे. पण ही मंजूरी जी स्टाफ पॅटर्न झालेली आहे ती कुठल्याही सभागृहापुढे कुठल्याही सदस्याला आजपर्यन्त माहिती नाही हे एक आणि दुसरी गोष्ट मागासवर्गीयांचा अनुशेष किती बाकी आहे? आणि तो अनुशेष कुठल्या सक्षम तपासणी अधिकाऱ्याने प्रमाणित केलेला आहे आणि तो कुठल्या साली केलेला आहे? यासबंधीही काही माहिती नाही. आजही सभागृहापुढे नाही. विषय म्हणजे वर्ग १ व २, ३ व ४ ही सर्व पदे जी भरावयाची आहेत या सर्वांचा रोस्टर एकत्रपणे म्हणजे प्रत्येक पदाला वेगवेगळे रोस्टर असते. परंतु ही एकत्रितपणे लिहीली जातात आणि एकात्रितपणे तपासणीसाठी पाठविली जातात. या इथे असे दिसते की वर्ग ३ आणि ४ चीच रोस्टर रजिस्टर तयार केलेली आहेत आणि तिच तपासणीसाठी पाठविली आहेत आणि ती तपासणी होउन आली आहेत. तर त्या तपासणी रजिस्टरमध्ये नेमका अनुशेष किती आहे? आली असेल तर जर ती रिजेक्ट केली असेल. तर तीही माहिती नाही. ती रिजेक्ट केली नाही. ती मान्य केली असेल तर ती किती पदे आहेत? अनुशेष जातीची किती? जमातीची किती? त्याचीही माहिती आज का सभागृहापुढे नाही. वर्ग १ व वर्ग २ च्या संबंधात मला वाटते आपण रोस्टर तयार केलेले नसेल किंवा ते त्यांनी तपासणी करताना त्याच्यामध्ये काही दोष आढळले असेल म्हणून ते मंजूरी नाकारली असेल असाही त्याचा अर्थ होतो. पहिली बाब झाली प्रशासनाने स्थायी समितीच्या सभागृहाच्या नको पण स्थायी समितीच्या सभेपुढे आणले पाहिजे की, किती पदे एकूण मंजूर झालेली आहेत? कुठल्या पदासाठी किती जागा आहेत? दुसरी बाब अनुशेष नोंदणी रजिस्टर कुठपर्यंत तपासणी झाली आणि अनुशेष नोंदणी रजिस्टर प्रमाणे किती मागासवर्गीयांचा अनुशेष भरावयाचा आहे. तिसरी बाब ज्या लोकांना पदोन्नतीसाठी आपण सक्षम ठरविले आहे अशा लोकांचे गोपनीय अहवाल स्वतःहून लिहीले पाहिजे आपल्या वरच्या अधिकाऱ्यांकडून ते तपासून घेतले पाहिजे आणि त्यांच्यापेक्षा वरच्या अधिकाऱ्याकडून ते तपासून घेतले पाहिजे आणि त्यांच्यापेक्षा वरच्या अधिकाऱ्याकडून ते रिव्हन्यु करुन घेतले पाहिजेत. पुर्नवलोकन करुन घेतले पाहिजेत. अशी तरतूद आहे. तरीसुध्दा बऱ्याचशा वरिष्ठ लिपीकांनी ह्या बाबतीमध्ये कुठेही अशा प्रकारचे गोपनीय स्वतःचे अहवाल तयार केलेले नाहीत. ५८(२) खाली घेतलेल्या नगरपालिकेच्या तत्कालिन सभेमध्ये ही बाब अहवाल तयार नाहीत. त्यांना तुम्हाला एक शैक्षणिक पात्रता व्यतिरिक्त इतर जी पात्रता ठरवायची असते तर ते कुठल्याही पदोन्नतीसाठी प्राप्त होणार नाहीत. कारण त्यांचे गोपनीय अहवालच नाही आहेत. त्यानंतर याच्यामध्ये एक महत्वाची अशी बाब आहे की, १९८५ साली काही ग्रामपंचायती मिळून नगरपालिकेची स्थापना झाली. त्यावेळी जे आस्थापनावर लोक होते ते नगरपालिकेच्या आस्थापनेवर आले. त्यावेळी नगरपालिकेच्या आस्थापनावर ज्या जागा, जी पदे मंजूर झाली होती. त्या पदावर त्यांना मंजुरी मिळाली आणि ज्यांना पदे उपलब्ध नव्हती. पण ते काम करीत होते. उदाहरणार्थ मिटर रिडर आहेत, प्लंबर आहेत. हे ग्रामपंचायत काळापासून काम करत होते. ते

नगरपालिकेत आल्यानंतर पदे निर्माण झाली. म्हणून ते तसेच राहिले. १९८५ नंतर, १९८८ नंतर आपल्याकडे काही गांवे आली. राई, मुर्धा, मोर्वा ग्रामपंचायती आल्यानंतर तेथील स्टाफ आपल्याकडे आला आणि तो स्टाफ आल्यानंतर पुन्हा ते ज्या जागेवर काम करित होते. त्या जागा इथे काही उपलब्ध होत्या, काही नव्हत्या. म्हणून ते खालच्या जागेवर काम करित होते. आता याच्यामधून एक असा मोठा प्रश्न निर्माण झाला की, सेवा ज्येष्ठता यादी पदोन्नतीसाठी दोन भाग आहेत. सेवा ज्येष्ठता यादी, गोपनीय अहवाल या दोन बाबीमध्ये पात्रतेचे निकष ठरविले जातात. पण सेवा ज्येष्ठता यादीचा विचार करताना आपण नेहमी सेवा सातत्य कधी बोलतो. एक संस्था सोडवून दुसऱ्या संस्थेमध्ये सम लेव्हलच्या ज्याची लेव्हल सारखी आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून ग्रामपंचायत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून नगरपालिका आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महानगरपालिका आहे. तेव्हा तिन्हीचे केडर एक आहे. ग्रामपंचायतमधून एखादा कर्मचारी जेव्हा महानगरपालिकेत येतो. तेव्हा त्यांचे सेवा सातत्य हे नगरपालिकेमध्ये जॉइन झाल्यापासून न पकडता त्याचे सेवा सातत्य त्या ठिकाणी तो परमनन्ट झाला तेव्हापासून धरायला पाहिजे. ही वादाची बाब असू शकेल. परंतु या सेवा ज्येष्ठतेच्या संदर्भात आजही आपल्याला सांगतो की, आजपर्यंत अशा प्रकारची सेवा ज्येष्ठता यादी प्रशासनाने चार महिन्यापूर्वी आपल्या कारकिर्दीत लावली. पण यापूर्वी कधीही लावलेली नाही. त्याच्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. काही कर्मचारी जे पात्र म्हणून सांगतात की, आम्ही सेवा ज्येष्ठतेला पात्र आहोत. आमच्या नगरसेवकांकडे, लोकप्रतिनिधिकडे येतात आणि सांगतात आमच्यावर अन्याय झाला. तर अशा लोकांवर खरोखर अन्याय झाला की नाही झाला, याची तपासणी कोण करणार? सभागृहाला करायला पाहिजे आणि म्हणून सभागृहापुढे सुध्दा या सेवा ज्येष्ठता यादीची माहिती यायला पाहिजे. साहेब महत्वाची बाब म्हणजे आपण एक निवड समिती केली. खरे म्हणजे निवड समिती करीत असताना त्याच्यासंबंधी शासनाने विशिष्ट आरक्षणाबाबतचे ज्या निवडी आरक्षणाच्या जागा भरावायाच्या आहे. त्याच्यासाठी शासनाने काही निकष ठरविले आहे. त्यामध्ये आपण बऱ्याच लोकांना कायदेशीर प्रक्रियेप्रमाणे सामील करुन घेतले आहे. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सहाय्यक संचालक रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, उपआयुक्त दोन. निवड समितीवर एका व्यक्तीची नेमणूक करण्याचे आपल्या अधिकारात आहे म्हणून कदाचित आपण दोन लोकांची केली असेल. त्याच्यानंतर सुध्दा आणखी एका व्यक्तीची या निवड समितीवर मागासवर्गीयांचा प्रतिनिधी म्हणून केली. त्याचे नाव काहीतरी बाबुराव वाघ म्हणून आहे. मला ते कळले नाही की, कुठल्या कायदयाच्या तरतुदीमध्ये असा मागासवर्गीयांचा प्रतिनिधी घ्यायचा असतो. ते कदाचित माझे नॉलेज तोकडे असेल. परंतु ज्या समित्या ज्या आरक्षणामध्ये नेमायच्या असतात त्यामध्ये विशेष जिल्हा समाजकल्याण सेवायोजन कार्यालय आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांची समिती असावी लागते. त्याच्यामध्ये आयुक्त आणि आयुक्ताने नेमलेला प्रतिनिधी. पण ह्या नेमलेल्या समितीमध्ये जेव्हा आपण निवड करित असतात. तेव्हा फायनल निवड होईपर्यंत किंवा झाल्यानंतर यातील समाजकल्याण अधिकारी जर उपस्थित नसला तर आपण केलेल्या सर्व निवडी ह्या अवैध होतात आणि दुर्दैवाने आपण जी मंजूर पदाची जी काही यादी या ठिकाणी दिलेली आहे. ती सभागृहापुढे नाही पण माझ्याकडे आहे आणि याच्यामध्ये विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांची कुठेही स्वाक्षरी नाही. तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापूर यांचीसुध्दा कुठेही स्वाक्षरी नाही आहे.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौराच्या आदेशाने विचारु इच्छितो की, आताच सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी सांगितले की, नगरसेवकांकडे ती यादी नाही आणि त्यांच्याकडे एक एक्स्ट्रा यादी आहे. ती यादी कुठली आणि त्यांच्याकडे कशी काय गेली? त्याची थोडीशी माहिती पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

चांगला प्रश्न घेतला. तुम्हाला पण माझा मार्ग सापडेल आपल्याला माहिती आहे. आपल्याला एक गोषवारा दिला आहे. त्या गोषवाऱ्यामध्ये आयुक्त साहेबांनी लिहीले आहे की, काही माहिती पाहिजे असल्यास ती खात्याकडून मिळेल. ती आपल्याच खात्याने दिली आहे. मग जो मागायला जाईल त्याला मिळेल तर शासन परिपत्रक क्र. बी.सी.सी.१०८४, १७७, १६ब २४/५/८४ नुसार आणि शासन परिपत्रक सामान्य प्रशासन बीसीसी १०७३/३६४०/२२३६, ७/१०/९७ नुसार आणि शासन परिपत्रक १९७३ या नुसार समाज कल्याण अधिकाऱ्यांची जर अनुपस्थिती असली तर झालेल्या निवडी या रद्द

करण्यात येतील असे शासनाचे स्पष्टपणे परिपत्रके निघालेली आहेत. त्यासंबंधी माहिती याच्यामध्ये आहे. आताही निवड होत असताना काही गोष्टीची पूर्तता करणे फार आवश्यक आहे. आरक्षण हे काही एका वर्षात झालेले आरक्षण नाही आहे. अनेक वर्षापासून हे आरक्षण चालत आलेले आहे. तर या ठिकाणी आपल्याला असे दिसून येते की, असे चालू असलेले आरक्षण वर्षानुवर्षे त्यासंबंधीची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठवायची. ती पाठविली नाही. ह्याच्यानंतर मागील रिक्त पदांची संख्या अनुशेष नामावली नोंदणीनुसार चालू राखीव पदे आणि प्रत्येक वर्गासाठी राखून ठेवलेल्या पदांची संख्या शासन परिपत्रक बीबीसी, बीसीसी १०७३/३६४०/२२३६, दिनांक ०७/१०/१९९७ अन्वये ही सगळी माहिती त्या कोष्टकामध्ये तयार करुन एकात्मिक विकास प्रकल्प अधिकारी महाराष्ट्र लोकसेवा आयोग या लोकांना कधीही पाठविली नाही. पाठविल्या बाबतची कुठलीही नोंद इथे नाही. ५२(१)(२) खाली आपण जी निवड समिती जाहिर केलेली आहे. या निवड समितीमध्ये फक्त पदोन्नतीच्या बाबतीत आपण निर्णय घेतले आहेत की सरळ सेवेचे पण घेतलेले आहेत याची माहिती नाही. अशा निवड समितीला सरळ सेवा भरती करता येते. अशा निवड समितीला पदोन्नतीची भरती करता येते. या बाबतचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. दुसरी बाब, मागासवर्गीयांच्या पदोन्नतीसाठी. या पदोन्नतीच्या जागा एकूण किती होत्या? आणि त्यामध्ये किती टक्के आरक्षण मागासवर्गीयांना दिले? त्यामुळे किती जागा या पदोन्नतीने आपण भरल्या? यासंबंधी काही माहिती नाही आहे. दुसरी बाब अशी की, आपण जेव्हा शासनाकडे प्रस्ताव पाठविला. तेंव्हा सहा सहआयुक्तांची आपण मागणी केली होती. त्यातील सहा सहआयुक्त आपल्याला मंजुर झालेले आहेत. सहआयुक्त चार आपल्याला माहिती आहे की, यामध्ये सरळ सरळ दोन सरळ सेवेतुन येतात आणि दोन पदोन्नतीने येतात. याच्यासाठी शासनाने एक वेगळा जी.आर. देखील काढलेला आहे. जेंव्हा पदोन्नतीच्या जागा भरण्यात येतात. तर त्याला कुठल्या प्रकारे अनुशेष लावावा हे बी.सी.सी. प्र.क्र.२२२/२०१६ व १९/०५/०३ च्या परिपत्रकाने आपल्याला दिले आहे. पण याचीसुध्दा कुठे माहिती दिसत नाही आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये आपल्याकडून जो गोषवारा आला त्याची फक्त दीड पानामध्ये माहिती आहे आणि पुढे जे आपण म्हटले आहे की, सरळ सेवाने यामध्ये एकूण मंजुर जागा किती आहेत? भरलेल्या जागा किती आहेत? भरावयाच्या जागेमधून अनुशेष किती बाकी आहेत? अनुशेषामध्ये सरळ सेवेने किती भरली गेली पाहिजेत? आणि पदोन्नतीने किती भरली गेली पाहिजे? हे जर कळले असते तर ह्याच्यावर निर्णय घेणे फार सोपे झाले असते. चौथी बाब आहे की, मुलाखतीद्वारे आपल्याला याद्या मागवून मुलाखतीद्वारे आपल्याला निवड करता येते. अशा प्रकारच्या याद्या आपण केंव्हा आणि कधी मागविल्या? यापूर्वी सुध्दा याद्या मागविलेल्या. त्यांना मुलाखतीला बोलावले. त्यांचे सिलेक्शन पण झाले. पण त्यांना काही नेमणूक दिली नाही. मग ती प्रक्रिया कुठे खंड पडली. ही एक बाब आहे. त्याच्यानंतर अलिकडे तुम्ही किती संस्थाकडून याद्या मागविल्या. म्हणजे शहापूर वरून, समाजकल्याणवरुन आणि सेवायोजन कार्यालयामधून आणि त्या आलेल्या याद्या त्यांच्या नावासहित त्यांची कुठेही माहिती नाही. किती लोक यामध्ये आली. खरे म्हणजे आम्ही जाहिरातीद्वारे काय म्हणतो? जाहिरात देण्याचा प्रसंग केंव्हा येतो? जेंव्हा आपण याद्या मागविल्यानंतरसुध्दा आपण अनुशेष भरु शकत नसाल तर ओपन जाहिरात करावी लागते. तर तशी ओपन जाहिरात करण्याचा प्रसंग आपल्यावर आला नाही. याचा अर्थ असा की, याद्यांमध्ये तेवढे आवश्यक उमेदवार आपल्याला मिळालेले आहेत. पण ते किती मिळाले? त्याची काही माहिती नाही. म्हणून सन्मा. महापैार मॅडम आणि आयुक्त साहेबांना विनंती करतो की, सगळी माहिती आमच्यापुढे आली तर त्याच्यावर निर्णय घेणे सोपे होईल. जात प्रमाणपत्र पडताळणी तुम्हाला माहिती आहे की, जून उगवला तर तुमची आमची किती तारांबळ उडते? हे तुम्हाला माहिती आहे. कुठल्याही कॉलेजमध्ये त्यांना जात पडताळणी सर्टिफिकेट दिल्याशिवाय प्रवेश मिळत नाही. प्रवेशासाठी विद्यार्थी इतक्या फेऱ्या मारतात, चकरा मारतात आणि त्यांना नोकऱ्या पाहिजे आहेत. त्यांना थांबायला काय हरकत आहे. वरती शासनाने असेही परिपत्रकात नमुद केलेले आहे की, ज्याची निवड झालेली आहे त्यांना १५ दिवसांच्या आत कळवा की, तुमची निवड झालेली आहे आणि प्रमाणपत्र पडताळणी करुन आणण्याचे काम त्यांनी करावयाचे आहे. ते जेवढ्या लवकर करतील तेवढ्या लवकर ते येतील. पण त्यांच्यासाठी आम्ही मुदतवाढ देणे किंवा प्रमाणपत्र न पाहता करणे. कारण एकदा प्रमाणपत्र न पाहता जर आम्ही नेमणूक दिली तर दुर्दैवाने काय होणार आहे की, हा कर्मचारी ज्याला आम्ही सांगतो की, तुझे सर्टिफिकेट खोटे आहे. तेंव्हा तो कोर्टात जाऊन पहिल्यांदा स्टे येईल आणि तो सांगेल हे जात पडताळणी समितीने आम्हाला बरोबर केले नाही आहे. पुन्हा ते हायकोर्टात जातील, पुन्हा सुप्रीम

कोर्टात जातील आणि त्याच्यामध्ये आम्ही वेळ का घालावा? आणि म्हणून जात प्रमाणपत्र पडताळणीची बाब संपूर्ण तपासणी झाल्याशिवाय करता येणार नाही. दुसरी महत्वाची बाब, सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले यांनी सांगितली की, काही लोकांनी वरिष्ठ लिपीकाच्या जागावरती क्लेम केला. त्यांनी कोर्टामध्ये जाऊन दावा दाखल केला. खरे म्हणजे कोर्टामध्ये निर्णय झाल्यानंतर त्या निर्णयाची आपण दखल घेतोच. पण मला हेही सांगायचे आहे की, कुठल्या कोर्टाच्या निर्णयाची दखल आम्ही घेतली पाहिजे. जे लोक कोर्टात गेले ते लोक अनफेवर लेबर प्रॅक्टेसेस ॲक्टखाली औद्योगिक न्यायालयात गेले आणि सुदैवाने किंवा दुर्दैवाने म्हणा, आमची नगरपालिका ही महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिसेस रुल्स या नियमाखाली चालते. जेंव्हा महानगरपालिकेने स्वतःच्या कर्मचाऱ्यांच्या सेवा अटी शर्ती स्वतः तयार केलेल्या नाहीत, त्याला मंजुरी दिल्या नाहीत, तेंव्हा त्याला एम.सी.एस. चा रुल्स लागू झाला आणि एम.सी.एस. च्या रुल्समध्ये अशा प्रकारचा अपिल केलेला नाही. त्यांना मॅटपुढे जावे लागते. उद्या औद्योगिक न्यायालयात जाऊन एखादा निर्णय आणायचा आणि त्या निर्णयाची दखल प्रशासनाने घ्यायची त्यांना प्रमोशन द्यायचे ठिक आहे. इतर लोक जर प्रमोशनला ड्यू नसतील तर नक्कीच त्यांची रॅंक वर करा. पण इतर लोक ज्यांना बारा बारा वर्ष झाली, त्यांचे एवढे कालावधी झाले, त्यांनासुध्दा समांतर प्रमोशन मिळाले पाहिजे. ही पात्रता धरता कामा नये की, न्यायालयाचा निर्णय होता म्हणून त्यांना पदोन्नती दिली. ही पात्रता होऊ शकत नाही. कारण ते सक्षम न्यायालय नाही आहे. आम्ही त्यांचा अवमान केलेला नाही आहे. त्या जागेवर ठेवले किंवा त्यांना पदोन्नती देताना त्यांच्याबरोबरची जी लोक आहेत त्यानासुध्दा समांतर पदोन्नती दयायला पाहिजे होती. पण अशा प्रकारे झालेले नाही आहे. याच्याशिवाय ज्या ठिकाणी एस.टी. चा कॅन्डीडेट आम्हाला मिळत नाही. पण एन.टी. चा कॅन्डीडेट ॲव्हेलेबल आहे त्यावेळी अशी स्पष्ट तरतूद त्याच्यामध्ये आहे की, अशा जागेवरती एन.टी चा उमेदवार आम्हाला भरता येतो आणि तो भरत असताना आम्हाला त्याच्याकडून हमीपत्र लिहून घ्यावे लागते की, जेंव्हा एस.टी.चा उमेदवार आम्हाला भरायचा असेल तेव्हा त्या एन.टी. च्या उमेदवाराला आपोआपच सेवेतून कमी केले जाईल. मला वाटते या सगळया गोषवाऱ्यामध्ये आपण कृपया पुन्हा सर्व ही माहिती द्या. सर्व नाव आणि यादीसहित द्या. आपल्याला मंजूरी द्यायला आम्हाला काही प्रॉब्लेम नाही. परंतु आम्हालाही कळले पाहिजे. कारण सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांनी सांगितले की, स्थानिक लोक कुठे गेले? आम्हाला स्थानिक लोकांना माहिती नाही की, कशा प्रकारे नेमणुका होतात? त्यामुळे शेवटी आम्ही तुमच्याकडेच येऊन भांडतो आणि म्हणून महापौर मॅडमना विनंती आहे की या संपूर्ण टिपणीसहीत आपल्यालासुध्दा माहिती मिळेल. कारण सेवा भरती हा एक असा विषय आहे की, आपण उच्च पदावर बसलेले असतो. पण एका साध्या माणसाला नोकरी देऊ शकत नाही. पण प्रशासनाने मनात ठरविले तर एक माणूस एक दिवस काम केला आणि परमनन्ट झाला. अशा अनेक केसेस या ठिकाणी आहेत. म्हणून या ठिकाणी प्रशासनाने त्यांच्या बुध्दिमत्तेचा वापर आमच्या पदाधिकाऱ्यांच्या कामासाठी केला तर अजून बरे होईल. म्हणून कदाचित सन्मा. सदस्य मिलन पाटील म्हणाले की, स्थानिक लोकांना तुम्ही असे डावलता असा प्रश्न नाही आहे. म्हणून आपण कृपया ही माहिती द्या. कारण याच्यामध्ये खूप डिटेलमध्ये जाणे गरजेचे आहे आणि ते ७०, ७१ सेक्शनप्रमाणे आपल्याला ही माहिती घेणे गरजेचे आहे. असे मी सांगतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, असे पुन्हा पुन्हा सांगितले की, गटनेत्यांच्या बैठकीमध्ये ठरले आहे. गटनेत्यांच्या बैठकीमध्ये हा जो पदोन्नतीचा विषय होता. त्यावेळी आपण अपेक्षा केली होती की, आयुक्तही असतील. पण गटनेत्यांच्या बैठकीत आयुक्त नव्हते. त्यामुळे ती चर्चा अपुरी राहिली. लिओ साहेब कधी कधी घाई करतात. कधी कधी मौन धारण करतात. आजच्या या विषयावर सगळे तांत्रिक मुद्दे चर्चेला आले होते. एकतर सरळ सेवा भरणे हा एक विषय वेगळा आणि पदोन्नतीच्या विषयावर आम्ही निश्चित बाजू मांडली होती की, एखाद्याही कर्मचाऱ्याची ज्यांनी अनेक वर्षे या महापालिकेत नगरपालिकेपासून किंवा पंचायतीपासून ज्यांनी सेवा केलेली आहे. त्यांच्यावर कुठेही अन्याय होता कामा नये. तर त्याच्याबद्दल काहींच्या तक्रारी असतील. महापौरांच्याकडे काही तक्रारी होत्या. असा विषय आल्यानंतर त्याचा सविस्तर खुलासा झाला नाही आणि खुलासा नाही झाला त्यामुळे पदोन्नतीचा विषय नक्कीच परिपूर्ण म्हणजे सभागृहाचे मत आजमावून सन्मानित सदस्यांच्या ज्या सुचना येतील. त्या विचाराधीन घेऊन नंतर हा विषय पुढच्या सभेला घ्यायचा असे काल निश्चित ठरले होते. त्यामुळे जसे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी सांगितले की, त्यांच्या नेहमीच्या पध्दतीने त्यांची

अभ्यास करावयाची पध्दत आहे. ती अत्यंत बारकाईने मत मांडलेले आहे. अन्य सदस्यांना जरी असेल तरी त्यांनी त्यांच्यावर मत मांडले पाहिजे. पण ह्या सभागृहात आपण सभागृह म्हणून मी दोन गोष्टी निदर्शनास आणतो की, जसे मघाशी आयुक्तांनी सांगितले. आयुक्त साहेब कशासाठी असे सांगतात त्यांचा मला कधीच उलगडा होत नाही. हे सभागृहाने ठरवायचे आहे. आमची अशी अपेक्षा आहे की, आमचे असे काही जाणकार आहेत की, सभागृहाचे अधिकार आणि आयुक्तांचे अधिकार याच्यात कुठेतरी थोडासा फरक आहे. निश्चित जेव्हा तुम्हाला कायदे सांगते, महापालिका ॲक्ट सांगते किंवा कोर्ट सांगते या सभागृहातील सदस्यापेक्षा आपली जाणकारी नक्कीच जास्त आहे असा मी विश्वास ठेवतो आणि जेंव्हा ती सर्टिफीकेट आपण न तपासता त्यांची पडताळणी न घेता ठेवायचे किंवा कसे सभागृहाने ठरवावे असे जे शब्द येतात. तेंव्हा थोडीशी यातना होते की नाही. याच्यावर आयुक्तांचे रुलिंग स्पष्ट झाले की, नियमात आपण ठेवूच शकत नाही. त्याच्यावर चर्चा होणार. काहीही असेल. कारण मी याबाबतीत बरेचसे सतर्क होतो. ज्या ज्या वेळी दाखले तपासायचे काम होते. मी त्यांच्याकडे सतत जात होतो. किती दाखले आले? किती आले नाहीत? त्या सगळया ऑफिसर्सना मी पत्रे लिहीली होती की, आमच्या महापालिकेत कर्मचाऱ्यांची गरज आहे. आमच्याकडे अनेक वर्षानी ही भरती होत आहे. ज्यांना ज्यांना या निवड समितीने निवडले आहे. त्यांचे दाखले जात पडताळणी समिती आपल्याकडे पाठविले आहेत. आपण जितक्या लवकर ते महापालिकेकडे पाठवू शकाल तितक्या लवकर पाठवा. जेणेकरुन ते कामावर हजर होऊ शकतील. नाहीतर झाले कसे एकतर जो कॅन्डीडेट सिलेक्ट झाला. बिचारा दिवसभर अनेक वेळा येऊन तो सिलेक्ट झाला. त्याचे त्या लिस्टमध्ये नाव वाचले, घरी जाऊन तो आईच्या पाया पडला. महापालिकेत मला नोकरी मिळणार. लिस्टमध्ये माझे नाव आले आहे आणि अनेक महिने झाले त्याला नोकरीचा पत्ता नाही. त्याची आई चिंता करते, बहीण चिंता करते, तो स्वतः चिंता करतो. काही लोकांची पडताळणी होऊन आली. आता जी मघापासून चर्चा चालली आहे. मी पहिल्यांदा सांगितले हे निश्चित आहे की अमुक लोकांची पडताळणी होणे बाकी आहे आणि कायद्यानुसार किंवा आयुक्तांच्या अधिकारात किती जरी हा भावनेचा विषय असला तरीसुध्दा त्यांची जात पडताळणी झालेली नाही आणि सर्टिफिकेट आलेले नाही. आपण त्याला नोकरी देऊ शकत नाही. तोपर्यंत थांबायलाच लागेल. असे निवेदन झाले असते तर बरे झाले असते आणि पदोन्नतीच्या बाबतीत जर काल तुम्ही आले असते. आजच्या एवढी आणखी चर्चा झाली आहे. अजून करायची आहे हे निश्चित आहे की, पदोन्नतीमध्ये ज्यानी ज्यानी ह्या महापालिकेत पंचायतीपासून काम केलेले आहे. त्या त्या पदावर केलेले आहे. लिगली त्यांचा एकाचा कोणाचाही कोणताही अधिकार डावलता कामा नये असे स्पष्ट चित्र कुठे होता कामा नये की, इथे वशिल्यावर नंबर लागतो किंवा यांच्या सौजन्याने नंबर लागतो. या महापालिकेत हे आयुक्त जोपर्यंत आहेत तोपर्यंत ज्याच्या नियमाने नेमणूक होत असेल त्यालाच नेमणूक मिळेल. असे चित्र होणे गरजेचे आहे. कारण कालच्यानंतर जेव्हा जेव्हा गटनेत्यांची बैठक झाली. विषयच पेन्डींग होता. म्हणून मी काहीना सूचना दिल्या माझ्यापर्यंत ती सुचना आली. आमच्या तक्रारी आहेत. त्याला अवधी मिळेल. घाई करण्याचे काही कारण नाही. ह्या सभेत तो विषय होणार नाही आहे. पण जर कोण आला आणि भावनात्मक कोण मागेल की, मला मिळालाच पाहिजे. मी ह्याचा हा आहे, त्याचा तो आहे. तर त्याला काही महत्व राहणार नाही. नियमात बसते त्याची पदोन्नतीची जी यादी आहे जेवढी माहिती मागितलेली आहे. तसेच परिशिष्ट बनवून सभागृहात पुढच्या सभेत हा विषय घ्यावा. अशी मी तुम्हाला विनंती करतो.

**रोहित सुवर्णा :-**

महापौर मॅडम, मी सुरूवातीला बोललो होतो की ५३(१) बी.पी.एम.सी. ॲक्टखाली पदोन्नती नेमणुक करण्याचा अधिकार मा. आयुक्तांना आहे काय? हा माझा एक प्रश्न होता. दुसरा जे सन्मा. नगरसेवक माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटीलजी बोलले की, काही लोक कोर्टात गेले. मग स्टे आणतात. तिच केस होती कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये. श्रीमती ठाणेकर बाईंची केस. त्याच केसमध्ये उच्च न्यायालयाचे मा. मुख्य न्यायाधिश सी. के . ठक्कर आणि श्रीमती रंजना देसाईंनी दिलेला तोच जजमेन्ट होता. कल्याण डोबिवली महानगरपालिकेमध्ये त्या बाईला नोकरीवर घेतले होते. सात वर्षानंतर आयुक्त साहेबांनी तिला निलंबित केले की, तिचा जातीचा दाखला खोटा आहे म्हणून ती बाई हायकोर्टात गेली आणि तिला स्टे मिळाला आणि तो स्टे आता कायम आहे. प्रिन्सिपल ऑफ नॅशनल जस्टीस सात वर्षानंतर तुम्ही कोणाला नोकरी वरुन काढू शकत नाही. या आधाराखाली त्या बाईला परत नोकरी मिळाली. अशा काही कोर्ट केसेस होतात. मग आपल्याच वकिलांना फी जाते.

नगरपालिकेच्या पैशाचा दुरुपयोग होतो. या सगळया गोष्टी आपण बारकाईने लक्षात घेऊन आमच्या सगळयांच्या समोर सविस्तर, लेट झाले तरी हरकत नाही. ऑक्टॉयबाबत भरपूर लेट झाले होते. असे अनेक विषय, जो सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट, भरपूर लेट चालले आहे. यांच्यामध्ये थोडेसे लेट गेले तरी हरकत नाही. पण सविस्तर माहिती आस्थापना विभागातून माहिती घ्या. सर्व संबंधित विभागातून घ्या. अन्यथा असेच कोर्ट मॅटर वाढत जातात. मग आपली महानगरपालिका ही फक्त कोर्टबाजी करत असते. असाच लोकांचा समज असतो. तर आपण कृपया आमच्या सदस्यांच्या समोर सगळी सविस्तर माहिती द्यावी ही माझी विनंती

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदया, या ठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांनी अतिशय उद्‌बोधक मार्गदर्शन आतापर्यंत केलेले आहे. वेगवेगळे मुद्दे या ठिकाणी जे उपस्थित केलेले आहेत. त्याचे थोडक्यात उत्तर देण्याचा मी प्रयत्न करतो. सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा साहेब यांनी जो या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला होता की, पदोन्नती जर आयुक्तांचा अधिकार असेल तो या सभेपुढे मंजुरीसाठी येण्याची आवश्यकता नाही. त्याला मी पहिले उत्तर देऊ इच्छितो की, पदोन्नती ही सुध्दा नवीन पोस्टवरची नियुक्ती आहे आणि म्हणून हा विषय या सभागृहापुढे घेतलेला आहे. निवड हा आयुक्तांचा अधिकार आहे. निवड समितीचा अधिकार आहे. ती कॅटेगिरी संपलेली आहे आणि आता आपल्यापुढे तो विषय मंजुरीसाठी ठेवलेला आहे, हा एक मुददा. शासन निर्णयानुसार ज्यांची जात पडताळणी समितीची सर्टिफिकेट आलेली आहेत त्यांना नियुक्त्या दिलेल्या आहेत परंतु ज्यांची अद्याप आलेली नाहीत आणि ज्यांना तीन महिने आपण त्या निवड समितीकडे पाठवूनदेखील त्यांचे उत्तर आलेले नाही. अशा केसेसमध्ये नियुक्ती दयायची का? हा एक प्रश्न या सभागृहापुढे उपस्थित केलेला आहे. याच्यामध्ये आम्ही असे म्हटले होते की, सभागृहाने त्यावर निर्णय घ्यावा. एक जी महत्वाची गोष्ट आहे ती अनुशेष भरतीची आहे आणि ज्याची मुदत डिसेंबर एन्डपर्यंत शासनाने दिली आहे. तांत्रिकदृष्ट्या आपण या मुदतीमध्ये ही भरती केलेली आहे. याबददल आमचे नगरविकास सचिव यांच्याशीदेखील मी चर्चा केली आणि कनफर्म केलेले आहे की, अशा प्रकारे त्यांची निवड झाल्याचे त्यांना आदेश देणे ही या प्रक्रियेतील पूर्णतः होउ शकते का? कारण आमच्या लेव्हलला आता काही पेन्डींग नाही आहे. तेंव्हा त्यांनी असे उत्तर दिलेले आहे की, जात पडताळणी समितीने जोपर्यंत आपल्याला त्यांच्याबद्दल क्लिअरन्स देत नाही. तोपर्यंत आपण नियुक्त्या करु नयेत. मात्र त्यांना निवड झाल्याचे आपण कळवावे आणि ज्यांचे अशा प्रकारचे क्लिअरन्स आलेले असतील त्यांना आपण नियुक्त्या द्याव्यात. दरम्यानच्या काळामध्ये शासन निर्णयाप्रमाणे निर्णय घ्यायचा की नाही? हा एक मुद्दा या सभागृहापुढे जो आहे या बाबतीत आपण कसाही निर्णय घेतला. या ठिकाणी जे मुद्दे उपस्थित केले ते खरोखरच महत्वाचे आहेत. परंतु शासन निर्णयदेखील आपल्या निदर्शनास आणणे हे माझे कर्तव्य होते. आपले सर्वांचे जर असे मत असेल की, जात पडताळणी समितीचे दाखले आल्यानंतर या उमेदवारांना नियुक्त्या द्याव्या म्हणजे योग्य उमेदवाराला न्याय मिळेल. त्याप्रमाणे आपण निर्णय घेतला तरी प्रशासनाची त्याला हरकत नाही. दुसरा जो मुद्दा आहे. सन्मा सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत की, हा जो बॅकलॉग आहे तो कोणी सर्टिफाय केला? याबददल मी उत्तर देउ इच्छितो. कोकण भवनामध्ये मागासवर्गीय कक्ष आहे. हा मागासवर्गीय कक्ष वर्ग ३ आणि वर्ग ४ या संवर्गाचे अनुशेष सर्टिफाय करते. आम्ही प्रत्येक पद वर्ग ३ आणि वर्ग ४ चे हे त्यांच्याकडून सर्टिफाय करुन त्याच्या सही शिक्क्यानिशी आपण आणलेले आहे. त्यामुळे आपल्याला जर ती माहिती बघायची असेल तर आम्ही कधीही उपलब्ध करुन देऊ. या पदाचे सर्टिफिकेशन हे शंभर टक्के झालेले आहे आणि त्यांच्यानंतरच ही भरतीची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. दुसरा जो मुद्दा होता की नक्की अनुशेष किती आहे? ही माहिती सभागृहापुढे आलेली नाही असे पाटील साहेबांचे म्हणणे होते. त्यांना मी उत्तर देऊ इच्छितो की, हा जो कॉलम आपल्याला परिशिष्ट १ मध्ये दिलेला आहे. त्याच्यात आम्ही स्पष्ट म्हटलेले आहे, वर्गवारीनुसार अनुशेष. याच्यामध्ये ही सर्व डिटेल माहिती दिलेली आहे. आपण परिशिष्ट १ चे कृपया अवलोकन करावे. हा जो अनुशेष या कॉलममध्ये दर्शविण्यात आलेला आहे हा कोकण भवनने सर्टिफाय केलेल्या अनुशेषाचीच ही माहिती आहे. असाच्या असा अनुशेष त्यांनी सर्टिफाय केलेला आहे. तोच आम्ही या ठिकाणी दाखविलेला आहे आणि मग त्याच्या पुढच्या कॉलममध्ये भरलेला अनुशेष आहे आणि मग ह्याच्यामधून हे मायनस केल्यानंतर जो रिक्त राहिल तो भरण्यासाठी आपण यथावकाश प्रयत्न करणार आहोत. मग आपण जसा मुद्दा उपस्थित केला की, एम्प्लॉयमेंटकडे उमेदवार नसतील

तर आपल्याला जाहिरात देऊन असे उमेदवार उपलब्ध करुन घेता येतील, वगैरे. दुसरे वर्ग-१ आणि वर्ग-२ याच्याबाबतीत जो अनुशेष आहे हा शासन सर्टिफाय करुन देते. म्हणजेच नगरविकास खाते सर्टिफाय करुन देते. या ठिकाणी संबंधित डेप्युटी सेक्रेटरीशी आमची सविस्तर चर्चा या विषयावर झालेली आहे. काही माहिती त्यांनी मागविली होती. ती माहिती त्यांना वेळोवेळी पुरविण्यात आलेली आहे. एक मुददा त्याच्यामध्ये असा होता की, वर्ग १ ची जी एकाकी पदे आहेत. त्या एकाकी पदाला आरक्षण लागू होत नाही. त्यामुळे ती पदे भरत असताना आम्ही कुठल्याही योग्य उमेदवाराची निवड करु शकतो. परंतु त्यावर त्यांनी आम्हाला असे मार्गदर्शन केले की, एकाकी पदांचे क्लबिंग एकत्र करणे आवश्यक आहे आणि क्लबिंग करुन त्यांनंतर त्याचा अनुशेष हा शासन सर्टिफाय करेल आणि त्यानंतर त्याच्या भरतीची प्रक्रिया म्हणजे जो महानगरपालिकेने भरण्याचा त्यातील आपला जो भाग आहे तर तो भरण्यासाठी हे विषय आपल्या सभागृहापुढे उपस्थित केले जातील. सेवा ज्येष्ठता यादीबद्दल आपण जो मुददा उपस्थित केला होता. हे मी मान्य करतो की, आतापर्यंत सेवा ज्येष्ठता अंतिम झाली नव्हती. परंतु मी गेले सहा सात महिने या विषयामध्ये स्वतः लक्ष घातले आणि आस्थापनेला या संदर्भात वेळोवेळी सुचना दिल्या. गोपनीय अहवाल देखील या महानगरपालिकेमध्ये उपलब्ध नव्हते. लोकप्रतिनिधींची वेळोवेळी मागणी असायची की, आमच्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे. त्यांना पदोन्नती मिळाली पाहिजे. त्यावेळी देखील मी असाच खुलासा करत होतो. माझीदेखील ती इच्छा आहे. परंतु जोपर्यंत त्यातील कायदेशीर बाबी पूर्ण होत नाहीत. तोपर्यंत आपल्याला ही पदोन्नती देता येणार नाही आणि या कायदेशीर बाबी पूर्ण करुन घेतल्यानंतरच त्यांचे गोपनीय अहवाल, त्यांची सेवा ज्येष्ठता यादीला आलेले आक्षेप, त्यांची सूनावणी करून त्यांच्यावर निर्णय घेणे ही सगळी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झालेली आहे आणि गोपनीय अहवाल आणि सेवा ज्येष्ठता या दोन्ही गोष्टी विचारात घेतल्यानंतर आपण ही पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. याचा अनुशेष देखील वर्ग-३ आणि वर्ग-४ हा कोकण भवनने सर्टिफाय केलेला आहे. यांच्यासाठी ज्या कमिटया आहेत. त्या सरळ सेवेसाठी आपण वाचलेल्या कमिट्या आहेत आणि पदोन्नतीच्या कमिटीमध्ये एक मागासवर्गीय अधिकारी, आयुक्त, आणि इतर जे सदस्य आहेत. त्या सदस्यांचा समावेश असलेली ही पदोन्नती कमिटी आहे. या पदोन्नती कमिटीच्या वेळोवेळी बैठका झालेल्या आहेत आणि त्यातून आतापर्यंत देण्यात आलेले कोर्टाचे निर्णय आपण असेही या ठिकाणी मत व्यक्त केले की, लेबर कोर्ट सक्षम नाही अशा प्रकारचा निर्णय घेण्यासाठी. त्यावरती मी भाष्य करणार नाही. परंतु त्याच्यावर आपण म्हणता तसे अपिल व्हायला पाहिजे होते. परंतु ज्या स्टेजला हे सर्व प्रोसिडींग माझ्यापुढे आले. त्या स्टेजला अपिलची मुदत संपून गेली होती आणि त्या निर्णयावर कार्यवाही करण्यापलिकडे आपल्याला दुसरा उपाय राहिलेला नव्हता. त्याच्यामध्ये जे कोर्टाने दिलेले डायरेक्शन आहेत. तर त्याच्यामध्ये गुणवत्ता आणि सेवा जेष्ठता ह्या गोष्टींचा स्पष्ट उल्लेख आहे आणि ज्यांनी योग्य पात्रता धारण केली. एल.एस.जी.डी. मॅट्रीक्युलेशन मिनिमम जे क्वालिफिकेशन आहे आणि प्लस त्याची सेवा ज्येष्ठता या सगळया गोष्टी कमिटीने लक्षात घेऊन एक एक केसची स्क्रुटीनी करुन जवळजवळ आमच्या चार पाच बैठका झालेल्या आहेत आणि सर्व प्रतिनिधी कामगारांच्या प्रतिनिधीलाही आम्ही त्याच्यामध्ये बोलवले होते. ते देखील त्याचे एक सदस्य होते. तर हया सर्वाच्या एकत्रित विचाराने आणि समन्वयाने ही पदोन्नतीच्यादेखील यादी बनविलेली आहे. याच्यात जर एखादया कर्मचाऱ्याला असे वाटत असेल की, आम्ही चुकीचा निर्णय घेतला तर याच्यामध्ये ते देखील न्यायालयात जाऊ शकतात आणि हा निर्णय बदलून घेऊ शकतात. त्यामुळे तो मार्ग त्यांना उपलब्ध आहे. मला वाटते इतर सर्व बाबींचा खुलासा हा झालेला आहे. लोकसेवा आयोगाच्या संदर्भामध्ये आपण एक प्रश्न उपस्थित केला की, हा अनुशेष वेळोवेळी लोकसेवा आयोगाला कळवायला पाहिजे. आपली जी भरती आहे ती लोकसेवा आयोगामार्फत होत नाही. ह्या ज्या डायरेक्शन आहेत की, लिपीकांसाठी शासनाने वेळोवेळी लोकसेवा आयोगाला अनुशेष कळविला पाहिजे. कारण त्यांचे जे भरतीचे अधिकार आहेत ते लोकसेवा आयोगाचे आहेत. मंत्रालयामधील लिपीक आणि वरचे जे सगळे शिक्षण ऑफिसर, डेस्क ऑफिसर ही सगळी भरती एम.पी.एस.सी. च्या मार्फतच होते. त्यांचे निवड मंडळ वगैरे आज अस्तित्वात नाही. त्या संदर्भातील त्या डायरेक्शन्स आहेत. त्या महापालिकेला लागू होत नाहीत. माझी सभागृहाला विनंती आहे की, डिसेंबर एन्डपर्यंत आपल्या मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याची जी मुदत शासनाने दिलेली होती. या मुदतीमध्ये आपण ही सगळी कायदेशीर प्रक्रिया व्यवस्थितरित्या पुर्ण केलेली आहे. म्हणून सभागृहाला माझी प्रशासनातर्फे विनंती आहे की, हा विषय आपण मंजूर करावा.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. आयुक्त साहेब मागासवर्गीय अनुशेष अंतर्गत वर्ग ३ सरळसेवा परिशिष्ट १ मध्ये आपण माहिती दिलेली आहे. आपल्याकडे क्रमांक ९ ला अनुरेखक हे एक पद आहे आणि अनुशेषसुध्दा एकच दाखविलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

एकाकी पद आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

एकाकी पदाला रिझर्व्हेशन लागू होत नाही. मग तो अनुसुचित जातीचा पाहिजे हे अशा प्रकारचे मग चुकीचे आहे.

**मा. आयुक्त :-**

नाही ते नवीनमध्ये आलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आणि म्हणूनच जर ते नविनमध्ये आले आहे. तर त्याचा अर्थ असा होतो की, अनुरेखक ही पदे एकापेक्षा जास्त असतील

**मा. आयुक्त :-**

अनुरेखक हे वर्गवार क्लबिंग आहे, पदवार नाही. मला वाटते आपल्या लक्षात आता आले असेल, वर्ग-३, वर्ग-२, वर्ग-४, वर्ग-१ असे क्लबीग एकत्र केलेले आहे आणि त्याच्यावरती कोकणभवनाने हा सर्टिफाइड करुन दिलेला दाखला आहे. आपल्याला दिसायला असे दिसते की, अनुरेखक हे एकच पद असल्याने ते अनुसुचित जातीला कसे जाते.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण त्यांना वर्ग ३ मध्ये मोडलेले आहे. म्हणून आपण त्यांना वेगळे एकांकी पद धरत नाही. वर्ग-३ मध्ये ते सगळी समाविष्ट झालेले आहे. म्हणून त्यांना एकांकी पद धरत नाही.

**मा. आयुक्त**

एक मिनिट एकुण दोन पदे मंजुर आहेत आणि एक आरक्षणामध्ये त्यांनी दाखविलेले आहे. मंजूर पदाचे जर आपल्याला दाखविले असते. तर कदाचित आपला हा गोंधळ झाला नसता.

**प्रफुल्ल पाटील :-**

हो तेच, म्हणूनच मी मघाशी म्हटले यापूर्वी किती पदे मंजूर होती.

**मा. आयुक्त :-**

त्यांच्या बद्दलच्या सर्व डिटेल्स ह्या आपल्याला देण्यात येतील.

**प्रफुल्ल पाटील :-**

हो ते द्या. म्हणजे काहीतरी निर्णय घ्यायला कुठेतरी आम्हाला जागा द्या.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला मंजूर पदाच्या बाबतीतले सर्व माहिती आमच्याकडे आहे. ती आपल्याला देण्यांत येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

ती माहिती द्या. हा विषय पुढच्या सभेला घ्या.

**मा. आयुक्त :-**

त्यासाठी हा विषय थांबवू नये अशी माझी सभागृहाला विनंती आहे. कारण रेकॉर्डवर सर्व माहिती आहे. आपल्याला ती देण्यात येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

आज असे आहे की, या विषयावर जर सविस्तर चर्चा करायची झाली तर आम्हाला कलम ७१ खाली सभागृहाला माहिती मागवावी लागेल आणि त्याच्यावर नंतर निर्णय घ्यावा लागेल. म्हणून माझे असे म्हणणे नाही की, सभागृहाने कलम ७१ खाली.

**मा. आयुक्त :-**

आपण जर उमेदवारांची यादी आमच्याकडून घेतली. तर मंजूर पदांचीसुध्दा माहिती आपल्याला मिळू शकली असती.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब म्हणूनच मी मघाशी म्हटले की, ही सगळी माहिती अगोदर द्यायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

गोषवाऱ्यामध्ये आम्ही हेही म्हटले आहे की, आपल्याला जी माहिती हवी आहे. ती आपण जर आमच्याशी संपर्क साधला असता तर आम्ही ती माहिती आपल्याला दिली असती.

**प्रफुल्ल पाटील :-**

ठिक आहे. जी वैयक्तिक माहिती घ्यायची आहे. ती मी आपल्याकडून घेतली आहे.

**मा. आयुक्त :-**

वैयक्तिक त्यामध्ये काय असते? ते सार्वजनिकच आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

वैयक्तिक म्हणजे मुद्दे वाईस. परंतु जशी सेवा ज्येष्ठता यादीबाबत यापूर्वी कधी प्रमाणित केली? माहिती नाही. आता प्रमाणित केली त्याच्यावर कोणाच्या हरकती आल्या? त्याचे निरसन केले का? कारण सेवा ज्येष्ठता यादीबाबत आपल्याला माहिती आहे की, एखाद्याची जरी हरकत आली तरी तुम्हाला सक्षम प्राधीकाऱ्याकडे ती सेवा ज्येष्ठता यादी पाठवावी लागते.

**मा. आयुक्त :-**

सभागृहापुढे मी खुलासा केला की, त्या प्रत्येक आक्षेपाला सुनावणी देऊन त्याला उत्तरे दिलेली आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

आणि तरीदेखील काही आक्षेप बाकी आहेत.

**मा. आयुक्त :-**

आता कुठले आक्षेप बाकी आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

संजय पाटील या कर्मचाऱ्याने सेवा ज्येष्ठता यादीमध्ये.

**मा. आयुक्त :-**

एक त्याच्यामध्ये गोष्ट आहे की, यादी प्रसिध्द झाल्यानंतर आक्षेप विशिष्ट मुदतीमध्ये घ्यायचे असतात. त्या मुदतीत घेतलेल्या आक्षेपालाच आपल्याला सुनावणी देता येते.

**प्रफुल्ल पाटील :-**

त्यानी विशिष्ट मुदतीत आक्षेप घेतला आहे.

**मा. आयुक्त :-**

मग विशिष्ट मुदतीत जर त्यांनी आक्षेप घेतला असता तर नक्कीच त्याला सुनावणी मिळाली असती. कारण सगळयांना सुनावणी मिळाली असेल तर त्याला सुनावणी टाळण्याचे काही कारण नाही

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणूनच असे विषय आधी प्रलंबित आहेत. एक नेहे म्हणून आहेत.

**मा. आयुक्त :-**

मग त्या कर्मचाऱ्याने आम्हाला कधीही भेटून या गोष्टीचा उल्लेख केलेला नाही आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याकडे लेखी दिलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

तो मुदतीच्या नंतर असेल तर आम्ही विचार करु शकत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मुदतीच्या आत आहे. आपण जी मुदत दिली होती त्या मुदतीच्या आत आहे. म्हणून आम्ही एक पत्रसुध्दा आपल्याला द्यायला आलो होतो. जेव्हा आपण म्हणालात अजून आम्ही पदोन्नती केली नाही. त्याच्यापूर्वी पत्र का देता? त्यावेळीच त्यांनी आक्षेप घेतलेला आहे. एक सुनील नेहे आहेत. ते एन.टी. आहेत. एन.टी. चे आरक्षण आहे आणि दुसऱ्या त्यांच्यानंतरच्या जुन्या लोकांना पुढे पदोन्नती देण्यात आलेली आहे.

**मा. आयुक्त :-**

सुनावणी दिलेली आहे. त्याला उत्तर दिलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

साहेब, ते उत्तर तुम्ही स्वतः तपासून बघा.

**मा. आयुक्त :-**

मी तपासून पाहतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

नेमणूकीची दिनांक काय पकडायची.

**मा. आयुक्त :-**

सुनावणीचा निर्णय त्यांना मान्य नसेल तर वेगळी गोष्ट आहे. त्याला सुनावणी दिलेली आहे आणि त्याला उत्तरही दिलेले आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणून मी म्हटले, तुम्ही असे तरी सांगा की, ग्रामपंचायत काळातील जे कर्मचारी नगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आले ते त्यावेळी परमनन्ट होते. त्याची जी जॉईनिंग ग्रामपंचायतीसाठी होती. ती तुम्ही इतर लोकांसाठी पकडली.

**मा. आयुक्त :-**

जे कर्मचारी ग्रामपंचायतीच्या काळामध्ये कायमस्वरूपी होते. त्यांचाच फक्त सेवा ज्येष्ठतेसाठी आपण विचार केलेला आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

ते लिपीकच होते.

**मा. आयुक्त :-**

जे असतील ते.

**प्रफुल्ल पाटील :-**

इतर ग्रामपंचायतीमधील लोक.

**मा. आयुक्त :-**

तात्पुरते असतील तर त्यांचा विचार करण्याची प्रोव्हिजन नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

इतर ग्रामपंचायतीमधील जे लोक आहेत म्हणजे पूर्वी जे आलेले ग्रामपंचायतीमध्ये ते जे परमनन्ट होते. त्यांच्या त्या नेमणूका तारखा टाकल्या. आणि त्याला संजय पाटील यांना पूर्वी मंजूरी पण दिलेली आहे. स्थायी समितीच्या सभेमध्ये पूर्वी नगरपालिका अस्तित्वात असताना

**मा. आयुक्त :-**

पुन्हा ते प्रकरण आले तर मी तपासून घेतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

अशी अनेक प्रकरणे आहेत.

**मा. आयुक्त :-**

अनेक प्रकरणे असतील तर प्रत्येक प्रकरणाला आपण सुनावणी देऊ. आता परत यावर्षीची यादी पुन्हा पब्लीश होईल. सेवा ज्येष्ठता यादी हा काही एका वर्षाचा प्रकार नाही. हा दरवर्षी चालत राहणारा प्रकार आहे. त्यांनी जर आक्षेप दाखल केला तर पुन्हा आम्ही यादी प्रसिध्द करु आणि यादी प्रसिध्द केल्यानंतर त्यांनी जर मुदतीत आक्षेप घेतला तर आम्ही पुन्हा त्याची सुनावणी घेऊन निर्णय देऊ.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांची परवानगी घेऊन बोलतो की, हा जो विषय आपल्या पटलावर आहे त्याच्यावर आयुक्त साहेबांनी राईटली पॉईंट आऊट केलेले आहे की, याच्यात बरेचसे बौध्दिक मुद्दे या निमीत्ताने या सभागृहापुढे चर्चेला आले. त्यातील काही प्रश्नांची उत्तरे मा. आयुक्त साहेबांनी दिलेली आहेत. मी हा जो प्रस्ताव सभागृहाच्या पटलावर आहे त्याचे समर्थन करण्याच्या दृष्टीकोनातून बोलत आहे की, या महानगरपालिकेचा स्टाफ पॅटर्न मंजूर होण्यासाठी जवळजवळ १० ते १२ वेळा निरनिराळया आदेशान्वये स्टाफ पॅटर्नमधील मंजूर पदांची प्रत्येकवेळी विगतवारीने मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याच्या तारखा आणि त्याचा संपूर्ण पत्रव्यवहार महानगरपालिकेकडे आहे. त्यानंतर शेवटी शेवटी या महानगरपालिकेला मला वाटते की, आय हॅव नॉट मिस्टेकन, ८६० कर्मचाऱ्यांच्या स्टाफ

पॅटर्नला मंजुरी देण्यात आली होती. आता या ठिकाणी प्रश्न उपस्थित झालेला आहे की, अनुशेषात जी भरती ही पहिल्यांदा मागच्या ३० मार्चला करण्याबद्दल शासनाचे आदेश होते. त्यानंतर सगळ्यांनाच ते शक्य झाले नसल्यामुळे ते आदेश एक्सटेन्ड होत मला वाटते ३० ऑक्टोबर अशी काहीतरी तारिख देण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा ३१ डिसेंबर ही तारीख आपल्याला देण्यात आली. त्याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून आपण विहित पध्दतीने एम्प्लॉयमेंट एक्सचेंज आणि समाजकल्याण खात्याकडून याद्या मागितल्या. मला आश्चर्य वाटते की, आमचे सन्मा. सदस्य ज्येष्ठ कार्यकर्ते, या सदनातील नगराध्यक्ष सन्मा. प्रफुल्ल पाटील एवढ्या धाडसाने बोलतात की, त्या ठिकाणी समाजकल्याण अधिकाऱ्याची इन्टरव्हुच्या संदर्भातील सहीच नाही. प्रशासनाने खरे सही नसेल तर हो म्हणायला पाहिजे. नसेल तर ठामपणे सांगायला पाहिजे की, त्या अधिकाऱ्याची सही त्या पत्रावर किंवा त्या अधिकाऱ्याची सही त्या पत्रावर किंवा त्या कागदपत्रावर आहे. म्हणून आम्ही या ठिकाणी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपल्यातर्फे किंवा खात्याने जी टिपणी गोषवारा दिलेला आहे. त्यामध्ये नियुक्त केलेल्या पदांना निवड झालेल्या उमेदवारांच्या यादीला मंजुरी दयायची आहे. त्या ठिकाणी हा जो प्रश्न आहे की, जातीचे पडताळणी सर्टिफिकेट आमच्या सन्मा. सदस्या उर्मिला भामरे यांनी बरोबर सांगितले की, काही वेळा एखादया उमेदवाराच्या बाबतीमध्ये एक वर्षाची पण मुदत टळून जाते. आपल्याला इथे महानगरपालिकेला अशी पण घाई आहे की, कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. कर्मचारी योग्य प्रमाणात भरती करायला पाहिजे. म्हणून या ठिकाणी जातीच्या पडताळणीच्या नियमांना थोडीशी आपण कन्डीशनली मंजुरी दिली की, जातीचे पडताळणी सर्टिफिकेट सादर केले आणि मुदतीत केले नाही किंवा केले नाही तर त्यामधून त्याला काढून टाकण्यात येईल. तर त्याचे कॉन्सिक्वेन्सेस काय होते की, तो सामान्य लेबर प्रॅक्टीस ॲक्टखाली २०७ दिवसांच्या मुदतीने आपल्याकडे नोकरीच्या कायमपणाचे क्लेम करु शकेल का? अशी पण एक भीती आहे. तरीसुध्दा आम्हाला असे वाटते आणि या सभागृहाचे माझ्या सर्व सहकाऱ्यांचे असे मत आहे की, प्रशासनाने जे काही केलेले आहे ती कार्यवाही निदान एक तारतम्य ठेवून कायदा पाळून निती-नियम ठेवून हे केलेले आहे. असे वाटते म्हणून या संदर्भामध्ये या बाजूने ठराव मांडण्यासाठी सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस हे महापौर साहेब आपल्याकडे परवानगी मागत आहेत. त्यांना ती परवानगी द्यावी.

**हॅरल बोर्जीस :-**

महासभा दिनांक १९/१२/०३ प्रकरण क्र. ५६ शासनाच्या धोरणानुसार मागासवर्गीय अनुशेष भरतीकरिता मुलाखतीद्वारे निवडलेल्या उमेदवारांच्या यादीस मान्यता देणे व जात पडताळणी प्रमाणपत्राच्या अधीन राहून नियुक्ती देण्यास आजची सभा मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

या ठरावास उपसुचना सदर यादीमध्ये सन्मा. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी ठाणे यांनी कुठल्याही मजूराच्या पदावर स्वाक्षऱ्या केलेल्या नाहीत.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील माझ्याकडे आता जी यादी उपलब्ध आहे. त्यामध्ये सर्व सह्या त्यांच्याकडे आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

ही यादी तुमचीच आहे का की, दुसऱ्या मुद्रणातून आणलेली आहे. ही पण यादी तुमचीच आहे.

**महेन्द्रसिंग चौहान :-**

महापौर महोदय, इतना फर्क जरुर है हम लोग नगरसेवक है। वो नगराध्यक्ष रह चुके है। लेकिन सभा भुल नही करनी चाहिए। सभा शिस्त के हिसाब से आपने पॉंच मिनट का आदेश बोलने के लिये दिया था।

**प्रफुल्ल पाटील :-**

चौहान साहब सभा शिस्त पहले आप सिखिए। बाद मे दुसरो को सिखाइए। सभा शिस्त के बारे मे आप प्रवचन दो। हम लोग इधर बैठेंगे। त्याना काही येत नाही मग गप्प बसायचे. मध्ये कशाला बोलतात.

**महेंद्रसिंग चौहान :-**

आप डायरेक्ट महापौर को बोलिए मुझे नही आता है तुमसे ज्यादा आता है। लेकिन आप नगराध्यक्ष रह चुके है। हम लोग तो नगरसेवक है । इसमे गलत डायरेक्शन मत दिजीये की सिग्नेचर नही है। आपको रिकॉर्ड जादा मालुम है। क्योंकी आप नगराध्यक्ष रह चुके है।

**प्रफुल्ल पाटील :-**

इसलिए हमको मालुम है।

**महेंद्रसिंग चौहान :-**

आप सिर्फ नगराध्यक्ष रहे । हम लोग नगरसेवक रहे। लेकिन गलत तरिकेसे बात नही करने की।

**प्रफुल्ल पाटील :-**

इधर कोई गलत बात नही करेगा।

**प्रफुल्ल पाटील :-**

इथे स्पष्ट लिहीले आहे की, समाजकल्याण अधिकाऱ्याची जर स्वाक्षरी नसेल तर नेमणुक नियमबाह्य आहे. असे मी शासनाचे परिपत्रक दाखवतो.

**मा. आयुक्त :-**

मला खुलासा करु द्या. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांच्या शंकेचे मी निरसन करु इच्छितो. या विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांची आपल्याकडे जी झेरॉक्स कॉपी आहे त्याच्यावर सही नाही. हे इथे दिसते आहे. परंतु मी अधिकृतरित्या या ठिकाणी आपल्याला खुलासा करु इच्छितो की, त्यांची सही याच्यावर आहे आणि जर अशी सही नाही असे त्यांनी म्हटले तर हा प्रश्न पुढे उपस्थित होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

तो प्रश्न नाही. मी फक्त एवढेच सांगितले त्याच्यात उपसुचना लिहा की, त्याच्यामध्ये समाजकल्याण अधिकाऱ्याची स्वाक्षरी झालेली पाहिजे.

**लिओ कोलासो :-**

सही झालेली आहे. त्याच्यामुळे ती उपसुचना विड्रॉ करा.

**प्रफुल्ल पाटील :-**

तेवढीच उपसुचना म्हणतो उपसुचना विड्रॉ कशी करणार? उपसुचना मी मांडली आहे तुम्ही कशी विड्रॉ करणार? हे काय समाजकल्याण अधिकाऱ्यानी केले.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आपण उपसुचना मांडली बरोबर आहे. तुमचा घटनात्मक आणि घटनादत्त अधिकार आहे. ते बरोबर आहे. प्रश्न असा आहे की, जेव्हा खातरजमा करण्यात आली. दोन्ही कागदपत्रे आरशासारखे समोरासमोर तपासून पाहण्यात आलेले आहेत. तर अशा वेळी आपण त्याचा आग्रह धरणे बरोबर होणार नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

हे मी अजूनपर्यंत पाहिलेच नाही. कागदपत्र पाहिन तेंव्हा बोलेन. साहेब सांगतात तसे अनेक कागदपत्रे तुम्हाला बघायला मिळतील जे सभागृहाला बघायचे नाहीत आणि कुठलेही कॉम्लीकेशन येऊ नये म्हणून मी सांगितले आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

महापौर मॅडम आपसे एक बार फिरसे निवेदन है। सभाशिस्त के हिसाब से हमको प्रवचन सुनने की आदत नही है। ये प्रवचन सुनने की बात है। इस हाउस मे हम प्रवचन सुनने नही आये।

**प्रफुल्ल पाटील :-**

प्रवचन ऐकायला सुध्दा बौध्दिक क्षमता असावी लागते. हा तबेला थोडाच आहे.

**महेन्द्रसिंग चौहान :-**

इसिलिए मै आपसे फिर कहता हूॅं। जो पाँच मिनिट की बात है।

**मा. महापौर :-**

विषय मंजुर आहे.

**प्रकाश दुबोले :-**

आयुक्त साहेब या ठिकाणी सर्वात महत्वाची बाब आहे. त्यानी जी झेरॉक्स केली. विषय मंजुर असेल तरी त्यांनी झेरॉक्स कुठून काढली. जर आपल्याकडे ओरिजनलवर सही आहे. त्यांच्याकडे सही नाही यांचा अर्थ त्यांच्याकडून कॉपी कुठून आली? आणि अशी चुकीची कॉपी दिली गेली आहे का? याची पडताळणी होणे गरजेचे आहे. कारण त्या विषयासाठी जर सभेचा एवढा वेळ जातो आणि आपण सहज विषय पार करतो की, त्यांची खातर झाली. मग त्यांच्याकडे कुठून कॉपी गेली. याचादेखील विचार करा. मग तुम्ही सभागृहाचा वेळ वाया घालवता चुकीच्या झेरॉक्स देऊन असे आमचे मत झालेले आहे. याची प्रशासनाकडून शहानिशा व्हावी.

**प्रकरण क्र. ५६ :-**

शासनाचे धोरणानुसार मागासवर्गीय अनुशेष भरती करिता मुलाखतीद्वारे निवडलेल्या उमेदवारांची निवड यादीस मान्यता देणे व जात पडताळणी प्रमाणपत्राचे अधिन राहून नियुक्ती देणेंस मान्यता देणे.

**ठराव क्र. ४४ :-**

आपल्या महापालिकेचा कर्मचारी आकृतीबंध दि.                    रोजी मंजुर झाला आहे. त्यास अनुसरुन व राज्य शासनाने मागासवर्गीयाचा अनुशेष भरण्यासाठीचे आदेश दिल्यावरुन ह्या महानगरपालिकेने नित स्वरुपाची प्रक्रिया पार पाडून वर्ग क्र. ३ ची एकूण ९० पदे व वर्ग क्र. ४ ची एकूण ११० पदे भरुन घेतली आहेत. सदर प्रमाणे घेतलेल्या पदाप्रमाणे सर्व कर्मचारी वर्गाची यादी मान. महासभेपुढे अवलोकनार्थ ठेवण्यांत आली आहे. सदरची पदे भरताना मान. आयुक्त, तसेच पाणीपुरवठा, बांधकाम, आरोग्य ह्या खात्याचे खाते प्रमुख तसेच शासनाचे प्रतिनिधी म्हणून प्रकल्प अधिकारी शहापूर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी ठाणे व जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी यांच्या निवड समितीने उमेदवारांची निवड केली आहे. त्याकामी उचित त्या खबरदारी घेण्यांत आल्या आहेत अशी ह्या सभागृहाची धारणा आहे.

त्याच प्रमाणे वरील एकूण ११० पदामध्ये एकूण ३२ जागा पदोन्नतीने भरावयाच्या होत्या. त्याकामी महापालिका पातळीवर प्रशासकीय समिती गठण करण्यांत आली होती. त्या समितीच्या वेळोवेळी बैठका होऊन पदोन्नती उमेदवारांची यादी निश्चित केली आहे. व ती कर्मचारीवर्गात मान्य केली आहे. म्हणून वरील म्हणजे (१) मागासवर्गीय कर्मचारी नेमणूक व (२) पदोन्नती ह्या दोन्ही प्रक्रिया उचितरित्या पूर्ण झाल्या आहेत असे ह्या सभागृहाचे मत असून निवडलेल्या उमेदवारांच्या यादीस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच आता निवडप्रक्रिया पूर्ण झालेली असल्याने कर्मचाऱ्यांना नेमणूक आदेश दिल्याने जे कर्मचारी कामावर हजर झाले आहेत ते सोडून ज्या-ज्या कर्मचाऱ्यांनी अद्यापी जातपडताळणीची पत्रे आणली नसतील त्यांना तशी पत्रे सादर करण्याचे हमीवर कामावर रुजू करण्यांत यावे त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

वरील प्रमाणे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) प्रमाणे ही मंजुरी देण्यांत आली असे.

**सुचक :- श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.          अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ गजानन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५७ चे वाचन केले.)

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, मी मुद्दामहून उभा राहिलो की, आमची गटनेत्यांची जी सभा झाली त्या सभेच्या वेळी असे सर्वानुमते ठरविण्यात आलेले आहे की, माहिती तंत्रज्ञान अधिकारी ही आवश्यक गोष्ट असल्यामुळे आपल्याला त्यांना मुदवाढ देणे. तरीसुध्दा सभागृहापुढे त्याच्यावर चर्चा करायला हरकत नसावी.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो स्थायी समितीचा उल्लेख आहे ५/७/०३ ठराव क्र. १०१ व २/८/०३ रोजी नेमणुक केलेली आहे. स्थायी समितीच्या १०१ ठरावानुसार माशाळकर यांची मुदत ३१/१२/०३ रोजी समाप्त होत आहे आणि त्या कारणास्तव आमच्या या महासभेची परवानगी मुदतवाढ मिळण्यास शिफारस मागितली आहे. आता यामध्ये जशी माशाळकर यांची आपण नियुक्ती केली त्यावेळी माशाळकर साहेबांचा पूर्ण एक बायोडेटा दिला गेला होता. या आम्ही केलेल्या नियुक्तीनुसार माशाळकर साहेबांनी नेमणूक झाल्यापासून नेमका काय प्रोग्रेस केला तो या टिपणीबरोबर नाही आहे. कारण अत्यावश्यक आहे वगैरे दिलेले आहे. जेणेकरुन उत्कृष्ट सेवा, तक्रार निवारण सेवा वगैरे उपलब्ध ही आपली जी महापालिकेची इमर्जन्सी आहे. ही याच्यात आपल्याला रिफलेक्ट होते की, एवढी एवढी इमर्जन्सी आहे. म्हणून आम्ही हे पद भरतोय. प्रतिनियुक्तीवर यांना घेतोय. प्रतिनियुक्ती देऊ नये असे मी म्हणत नाही. शिफारस आम्ही करु. त्याला माझा विरोध नाही. परंतु यामध्ये ३१/१२/२००३ रोजी यांची मुदत समाप्त होत आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने माशाळकर यांना मुदतवाढ देणे अत्यंत गरजेचे आहे. त्यानंतर प्रशासनातील इतर विभागातील संगणकीकरण हाती घेतले जाणार आहे. त्याकरिता स्थायी समितीकडून नेमणूक केलेले विशेष अधिकारी माहिती तंत्रज्ञान सुभाष माशाळकर यांना महापालिका अधिनियम १९४९ चे ५३ (१) अन्वये नेमणुकीचे नवीनीकरण करुन काम पूर्ण होईपर्यंत यामध्ये म्हणजेच पाच महिने असे पाहिजे. म्हणजे हे काम जर तीन चार वर्षे चालत राहिले, कॉम्प्युटर वगैरे येत राहिले तर नवीन नवीन पी-४, पी-५, पी-६ तिथपर्यंत माशाळकर साहेब राहतील असे आम्हाला वाटते. आम्ही सुचना मांडतो की, तुम्ही आता प्रशासनाच्या भाषेमध्ये ग्रॅमॅटिकल मिस्टेक बोलाल. पण त्या एक एक शब्दानुसार त्याचे अर्थ बदलत जातात. आपण खाली मुदत दिलेली नाही. काम पूर्ण होईपर्यंत म्हणजेच पाच महिने मुदतवाढ मिळण्याची शिफारस आहे. असे आपण याच्यात नमुद करावे आणि ठराव स्वयंस्पष्ट नमुद करावा आणि आम्ही ठराव नंतर मान्य करतो.

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. ५७ महानगरपालिकेचे कामकाजाचे संगणकीकरण करणेबाबत नेमलेले विशेष अधिकारी माहिती तंत्रज्ञान यांच्या नेमणुकीस मुदतवाढ देण्याबाबत. महापौर साहेबा श्री. माशाळकर यांची नेमणूक आपण स्थायी समितीच्या ठरावान्वये या पूर्वी सहा महिन्याकरिता केलेली होती आणि श्री. माशाळकर यांनी आपल्या महापालिकेत येण्यापूर्वी ते मला वाटते कल्याण डोंबिवली महापालिकेत देखील संगणकीकरणाचे काम अत्यंत यशस्वीरित्या केलेले आहे. त्यांच्या ज्ञानाचा अनुभवाचा फायदा आपल्या महानगरपालिकेत व प्रशासनाला होत आहे आणि येथून पुढे त्यांच्या ज्ञानाचा फायदा होईल आणि आपल्या कार्यप्रणालीमध्ये संगणकीकरणाच्या माध्यमातून नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा कशा प्रकारे उपलब्ध करता येतील त्याकरिता प्रयत्न करित आहेत. या प्रस्तावाचे समर्थन करित असताना महापौर साहेबा मी एक ठराव मांडू इच्छितो. प्रकरण क्र. ५७ विषय, महापालिकेच्या कामकाजाचे संगणकीकरण करण्याबाबत खाली नेमलेल्या विशेष अधिकारी माहिती तंत्रज्ञान यांच्या नेमणुकीस मुदतवाढ देण्याबाबत ठराव आपल्या महापालिकेच्या दप्तरी कामकाज संगणकीकरण घेण्यात यावे. अशा प्रकारची भूमिका यापूर्वीच आपल्या मा. सभागृहाने व्यक्त केली आहे. त्या कामी महापालिकेच्या स्थायी समितीने दिनांक ५/०७/०३ च्या ठराव क्र. १०१ प्रमाणे श्री. सुभाष माशाळकर यांची दिनांक २/०८/२००३ पासून महापालिकेत विशेष अधिकारी माहिती तंत्रज्ञान म्हणून सहा महिन्यांसाठी नेमणूक केली होती. सदर माहिती तंत्रज्ञान अधिकारी यांनी संगणकीकरणाच्या दृष्टीने आवश्यक ते साहित्य खरेदी करणेसाठीची प्रक्रिया त्यांनी पूर्ण केलेली आहे. त्या माध्यमातून मालमत्ता कर, पाणीपटटी, जन्म मृत्यू नोंदणी ही कामे आता प्रत्यक्ष हाताळण्यास घ्यायची आहेत. तसेच प्रॉपर इन्स्टॉलेशन ऑफ परचेस हार्डवेअर व सॉफ्टवेअर हिस्ट्री, डेटा एन्ट्री, पाणीपुरवठा विभाग, जन्म मृत्यू विभाग, मालमत्ता कर विभाग, इम्प्लीमेंटेशन ऑफ ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर, नवीन नागरी सुविधा केन्द्र बनविणे, मुख्यालयाचे नेटवर्किंग करणे, जी.आय.एस. सॉफ्टवेअर बसविणे ही कामेही हाताळायची आहेत. म्हणून निवडलेल्या व्यक्तीकडून ही कामे लवकरात लवकर पूर्ण करुन घेणे शक्य होईल. म्हणून तुर्त पुढील सहा महिन्याकरिता श्री. सुभाष माशाळकर यांना मुदतवाढ देण्यात यावी असा मी या ठिकाणी ठराव मांडतो.

**मिलन म्हात्रे :-**

या ठरावाला मी थोडी सुचना करतो. आता जे सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी सुंदर भाषण केले . सन्मा. महापौरांचे मी सांगितलेले रुलिंग झाले नव्हते. पण जी.आय.एस. करण्याकरिता सदर व्यक्तीने ही टाऊन प्लॅनर लागते हे लक्षात ठेवावे. मी जी आपल्याला सुचना केली त्यावर रुलिंग पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. आयुक्त साहेब यांच्या परवानगीने बोलतो आपण जे सांगितले त्याचाच खुलासा करीत आहोत. आपण सांगितल्याप्रमाणे काय काय केले? माशाळकर यांना विचारले. एक महिन्याच्या कालावधीत सर्व कर्मचाऱ्यांचा रिफ्रेशन कोर्स त्यांनी आयोजित केला आणि सर्व कर्मचाऱ्यांना संगणकाचे रिफ्रेशन कोर्स त्यांनी दिले. त्यानंतर अत्याधुनिक साहित्य जे आपणाला आवश्यक आहे अशा तऱ्हेचे साहित्य त्यांच्या माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन, त्यांना जो अनुभव आहे त्याचा वापर करुन आपण ते साहित्य बोलावून घेतले आहे. लवकरात लवकर ते आपल्याकडे येण्याच्या दूष्टीने आपण आदेश महानगरपालिकेने दिलेले आहेत. आपल्याकडे काही साहित्य आलेले पण आहे आणि काही यायचे आहे आणि हा संपूर्ण कार्यक्रम चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी किमान एक ते दीड वर्षाचा कालावधी लागणार आहे. सभागृहाला विनंती आहे की, सहा महिन्यांच्या मुदतीत हा कार्यक्रम होणे शक्य नाही. कारण कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि इतर महानगरपालिकेची कामे आम्ही बघून आलो आणि ते सर्व कार्यक्रम बघितल्यानंतर सहा महिन्यांच्या कालावधीत हे काम होणे शक्य नाही. सभागृहाला विनंती करण्यात येते की, त्यांनी किमान एक वर्षाचा कालावधी त्यांना देण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा, आम्ही जे सांगितले त्याला काहीतरी घटनात्मक आणि नियमाचा आधार आहे. आम्ही कुठे परवानगी नाकारतो आहे. विषय परत आणा. आम्ही नाही म्हणत नाही आणि माझी दुसरी अशी मागणी आहे की, आमच्या सारख्या नगरसेवकांना, ज्यांना कोणाला इच्छा असेल त्यांना जर कॉम्प्युटरचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देता तसे जर आम्हाला दिले तरी बरे होईल. काही तरतुद करुन तुम्ही द्यावी. सभागृह नेते नाही बोलले. तुम्ही नाही कशाला बोलता. तुमच्या खिशातील फी आम्ही मागत नाही. आम्हाला मॅडम आपण रुलिंग द्यावे. कारण चर्चा होत जाते. रुलिंग होत नाही. आमची मुदत सहा महिन्यांची आहे. सहा महिने कामाचा अंदाज आम्हाला आहे. आम्ही नाकारत नाही. मी पहिल्यांदाच बोललो. मी त्यावेळेच्या ठरावाला मीच सुचक होतो. म्हणून मी ही सूचना मुद्दामहून कारण त्यावेळी स्थायी समितीने सहा महिन्याची दिली आहे. त्यावेळी मी सुचक होतो. मला काही लायबिलीटी आहे. म्हणून मी हे तुम्हाला सुचवतो. सहा महिन्याकरिता द्यावे, पिरीयड टाकावे, ठराव मंजुर करावा.

**लिओ कोलासो :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सुचना मांडली की, नगरसेवकांना सुध्दा संगणकाचे प्रशिक्षण द्यावे. मी मुद्दामहून आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की, अशाच प्रकारचे प्रशिक्षण हे सन्मा. महाराष्ट्र विधानसभा आणि विधानपरिषदेतील आमदारांसाठी ठेवण्यात आले होते. परंतु त्याला रिस्पॉन्स मिळाला नाही असे जाहिर झाले. म्हणून मी सांगितले की, ज्यांची इच्छा असेल त्यांच्यासाठी फक्त हे आयोजित करावे.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी मांडलेल्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदया, या ठिकाणी माहिती तंत्रज्ञान अधिकारी श्री. माशाळकर यांच्या मुदतवाढीचा प्रस्ताव आपल्यासमोर मी सादर केलेला आहे. माशाळकरांची क्वॉलीफिकेशन, माशाळकरांनी आतापर्यंत काय काय कार्य केले? त्याबद्दलचाही उल्लेख या अगोदर आपल्याला सभागृहामध्ये सन्मा. सदस्य आसिफ शेख आणि आमचे डेप्युटी कमिशनर दोघांनी सांगितला. तो पुन्हा सांगून रिपिटेशन करु इच्छित नाही. एक गोष्ट मी आपल्याला पुन्हा सांगू इच्छितो की, संगणकीकरण ही काळाची गरज आहे. हे पुन्हा म्हणजे घोळून घोळून जे पाठ झालेले वाक्य आहे ते मी आपल्याला सांगू इच्छितो. खरोखरच पुढच्या कालावधीमध्ये एक पारदर्शी प्रशासन आपण ज्याला म्हणू ते केवळ संगणकाच्या माध्यमातून आपण साध्य करु शकू आणि हे करित असताना त्याच्यातील ज्या तांत्रिक बाबी आहेत. या इतक्या क्लिष्ट आहेत. त्या पूर्ण करणे हे कुठल्याही अतांत्रिक माणसाला ते शक्य नाही.

ज्यावेळी श्री. माशाळकर माझ्याकडे आले आणि त्यांच्या तिथला जो प्रोजेक्ट होता. ते पूर्वी ए.बी.एम. नावाच्या कंपनीमध्ये कन्सल्टंट म्हणून काम पाहात होते. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा जो प्रकल्प उभा राहिलेला आहे. ज्याला आपल्या राज्याने आदर्श प्रकल्प म्हणून मान्यता दिलेली आहे आणि मला वाटते देश पातळीवरदेखील त्या प्रकल्पाचा गौरव झालेला आहे आणि तो प्रकल्प प्रत्येक महापालिकेने राबवावा अशा प्रकारची शासनाने देखील इच्छा व्यक्त केलेली आहे. त्यांच्याकडे सॉफ्टवेअर्स, त्यांची किंमत ठरविण्याचे कामदेखील एका कमिटीकडे गव्हर्नमेंटने दिलेले आहे. असा एक क्वालिफाईड अधिकारी की ज्याने ते केन्द्र उभे केले. तोच जर आपल्याला उपलब्ध होत असेल तर त्याच्या सेवेचा लाभ आपण का घेऊ नये. असा विचार करुन मी स्थायी समितीपुढे हा प्रस्ताव मांडला आणि स्थायी समितीने त्याला मान्यता दिली. आपण अर्धा तासापूर्वी भूमिपुत्राच्या अधिकारांविषयी जोर जोरात चर्चा या ठिकाणी केली. मी आपल्याला, सर्व सभागृहाला सांगू इच्छितो की, श्री. माशाळकर हे भूमिपुत्र आहेत. आपल्याकडे भाईंदरमध्ये ते राहतात. अे.बी.एम. कंपनी त्यांना जवळपास ६६ हजार ५०० रु. पगार देत होती आणि आपण मला वाटते १८-१९ हजार रुपये त्यांना पगार देतो. एवढा डिफरन्स त्यांनी सहन करुनही या ठिकाणी काम करण्याची तयारी दाखविली ती एवढ्यासाठी की, मी या गावाचा आहे. माझ्यामुळे जर एक संगणक केन्द्र या ठिकाणी उभे राहत असेल तर ती माझ्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट राहिल. इन्डीपेन्डन्टली मला या ठिकाणी काम करायला मिळेल. खरे म्हणजे अशा व्यक्तींच्या बाबत मुदतवाढ देण्यामध्ये कंजुषी करण्याचे काय कारण असावे? हे काही मला कळून येत नाही. आवश्यक नसताना आम्हाला त्यांची मुदतवाढ घ्यायची गरज नाही. मी तर असे म्हणेन की, उद्या ज्यावेळेला माहिती तंत्रज्ञान अधिकाऱ्याची या ठिकाणी पोस्ट क्रिएट होईल तर ती आपल्याला करावी लागणार आहे. त्यावेळी देखील अशा अधिकाऱ्याचा उपयोग आपल्याला कायमस्वरुपी सेवेमध्ये का करु नये. अशा प्रकारचा काही सदस्य मला प्रश्न विचारतील असे मला वाटत होते. परंतु असा प्रश्न बाजुला राहिला. त्याना सहा महिन्याची मुदत द्यावी. अशा प्रकारचा प्रस्ताव या ठिकाणी आलेला आहे. पुन्हा एकदा मी प्रशासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, सहा महिने ही अतिशय कमी मुदत आहे. सहा महिन्याच्या मुदतीमध्ये फार काही होऊ शकते असे नाही. कारण या ज्या प्रक्रिया आहेत या प्रक्रिया अतिशय लेन्दी आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा माझी विनंती आहे की, हा प्रकल्प पूर्ण होईपर्यंत असे जे आम्ही म्हटलेले आहे. याच्यामध्ये आमचा कसलाही स्वार्थ नाही आहे. हा प्रकल्प उभा राहिल. त्यानंतर दरम्यानच्या काळात जर माहिती तंत्रज्ञान अधिकारीची पोस्ट निर्माण झाली तर हा सगळा चार्ज त्या अधिकाऱ्याकडे सोपविता येईल. अन्यथा जर माशाळकरांची मुदत संपली आणि त्याला मुदतवाढ दिली नाही तर ते केंन्द्र चालवायचे कोणी? हा प्रश्न उपस्थित होईल तर त्या दृष्टीने माझा हा प्रस्ताव आहे. नाहीतर पुन्हा दर सहा महिन्याला माशाळकरांच्या मुदतवाढीचा ठराव मला या सभागृहापुढे आणावा लागेल. तर त्या दृष्टीने आपण कृपया चर्चा करावी, विचार करावा.

**जयंत पाटील :-**

महापौर मॅडम, म्हणजे काही ठिकाणी आम्ही भूमिपुत्र म्हणतो माशाळकर साहेब आमच्या शहरात राहतात आणि दोनशे लोकांना नोकऱ्या देताना आम्ही त्या गोष्टीचा विचार केलेला नाही. आता जे आपण मागासवर्गीय अनुशेष भरण्यासंबंधी त्यावेळेस आम्हाला या शहरातील लोक हवीत असे आम्हाला वाटले नाही. फक्त सुभाष माशाळकर साहेबांसाठी आम्ही म्हणतो की, ते भाईंदर मधील आहेत आनंदाची गोष्ट आहे. या एकंदरीत प्रोजेक्टवर आपण किती खर्च करायचा? त्यांचे मानधन धरून हे आपण कधी ठरविलेले दिसत नाही. कारण आतापर्यंत आपल्या हिशेबाप्रमाणे पकडले गेले. तर लाखभराच्या आसपास त्यांचे मानधन झालेले आहे. मला त्यासंबंधी काही म्हणायचे नाही. त्यांच्या बुध्दीमत्तेवर ते मानधन अवलंबून असेल. परंतु हा प्रोजेक्ट किती महिन्यामध्ये तयार व्हायला पाहिजे हे ही काही आपण ठरविले नाही. आज आपण एक वर्ष मागतात. सभागृहात सहा महिन्यासाठी ठरावसुध्दा झाला आणि हा प्रोजेक्ट किती वर्षात किती महिन्यात तयार व्हायला पाहिजे याचा आपण काही कालखंड ठरविला आहे का? कारण पुढल्या सहा महिन्यानंतर आपण परत हाच प्रस्ताव आणणार आहात. आम्ही पुन्हा सहा महिन्यासाठी जर आवश्यकता भासली तर त्यानी मंजुरी देणार आहोत. ते कालखंडाचे सांगणे गरजेचे आहे आणि साधारणतः किती खर्च करता येईल? स्थायी समितीने महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) प्रमाणे सहा महिन्यापर्यंत त्यांना मुदत देऊ शकले असते. पण पाच महिन्याची दिली. आठव्या महिन्यापासून बाराव्या महिन्यापर्यंत पकडले तर ती

पाच महिन्याची होते. म्हणजे एक महिना त्याने का ठेवले हे ही कळत नाही आणि आता पुन्हा मुदतवाढीसाठी आलेले आहेत. त्यांचे काम कुठल्या स्टेजवर आहे. हे ही कोणाला माहिती नाही. त्या टिपणीमध्ये थोडेसे दिलेले आहे. पण निश्चित स्वरुपाची माहिती नाही. म्हणजे त्या प्रोजेक्टसाठी आपल्याला किती खर्च अपेक्षित आहे. हे जर आपण सांगितले तर त्याप्रमाणे मुदतवाढीचा पुढे विचार केला जाईल.

**सुभाष माशाळकर :-**

ह्या पूर्ण प्रोजेक्टसाठी कमीत कमी मी ज्यावेळी कल्याणला केले होते, जवळजवळ ४३ टेक्नीकल टिम होती आणि आम्ही तिकडे अडीच वर्ष काम केले होते. आता सध्या इकडे सहा महिन्यात त्यावेळी आमच्याकडे एक पण कॉम्युटर नव्हता. आता सगळे संगणकीकरणासाठी जे इक्वीपमेंट पाहिजे त्याला फक्त आम्ही वर्क ऑर्डर दिलेली आहे. आता पुढच्या आठवड्यात काही कॉम्युटर्स इकडे डिलीव्हरी होणार आहे. सध्या ह्या कार्पोरेशनमध्ये माझ्याकडे काही टिम नाही. मॅन पॉवर नाही. मला जे लागणारे टिम आहे. मला पूर्ण डिपार्टमेंट उभा करायचा आहे. त्यांना तयार करायचे आहे. ते तयार करुन आता जे सांगितले आहे ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर इम्प्लीमेंट करण्यास कमीत कमी आठ महिने लागतात. महानगरपालिकेला जो रोजंदारी कामासाठी लागणारे जे डिपार्टमेंटचे संगणकीकरण करायचे आहे त्याला कमीत कमी आठ महिने लागतात. सगळे तुमच्याकडे असले तर बाकी सहा महिन्यांत फक्त टिम उभी करुन सॅन्क्शन घेईपर्यंत गर्व्हमेंटमधून मला सहा महिने संपून जातील. त्याच्यांनतर ते जे जी.आय.एस. सॉफ्टवेअर आहे. सन्मा सदस्य मिलन म्हात्रे म्हणत होते की, जी.आय.एस. सॉफ्टवेअर हे ४० लाखापासून कमीत कमी ठाणा महानगरपालिकेत त्यांना आता सुरु केलेले आहे. कमीत कमी तीन कोटीपर्यंत त्यांचे बजेट गेलेले आहे. आता फक्त पुढच्या वर्षी मी प्रपोजल दिलेले आहे आणि सांगितलेले आहे की, फक्त ५० लाख सुरु करण्यासाठी पकडलेले आहे. ते पण प्रायोगिक तत्वावरती एक स्क्वेअर किलोमीटर सध्या सुरू करावे असे मी म्हणतो. हे पूर्ण प्रोजेक्ट संपविण्यासाठी कमीत कमी पुढच्या वर्षी जवळ जवळ दोन कोटींचा खर्च येईल आणि हे सहा महिन्यात जसे सर म्हणाले तसे टेक्नीकल टिम उभी करण्यात इकडे मला आता सध्या कोणी नाही. जो माणूस प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून पन्नास ते आसपास टिम हॅन्डल करुन ते काम मला तिकडे अडीच वर्ष करावे लागले. आता इकडे मी एकटा आहे. मला फक्त ते डॉक्युमेंट प्रिपेर करायला आठवडा लागला. हे तुम्ही ह्याच्यानंतर ठरवावे. सहा महिन्यात माझे फक्त सॅन्क्शन होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण आता एकतरी आज्ञावली तयार केली आहे का? गेल्या सहा महिन्यामध्ये आपण एकतरी सॉफ्टवेअर कुठल्या तरी प्रोग्रॅमची केलेली आहे का?

**सुभाष माशाळकर :-**

हे जे सहा महिन्यात तुम्ही जे म्हणाले सगळे करायचे म्हणजे इकडे कम्प्युटर्स पाहिजे. कम्प्युटर्स आता येत आहे. इम्प्लिमेंटेशन तुम्ही म्हणता तर ते एकतरी केले आहे का? इकडे इम्प्लिमेंटेशन करायचे असेल तर जसे मा. आयुक्त साहेब म्हणाले की, हे माहिती तत्रज्ञान डिपार्टमेंट आणि नगरविकास डिपार्टमेंट ते मंत्रालयात आहे. त्यांनी परवा १२ तारखेला जे डिसीजन घेतलेले आहेत. के.डी.एम.सी. प्रोजेक्ट एक्सेप्ट बांधकाम विभाग सोडून इम्प्लीमेंट करायचे म्हणून त्यांनी घेतलेले आहे. अजून त्यांचा शासन निर्णय आम्हाला पोहोचलेला नाही. पण मला ही माहिती आहे. कारण मी रोजच्या रोज कॉन्ट्रॅक्टमध्ये असल्याने फक्त डिसेंबर १२ तारखेला त्यांनी डिसीजन घेतलेले आहे. त्याच्यानंतर त्याला किती किमती द्यायला पाहिजे तसे ठरविल्यानंतर इम्प्लीमेंटेशनच्या मॉडेल्स कार्पोरेशनकडून मिळतील. कदाचित शासन घेतले तर शासनाकडून जे काही अमाउन्ट फिक्स केली जाईल. त्या अमाउंटने मिळेल. आता फक्त तीन महिन्यात आमचे जन्ममृत्यू आणि पाणीपट्टीचे जे हिस्ट्री रेकॉर्ड आहे. मला ते फक्त डेटा एन्ट्री टाकून फक्त मॅन्युअल रेकॉर्ड कम्प्युटरमध्ये आणण्यापर्यंत मला तीन महिने पाहिजे आणि ते पण कमीत कमी पंधरा मशिन्स दोन शिफ्ट मध्ये लावले तर ते कमीत कमी तीन महिने वेळ लागेल आणि ज्या वेळेला पुढचे बिल निघेल ते पुर्णपणे चेक करुन आणि ॲथॉंटीक करुन ते बिल काढावे लागतील. नाहीतर परत आम्ही जे बिल पाठवतो ते चुकीचे आहे. ह्याचा अर्थ हा नाही की, संगणकीकरण म्हणजे प्रोग्रॅमिंग केलेले आहे ते चुकीचे नाही. डेटा पण त्याच्यामध्ये प्रॉपर फिड करायला पाहिजे. पुढच्या सहा महिन्यात डेटा एन्ट्री करून फक्त रेव्हेन्यु रिकव्हरीसाठी लागणारे

जे तीन मॉडेल्स आहे. प्रॉपर्टी टॅक्स, वॉटर बिलींग अकाउंटींग आणि जन्म मृत्यू. नागरिकांसाठी जे करायचे आहे फक्त पुढच्या सहा महिन्यात एवढे करायचे तरी पुष्कळ झाले. याच्यापेक्षा जास्त पुढे मला करता येणार नाही. हे प्रोजेक्ट करायचे असेल तर मला कमीत कमी दिड ते दोन वर्ष लागणारच आणि इकडे मला एक कम्प्युटर डिपार्टमेन्ट पण उभा करायचा आहे. पुढे हे कार्पोरेशन परत एक कॉन्ट्रक्टरकडे जाता कामा नये आणि स्वतःचे स्वावलंबन व्हायला पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण आता सांगितले की, सहा महिन्यांमध्ये आपण फार काही करु शकला नाहीत. पण कल्याण कार्पोरेशनमध्ये आपण अडीच वर्षामध्ये ४३ लोकांची टिम घेऊन बरेचसे सॉफ्टवेअर आपण डेव्हलप केले. आता तेही सॉफ्टवेअर कल्याण महापालिकेच्या मालकीचे आहेत आणि त्याचे सार्वत्रिकरण शासनाने केले की, ते सॉफ्टवेअर आपल्याला विकत घेता येतील. ते सॉफ्टवेअर तुमच्या टिमने डेव्हलप केलेले आहेत. ते सॉफ्टवेअर आम्ही वापरू शकतो. म्हणजे आता जी किंमत तुम्ही अडीच तीन कोटीच्या घरातील सांगितली त्या सॉफ्टवेअरची किंमत जर शासनाने ठरविली तर अजून कमी होईल आणि आपल्याला पिरीयड पण कमी होईल. म्हणजे अडीच वर्ष लागणार नाही.

**सुभाष माशाळकर :-**

त्याच्यात ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर तुम्ही जे म्हणाले, त्यामध्ये जास्तीत जास्त माझ्या अंदाजाप्रमाणे ३५ लाखापेक्षा जास्त ते सॉफ्टवेअर आम्हाला आतच मिळाले पाहिजे. ३५ लाख मी जे सांगतो आणि तिकडे जे अडीच वर्ष लागले इकडे फक्त आठ महिने लागतील असा माझा अंदाज आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्हाला हार्डवेअर सेट करायचा आहे.

**सुभाष माशाळकर :-**

हार्डवेअर करायचे आहे. नेटवर्किंग करायचे आहे. जी.आय.एस.ची पण मी पुढे तरतुद पकडलेली आहे. तिकडे जी.आय.एस. नाही आहे. जी.आय.एस. आहे आणि डिझेस्टर मॅनेजमेंट सर्व्हिसेस आणि जे म्हणतोच आहे की, एमर्जन्सी मॅनेजमेंट सर्व्हिसेससाठी हे लागणार आहे. ते इक्वीपमेंट लाइक वायरलेस सेट अप आहे, नाहीतर फायर फायटिंग असेल हे सगळे तिकडे नाही आहे. आता तिकडे जे के.डी.एम.सी. मध्ये केले आहे. फक्त बॅक ऑफिस आणि नागरी सुविधा केन्द्र केलेले आहे आणि जे आहे ते इकडे येणारच. त्याच्या व्यतिरिक्त जी.आय.एस आणि डिझेस्टर मॅनेजमेंट आम्ही इकडे करणार आहोत.

**प्रफुल्ल पाटील :-**

आयुक्त साहेब यांना नुसती मुदतवाढ देऊन चालणार नाही. यांच्यासाठी बजेटमध्ये सुध्दा प्रोव्हिजन झाली पाहिजे आणि त्यांना लागणारा स्टाफसुध्दा दिला पाहिजे. मग तो कुठल्या पध्दतीने द्यायचा.

**मा. आयुक्त :-**

स्टाफचे कसे आहे की, त्यांना वेगळा स्टाफ द्यायची आवश्यकता नाही आहे. आपल्या उपलब्ध स्टाफमधूनच म्हणजेच आता संगणकाचे प्रशिक्षण पण आपण आपल्या स्टाफला दिलेले आहे. फक्त यांच्या परपझसाठी जो स्टाफ यांना लागणार आहे. त्या त्या डिपार्टमेंटच्या स्टाफला ते ट्रेनिंग देणार आहेत. या व्यतिरिक्त जो तीन चार लोकांचा स्टाफ लागेल. तो आपल्याला त्यांना नवीन भरतीमधून देता येणे शक्य आहे. परंतु आपल्याकडे उपलब्ध असलेलेच कर्मचारी यासाठी आपण वापरणार आहोत.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपल्याकडे पूर्वी ज्या लोकांनी सॉफ्टवेअर पालिकेसाठी डेव्हलप केलेली आहेत आणि त्यांना कॉन्ट्रॅक्ट दिले होते. अशा लोकांची सॉफ्टवेअर तुम्ही का घेत नाहीत? कारण जर के.डी.एम.सी.कडे तशी सॉफ्टवेअर नसली किंवा ज्यांच्या ज्यांच्याकडे असे सॉफ्टवेअर ॲव्हॅलेबल आहेत ते घ्यायला काय हरकत आहे.

**मा. आयुक्त :-**

ते नक्कीच आपण घेण्याचा प्रयत्न करु.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण आता आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देतो. त्यांच्यानंतर त्यांना सॉफ्टवेअर डेव्हलप करण्याचे ज्ञान मिळायला खूप वेळ जाणार आहे. ते लोक हे काम करु शकतील अशातला भाग नाही.

पण दरम्यानच्या काळामध्ये आपल्याला ती अधिकाऱ्याची शासनाकडे पोस्ट मंजूर करायला काही हरकत नाही. मग माझी उपसुचना आहे, अशी पोस्ट निर्माण करण्यात येईल त्याला मंजुरी द्यावी आणि शासनाकडे असा प्रस्ताव पाठवा.

**शशिकांत शहा :-**

माझ्या मते एक वर्षाकरिता मुदतवाढ द्यायची आहे अशी माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

ठराव झाला पुढचा विषय घ्या.

**मोहन पाटील :-**

एक वर्ष मुदतवाढ द्यावी असे मी मान्य करतो.

**प्रकरण क्र. ५७ :-**

महानगरपालिकेच्या कामकाजाचे संगणकीकरण करणेबाबत नेमलेल्या विशेष अधिकारी (माहिती तंत्रज्ञान) यांच्या नेमणूकीस मुदतवाढ देण्याबाबत.

**ठराव क्र. ४५ :-**

आपल्या महापालिकेचेही दफ्तरी कामकाज संगणकावर घेण्यांत यावे अशा प्रकारची भुमिका यापुर्वीच आपल्या मान. सभागृहाने व्यक्त केली आहे. त्याचकामी महापालिकेच्या स्थायी समितीने दि. ५/७/२००३ च्या ठराव क्र. १०१ प्रमाणे श्री. सुभाष माशाळकर यांची दि. २/८/२००३ पासून महापालिकेत विशेष अधिकारी - माहिती तंत्रज्ञान म्हणून ६ महिन्यासाठी नेमणूक केली होती. सदर माहिती तंत्रज्ञान अधिकारी यांनी संगणकीकरणाच्या दृष्टीने आवश्यकत ते साहित्य खरेदी करण्यासाठीची प्रक्रिया त्यांनी पूरी केली आहे. त्याच माध्यमातून मालमत्ताकर, पाणीपट्टी, जन्म-मृत्यू नोंदी ही कामे आता प्रत्यक्षात हाताळण्यांस घ्यावयाची आहेत. तसेच

१) प्रॉपर इन्स्टॉलेशन ऑफ परचेस हार्डवेअर व सॉफ्टवेअर
२) हिस्ट्री डेटाएन्ट्री
   - पाणी पुरवठा विभाग
   - जन्म-मृत्यू विभाग
   - मालमत्ता कर विभाग
३) इम्प्लीमेंटेशन ऑफ ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर
४) नविन नागरी सुविधा केंद्र बनविणे.
५) मुख्यालयाचे नेटवर्कींग करणे.
६) जी.आय.एस. सॉफ्टवेअर बसविणे इ.

ही कामे हाताळावयाची आहेत. म्हणून निवडलेल्या व्यक्तीकडून ही कामे लवकरात लवकर पूर्ण करुन घेणे शक्य होईल म्हणून तूर्त पुढील १२ महिन्यांसाठी (बारा महिन्यांसाठी) श्री. सुभाष माशाळकर यांना मुदतवाढ देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.          अनुमोदन :- श्री. शाह रिटा सुभाष.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५८ चे वाचन केले.)

**आसिफ पटेल :-**

महासभा दि. १९/६/०३ चे प्रकरण क्र. २१, म्हणजेच प्रभाग समिती स्थापन करण्याबाबत विचारविनीमय करणे. मी ठराव मांडत आहे. आपल्या महापालिकेच्या कामकाजाचे विकेंद्रीकरण करण्यास्तव व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम २९(अ) प्रमाणे आपणास प्रभाग समिती नेमणे अनिवार्य आहे. या कामी दिनांक १९/०६/२००३ रोजी महासभेपुढे अशा समित्या स्थापण्याबाबत विचारविनीमयसाठी प्रकरण ठेवण्यात आले होते. त्यावेळी ठराव क्र. १२(अ) चार समित्याऐवजी पाच समित्या कराव्यात असे पारित करण्यात आले होते. त्यावर महापालिका पातळीवर

दि. २६/०६/२००३ च्या पत्राने शासनाकडून ४ ऐवजी ५ समित्याबाबत मार्गदर्शन मागविले होते. तथापि नगरविकास विभागाने दि. २६/८/२००३ चे प्रमाणपत्र प्रमाणे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ अनुसरण्यास सांगितले. या सभागृहाची अशी धारणा झाली आहे की, पाचऐवजी चार समित्या आपण करु शकता. म्हणून जे निष्कर्ष समित्या स्थापनेसाठी टिपणी दर्शविली आहे. त्यास अनुसरुन मी सभा प्रभाग क्र. १, २, ३, १७, १८ व १९ यासाठी एक तसेच प्रभाग क्र. ४, ५, १६, २०, २१ व २६ यासाठी एक तसेच प्रभाग क्र. ६, ७, ८, २२, २३, २४ व २५ साठी एक तसेच प्रभाग क्र.१०, ११, १२, १३, १४ व १५ साठी असे एकूण चार प्रभाग समित्या स्थापन करावे असे सुचवित आहे. तसेच या कामी आवश्यक तो कार्यक्रम प्राधीकृत अधिकारी म्हणून महापौर साहेब, आयुक्त साहेब यांनी त्याची अंमलबजावणी सुरु करावी म्हणून ही सभा ठराव करीत आहे.

**प्रभात पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ५८ :-**

प्रभाग समित्या स्थापन करणेबाबत विचार विनिमय करणे. (मा. महासभा दि. १९/०६/२००३ रोजीचे प्रकरण क्र. २१)

**ठराव क्र. ४६ :-**

आपल्या महापालिकेच्या कामकाजाच्या विकेंद्री करणाचे कारणास्तव व मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील नियम २९(अ) प्रमाणे आपणांस प्रभागसमिती नेमणे अनिवार्य आहे. याकामी दि. १९/०६/२००३ रोजीच्या महासभेपुढे अशा समित्या स्थापन्याबाबत प्रकरण विचारविनिमयार्थ ठेवण्यांत आले होते. त्यावेळी ठराव क्र. १२(अ) द्वारे ४ समित्या ऐवजी ५ समित्या कराव्यात असे पारीत करण्यांत आले होते. त्यावर महापालिका पातळीवर दि. २६/०६/२००३ च्या पत्राने शासनाकडून ४ ऐवजी ५ समित्या बाबत मार्गदर्शन मागितले होते. तथापी नगरविकास विभागाने दि. २६/०८/२००३ च्या पत्राप्रमाणे मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी अनुसरण्यांत सांगितल्याने ह्या सभागृहाची अशी धारणा झाली आहे की, ५ ऐवजी ४ समित्याच आपण करु शकतो. म्हणून जे निकष समित्या स्थापन्यासाठी टिपणीत दर्शविले आहेत त्यास अनुसरुन ही सभा प्रभाग क्र. १, २, ३, १७, १८ व १९ याचेसाठी एक तसेच प्रभाग क्र. ४, ५, १६, २०, २१ व २६ साठी एक तसेच प्रभाग क्र. ६, ७, ८, ९, २२, २३, २४ व २५ साठी एक तसेच प्रभाग क्र. १०, ११, १२, १३, १४ व १५ साठी एक अशा एकूण ४ प्रभाग समित्या स्थापन कराव्यात असे सुचवित आहे. तसेच याकामी आवश्यक तो कार्यक्रम प्राधिकृत अधिकारी म्हणून (महापौर साहेबा / आयुक्त साहेब) यांनी त्याची अंमलबजावणी सुरु करावी म्हणून ही सभा ठराव करीत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ पटेल.** **अनुमोदन :- श्री. जेन्वी युस्टस आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ५९ चे वाचन केले )

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर साहेबा, महासभा दि. १९/१२/२००३, प्रकरण क्र. ५९, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत जलवाहिन्या टाकण्याच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्याबाबत. सदरच्या विषयाबाबत मी ठराव मांडत आहे. सदरचा विषय आपल्या महापालिकेच्या दि. १८/९/२००३ च्या सभेपुढे प्रशासकीय मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावाप्रमाणे मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील एकूण १२ मुद्दे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात आले होते. त्यात उत्तन लाईट हाउस, उत्तन गाव, पाली गाव, पातान बंदर, करईपाडा, डोंगरी, आनंद नगर तसेच भाईंदर पूर्व, मिरा रोड येथील शिवार गार्डन परिसर, काशी व काशी गावठण, श्री. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

हटकेश कंपनी व न्यु भारत हॉटेलचा भाग तसेच घोडबंदर भाग तसेच संघवी टॉवर व एस. के. स्टोनचा भाग या ठिकाणी पाईपलाइन बदलणे, नवीन पाईप टाकणे इत्यादी बाबी घेतल्या होत्या. तथापि सदरसाठी मुळ पाणी पुरवठा योजनेत निधी असल्याचे सांगण्यात आल्यामुळे वरिल प्रस्ताव तहकुब ठेवण्यात आला होता. या कामी प्रशासनाकडून असे कळविण्यात आले की, मुळ प्रस्तावावरील सर्व बाबी या मुळ पाणीपुरवठा योजनेमध्ये नव्हत्या. त्यामुळे त्यासाठी या योजनेत कोणताही निधी उपलब्ध नव्हता. म्हणून वरील वस्तुस्थिती आता स्पष्ट झाल्याने दि. १८/९/२००३ च्या महासभेत जी स्थिती दिली होती त्यातील व आता ती तपशीलवार टिपणी दिली आहे. त्या सर्व प्रस्तावांना आजची सभा प्रशासकीय मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

इस ठराव को अनुमोदन देता हूँ।

**प्रभात पाटील :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलते. या ठरावाला अनुमोदन झालेले आहे. सगळ्या भागामध्ये, सगळया नागरिकांना पाणी मिळाले पाहिजे. जलवाहिन्या पडल्या पाहिजे. सगळया गोष्टी खऱ्या आहेत. परंतु हे काम कोण करणार? आपले लोक करणार आहेत की, प्राधीकरण करणार आहेत? आपल्या लोकांनी काम केले तर तुम्ही जे प्राधीकरणाने काम करित असताना एक गोष्ट प्रामुख्याने ध्यानात घेतली पाहिजे की, नवघर रोडच्या नवघर नाक्यावर गेले कित्येक महिने जलवाहिन्या फुटून खड्डे पडलेले आहेत. आजही रिपेअर होत नाही. मला असे वाटते सार्वजनिक बांधकाम खात्याने तिथे रस्त्याचे काम करण्याचे टेन्डर दिलेले आहे. काम करायला ठेकेदार येतातसुध्दा आणि तो खड्डा बघितला की, ते डांबराच्या गाड्या घेऊन परत जातात. वर्षानुवर्षे ते खड्डे तसेच आहेत. रस्ता बनत नाही. लोकांना चालायला त्रास आहे. रिक्षांना त्रास आहे. बी.एस.टी. च्या बसेस त्यामध्ये जातात. टॅक्स्या त्यामध्ये पडतात. रिक्षा कलंडतात. ही कामे होताना उत्तन भागामध्ये जेथे जेथे आता जलवाहिन्या टाकणार आहेत. त्याना हा त्रास होता कामा नये. जसा नवघर रोडवाल्यांना त्रास होतो. याची दक्षता घेण्यात यावी आणि या ठरावाला अनुमोदन द्यावे. आम्हाला त्रास आहे. तुम्हाला होऊ नये अशी माझी इच्छा आहे म्हणून मी बोलते.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. पाणी हे सर्वांना मिळाले पाहिजे आणि मागच्या सभेमध्ये हा विषय आला होता. काही त्रुटीमुळे तो पुढे आलेला आहे आणि आज त्याला मंजुरी मिळत आहे. मला दोन गोष्टीचे स्पष्टीकरण पाहिजे. हेगडेवार मार्ग म्हणजे आताचा छत्रपती शिवाजी मार्ग या मार्गावर मागे एम.जी.पी.ने काही पाईप लाईन टाकल्या होत्या. त्या पाईप लाईन आता तिथे आहेत किंवा त्या अन्य ठिकाणी काढून नेलेल्या आहेत या संदर्भात खुलासा पाहिजे. मागे आमचे सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनीसुध्दा हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी असेसुध्दा सभागृहात सांगितले होते की, ते पाईप एका लॉरीमध्ये भरून घेऊन अन्य ठिकाणी गेलेले आहेत आणि त्यांच्याकडे लॉरी नंबरसुध्दा आहे. अशा पध्दतीने मागच्या सभेमध्ये त्यांचे वक्तव्य झाले होते. खरे काय हे आम्हाला कळले पाहिजे. त्या पाईप लाईन तिकडे टाकल्या गेलेल्या आहेत की नाहीत की, अन्य ठिकाणी टाकल्या गेलेल्या आहेत. जरा त्या संदर्भात खुलासा करावा.

**एस. के. दशोरे :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांना लेखी उत्तर दिलेले आहे आणि ती जी लाईन टाकली होती एम.जी.पी. ने टाकली होती. ती साठ किलोमीटर लाईन होती. त्याच्यामध्ये टाकण्यात आली होती आणि रोडचे जेव्हा वायडिंग केले तेव्हा त्याच्यामध्ये येत होती. ती काढून परत टाकण्यात आलेली आहे.

**रतन पाटील :-**

परत टाकण्यांत आली आहे ना.

**मा. आयुक्त :-**

अधिकाऱ्यांनी ताबडतोब तिथे भेट द्यावी आणि दोन दिवसात काय प्रश्न आहे तो सोडवावा.

**जयंत पाटील :-**

प्रमुख नाके वगैरे तिथे आहेत आणि तिथुन बसेस वगैरे वळतात. मला थोडे असे सांगायचे आहे की, नवघर गावातसुध्दा जुन्या ज्या पाईप लाईन आहेत त्या सिमेन्टच्या आहेत. त्या तुटफुट झाल्यामुळे

गटाराचे पाणी त्या पाईपमध्ये जाऊन पाणी दुषित झालेले आहे. त्यामुळे रोगराई पसरलेली आहे. तरी त्या पाईपलाईन सुध्दा नवीन टाकाव्यात अशी माझी सुचना आहे.

**एस. के. दशोरे :-**

पाहणी करुन नवीन प्रस्ताव तयार करण्यांत येईल.

**रोहिदास पाटील :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो. ह्यामध्ये जी टिपणी दिलेली आहे. या टिपणीमध्ये एक असे निश्चित आहे की, सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस यांनी विचारले होते की, याचा नीट खुलासा होत नाही. मी आज या सभागृहात विचारतो आहे की, ही जी उत्तनमधील जी पाईपलाईन आहे. उत्तन विभागात पाईपलाइन टाकणे. त्यामध्ये रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीकडे जाणारी जी आठ इंचाची पाईप लाईन प्रस्तावित केली होती. त्यावेळी आपले आयुक्त सगळेच होते. ती त्यांच्यामध्ये आहे किवा नाही.

**एस. के. दशोरे :-**

याच्यामध्ये त्याचा समावेश नाही आहे.

**रोहिदास पाटील :-**

नाही आहे तर मग तो प्रस्ताव का घेतला नाही?

**एस. के. दशोरे :-**

हा फक्त जुनी पाईपलाईप बदलण्याचा प्रस्ताव आहे. याच्यामध्ये समावेश नाही.

**रोहिदास पाटील :-**

जुनी पाईपलाईनच आहे. जी भुत बंगल्यापासून प्रबोधिनीकडे जाते ती लाईन आहे.

**एस. के. दशोरे :-**

त्याच्यामध्ये सध्या जी सिस्टिम आहे. त्याप्रमाणे त्याच्यामध्ये केशव सृष्टीला आपण सप्लाय करु शकत नाही. त्याची वेगळी योजना तयार करायला लागेल.

**रोहिदास पाटील :-**

मला आठवते नाईक साहेब पण होते. आयुक्त साहेब आपल्यासमोर हा विषय निघाला होता की, त्याची आठ इंचाची लाईन प्रस्तावित आहे आणि त्यावेळचे क्लिअर उत्तर मिळाले नव्हते. मी आता क्लिअर विचारतो की, जुन्या लाईन बदलायच्या आहेत. त्यावेळी ती लाईन बदलायची. तिकडच्या लोकांना पाणी मिळत नाही. या प्रबोधिनिला पाणी मिळत नाही याचा उलगडा करा. जुन्याच बदलता ना.

**एस. के. दशोरे :-**

जे केशवसृष्टीला सप्लाय करायचे त्याच्यामध्ये प्रॉपर हेड मिळणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

प्रॉपर हेड मिळणार नाही. म्हणजे तुमचे टेक्निकल उत्तर समजले नाही.

**एस. के. दशोरे :-**

त्याचे जे हेड आहे ते हाय लेव्हलला आहे. त्याच्यासाठी वेगळी योजना पम्पिग मशीनने इन्स्टॉल करून पाणी द्यायला लागेल. सध्याच्या स्थितीत जी योजना आहे त्याचा पाणीपुरवठा करु शकणार नाही. त्यासाठी सेपरेट योजना तयार करावी लागेल. त्याबाबत एम.जी.पी.ला पत्रव्यवहार केलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी कशाबद्दल विचारतो ते तुमच्या लक्षात आले आहे का? मला वाटते तुम्ही दुसरे उत्तर देत असाल. मी केशव सृष्टीमधील विचारतो आहे. रामभाऊ म्हाळगी प्रबाधिनीतील विचारतो, ज्याच्यात त्याचे हाय लेव्हलचे विषय येत नाहीत. आपली पाइप लाईन त्याच्या असलेल्या ग्राउन्ड लेव्हलपेक्षा उंचावरून जाते. तिथे लो लेव्हल आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

याबाबत प्रबोधिनिच्या अधिकाऱ्याबाबत चर्चा झाली होती. त्या चर्चेप्रमाणे् जी पुढची लाईन आहे. आपले गेट बनविलेले आहेत. त्या पुढची लाइन त्यांनी टाकायची आणि तिथपर्यंत जी लाईन टाकायची आहे. भूत बंगल्यापासून त्या गेटपर्यंत त्याचे काही कॉन्ट्रीब्युशन आम्ही मदत करु सांगितले होते. त्याबाबत एस्टीमेटही तयार केलेले होते. परंतु ते जे चर्चेसाठी आयुक्तांबरोबर येणार होते. ते आले नसल्यामुळे प्रस्ताव पेन्डींग आहे.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे या लाइनमध्ये ते नाही आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

ते या लाईनमध्ये नाही आहे. पण करायचे आहे

**रोहिदास पाटील :-**

मी तोच खुलासा विचारतो.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो):-**

चर्चा झालेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

चर्चा जेव्हा झाली होती तेव्हा प्रस्तावित लाईन जुन्या लाईन बदलतो. तर त्याच्यामध्ये आठ इंच लाईन नाही का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो. ):-**

टोटल एस्टीमेटपैकी ते किती खर्च करणार? आपण किती खर्च करणार? आतली लाईन त्यांनी टाकून देतो म्हणून सांगितले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आतली लाईनपर्यन्तचा वेगळा विषय आहे. त्यांच्या प्रायव्हेट लाईनमध्ये जागेमध्ये पाईप लाइन टाकणार त्याचा ते आग्रह धरतच नाहीत.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.):-**

गेटपासून ते गाईचे जे गोरक्षा आहे तिथपर्यंतची पाईप लाइन आम्ही टाकून घेऊ म्हणून सांगितले आहे. भूत बंगल्यापासून ते गेटपर्यंत आम्हाला किती मदत करणार? तुम्ही थोडा खर्च करा म्हटले होते. पण ती लोक ते सगळे प्रस्ताव तयार करुन आयुक्तांबरोबर चर्चेसाठी येणार होते. चर्चा करायला अजून का आले नाही? मला काही समजले नाही

**रोहिदास पाटील:-**

पण त्या परिसरात तुम्हाला पाणी द्यायला लागेल हे असे शब्द आहेत. मला काही नाही तुम्ही केले नाही. हा वेगळा विषय आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

या व्यतिरिक्त महाजन साहेबांनी सांगितले होते.

**रोहिदास पाटील :-**

तुम्हीच आठवा तुम्ही कोणाला काही आश्वासन दिले ते आठवा. तुम्ही तोपर्यंत या सभागृहात आहात, या महापालिकेत आहात तोपर्यत तुम्हालाच तो प्रश्न विचारला जाईल साहेब तुम्हालाच तो प्रश्न विचारला जाईल. महाजन साहेब तुम्हालाच विचारतील. तुम्ही त्यांना उत्तर द्यायला सक्षम आहात. पण जे आठवत आहे ते मी तुम्हाला सांगतो.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

पाईप लाइन जी टाकायची आहे त्याबद्दल पुढच्या सभेला विषय आणला जाईल. संबंधित अधिकाऱ्यांना प्रस्ताव तयार आहेत. एस्टीमेटही तयार आहेत. त्यांना बोलवा आपण पुढच्या सभेला तो विषय घेऊ.

**रोहिदास पाटील :-**

सगळया विषयावर चर्चा करायची नाही. आम्हाला चर्चा करण्याची सवय आहे. हा विषय क्लिअर सांगतो की, ज्या पध्दतीने आतल्या बाबतीत असेल त्याच्यावर तुमची चर्चा होते. आपण किती सहभागी आहोत. आम्ही आमचे करु, तुम्ही काही मदत कराल का? असा विषय आहे. आपला विषय होता की, केन्द्राकडून काहीतरी मिळवून घ्यायचे.

**शिवमुर्ती नाईक (मा.उपआयुक्त साो.):-**

तो विषय असा की, आजूबाजूची गावे मिक्स अप करा. केशवसृष्टीच्या मदतीने बाकीच्या गावांना पण पाणी देऊ व ती स्कीम तयार करा म्हणून सांगितले होते.

**रोहिदास पाटील :-**

रामरत्नकडे जो आहे तो हेड उंच आहे. केशवसृष्टीकडे हेड उंच नाही. केशवसृष्टीत आज असलेली अस्तित्वात जी पहिली पंचायतची पाईप लाईन आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

आपण हनुमान मंदिराजवळ टाकी घ्यायची होती.

**रोहिदास पाटील :-**

ती दुसरी स्किम म्हणून मी तुम्हाला विचारले म्हणून विचारले की, माझ्या प्रश्नाचे उत्तर देत नाहीत. हनुमानमंदिरकडचे जे रामरत्न विद्यामंदीर आहे. तो हायेस्ट पॉइन्ट आहे. त्याच्यामध्ये कॉन्स्टीब्युशन होते. त्याच्यामध्ये पार्टपार्शल ते काहीतरी करतील असे होते आणि हा जो विषय होता तुम्ही नव्हते. त्यामुळे आम्ही आणखी आग्रह करीत नाही. पण नाईक साहेब होते. त्यामुळे त्याना मी आग्रह करतो की, केशवसृष्टीच्या दारापर्यंत जी पाईपलाईन न्यायची आहे. ती सगळया संबंधितासाठीच आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

आपण जी आता स्कीम सांगितली ती आपण एम.जी.पी.ला बनवायला सांगितली. कारण त्यांच्या गाइडन्स शिवाय ती स्किम होणार नाही. पण जे पाईप लाईनचे जे आहे ते प्लॅन घेऊन आले होते. चर्चा पण झाली. नंतर कमिशनर साहेबांकडे येणार होते. का आले नाहीत? मला काही समजले नाही. पण पुढच्या सभेला ते आल्यानंतर दोन दिवसात बोलवा. पुढच्या सभेत तो विषय घेऊ.

**रोहिदास पाटील :-**

मी अजून सांगतो तुम्ही बरोबर उत्तर दिले. पण ते आल्यानंतर असे काय? हेही आपलेच काम आहे. आतमध्ये किंवा वरचे जे करायचे आहे त्याच्यासाठी मी त्यांना घेऊन येतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.):-**

घेऊन या आतल त्यांनी टाकून घेऊ दे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. शिवार गार्डन ते उड्डाणपुलापर्यंत जलवाहिनी टाकणे. त्याचप्रमाणे याचा असा उल्लेख आहे. मी दशोरे साहेबांनी विचारते की, ज्या ठिकाणी पाण्याची पाईप लाईन लिकेज झालेली होती आणि ते घाण पाणी मी प्रत्यक्षात तुम्हाला आणून दाखविलेले होते. त्यामध्ये ती लाईन आझाद नगरची आहे का आझादनगर ते साईबाबा मंदिरापर्यंत आहे का?

**एस. के. दशोरे :-**

त्या लाइनचे एस्टीमेट ऑलरेडी स्थायी समितीमध्ये पास झालेले आहे. निवीदा पण मंजूर झालेली आहे. त्याचे काम लवकर सुरु करण्यात येईल.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. जलवाहिन्या अनुषंगाने मी दोन्ही पेट्रोलपंप मिरा सेल पेट्रोलपंप ते विरानी पेट्रोलपंपच्या मध्ये नवीन पाईपलाइन टाकण्याबाबत मी ६ मे २००३ रोजी पत्र दिले. त्याच्या १५ दिवसानी अजून एक पत्र दिलेले आहे. त्याचे काही उत्तरही आलेले नाही आणि ते कामही सुरू होत नाही. त्या अनुषंगाने मी दशोरे साहेबांना वेळोवेळी माझ्या माणसाने रिमाईंड केलेले आहे. पण त्याचे उत्तर काही मिळाले नाही. तिथे लोकांची पाण्यासाठी फार अडचण आहे आणि दुसरा एक विषय काशी गावामध्ये जुनी पाईप लाईन आहे. म्हणजे सिमेंटची पाईप लाईन आहे.

**एस. के. दशोरे :-**

ते त्याच्यामध्ये आपण घेतलेले आहे. आता जी पाईपलाईनला मंजुरी मिळाली त्याच्यात घेतले आहे.

**आसिफ पटेल :-**

सेल पेट्रोलपंप आणि विराणी पेट्रोलपंप मधील.

**एस. के. दशोरे :-**

ते मी पाहणी करुन प्रस्ताव तयार करण्यात येईल .

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ५९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत जलवाहिन्या टाकणेच्या कामांस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे. (मा. महासभा दि. १८/०९/२००३ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ४०)

**ठराव क्र. ४७ :-**

सदरचा विषय हा आपल्या महापालिकेच्या दि. १८/९/०३ च्या सभेपुढे प्रशासकीय मंजुरीसाठी ठेवण्यांत आला होता. सदर प्रस्तावाप्रमाणे मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील एकूण १२ मुद्दे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यांत आले होते. त्यात उत्तन लाईट हाऊस, उत्तनगांव, पालीगांव, पातनबंदर, करईपाडा, डोंगरी व आनंदनगर तसेच भाईंदर पूर्व, मिरा रोड येथील शिवार गार्डन परिसर, काशी व काशी गांवठण, श्री. छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, हटकेस कंपनी व न्यू कारत हॉटेलचा भाग तसेच घोडबंदर भाग, संघवी टॉवर ते एस. के. स्टोनचा भाग ह्या ठिकाणी पाईप लाईन बदलणे, नवीन पाईप टाकणे इत्यादी बाबी घेतल्या होत्या. तथापी सदरसाठी मूळ पाणीपुरवठा योजनेत निधी असल्याचे सांगण्यांत आल्यामुळे वरील प्रस्ताव तहकूब ठेवण्यांत आला होता. याकामी प्रशासनाकडून असे कळविण्यांत आले आहे की, मूळ प्रस्तावातील वरील सर्व बाबी ह्या मूळ पाणीपुरवठा योजनेमध्ये नव्हत्या. त्यामुळे त्यासाठी त्या योजनेत कोणताही निधी उपलब्ध नव्हता म्हणून वरील वस्तुस्थिती आता स्पष्ट झाल्याने दि. १८/९/०३ च्या महासभेत जी स्थिती दिली होती त्यांतील व आता जी तपशिलवार टिपणी दिली आहे त्या सर्व प्रस्तावांना ही सभा आर्थिक व प्रशाकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोदी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवानी प्रकरण क्र. ६० चे वाचन केले)

**याकुब कुरेशी :-**

प्रकरण क्र. ६० याची आमच्याकडे कुठलीही टिपणी नाही. त्यामुळे मी विनंती करतो की, त्याची टिपणी नाही. त्यामुळे या विषयाला पुढच्या सभेत घ्यावे अशी मी विनंती करतो.

**शशिकांत भोईर :-**

हा प्रस्ताव असल्या कारणाने प्रस्ताव दिलेला होता. प्रशासनाने जर त्याची दिरंगाई केली असेल तर प्रशासनाने त्याचे उत्तर दयायचे आहे. हा प्रस्ताव मला मागील सभेत घ्यायचा होता. महापौरांनी उत्तर दिलेले की, तुमचा सदरचा विषय डिसेंबर २००३ च्या सभेत घेण्यात येणार. त्याप्रमाणे माझा हा प्रस्ताव आलेला आहे. प्रकरण क्र. ६० मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम १(ज) अन्वये दि. १३/१०/०३ रोजी मी प्रस्ताव दिलेला होता. त्या अनुषंगाने हा माझा प्रस्ताव आज महापौर मॅडमने घेतल्याबददल मी त्यांचा आभारी आहे. मी याबाबत एक ठराव मांडू इच्छितो. तत्कालिन नगरपालिकेने ठराव क्र. १९८ अन्वये दंडापूर्ती एक इंच जोडणीस रूपये ३५,०००/- व अर्धा इंच जोडणीस रूपये २५,०००/- प्रमाणे व तीन वर्षाचे सरासरी बील आकारण्यात येऊन सदर नळजोडण्या अधिकृत करण्यास मंजुरी दिली होती. सदर नळ जोडण्या नियमानुकूल करताना रू. १५ कोटीचे उत्पन्न तत्कालिन नगरपरिषदेने गृहीत धरले होते. सदर नळ जोडण्या नियमित न केल्यास मिरा भाईंदर शहरासाठी नवीन ५० दशलक्ष लीटर वाढीव पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यावर सदर अनधिकृत नळ जोडणीधारक स्वतःहूनच या नळ जोडण्या बंद करतील व अधिकृत नळजोडण्यासाठी नगरपालिकेकडे अर्ज करतील. पर्यायाने नगरपालिकेस अनधिकृत नळजोडणी नियमित केल्यामुळे मिळणारी दंडची रक्कम रू. १५ कोटी प्राप्त होणार नाही. असा गोषवारा मा. उपसचिव यांनी दिल्यानंतर महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एम.यु.बी. ७०००/१८४१/प्र.क्र.९३/२००० नवी वि, दि. १६/८/२००१ नुसार अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्याचा निर्णय घेतला. सदर निर्णयातील प्रस्तावनेत अनधिकृत नळजोडणी नियमित करणेसाठी उत्पन्नात रु. १५ कोटींची अपेक्षित वाढ विचारात घेऊन शासनाने एक अपवादात्मक बाब म्हणून सदर निर्णय घेतला आहे. सन १९९३ पासून

नगरपरिषद क्षेत्रामध्ये नवीन नळजोडण्या देण्याचे बंद केले आहे. त्यांनंतर आजपर्यंत अनधिकृत नळजोडण्या केल्या जात आहे. नगरपालिकेने नळजोडण्या नियमानुकुल करण्यासाठी मोहिम हाती घेतली असता २१७१ अर्ज अनधिकृत जळजोडणीधारकांना वितरीत करण्यात आले. त्यापैकी ४५५ अर्ज दंड बिल आकारणीसाठी अर्जदारांकडून भरण्यात आलेले नाहीत. नगरपालिकेने वेळोवेळी केलेल्या सर्वेनुसार एकूण चार हजार नळजोडण्या अनधिकृत गृहीत धरल्या होत्या. परंतु प्रत्यक्षात १७१६ अर्ज प्राप्त झाले. याचा अर्थ उर्वरित २२८४ धारकांनी नळजोडण्या नियमानुकुल करण्यासाठी अर्ज केलेला नाही. त्यामुळे रुपये आठ कोटी दंडाच्या रकमेपोटी व रु. ४.५७ कोटी पाणी वापराच्या सरासरी बिलापोटी असे एकूण रु. १२.५७ कोटी रूपयाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. ज्या २१७१ धारकांनी नळ जोडणी नियमित करण्याचे अर्ज नेले आहेत. त्यापैकी ४५५ अर्ज पुन्हा महापालिकेकडे प्राप्त झालेले नाहीत. त्यावर दंड आकारणी व सरासरी बिल आकारणी करायची आहे. महानगरपालिकेने नवीन नळजोडण्या देण्याची स्थायी समिती ठराव क्र. ९३ दि. १८/१/२००३ व ठराव क्र. ५२ दि. २८/५/२००३ अन्वये मंजुरी दिल्याने दि १२/१०/२००३ पर्यंत सुमारे १३७०८ नवीन नळ कनेक्शन मिळविण्यासाठी नागरिकांना नमुने अर्ज वितरित केले आहे. त्यामुळे २२८४ अनधिकृत नळ जोडणीधारकांनी नवीन नळ जोडणी मंजुरीकरिता अर्ज केलेले असल्याने एकूण रु. १२.५७ कोटी नुकसान होणार आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून नळजोडणी चोरीनी घेणाऱ्या समाजकंटकाने रू. १२.५७ कोटीचे दंड आकारण्यापोटी व बिल आकारणीपोटी महापालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे. अशा अनधिकृत नळजोडणीधारकांना शासनाच्या आदेशानुसार कायद्याने कार्यवाहीस पात्र धरणे आवश्यक आहे. मिरा रोड येथील काही अनधिकृत नळजोंडणीधारकांना प्रत्येक जोडणीमागे दंड आकारणी व सरासरी बिलापोटी रु. ७५,०००/- इतक्या रकमेची बिले मनपाने पाठविली. ती नंतर मनपाच्या अधिकाऱ्यांनी लाच घेऊन सदर बिलाची आकारणी कमी करुन त्याच जावक क्रमांकाने नवीन बिले दिली आहेत. ५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेल्या ५४ किलोमीटर अंतर्गत जलवाहिनी वितरित व्यतिरिक्त सदर योजनेत समाविष्ट न केलेल्या परंतु नव्याने वसलेल्या इमारतीना आणि पूर्वी वगळण्यात आलेल्या इमारतीना पाणीपुरवठा व्हावा ह्या दृष्टीकोनातून तत्कालिन नगरपरिषदेने आराखडे तयार करून अतिरिक्त ६६.६ कि.मी. वितरण व्यवस्थेसाठी जलवाहिन्या टाकण्यास मंजुरी दिली होती. परंतु सदर ६६.०६ कि.मी. वितरण व्यवस्थेव्यतिरिक्त अनेक ठिकाणी अधिकाऱ्यांच्या संगनमताने नकाशात अंतर्भूत नसलेल्या रहिवासी संकुलनांना अनधिकृतरित्या जलवाहिन्या टाकण्यात आल्या. वरिल बाबींचा विचार करता अनधिकृत नळजोडण्या दंड आकारणी करुन नियमानुकुल न करणे, दंड आकारणीच्या रकमेमध्ये फेरबदल करणे व समाविष्ट नसलेल्या भागांमध्ये वितरित व्यवस्थेत अनधिकृत जलवाहिन्या टाकणे तसेच शासनाच्या आदेशाची पायमल्ली करुन नवीन नळ जोडणीसाठी कोणतेही कायदेशीर निकष न ठरविता किंवा नवीन नळजोडणीसाठी उपविधी / नियम तयार न करता नवीन नळ जोडण्या देणे. यामध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वरील कामसाठी वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या नोंदवहया मनपाच्या दप्तरातून गहाळ झालेल्या आहेत व तसे वृत्तपत्रातही छापून आलेले आहे. वरील सर्व बाबींची सर्वकष चौकशी सक्षम अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येऊन संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, सभागृहातील सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी दोन महिन्यापुर्वीच्या सभेपुढे त्यांचा प्रस्ताव रितसर आपल्याकडे सादर केलेला होता. परंतु, नंतरच्या सभेमध्ये त्या प्रस्तावावर विचार विनिमय, चर्चा आणि ठराव काही झाला नाही. आज सुदैवाने महापौर साहेब आपण सभागृहाला आश्वासन दिले होते की, जे काही जुने प्रस्ताव पेंन्डींग असतील तर ते आपण एक-एक करत एका सभेमध्ये दोन-तीन आणून आपण त्याचा योग्य तो निर्णय घेण्याचे ठरविले होते आणि ते आश्वासन पाळत पाळत आपण ह्या प्रस्तावापर्यंत आज आलेलो आहोत. मी मुद्दामहून सभागृह आणि सभागृहाच्या भावनांशी सहमत होतांना आयुक्त साहेब आपल्या निदर्शनास आणून देईन की, सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी या महापालिकेचे सुमारे १२ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे अशा स्वरुपाचा पत्रव्यवहार प्रस्तावामधून आपल्याकडे पाठविलेला आहे. एखाद्या

व्यवहारामध्ये हजार-दोन हजार, लाख-पाच लाख अशा गोष्टीची चर्चा होते. त्यावेळी त्याचे गांभिर्य सगळेच घेतील आणि सगळ्यांनीच घ्यावे असे काही अपेक्षित नाही. परंतु, जेव्हा सभागृहातील लोकप्रतिनिधी प्रशासनाच्या संदर्भामध्ये अशा स्वरुपाचा ठासीवपणे एखादा आरोप मांडतात. त्याचे परावर्तन ठरावाच्या रुपानेसुद्धा आणण्याचा प्रयत्न सभागृहात होतो. तर त्यामुळे विचार केला नाही आणि अविचाराने काही करायचे म्हटले तर ती आमची चुक होईल. म्हणून मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी जी सांख्यिकी व्यक्त केलेली आहे. सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर साहेब, मी काल आपल्याशी कॉरीडोअरमध्ये सहज बोललो. ते बोलायला पण पाहिजे. विरोधी पक्षाचे सभासद असो, रुलिंग पक्षाचे सभासद असो, सत्तेतील असो. पण एखाद्या विषयावर विचार मांडतात, तर त्यांच्याशी आपल्याला सुसंवाद साधून बोलण्याला काही कमीपणा नाही. मी त्यांच्याशी बोललो तेव्हा त्यांनी असे व्यक्त केले की, मा. आयुक्त साहेब, आपले प्रशासन फार धीमं झालेले आहे. त्यांनी उच्चार केला की, गेंड्याच्या कातडीचे झालेले आहे. हे वेदनादायक आहे. तर त्यांनी असे म्हटल्यानंतर निश्चितच आम्ही या शहराच्या विकासाशी, या शहराच्या नावलौकिकाशी बांधिल आहेत. म्हणून जेव्हा या शहराच्या प्रशासनावर राजधाऱ्या सत्तेवर जेव्हा अशा प्रकारचे आरोप होतात. त्यावेळी वेदना होते. पण तरी पण केवळ एका सभासदाने पत्र पाठविले म्हणून सर्व काही आपण मान्य केले असेही होणार नाही. मा. आयुक्त साहेब मी खात्याच्या अधिकाऱ्यांशी यासाठी बोललो की, हे जे काही व्यक्त केलेले आहे. याच्यातील वस्तुनिष्ठता आपण आम्हांला समजावून सांगा. एवढे मोठे प्रशासन चालवितांना लाख हजार, दोन हजार, पाच हजारांच्या किंवा पन्नास लाखांच्या असे काय? पण जेव्हा सभासद बारा कोटींचा जेव्हा या ठिकाणी अशा प्रकारचे आरोप करण्याचे धाडस करते तेव्हा निश्चितच त्या प्रकरणाचे आपल्या प्रशासनाची जबाबदारी आहे की, सडेतोडपणे त्याचे उत्तर दिले पाहिजे. जे योग्य असेल तर आम्ही मांडण्याचा प्रयत्न करु आणि जे अयोग्य असेल त्याच्यावर विचार करण्यासाठी हे सभागृह समर्थ आहे.

**शशिकांत भोईर :-** प्रशासन गेंड्याच्या कातडीचे झालेले आहे असे मी बोललो नाही.

**महेंन्द्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर महोदय, सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईरजीने जो पेश किया है, वो पिछले चार वर्ष निरंतर इस तरह से आता रहा है। १९९३ मे जब हम लोग सभागृह मे थे। स्टँडींग कमिटीने सारे कनेक्शन बंद कर दिये गये थे। शहर को देखते की, पानी कम है। कनेक्शन गलत तरिकेसे दिये जा रहे है। उसके बाद १९९८ से जब पानी आना शुरु हुआ। अनधिकृत कनेक्शन देने की बाढ लग गयी। १९९९, २०००, २००१ तक तत्कालीन मुख्याधिकारी आज के उस समय के आयुक्त शुरु मे और उपआयुक्त महोदय ने अभी सन्मा. सदस्य लिओ कोलासो ने थोडासा खुलासा किया। लेकीन ऐसी संवेदना नही है। आपके सामने भी बजेट आया था। उस बजेट मे प्रोव्हीजन नाईक साहबने कहा की, इतने ढाई हजार कनेक्शन अनधिकृत का वसुली दस करोड करीब हो चुकी है। इसका हम लोगोने सन्मान किया था। ये बात गलत है की, उन्होंने बारा पंधरा करोड का बिलकुल झुठ है, गलत है। थोडा बहुत जरुर है। हमको जो जानकारी है वो बता रहा हूँ। तत्कालीन मुख्याधिकारी, तत्कालीन नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील थे उनके समय मे ये सारी बातचीत तय हुई के, कितना पैसा लेना चाहिए। कितना बजेट मे बढेगा? पंधरा करोड की लागत से चार हजार कनेक्शन को ट्रेस आऊट करके उसको मालूम किया गया था की, इतना पैसा आयेगा। सब हाऊसने सर्व संमतीसे एक तरफ पानी बढ रहा है। एक तरफ अपने बजेट मे पंधरा करोड रुपया बढेगा। इस तरह की अपेक्षा की थी। और २००१ से इस तरह से निरंतर नाईक साहबने उस तरह से वसुली की, जो स्टँडींग कमिटी मे जब चर्चा हुई। उन्होने बाकायदा ढाई हजार कनेक्शन आज स्टँडींग कमिटी के मेंबर थे। उनके समक्ष कहा, करीब नियर अबाऊट टेन करोर्स ऑफ रुपीज। मुझे लगता है आठ करोड पच्चत्तर लाख था। लेकिन वो नियर अबाऊट दस करोड की वसुली उन्होने दिखाई थी। अभी ये कहने का मतलब पंधरा करोड हो जाना चाहिए। बारा करोड का नुकसान है। वो कनेक्शन कहाँ गये? इस तरह का मुझे मेरे साहबजीने बताया के मैने उनके समय से यहा हूँ। प्रवचन जैसी बात हम लोग सुनने के अधिन हो गये है। जो फॅक्ट है वो आपके सामने रखा है। आयुक्त, उपआयुक्त और मुख्याधिकारीने ये सारा का सारा डिटेल हमारी स्टँडींग कमिटी मे दिया। हमने बहुत तारीफ की। उनको एक सन्मान दिया। उनके हाथ मे एक पुष्पगुच्छ भी दिया। वह दस करोड कहाँ से आया। अगर कही रह गये, ढाई हजार कनेक्शन तो उनको आपही साथमे लेकर बताईए। कम से कम पाँचसौ कनेक्शन तो बताओ की, यह पाँचसौ कनेक्शन अनधिकृत इस तरह से रह गये। मेरी यहाँ तक नॉलेज है। जहाँ तक मै

जानता हूँ, मा. आयुक्त महोदय आपके यहाँ से अभी तक मुझे लगता है बंद नही किया गया। अगर कोई भी व्यक्ती उसका अनधिकृत कनेक्शन है तो वह पैतीस हजार रुपया जमा करके अभी भी अधिकृत करने के लिए उसके लिए पुर्णतः परमिशन है। तो वह यह पैसा जमा कर सकता है। लेकिन चार हजार कनेक्शन नही है इस शहर मे। अगर है तो उसकी जानकारी सबसे लेटेस्ट नगराध्यक्ष महोदय यहाँ है उनको है। वह कनेक्शन कहाँ पर है वह बताईए की, इस एरिया मे ५०० कनेक्शन बाकायदा लेटेस्ट है। जैसे उनका प्रस्ताव। यह प्रस्ताव क्यों आया? कैसे आया? क्योंकी उसकी जानकारी जादा तर उनको है। हम लोग बारह साल आज हो गये। १९९० से लेकर आजतक सतत पाणी के बारें मे कैसे मित व्यवस्था हो? कैसे हर घरमे पाणी पहुँचे? अभी भी कोई बताते है की, पाणी नही पहुँच रहा है। यह सब करते हुए चले आ रहे है। और यह इतना बडा रॅकेट और इतना बडा भांडाफोड करने का मा. नगरसेवक हमारे साथ जो पिछले पाँच साल से शायद पहचान के बाद भी यह चार हजार कनेक्शन शहर मे अनधिकृत तो नही है। ज्यादा से ज्यादा किसी भी हिसाबसे अगर हजार भी हो तो मै चाहता हूँ, पाँचसौ का भी लेखा देखे तो आपका जो यह बजेट है वह पाँच करोड का बढेगा, और भी अच्छा लगेगा। मेरी राय से अगर आप इसको स्पष्ट किजीए। ऐसा है तो हम लोग हमारे हाऊस लीड ने बताया की, ऐसा है लेकिन ऐसा बिल्कुल नही है। आपके हाथ से बजेट गया। हम लोगों ने तीन तीन दिन मेहनत की। दस करोड उधर लिकेट किया है। इतना पैसा होने के बदौलत हमने दुसरे फंड मे यह जो बांधकाम डिपार्टमेंट है, दुसरे मे ज्यादा पैसा बढाया था। वही पैसा पानी का पैसा हमने कम भी किया। जहा जो ले रहे उसमे कम भी किया। मेरी रायसे यह जो प्रस्ताव शहर के नागरिकों को जिनको कनेक्शन मिले उनको भी परेशान हुए। उस समय पचास पचास हजार रुपये देके कनेक्शन लिए। अब उनको यह दुबारा तकलीफ है। अगर लिए है तो उनके नाम बताईए। इतने आदमी जिस ने पचास पचास हजार रुपये लिये गये और पैतीस हजार रुपये लेके दुबारा ऐसे पाँचसौ आदमी भी आप बताईए और शहरका भला हो जाएगा। तो मेरी राय, सुझाव यह है की, इसके संबंधित कोई भी प्रस्ताव देने मे उसने दोसौ कनेक्शन यही बता दिजिए। उसका यह सभागृह सन्मा करेंगी और इससे अपना रेव्हन्यु बढेगा ऐसी कोई बात नही। लेकिन यह जो जानकारी सिमित है सिर्फ चार लोगों तक सिमित है। एक उस समय के मा. मुख्याधिकारी, उस समय के आयुक्त और इस समय के मा. उपायुक्त महोदय जानते है की, उस समय के मा. तत्कालीन नगराध्यक्ष महोदय उनको सबसे ज्यादा जानकारी होगी। इसलिए उससे यह जानकारी लि जाए। तो इस शहर का और यह सभागृह जादा भला हो सकता है।

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, आता जो विषय मिरा भाईंदर विकास आघाडीचा विषय आलेला आहे. सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी जे आज लेटर दिलेले आहे आणि त्या अनुषंगाने या ठिकाणी चर्चा चालू आहे. मी आपल्याला सूचित करु इच्छितो की, सहा महिन्यापुर्वी इलिगल कनेक्शन लिगल करायचे जे शिल्लक आहे. त्याच्यासाठी मा. मंत्री महोदय श्री. आर. आर. पाटील साहेब यांच्याकडे मी स्वतः आणि कमिशनर श्री. आर. डी. शिंदे आणि कार्यकारी अभियंता दशोरे साहेब आम्ही प्रत्यक्ष जाऊन भेट घेतली आणि ती मुदत संपली होती. ती मुदतवाढ करुन मिळावी. ही जी इलिगल कनेक्शन आहेत ती लिगल करण्यासाठी मुदत आम्हांला मा. मंत्री महोदय आर. आर. पाटील साहेब यांनी आम्हांला मिळवून दिली. परंतु त्याच्यानंतर ती मुदत आल्यानंतर जी काही इलिगल कनेक्शन लिगल करायची जी प्रोसीजर होती ती किती प्रमाणात प्रोसीजर आली याची आम्हांला कल्पना अजून मिळाली नाही. मा. महापौर मॅडम आज यावर मी सभागृहात सांगितले होते. ज्यावेळी ९४ आणि ९५ नंतर जे इलिगल बिल्डींगला कनेक्शन देण्यांस शासनाची मनाई आहे. मा. महापौर मॅडम त्यावेळी मी सुचित केले होते की, ही कनेक्शन आपण कुठल्या ठरावाद्वारे मंजुर करावीत आणि या शहराला सर्वांना न्याय द्यावा. सर्वांनाच पाणी द्यावे. तो नियम आपण अंमलात आणला नाही आणि आज या शहरामध्ये अशी परीस्थिती आहे. एका बिल्डींगला पाणी मिळते तर दुसरी बिल्डींग पाहत बसते. ते पाणी पितात पण आम्हांला पाणी मिळत नाही आणि अशा अवस्थेमध्ये आज या शहरामध्ये माझ्या स्वतःकडे काही बिल्डींग आलेल्या होत्या. आम्हांला कनेक्शन पाहिजेत. काही पेपर नसतांना मी काही बिल्डींगना कनेक्शन देऊ शकलो नाही. पण त्या बिल्डींगना दुसरीकडून कनेक्शन झाले. ज्या पद्धतीने कनेक्शन झाले त्याचा खुलासा मी कमिशनर साहेबांकडे केलेला आहे. माझे बिल्डींगला कनेक्शन मिळाले आहे. त्याबद्दल ऑब्जेक्शन नाही आणि त्या बिल्डींगचे कनेक्शनही कापू देणार नाही. परंतु, कशी कनेक्शन

झाली? याचा खुलासा मला आज शासनाने द्यायला पाहिजे. अशी परिस्थिती असतांना जे माझ्याकडून काम होत नाही ते काम दुसरीकडून केले जाते. आज या प्रश्नाला फार मोठे महत्व आहे. मी या ठिकाणी एवढेच सांगेन की, अशा प्रकारची कामे आपल्या खात्याकडून होत आहेत आणि ह्याला कुठेतरी मज्जाव करण्यासाठी, ह्याला आळा घालण्यासाठी या सभागृहाला मी विनंती करतो की, जी काही कनेक्शन अजून बाकी आहेत. ज्या ९४-९५ नंतरच्या इलिगल बिल्डींग आहेत त्याही बिल्डींगला कनेक्शन शासनाने कुठल्याही मार्फत बसवून त्या बिल्डींगना अधिकृत पाणी देण्याची कृपा सभागृहाला विनंती करतो आहे. नाही पेक्षा जी पण कनेक्शन बिल्डींगला बाकी आहेत त्या बिल्डींग देखील कुठल्याही मार्गाने कनेक्शन घेतल्याशिवाय राहणार नाहीत आणि असाच प्रकार यापुढे देखील या शहरामध्ये चालू राहील. मा. महापौर मॅडम, मी आपल्या अजून निदर्शनास आणून देऊ इच्छितो, ज्या बिल्डींगमधील लोक राहतात त्यांनी केव्हा कनेक्शन घेतले. मला माहिती नाही. ती बिल्डींग आमच्या प्रभागामध्ये आहे. राहूल डी बिल्डींग आहे. त्या बिल्डींगचे कनेक्शन दहा दिवसापुर्वी पाणी पुरवठ्याकडून कापले गेले. हाच तो विषय आहे. तर त्या बिल्डींगचे कनेक्शन कसे काय कापले गेले? त्याची कल्पना नाही आणि मी दोन महिन्यापुर्वी आर.एन.ए. टॉवर, कादंबरी हॉलच्या बाजूला एक बिल्डींग आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, जो विषय प्रस्तावात आलेला आहे. आम्हाला पाण्याची आवश्यकता आहे. आम्हांला पाणी मिळत नाही. आम्हांला नव्या-जुन्या बिल्डींगला पाणी मिळाले पाहिजे. अधिकृत, अनधिकृत बिल्डींगला, १९९५ नंतरच्या बिल्डींगला पाणी मिळाले पाहिजे. पाणी वितरण व्यवस्था बरोबर नाही, हा विषय संपूर्णपणे वेगळा आहे. हा जो प्रस्तावाचा विषय मांडलेला आहे त्या विषयावर बोला. प्रस्ताव जो या ठिकाणी आलेला आहे तो विषय वेगळा आहे आणि हा विषय वेगळा आहे.

**दिनेश नलावडे :-**

आर.एन.ए. टॉवर बिल्डींग आहे. तिथे कंन्स्ट्रक्शन, बिल्डींगचे काम चालू आहे आणि त्या बिल्डींगला इलिगल कनेक्शन घेऊन आज ती बिल्डींग पूर्णपणे उभी राहीलेली आहे आणि तसे मी लेटर त्या ठिकाणी दिलेले आहे. त्या बिल्डींगवर काय कारवाई केली? याची आम्हांला कल्पना नाही याचा संपूर्ण खुलासा प्रशासनाने द्यावा ही विनंती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम, मला याच्यात कागदोपत्री पुरावा सादर करायचा आहे. मला सभागृहाचा अर्धा तास लागणार आहे. तुम्ही जेवणाची घोषणा करा. पुरावे आहेत सगळे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी मघाशी सांगितले. त्याचबरोबर सन्मा. सदस्य श्री. दिनेश नलावडे यांनीसुद्धा सांगितले. खेदाची गोष्ट आहे की, ज्या बिल्डींग कायदेशीर नाही म्हणून आम्ही कनेक्शन दिली नाहीत. पण त्याच बिल्डींगना चोरुन कनेक्शन लागली गेली हा प्रस्ताव त्यांनी आणलेला आहे. खरं तर लाजीरवाणी गोष्ट आहे की, हे जर अधिकारी तसे करीत असतील आणि तुम्ही त्यांना पाठीशी घालणार तर चालणार नाही. सन्मा. सदस्य लिओ कोलासो यांनी सांगितले की, अधिकारी का जबाब देत नाहीत. हा जबाब अधिकाऱ्यांनी द्यायला पाहिजे होता. जेव्हा १२ कोटीचा आरोप होतो. तेव्हा अधिकारी का मूग मिळून गप्प का बसले आहेत? त्यांनी जबाब देऊ नये का?

**आसिफ शेख :-**

महापौर साहेब आणि सन्मा सदस्य श्री. तुळशीदास म्हात्रे, आपल्या भावना सर्व सदस्य त्यांच्या भावनेशी सहमत आहे. सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी जो या ठिकाणी प्रस्ताव मांडला त्याचे पण आपण निश्चितपणे समर्थन करु या. आमचे पहिल्यापासून ठरले आहे. काम करीत नाही त्यांना घरी बसवायचे.

**मिलन म्हात्रे :-**

या विषयावर अगोदर जे सदस्यांनी वक्तव्य केले. आमचे सभागृह नेते आणि दुसरे

**मोहन पाटील :-**

महापौर मॅडमनी कमिशनर साहेबांना खुलासा करायला सांगितला होता. मग सदस्य मध्ये का बोलतात?

**मिलन म्हात्रे :-**

खुलासा नाही. सर्व पूर्ण झाल्यानंतर खुलासा व्हावा. विषय पूर्ण संपलेला नाही. आमच्याकडे सर्व पुरावे आहेत. लंचनंतर आम्ही बोलायला तयार आहोत.

**मा. महापौर :-**

मी काय सांगते, तुमच्याकडे काही पुरावे असतील. तर कमिशनर साहेबांकडे द्या ते बघतील.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, हे सर्व झालेले आहेत. तुम्ही जेवणाकरिता सुट्टी द्या. आम्ही सभेचे कामकाज चालवायला असेही तयार आहोत आणि सभा जर सुट्टी दिली नाही तरी चालवायला तयार आहेत. तुमच्या सदस्यांना मग गप्प रहायला सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम, महापालिकेच्या नुकसानाची १२ कोटींची गंभीर बाब आहे. शेवटी आदरणीय राज्यपालांनी त्यावेळी हा आदेश दिला होता. त्यावेळीच्या आयुक्तांनी एक पत्र दाखविले होते. दोन महिन्याच्या आत ज्यांनी लिगल केले नाही त्यांचे कनेक्शन देण्यांत येणार नाही अशा पद्धतीचा आदेश असेल त्याच्यावर १२ कोटींचे नुकसान झाले आहे. या सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मी खुलासा करतो.

**रोहित सुवर्णा :-**

तुम्ही एकदा खुलासा केला की, हे बोलतील साहेबांनी खुलासा केला, संपले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपला खुलासा आम्ही ऐकायला तयार आहोत.

**आसिफ पटेल :-**

महापौरांच्या परवानगीने बोलतो, मॅडम तुम्ही जेवणानंतर हा खुलासा करा. तो खुलासा मान्य होणार नाही. जेवणानंतरच हा खुलासा होऊ द्या.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, हा विषय गेल्या दिड-दोन वर्षापासून चालू आहे. विषयपत्रिकेवर तुम्ही पत्र घेतलेले आहे. अशा प्रकारची पत्र आमची देखील आहेत. त्याच्यावर आयुक्त साहेबांबरोबर मी व्यक्तिगत चर्चा केली. आयुक्तांनी त्याच्यावर माझ्या समक्ष आदेश झालेले आहेत. परंतु, त्याच्यावर कुठलीही कारवाई नाही. पुराव्यासकट मी पत्रव्यवहार केलेला आहे. मंत्रालयाला महानगरपालिकेकडून जी उत्तर गेली आहेत ती सुद्धा भ्रमनिरासव खोट्या प्रकारची आहेत. त्याचे पुरावे माझ्याकडे आहेत. जेवणानंतर आम्ही व्यवस्थित बसायला तयार आहोत.

**परशुराम पाटील :-**

महापौर मॅडम आणि आयुक्त साहेबांच्या परवानगीने बोलतो की, मघासचा जो पेन्डींग विषय होता आणि तो आता जेवणानंतर आपण उपस्थित केलेला आहे आणि त्याचप्रमाणे सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी आपल्या पत्रानुसार ज्या आपल्या नळ कनेक्शन विषयी जे पत्रात नमुद केलेले आहे. त्या प्रश्नाचे उत्तर मागितलेले आहे आणि सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी जे पत्र वाचून दाखविले आहे त्याला जे उत्तर द्यायचे आहे. तर माझे असे म्हणणे आहे की, आयुक्त साहेबांनी त्यांच्या पत्राचे उत्तर द्यावे आणि नंतर कोणाला बोलायचे असेल त्यांनी बोलावे अशी आपणांस नम्र विनंती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझा बोलायचा दृष्टीकोन असा होता, मघाशी जी चर्चा झाली त्या पत्रावर उत्तर दिले की, प्रश्नोत्तराचा तास संपला.

**परशुराम पाटील :-**

आता प्रश्नोत्तराचा तास नाही आहे. पण त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यांत यावे. मग आपण त्याच्यावर चर्चा करण्यांत यावी.

**मिलन म्हात्रे :-**

एकत्र द्यावे. त्यांनी फक्त विदाऊट कागदपत्रे फिगर सांगितला आहे. सभागृहामध्ये कागदपत्रे मागतात. ती माझ्याकडे आहेत. तुम्ही मध्येच हस्तक्षेप का करता? तुमचे तुम्ही बोलतात, संपले. पुरावे मागितले गेले, ते आम्ही देतो. तुम्ही आम्हांला सपोर्ट केले पाहिजे.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे, मी विरोध करीत नाही. पण आपल्या प्रोसीजरने आपल्याला जायला पाहिजे. आपण कायद्याप्रमाणे जायला पाहिजे. मी विरोधाच्या बाजूनेच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. मग उलटा आम्हांला तुमचा वेळ द्या.

**परशुराम पाटील :-**

माझा वेळ घेण्यापेक्षा सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांना मा. आयुक्त उत्तर देतील. त्या उत्तरानंतर काही ती चर्चा करण्यांत यावी. आयुक्त साहेब आपण उत्तर द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम मला आपण बोलण्यांस परवानगी द्यावी अशी मी आपणांस विनंती करतो.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, सब्जेक्ट मे बोलने की परमिशन अगर कोई माँगता है। वोही हाऊस असिस्ट के लिए ठिक है। आऊट ऑफ सब्जेक्ट कोई भी बोलेगा।

**मिलन म्हात्रे :-**

कोई आऊट ऑफ सब्जेक्ट नही है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सब्जेक्ट के हिसाब से बोलीये।

**मिलन म्हात्रे :-**

आप नक्की मत किजीए। कौनसा आऊट ऑफ है और कौनसा इनफ है। हमने परमिशन माँगी है। हमको बोलने दिजीए। माझ्याकडे पुरावे आहेत आणि प्रकरण करोडो रुपयांच्या नुकसानीचे आहे. आज या सभागृहामध्ये सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांच्या पत्राचा उल्लेख केला गेला. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील आणि सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी ठराव वाचून दाखविला. त्याच्यात माझ्या भाषणनंतर मी काही अमेंन्डमेन्ट करणार आहे. संबंधित प्रश्नाची अनधिकृत नळ कनेक्शन याबद्दल महापालिकेस मी २७/०६/२००३ रोजी रितसर पत्र दिले होते. त्याच्यामध्ये जवळ जवळ १८४ नळ कनेक्शनबद्दल बिल्डींगच्या नावानिशी आणि नळ कनेक्शनच्या संख्येनिशी मी तुम्हांला कळविले होते. त्यानंतर समोरच म्हणजे आयुक्तांची मी भेट घेतली आणि हे पत्र त्यांना सादर केले. त्यावेळेला माझ्या समवेत श्री. दशोरे, कांबळे हे अधिकारी आयुक्त साहेबांच्या समोर हजर होते. त्यांनी तिकडेच ही नळ कनेक्शन जाऊन तपासून लगेच तोडण्याचे आदेशसुद्धा त्यांना दिले गेले होते. माझ्यासमोर दिले आहेत. मी त्याचा साक्षीदार आहे. ही जी लिस्ट बनविलेली आहे. तरी त्या एरियामध्ये मी स्वतः पायी फिरुन प्रत्येक बिल्डींगवाईज पहाणी करुन ही लिस्ट मी आपल्याला दिली आहे. सभागृह नेते आम्ही जरा बोलतो आहे. ही लिस्ट पुर्णपणे एक दिवस त्या विभागामध्ये फिरवून आणली. माझे या सभागृहामध्ये अगदी ओपन चॅलेंज आहे की, तिकडे खाजगी फ्लॅटना सुद्धा कनेक्शन दिलेली आहेत. अगोदर मी सांगणार नाही. हा पुरावा अर्धा दिला आहे. पूर्ण पुरावा लगेच द्यायचा नसतो. तुम्ही एक एन्क्वायरी मा. आयुक्त साहेबांनी बसविली होती. पाणी पुरवठा विभागामध्ये जेवढी पत्रे आम्ही दिलेली आहेत. मी स्वतः अजूनपर्यंत कुठल्याही पत्राचे उत्तर आलेले नाही. त्याच्यात फक्त एका पत्राचे उत्तर मला मिळाले ते सुद्धा चुकीचे आहे. ते पत्र दशोरे साहेबांच्या सहीचे आहे आणि त्याच्यामध्ये आणि तसेच पत्र त्यांनी वरती महाराष्ट्र शासनाला सुद्धा मी जे पत्र दिले सचिवांकडे, मुख्यमंत्र्यांकडे. हा पत्रव्यवहार केला गेला त्या पत्राच्या उत्तरामध्ये ह्याच्या खाली जे उत्तर दिले होते. त्याच्यामध्ये त्यांनी आज असे दिले मला की, पत्र नपा/पा.पु./५९५५/२००३-२००४, दि. ८/९/२००३. पत्राच्या शेवटला मा. महापौर मॅडम आपले कामकाज कसे चाललेले आहे बघा. पत्राच्या शेवटला मला त्यांनी जी माहिती दिली की, सदर दावा हा अनिर्णीत आहे. एक आपल्या पाणी पुरवठा विभागाचा महत्वाच्या पदावरचा अधिकारी एका नगरसेवकाला नगरपालिकेच्या करोडो रुपयाच्या लॉसकरिता जे पत्र देतो त्याच्यामध्ये भ्रमनिराश करण्याचे पत्र की, ही कोर्टकेस अजून पेंडींग आहे. माझ्याकडे ही हायकोर्टाची ऑर्डर आहे आणि त्याच्यामध्ये हा निकाल ११/०६/२००३ ला उच्च न्यायालयाने आपल्या महानगरपालिकेला डायरेक्शन दिल्या आहेत. दंडाची रक्कम कोणी घ्यायची हे नगरपालिकेला काही त्याच्याशी देणे घेणे नाही. तुम्ही दंडाची वसुली करण्यांस सुरुवात करा आणि आपला अधिकारी अजून लिहून देतो की, न्यायप्रविष्ठ बाब आहे. दोन महिने झाले, दोन

दिवस नव्हेत. सदर ऑर्डर आपल्या न्यायविधी विभागाकडून कमीत कमी दहा पंधरा दिवस, आठवडा आली पाहिजे. परंतु दोन-दोन महिने होत आले. अधिकारी आमच्यासारख्या नगरसेवकांना लिहून देतात की, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. एक बाब झाली. महानगरपालिकेने, तत्कालीन नगरपालिकेने या ठिकाणी पाईप लाईन नवीन टाकण्याकरिता ९३ साली परमिशन दिलेली आहे. सदर परमिशन दिल्यानंतर त्या ठिकाणच्या नागरिकांनी जवळ जवळ ९९ पासून आपल्याकडे तीस-एक पत्रे दिलेली आहेत. या सगळ्या पत्राच्या कॉपी माझ्याकडे आहेत की, आमच्याकडे पाणी पुरवठा जो आहे तो एकदा नगरपालिकेने खंडीत केला. सगळे कनेक्शनचे पाणी बंद झाले. तिकडच्या संस्थेने, सगळ्या हाऊसींग सोसायट्यांनी नगरपालिकेस स्वतःचे सिल शिक्का मारलेली पत्रे हे एक कंम्बाईन आहे. संयुक्तपणे एक पत्र दिले. त्याच्यावर सगळ्या सोसायट्यांचे सही, शिक्के आहेत आणि काही व्यक्तिगत दिलेले आहेत आणि त्यांनी १९९९ साली सांगितले की, आम्हांला तुम्ही पाण्याचे कनेक्शन चालू करुन द्या. जी पाईप लाईन बंद केली आहे ती आणि आज आपल्या पाणी विभागातर्फे मला काल-परवा पत्र आलेले आहे. म्हणजे हे जे पत्र तुम्हांला सांगितले ८/९/२००३ याच्यात दिले आहे की, शांती पार्क या एरियामध्ये इलिगल कनेक्शन नाही आहेत. १८४ जे पायी फिरुन जी लिस्ट दिली आहे ते मी पायी फिरलो आहे. तिकडे माहिती काढली आहे आणि नंतर तुम्हांला पत्र दिलेले आहे आणि त्याचा संपूर्ण पुरावा माझ्याकडे आहे. सभागृहाने याच्यावर काय निर्णय द्यायचा आहे तो घ्यावा. त्याच्यापुढे काय करायचे तेही आम्ही ठरविले आहे. जवळ जवळ सव्वा करोड रुपयाचा प्रश्न आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

महापौर मॅडम, इस हाऊस के हिसाब से मेरे पास भी पुरावा है। मेरे पास भी लेटर है। मै पुरावे के साथ आया हुं। मुझे पाँच मिनिट बोलने दिजिए। मै हाऊस का समय बचाने की आपसे रिक्वेस्ट कर रहाँ हूँ। आप उनके बाद मुझे बोलने दिजिए।

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेतर्फे अनधिकृत नळ कनेक्शनला पेनल्टी करण्याबद्दल, त्यांचा दंड घेण्याबद्दल आपले श्री. दशोरे यांनी ४ जून, २००३ रोजी ॲफीडेव्हीट दिलेले आहे हायकोर्टामध्ये. ह्याची कॉपी माझ्याकडे आहे. त्याच्यामध्ये सुद्धा त्यांनी मान्य केले आहे की, ही नळ कनेक्शन इकडे इलिगल आहेत आणि तोच अधिकारी केवळ कोणाचा तरी बचाव, स्वतःचा बचाव, काहीतरी असेल. पण ते सगळे करण्याकरिता असे दाखवतात की, त्या एरियामध्ये कनेक्शनच नाही आहेत. इलिगल कनेक्शनच नाहीत. जी आहेत ती नवीन आहेत. मी ज्या बिल्डींगमध्ये राहतो तिकडे गेल्या दहा वर्षापुर्वी दोन चोरीची कनेक्शन आहेत. कोणीतरी आमचे एक्स, वाय, झेड, कोणीतरी दिली असतील. त्यावेळेला शंभर फ्लॅट होते किंवा साठ पकडा. पंधरा फ्लॅटच्या हिशोबाने दोन कनेक्शन लागले. ती जुनी चोरीची होती. आता तुम्ही पंधरा चोक साठ म्हणजे चार कनेक्शन लागणार त्या बिल्डींगला. दोन इलिगल कनेक्शन आहेत. ती तिकडची वॉक आऊट केले. संपूर्ण केस नील केली. टोटल चार कनेक्शन नवीन दाखविली गेली आहेत आणि दोन जी तुमची चोरीची कनेक्शन झाकली गेली. त्यामध्ये १ लाख १२ हजार रुपये प्रत्येक बिल्डींगमागे लॉस झाला. हे मी तुम्हांला उदाहरणार्थ सांगतो. मघाशी इकडे भाव उतरला. पहिले पाचशे, नंतर तीनशे सांगितले आणि दोनशेवर आले. त्यांच्या दोनशेनुसार १८४ कनेक्शनचे पुरावे इकडे मी तुम्हांला दिलेले आहेत आणि मी तिकडे पायी फिरुन आलेलो आहे. मी हवेत गप्पा करीत नाही. त्यांनी अहवाल तयार केला आहे. तो अहवाल पूर्णपणे चुकीचा आहे. मी ज्या घरामध्ये पाण्याचे कनेक्शन आहे. ते पण घर बघून आलेलो आहे. परवा कापडणीस साहेबांचा आपण एक ठराव घेतला होता. उत्कृष्ट अभियंता. त्य अभियंत्याच्या घरातसुद्धा स्वतंत्र एक इंचाची लाईन लावून घेतली होती. अजित कापडणीस साहेबांच्या इथे ही मागची जुनी गोष्ट आहे. या ठिकाणी सोसायटीवाल्यांनी १९९९ पासून अनेक अर्ज केले आहेत. ज्याच्यावर नगरपालिकेचा शिक्का आहे आणि याच्यात बिल्डींगची सर्व नांवे दिलेली आहे. कनेक्शनची संख्या आहे आणि ही सर्व सिल आहेत त्यावेळेला त्या सोसायटच्या बोलतात की, आमच्याकडे चोरीची कनेक्शन आहेत. आम्ही दंड भरायला तयार आहोत आणि आमचा दंड घ्या. शिवमुर्ती नाईक साहेब, इकडे सभेत बसलेले आहेत. शिवमुर्ती नाईक साहेबांच्या सुद्धा नोटीस त्यांच्याकडे आहेत. आपल्याकडे नगरपालिकेच्या वतीने दि. ४/१०/२००१ रोजी सर्व बिल्डींगना अशा नोटीस दिलेल्या आहेत. त्याच्याखाली शिवमुर्ती नाईक साहेबांची सही आहे. आपण कुठूनही नाकारु शकत नाही की, एखाद्या बिल्डींगला इलिगल कनेक्शन नाही. याच्यामध्ये जरुर ठराविक काही महत्वाची कनेक्शन लपवण्याकरिता एक लमसम फिगर ही

दिला जाऊ शकतो आणि दिला गेलेला आहे. वास्तव परिस्थिती तशी नाही. माझ्या वॉर्डामध्ये चोरीची कनेक्शन डिटेक्ट करण्याकरिता हातात मोठे टॉर्च घेऊन, शिडी लावून, मी अंडर ग्राऊंड पाण्याच्या टाकीमध्ये आपल्या खात्यातील कर्मचाऱ्यांना उतरविलेले आहे आणि पाईप लाईनच्या धारा किती उडतात त्या मोजा आणि ह्या बिल्डींगला कनेक्शन किती आहेत. आपल्या रेकॉर्डवर ती मोजा आणि असे करुन काही कनेक्शन डिटेक्ट झालेली आहेत. आता माझ्या वॉर्डामधली गोष्ट सांगतो. अंम्बा माता मंदिराच्या पाठीमागे एक सोसायटी आली त्यांना तीन नळ कनेक्शन पाहिजे होती. जी चोरीची होती. आम्ही गेलो. अजून आपला धोरणात्मक निर्णय व्हायचा आहे. होणार नाही, ठिक आहे. तुम्ही कायदा पाळा. आम्ही तुम्हांला सपोर्ट करतो. मा. महापौर मॅडम, तीन महिन्यामध्ये त्या बिल्डींगला कनेक्शन लागले. ती रेग्युलराईज झाली. पैसे घेतले गेले. आम्हांला जर तुम्ही नियमाच्या आणि धोरणात्मक निर्णयाच्या गोष्टी सांगता तर ती कशी काय रेग्युलराईज झाली? सुपार्श्व बिल्डींग तीन कनेक्शन आहेत. मी नावासहित बोलतो आहे. आमच्या इकडे सुर्यलोक बी आहे. अजून दोन इंचाचे कनेक्शनचा त्याला हे लागलेले आहे. त्या बिल्डींगच्या कनेक्शनला अजून कुठलेही कागदपत्र तयार झालेले नाहीत. मी स्वतः पत्र देऊन पूर्णपणे नगरपालिकेकडून माहिती मागविली आहे. अजून त्याची माहिती मिळालेली नाही आहे. त्याचे डिपॉझीट भरले आहे का? दुसऱ्या बिल्डींगना आम्ही सांगायचे की, लाख-लाख रुपये भरा आणि पैसे भरुन तुम्ही रेग्युलराईज करा. ते बिचारे येतात, ड्राफ्ट भरतात, पैसे भरतात. एका बिल्डींगने तुमचा नियम पाळायचा. दुसऱ्या बिल्डींगने त्याचे चोरीचे कनेक्शन लिगलाईज करुन घ्यायचे, फक्त २८ हजारामध्ये. हा उद्योगधंदा सर्रास चालू आहे. याच्यामध्ये जे काही मिरा रोडमध्ये आहे आणि पुराव्याची जी गोष्ट आली. मी पुराव्याशिवाय कधीही बोलत नाही. मी १२ कोटींचे बोलणार नाही. मी एक कोटीचे बोलेन आणि ते एक कोटी त्या बारा कोटीमधील असू शकतात. मी ते सांगत नाही. तो तुमचा हिशोब आहे. मोठे हिशोब तुम्ही करायचे, आम्ही करत नाही. मॅडम, मला एकच सांगा की, ह्या प्रश्नाचे उत्तर अजूनपर्यन्त दिले गेले नाही. आयुक्तांनी त्या ठिकाणी सर्व्हे करण्याचे आदेश दिले. त्यानंतर खरे बघायला गेले, नगरपालिकेचा काय सर्व्हे झाला? तुमचे तिथे किती कनेक्शन डिटेक्ट झाले? ती कनेक्शन खरोखर होती का? मिलन म्हात्रेचे म्हणणे खोटे होते की खरे होते? हे महापालिकेने मला काही ठराविक कालावधीमध्ये कळवायला पाहिजे होते. ते अजूनपर्यंत कळविलेले नाही. शंभर टक्के माझे खोटे असू शकते. तुमचे एकशे दहा टक्के खरे असू शकते. काहीतरी बोला. पण तसे कुठेही करण्यांत आले नाही. मी बिल्डींगच्या नावानिशी कळविलेले आहे. सहा महिने झाले, मी आयुक्तांना वारंवार जाऊन भेटलो आहे, नंतर त्यांना भेटलो. नाही साहेब, आमचा आता सर्व्हे चालला आहे. आम्ही काल बघून आलो. आम्ही काल हे करुन आलो. पंधरा दिवसामध्ये तुमची कनेक्शन लागली आहेत आणि एक तुमचा खड्डा मारला गेला की, तिकडे एकाच्या ऐवजी दोन कनेक्शन लागतात. पैसे एकाचे भरता. आमच्यासारखे कोण विचारायला गेले, देखो यह पावती है। नगरपालिकाने हमको ऑथोराईज कनेक्शन लगाने का परमिशन दिया है। आम्ही काय बघणार. खड्डा बंद करताना दुसरे लावतात. परिणामी इलिगल कनेक्शनचे प्रमाण अजूनही चालू आहे. मी जी पद्धती तुम्हांला सांगितली, नगरपालिकेच्या वॉचमनला बरोबर घ्या. पाणी खात्याच्या कर्मचाऱ्यांना आपले वरिष्ठ अधिकारी, त्या बिल्डींगचे, सोसायटीचे पदाधिकारी, त्यांना बरोबर घ्या. टाकी उघडून खाली उतरवायचे आणि मग कळते चोरीचे किती कनेक्शन आहेत? तुम्ही वर-वर बघायला गेले तर बिलकुल कळणार नाही. माझी ही सुचना आहे. नगरपालिकेच्या आर्थिक फायद्यासाठी कोणीही याच्यात बारगेनिंग करु नये, असे माझे स्पष्ट मत आहे. आम्ही आमच्या वॉर्डमधील काही लोकांना सांगतो जाऊन पैसे भरा. नगरपालिकेचे अधिकृत तुम्ही करुन घ्या आणि एकीकडे आम्ही असे सांगत असतांना दुसरीकडे मात्र इलिगल कनेक्शन लिगल करण्याचे वेगवेगळ्या ठिकाणी सतत चालू आहे. दुसरी एक गोष्ट सांगतो आयुक्त साहेब, याचे सगळे पुरावे माझ्याकडे आहेत. काही प्रकरणे तुमच्या नगरपालिकेच्या दप्तरातून गायब झालेली आहेत. फॉर्म पण लोकांनी भरले आहेत. ही अलग अलग बाकी जी पत्र आहेत आता एक उदाहरणार्थ तुम्हांला फॉर्म दाखवतो. अर्ज क्रमांक १८०, त्याच्यावर तारीख १९/९/२००० आहे. २००१ किंवा २००२ ची असेल पण १९/९ अशी तारीख आहे. हा त्या फॉर्मचा प्रिस्क्राइब आहे. म्हणजे त्या एरियामध्ये त्या सोसायट्यांना अनधिकृत नळ कनेक्शन नियमित करण्याचा अर्ज. हा फॉर्मचा फॉरमॅट आहे. म्हणजे त्या ठिकाणी अनधिकृत नळ कनेक्शन त्यावेळी होती हे सांगणारा आपला नगरपालिकेचा पुरावा आहे. नगरपालिकेचे गोल सिल आहे. नगरपालिकेचा नंबर आहे. मी त्या वेळेला सुद्धा पत्रात म्हटले आहे. तुमची चौकशी

पूर्ण झाल्यानंतर मी कागदोपत्री सर्व पुरावे तुम्हांला देईन. मी हे आज या सभेत याच्याकरिता मांडतो आहे की, त्याची इतिवृत्तांताला नोंद झाली पाहिजे. आपले अधिकारी सहा महिने काही करु शकले नाहीत. पुढे काही करणार नाहीत. शेवटी ते आम्हांलाच करायचे आहे. ऑक्ट्रॉयमध्ये आम्ही ते करुन दाखविले. ऑक्ट्रॉयमध्ये हायकोर्टची ऑर्डर आमच्या फेवरला आली. आम्ही केलेले अपिल हायकोर्टाने मान्य केले. स्टेट गव्हर्नमेंटला त्याचे डायरेक्टीव्ह दिले गेले आहेत. आठवड्यामध्ये त्याचा निर्णय घ्या. आमचे जे अपिल केले त्याची सुनावणी घ्या. ह्यांच्याकडे जे काही ॲडीशनल पुरावे असतील ते नोंदवून घ्या. नगरसेवक झाल्यानंतर सर्व काम पूर्ण झाले असे नाही. या शहराकरिता चांगले करण्याकरिता बरेच काही टप्पे आम्हांला पुढे गाठायचे आहेत. त्याच्यातील हा एक प्रकर आहे. आज हे सगळे पुरावे माझ्याकडे आहेत. काही पुरावे आहेत. अजून चौकशी करा. माझ्याकडे भरपूर कागद आहेत. तुम्ही करत रहा. त्याच्यावर माझ्याकडचे पुरावे मी तुम्हांला इकडे देणार नाही. ज्या ठिकाणी सक्षम आहे तिकडे मी देणार. कारण आयुक्त आम्हांला सक्षम वाटत होते. आयुक्तांकडे बसून आम्ही निवेदन केले. अर्ज, विनंत्या केल्या. नगरपालिकेच्या करोडो रुपयांचा लॉस होत आहे हे दाखवून दिले. आयुक्तांनी त्यांचे काम केले. कनिष्ठ अधिकाऱ्यांना लगेच तिकडे माझ्या समोर आदेश दिले. पण त्या आयुक्तांच्या आदेशाचे पालन केले गेले नाही. ही आम्हांला आम्ही शरमेची बाब मानतो. म्हणून साहेब, मी परत तुमच्याकडे गेलो नाही. मंत्रालयात गेलो. याच्यापुढे सवलती म्हणजे अनेक मार्ग मोकळे आहेत. आज झोपडपट्टीमधील स्टँडपोस्ट कट करण्याकरिता आमच्यासारख्या नगरसेवकांना, सगळ्यांना तुम्ही पत्र दिली. आज आमच्याकडच्या लोकांनी ग्रुप कनेक्शनसाठी तुमच्याकडून फॉर्म नेले. सगळे काही झाले. कनेक्शन पुर्ण झाली. मंजुर झाली. स्टँडपोस्ट अजून बंद न केल्यामुळे तुमचे लाखो रुपये आज आमच्या झोपडपट्टीच्या लोकांनी कनेक्शन मंजुर केल्याचे, कनेक्शन घेतले नाहीत म्हणून पेंन्डींग आहेत. लोक सरळ सांगतात, म्हात्रे साहब आप सफेद झुठ बोलते हो। आपने बोला यह कनेक्शन कटनेवाला है करके हमने फॉर्म लाया। हमने पैसे भरने के लिए ले गये, लेकिन कनेक्शन कटता नही। फोकट मे पानी मिलता है तो हम पानी खरीद के क्यों लेंगे। और हमारा दस-पंधरा हजार डालेंगे। हे लोक बोलतात. एकीकडे तुम्ही नगरपालिकेला कळविले, आमच्या नगरसेवकांना कळविले की, तुमच्याकडे स्टँडपोस्ट आम्ही सगळे बंद करणार. चला ठिक आहे. गणपती गेले, दिवाळी गेली, दसरा गेला, आता न्यु इयर आले. आता आपण ख्रिसमसनंतर करु या. पण कुठल्याही सणाचा मुलाहिजा न ठेवता तुमची जी कठोर कारवाई आहे ती तुम्ही योग्य वेळी करा. तर तुम्हांला त्याच्यामध्ये काही तरी बेनेफिट मिळेल. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जो ठराव दिलेला आहे त्याच्यामध्ये मी माझी उपसुचना मांडतो. आपल्याकडे जो निधी जमा व्हायला पाहिजे तो अन्य ठिकाणी इतर निधी कमी पडू नये. याच्यामध्ये अधिकारी हेळसांड केल्यामुळे निधी कमी पडतो. पैसे न आल्याने म्हणून १९४९ च्या सेक्शन ५६ नुसार ती कारवाई करण्यांत यावी अशी माझी उपसुचना आहे. मी आपल्याला विनंती वजा निवेदन केले ह्याचा आपण गांभिर्याने विचार करावा. माझ्याकडे सर्व पुरावे आहेत. परत एकदा सांगतो, आपण आपली सर्व चौकशी पूर्ण करावी. त्यानंतर मात्र जी काही कनेक्शन डिटेक्ट होतील शेजारच्या नालासोपारा नगरपालिकेत आताच कलेक्टर साहेबांनी जे काही आदेश दिलेले आहेत त्याचे उदाहरण आपण समोर घेऊ या असे मला वाटते आणि मी माझे निवेदन पूर्ण करतो. आपण बोलायला संधी दिली. त्याबद्दल धन्यवाद. कागदपत्रे देऊनसुद्धा आपल्या अधिपत्याखाली हे इकडचे सरकार आहे. त्याच्यामध्ये नगरसेवकांना न्याय मिळत नाही. नगरसेवकांनी दिलेली पत्र यांची कुठलीही दखल घेतली जात नाही. ती कितीही गंभीर असू दे. ह्याची मॅडम आपण नोंद करावी ही माझी आपणांस नम्र विनंती.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी जी उपसुचना मांडली ती मला मान्य आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मै सभाशिस्त के हिसाब से बाहर बात करता नही। जैसे के उन्होने अभी फर्माया, ऐसे जो सक्षम नगरसेवक जो है। आज जिस तरह से उन्होंने बात की। उसके विरोध मे मेरे जैसे नगरसेवक कभी जाते नही। अनधिकृत नल कनेक्शन के बारे मे मेरे जैसे लोग कभी बात नही करते। सवाल गटनेता श्री. शशिकांत भोईरजी का है। सुक्ष्म मे मै बताऊ की, आपके पास इस तरह का संवेदन किसी तकलीफ आयी आपने उस तरह का लेटर यहाँ पर लिया। प्रस्ताव के रुप मे यहाँ दिया। हम लोगों को मान्य रहा की, इसमे चर्चा हो। चर्चा होने के साथही मेरे संबंधित नगरसेवक जिन्हे इतना

बडा ज्ञान, इतनी बडी चोरी पकडने का तरिका आता है। एक बार सरकार के न्याय से नगरसेवक बने। दुसरी बार नगरसेवकों के साथ हमारा सौभाग्य है, इतने अच्छे नगरसेवक हमारे पास है की, इनको मालूम है की, अभी भी अनधिकृत कनेक्शन इस शहर मे कितने है। वो ही आखिर सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजी का है की, जो चार हजार हमने ट्रेस आऊट किये उसमे बाइस सौ नळ कनेक्शन है। वो ट्रेस आऊट हुए। उसमे दस करोड की इन्कम हुई। जो की बजेटमे है। आपका प्रशासन क्या करता है? वो आपका काम है। लेकिन हमारे यहाँ पर ऐसे भी नगरसेवक है, जो बता रहे है, पाच हजार कनेक्शन मुझे लगता है। अकेले सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बता देंगे इस शहर मे और लगे है, तो मुझे कोई संकोच नही है। अगर उनकी मदत ली जाये, मै भी उनकी मदत करने को तैयार हूँ की, ये पाच हजार कनेक्शन कहाँ है? कहाँ सिडीयाँ लगा-लगाकर उन्होंने देखी। उन्ही की सबसे बडी झोपडपट्टी है। सबसे बडा एरिया है। वो कनेक्शन किस पिरिएड मे लगे। वो दस साल से मेहनत कर रहे थे। तब से कनेक्शन लगाये थे। किनके साथ मिलकर कनेक्शन लगाये थे। आज जो काम रहाँ रास्ते पर आया है।

**मिलन म्हात्रे :-**

मैने झोपडपट्टी मे नही बोला। मैने बिल्डींग मे बोला है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मै सभाशिस्त जानता हूँ। मैने इनको डिस्टर्ब नही किया। वो जो बोले वो सुना है। ये इतने सौभाग्यशाली है की, दुसरी बार भी उनको टर्म मिला।

**मिलन म्हात्रे :-**

हमे रोना नही पडा। हम हमारे कतृत्व से आये। तुम्हारी मेहेरबानीसे नही आये। ठराव के हिसाब से बात करो।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

ठराव की जरुरत नही है। ठराव सिर्फ इतनासा है की, चार हजार नल कनेक्शन जो थे उसमे से ढाई हजार क्यों आये? १५०० कनेक्शन के लिए आपके यहाँ से मुझे पता चला है की, पुरी तरह से अनधिकृत कनेक्शन अभी भी १५०० ट्रेस आऊट हो जाते है। या पाच-सौ, छे-सौ और लगते और तीन हजार हो गये। तो हजार कनेक्शन का पैतीस हजार की हिसाब से आपके रेव्हेन्यु मे कोई घाटा नही। मा. गटनेते श्री. शशिकांत भोईर का भी यह आशा है की, जो बाकी बचे हुए कनेक्शन १५०० जो १५ करोड बोला था, यह बजेट मे सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ने उस समय १५ करोड का एस्टिमेटेड किया था, वो पैसे बढ जायेगा। यह उनका हिसाब है। १५ करोड बढ जायेगा। तो दस करोड कम जादा करके दस करोड अनुमानित किया था। नियर अबाऊट दस करोड का पुरी की फिगर साडे नऊ बताके इतनी फिगर आ गयी। सवाल शहर मे कितने कनेक्शन लग रहे है, इस बात का नही है। सवाल इस बात का है की, १५०० कनेक्शन जो आपने एस्टिमेटेड किये थे, क्यों नही अभी तक अधिकृत हुए। वो ट्रेस आऊट क्यों नही हुए। अभी अपने पास जादा इंजिनिअर भी है। जादा लोग है। तो ये ४००० की फिगर एक बार कंम्प्लिट हो उसके बाद सन्मा. नगरसेवक मिलन म्हात्रे जो उनके पास इस तहर का है। गोडाऊन से चोरी हो रही है। कार के पेट्रोल की चोरी हो रही है। डिझेल चोरी हो रहे है। सब कुछ उनको पता है। कैसे पता मुझे पता नही। और अच्छी बात है आपको पता है। आप बताते हाऊस को यह अच्छा शहर का भला हो रहा है। लेकिन आप ही को पता है, ७९ नगरसेवक को नही पता चोरी कैसे होती है। किसी को नही पता। चोरी कैसे होती है। ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे जी को अच्छी तरह पता है। इनकी मदत लिजिए। मै महापौर से निवेदन करता हूँ। जरुरत पडे इनकी मदत लिजिए। चोरी कहाँ हो रही है। वॉचमन ड्युटी छोड के कब चला जाता है। बंदूक कहाँ रख के आता है, वो इनको मालूम है। वो किसकी बंदूक कहाँ रखी है यह भी उनको मालूम है। स्थायी समितीमे इस तरह की बात उसने कही है सबसे जादा चोरी करना। चोरी कैसे की जाती है। चोरी कैसे पकडी जाती है। वो जानते है, कनेक्शन कैसे लगते है। मै झोपडपट्टी मे बताईए एक भी ग्रुप कनेक्शन लगा नही पाया। मेरी दो झोपडपट्टी है। सबसे जादा झोपडपट्टी है साईबाबा, हनुमान नगर झोपडपट्टी। अभी तक कनेक्शन, एक कनेक्शन के यहाँ नही आया। यही इंतजार कर रहा था की, वो पैसा उन गरिबों को फायदा हो। अभी इन्होंने मुद्दा उठाया की, वो स्टँड पोस्ट क्यों नही काटे गये? आपको मालूम है। आपने लगा लिये। वहाँ बिचारे गरीब

मर जाते है। कैसे कटने देंगे। नही कटने देंगे स्टँड पोस्ट। आप तो चंदा वसूल करके काम करते है।

**मिलन म्हात्रे :-**

ये विधान आप वापस ले लो। हद के बाहर बढ रहे है। हम लोगों ने लोगों को बोला है। चाहे तुम लोग कर्ज निकालो। और ये भी बोला है की, कनेक्शन कब बंद होगा उसकी गॅरेन्टी नही है। तुम्हारे जैसे हम लोग चंदा लगा के होर्डिंग्ज लगाते नही। समझे क्या? पर्सेंटेज नही लेते दस टक्के का, तीन टक्के का। संभालके बात करो।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

काम कैसे होना चाहिए। उसका तरिका हमने बताया की, जो अनधिकृत है। मा. आयुक्त महोदय आप डिपार्टमेन्ट को चुस्त करीए। पहले १५०० कनेक्शन का पैसा यहाँ भराईये। उससे १५ करोड रुपया होगा। उसके बाद सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे जी का सहयोग लिजिए। इस तरह अगर उन्हे तकलीफ है इस तरह का प्रस्ताव लाये ना।

**मिलन म्हात्रे :-**

लाया ना। उसको साथ दो। चर्चा क्यों करते है। साथ दो। देखो क्या काम नही होता है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इनको, सभी को मौका आपको देना है। तो ऐसा प्रस्ताव इनको भी बोलीए। इनके पास बहुत सी चोरीयों के प्रकरण है। हम लोग चर्चा करेंगे और इनको मौका देंगे।

**मिलन म्हात्रे :-**

लास्ट टाईम वहाँ पर इन्स्पेक्शन मे गये तो एक घंटे मे आपकी कमर दर्द होने लगी।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आप बीच मे मत बोलिए। मै आपको सभाशिस्त सिखाना चाहता हूँ।

**मोहन पाटील :-**

मॅडम, एक सदस्य बोलत असतांना दुसऱ्याने मध्ये का बोलावे?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपको सभाशिस्त आती नही।

**मिलन म्हात्रे :-**

व्यक्तिगत आरोप करु नका. व्यक्तीगत आरोप चालणार नाही.

**(सभागृहात गोंधळ)**

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आज तक पचास बार सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे जी का नाम पेपर मे आया। लेकिन हमारे जैसे नगरसेवक का कभी आया नही।

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही कसे लगेच उठता बोलायला, मी असे बोललो नाही म्हणून. त्यांना बोलू दे. व्यक्तीगत नाही .

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मुझे इतनाही बोलना है, आज मुद्दे से बात करके प्रशासन जवाब दे।

**मिलन म्हात्रे :-**

उद्या ते काहीही बोलतील.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मै बीच मे नही बोल रहा हूँ। आप बीच मे क्यों बोल रहे है?

**आसिफ शेख :-**

चौहाण साहेबांना बोलायचे तर चौहाण साहेबांना बोलू द्या. चौहाण साहेबांना काय भाषणात काहीतरी मुद्दे उपस्थित केले. त्याचा खुलासा करतांना सन्मा. सदस्यांनी नंतर खुलासा केला पाहिजे. मग ते बोलत असतांना कृपया त्यांनी बोलू नये. त्यांना बोलू द्या. नंतर तुम्ही बोला. तुम्हांला भरपूर संधी आहे. वादविवाद कशाला वाढवता. सन्मा. महापौर साहेब या ठिकाणी सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी जो या ठिकाणी प्रस्ताव आणलेला आहे आणि त्यावर आपले मतप्रदर्शन करतांना सर्व सन्मा. सदस्य, सर्वश्री सभागृह नेते, लिओ कोलासो, मिलन म्हात्रे, प्रफुल्ल पाटील, महेंद्रसिंग चौहाण आणि

अन्य सर्व सदस्यांनी यामध्ये ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या भावनांशी मला वाटते, सर्व सभागृह जवळ जवळ सहमतच आहे. दुमत कोणाचेच नसणार. परंतु या ठिकाणी जे अनधिकृत नळ कनेक्शन संदर्भात जे मुद्दे उपस्थित झाले आणि नवीन नळ कनेक्शन देत असतांना ज्या आपण प्रक्रिया अवलंबितो आणि त्या प्रक्रियेमध्ये विलंब लागतो, असे दोन्ही प्रकारचे मुद्दे या ठिकाणी उपस्थित झालेले आहेत. आता आपल्याला प्रशासन चालवत असतांना बऱ्याच गोष्टी आपल्या हातून कधी चांगल्या तर कधी वाईट होतात. तर जसे आपण चांगली कामे केल्यानंतर आपण या ठिकाणी प्रशासनाची तारीफ करीत असतो तसे एखाद्या चुका वगैरे झाल्या असतील तर त्या सुधारण्याची आपण संधी दिली पाहिजे. आता आपण जर ठाणे महानगरपालिकेचे किंवा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे उदाहरण घेतलेले आहे. तेथील आयुक्तांनी प्रशासन सुधारण्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत कडक पावले उचललेली आहेत आणि या ठिकाणी सन्मा. आयुक्त साहेब अत्यंत सक्षम आहेत. या ठिकाणी जे गंभीर मुद्दे उपस्थित झालेले आहेत, अनधिकृत नळ कनेक्शन संदर्भात किंवा नवीन नळ कनेक्शन प्रक्रिया देत असतांना तर या संपूर्ण बाबींची अत्यंत गंभीरतेने या सभागृहाने दखल घेतली पाहिजे. प्रशासनाने दखल घेतली पाहिजे आणि त्यावर यथायोग्य ती कारवाई निश्चितपणे झालीच पाहिजे असे मला वाटते. या सभागृहाचे या ठिकाणी मत आहे. आपापसात भांडण्यापेक्षा आपल्याला मुळ मुद्यात हात घातला पाहिजे. शेवटी आपण असे म्हणत असतो की, घुँगट कहाँ तक सवारोगे, यह लाज है। छिलके कहाँ तक उतारोगे, यह प्याज है। समझा जाये तो उलझना व्यर्थ है और दोष कहाँ तक निकालोगे, यह समाज है। तर आपण याप्रमाणे बघितले तर दोष तर आहेत. काम करीत असतांना चुका तर होणारच आहेत. पण एखादी जर गंभीर चुक असेल सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यामध्ये खरोखरच गंभीर बाब असेल तर त्याची शहानिशा झाली पाहिजे, चौकशी झाली पाहिजे आणि संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे. एवढीच साहेब आमची या ठिकाणी अपेक्षा आहे. ठाणे महानगरपालिकेत आयुक्त भोगे साहेब यांनी, कल्याण डोंबिवली महापालिकेत आयुक्त खामतकर साहेबांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने त्या ठिकाणी प्रशासनावर पकड बसवलेली आहे. जे खरच काम करीत नाहीत त्यांना घरी बसवलेले आहे. आम्ही वृत्तपत्रातून वाचलेले आहे. मी प्रत्येक वेळी सांगत असतो. स्थायी समितीमध्ये पण आमचे तेच म्हणणे असते. महासभेत पण आमचे तेच म्हणणे असते. जे अधिकारी, कर्मचारी चांगले काम करतात त्यांची तारीफ केली पाहिजे. त्यांना आपण पदोन्नती देतो. त्यांचे मानधन आणि डबल इन्क्रीमेन्टदेखील त्यांना या ठिकाणी दिलेले आहे आणि जर खरोखरच गंभीर चुका झाल्या असतील तर एक-दोन लोकांना चौकशी करा. त्यामध्ये तथ्य असेल आणि पुरावे असतील तर आपण कारवाई करायला मला वाटते आपण मोकळे आहोत. प्रशासनाने त्या संदर्भात योग्य ती कारवाई करावी. चौकशी करुनच कारवाई करायला पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे एखाद्यावर कारवाई करीत असतांना मला वाटते ठराव करण्याची आवश्यकता भासत नाही. कारण आपला मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मध्ये हे सर्व आपल्याला दिलेले आहे की, आपण कारवाई करु शकता. त्या अधिनियमाचा आपण वापर करा आणि कारवाई करण्यासाठी ठराव करणे हे कितपत योग्य आहे हे मला माहिती नाही. त्यामुळे आपल्या अधिनियमात आपण योग्य ती कारवाई करा. अधिकारी, कर्मचारी काम करीत नसतील तर ठराव करण्याची आवश्यकता नाही. स्थायी समितीमध्ये ठराव नको आणि महासभेत पण नको. अधिनियम आपल्याकडे आहे. अधिनियम कलमान्वये कारवाई करा. आपल्याला मुळ आहे आणि जसे प्रशासन आम्हांला अपेक्षित आहे, स्वच्छ आणि पारदर्शक प्रशासन चालविले पाहिजे. आमची सर्वांची या ठिकाणी तीच भावना आहे की, सरकार कसे असले पाहिजे, पारदर्शक आणि उत्तम प्रशासन आपण या ठिकाणी चालवित आहोत. याचे एक उदाहरण आयुक्त साहेब, महापौर साहेब आपण चौकशी करा आणि जे तथ्य आढळेल, संबंधितांवर कारवाई करा. एवढेच या ठिकाणी बोलतो. धन्यवाद.

**मिलन म्हात्रे :-**

कांद्याचे सांगितले ना, वो जो प्याज है उसका छिलका निकालने के बादही वो दुसरे को रुलाता है। उसके लिए छिलका निकालना जरुरी है।

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. मॅडम मी आपल्याला विनंती करतो. आज एवढी चर्चा झाली आणि यापुढे अजून ९४-९५ नंतरच्या इलिगल भरपूर बिल्डींग शिल्लक आहेत. एक वर्ष झाले आपण पाण्याचे कनेक्शन द्यायला चालू केलेले आहे. मी आयुक्त साहेबांना विनंती करतो

की, एक वर्षामध्ये ज्या बाकी बिल्डींग शिल्लक ९४-९५ च्या इलिगल आहेत. त्यांना पाणी कनेक्शन मिळण्यासाठी आपण शासनाकडून काही प्रयत्न केले आहेत का? नसेल केले तर करणार आहात का? की, ह्या बिल्डींगला आपण पाणीच द्यायचे नाही. असा आपल्या महानगरपालिकेचा निर्णय आहे का?

**मा. महापौर :-**

तुम्हांला आता कमिशनर साहेब सांगतील.

**दिनेश नलावडे :-**

साहेब ह्याच्यावर आपण प्रयत्न करा. याच्यासाठी संपूर्ण नगरसेवक सहयोग द्यायला तयार आहोत. पण आपल्या प्रशासनाकडून याबाबत झाले पाहिजे आणि मी एवढे सांगेन आजपर्यंन्त ज्यांना कनेक्शन लागेल त्यांना दिले तर हा प्रश्न पुढे येणारच नाही. माझे मत आहे की, आजपर्यंत जेवढ्या बिल्डींग आहेत, ज्यांना कनेक्शन लागेल त्यांना कनेक्शन द्या. आपल्या महानगरपालिकेचा ठराव करा आणि सर्वांना कनेक्शन देऊन टाका.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, माझी विनंती अशी आहे की, आम्ही जे एवढे बोललो त्यावर आपले रुलिंग व्हावे नंतर आयुक्त साहेबांनी त्याचा खुलासा करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

महापौर मॅडम, जो सन्मा. सदस्य श्री. शशिकांत भोईर यांनी प्रस्ताव दिलेला आहे. त्यामध्ये तीन गोष्टींचा तिकडे उल्लेख केलेला आहे. प्रथम गोष्ट त्यांनी सांगितली की, ज्या २१७१ धारकांनी नळ जोडणी नियमित करण्याचे अर्ज नेले. त्यापैकी ४५५ अर्ज पुन्हा महापालिकेकडे प्राप्त झाले नाही, हे एक. नंबर दोन ६६.०६ किलोमीटर वितरण व्यवस्थेमध्ये व्यतिरिक्त अनेक ठिकाणी अधिकाऱ्यांच्या संगनमताने नकाशात अद्‌भुत नसलेल्या रहिवाशी संकुलात अनधिकृत जलवाहिन्या टाकण्यांत आल्या. तिसरा त्यांनी आरोप केला आहे. शासनाच्या आदेशाची पायमल्ली करुन नवीन नळजोडणी कोणतेही कायदेशीर निकष न ठेवता किंवा नवीन नळ जोडणीसाठी उपविधी नियम न तयार करता नवीन नळ जोडणी देणे यामध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचे प्रथम दिसून येते. हे जे तीन आरोप केलेले आहेत ते तीन्ही आरोप सत्य आहेत. आयुक्त साहेब तुम्हांला आम्ही अनेक वेळा पत्र दिले आहे. या महासभेत आम्ही इलिगल कनेक्शनची यादी मागितली. आमच्या गटनेत्यांनी मागितली, आमच्या आमदारांनी मागितली. पण आजपर्यंत तुमच्याकडून ती यादी दिली गेली नाही. या महासभेमध्ये मी एक प्रश्न केला होता. प्रश्न क्र. ४९ अजून तो चर्चेमध्ये येणे बाकी आहे. त्यामध्ये जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तरामध्ये आपण बघितले. त्यामध्ये मी जो प्रश्न केला, त्यामध्ये असे विचारलेले आहे की, जे १९९५ नंतर एकूण किती बिल्डींगमध्ये पाण्याचे कनेक्शन देण्यांत आले. आपले उत्तर आहे ६२ बिल्डींगला देण्यांत आले. त्यानंतर मी महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे १९९५ नंतरच्या अनधिकृत बिल्डींगना कनेक्शन देऊ नये आणि १९९५ च्या नंतरचे कनेक्शन किती दिले गेले? आणि कुठल्या आधारावर दिले गेले? त्याचे फक्त उत्तर दिलेले आहे की, आपण फक्त ४३ बिल्डींगला कनेक्शन दिलेले आहे. कुठल्या नियमाने दिले माहिती नाही. त्यानंतर आपण पुन्हा टिप दिलेली आहे. चार हजार कनेक्शन स्थायी समितीच्या नवीन ठरावाप्रमाणे अर्ज आलेले आहेत आणि त्याची कारवाई सुरु आहे आणि कनेक्शन देणार आहोत. साहेब, जे आरोपपत्र केलेले आहे आजच महासभेमध्ये आपल्या अधिकाऱ्यांकडून एक उत्तर दिलेले आहे. सन्मा. नगरसेवक मदनसिंह यांनी प्रश्न केला होता. भाईंदर पूर्वेला राहूल ड्रीम सी बिल्डींगमध्ये एक, दोन पाणी कनेक्शन देण्यांत आलेले आहेत. ते अधिकृत आहेत का? आपल्या अधिकाऱ्यांकडून सांगितले गेले आहे. ते कनेक्शन राहूल सी बिल्डींगमध्ये एक व्यासाच्या दोन नळ जोडण्या मंजुर करण्यांत आलेल्या नाहीत. सदर अनधिकृत नळजोडण्यांबाबत रितसर कारवाई सुरु आहे. म्हणजे हे आज उत्तर दिले आहे. म्हणजे दहा-दहा अधिकारी या महासभेमध्ये आपण घेतलेले आहेत आणि आजही प्रशासनाच्या डोळ्यामध्ये मिरची टाकून अशा पद्धतीने नळ कनेक्श्न घेतले जात आहेत. म्हणजे याच्यामध्ये जर खरोखर नगरसेवक इन्व्हॉल्व्ह आहेत. तर नगरसेवकांवर कारवाई करावी. नगरसेवक इन्व्हॉल्व्ह नसेल तर अधिकाऱ्यांना का आपण क्षमा करता. आपण उत्तर दिले आहे. आम्ही उत्तर दिलेले नाही, हे आपल्या अधिकाऱ्याचे उत्तर आलेले आहे. म्हणजे किती गंभीर बाब अधिकाऱ्याला माहिती आहे. पाण्याचे कनेक्शन इलिगल चालू आहे. मी तीन पत्र दिलेली आहेत. बिल्डींगची नांवे दिलेली आहेत. ती आता माझ्याकडे नाहीत. मी पुरावा देईन. त्या बिल्डींगमध्ये कुठल्या आधारावर कनेक्शन दिलेले आहे. त्याचे उत्तर अजूनपर्यंत मला मिळालेले

नाही.  मी ए.टी.पी. डिपार्टमेंटला पत्र पाठविलेले आहे, नगररचना विभागाकडे पाठविले आहे.  या वीस बिल्डींगना आपण भोगवटा दाखला दिला आहे का?  त्यांचेही उत्तर आलेले नाही की, आम्ही भोगवटा दाखला दिलेला आहे की, नाही दिलेला आहे.  कारण भोगवटा दाखल्याशिवाय मला शासनाचे परिपत्रक जे लिगल कनेक्शन जे अधिकृत बिल्डींग आहे.  भोगवटा दाखला बघून तुम्ही कनेक्शन द्यावे असे सांगितलेले आहे.  असे नसतांना देखील कनेक्शन देण्यांत आलेले आहे.  अशी अनेक यादी आहे आणि आता जे महाराष्ट्र शासनाने जे दोन परिपत्रक आपल्या महापालिकेत पाठविले होते त्या परिपत्रकामध्ये क्लिअर महाराष्ट्र शासनाने लिहिलेले आहे.  एक तुमचे परिपत्रक १६ ऑगस्ट २००१ चे आहे आणि दुसरे परिपत्रक १५ सप्टेंबर २००० चे आहे.  मी शिवमुर्ती नाईक साहेबांचा त्यावेळी धन्यवाद केला होता.  आजही करतो आहे.  त्यावेळी त्यांनी या महापालिकेचे उत्पन्न वाढण्यासाठी जे दोन आदेश आणले.  पहिला त्यांनी आदेश आणला की, अनधिकृत कनेक्शन रेग्युलराइज केल्यानंतर एवढे पैसे येणार आहे आणि महाराष्ट्र शासनाने त्यांना परवानगी दिली.  त्यानंतर संशय झाला की, हे इलिगल कनेक्शन लोक लिगल करणार नाही.  तर त्यांच्यावर काय कारवाई आणि दुसरा आदेश झाला, दोन महिन्यांच्या आत म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या आदेशाच्या दोन महिन्याच्या आत ज्या लोकांनी इलिगल कनेक्शन लिगल करुन कायदेशीर घेतले नाही त्यांची नळ कनेक्शन जोडणी ताबडतोब तोडून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी.  मी प्रश्न विचारलेला आहे.  मला आपल्या अधिकाऱ्यांनी उत्तर दिलेले आहे.  भाईंदरमध्ये एकूण ३६२ अर्ज आले.  त्याच्यातील २५७ अर्ज रेग्युलराईज केले.  ११७ अर्ज अजून पेन्डींग आहेत.  म्हणजे मा. राज्यपालांनी जे आदेश दिलेले आहे दोन महिन्यांच्या आतमध्ये ज्यांनी लिगल केलेले नाही त्यांना ताबडतोब दंडात्मक कारवाई करुन त्याला पुन्हा कधी नळ जोडणी देऊ नये अशा आदेशाचेही पालन आपले अधिकारी करीत नाहीत, ही गंभीर बाब या ठरावाने येते. आमचे एवढेच म्हणणे आहे प्रस्ताव आलेले आहे.  चौकशी नेमावी.  चौकशीच्या माध्यमाने जे अधिकारी तुम्हांला सापडतील कारण शेवटी या महापालिकेचा पैसा चाललेला आहे.  ज्या महापालिकेचे उत्पन्न हे महापालिकेच्या फंडामध्ये आले पाहिजे ते पैसे अधिकाऱ्याच्या खिशात जात आहेत किंवा इलिगल कनेक्शन हे दलालाकडे चाललेले आहे ही प्रथा बंद झाली पाहिजे.  मा. आयुक्त साहेब आम्ही अनेक पत्र दिलेली आहेत.  रिमाईन्डर दिलेले आहे.  आज ही चर्चा करण्याची का पाळी आली?  हा ठराव आणण्याची का पाळी आली?  हे बोलतात ना ठराव आणण्याची काही गरज नाही आहे.  आयुक्तांकडून तसा प्रतिसाद नगरसेवकांना मिळाला नाही.  अधिकाऱ्यांना पण तो मिळत नाही.  पण आयुक्त साहेब, आपण जर गंभीर बाब घेतली असती तर आज बेधडक उत्तर देता आले असते.  आजचा प्रश्न आहे. कनेक्शन लागले म्हणून आज जाऊ आता म्हणजे अधिकाऱ्याला सर्व माहिती असून या शहराचे वाटोळे करायला घेतले आहे.  आपले अधिकारी यांना क्षमा माफीची लायकी नाही आहे.  पण याची कायदेशीर कारवाई केलीच पाहिजे अशी आमची पण मागणी आहे.

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आपण जे अधिकाऱ्यांविषयी वक्तव्य केले त्याबद्दल मी आपल्याशी सहमत आहे.  पण त्यांची लायकी वगैरे काढणे योग्य नाही.  हे आपण मागे घ्या.

**मोहन पाटील :-**

ते विरोधी पक्ष नेत्यांनी ठरावावे.

**परशुराम पाटील :-**

मी आपल्याबरोबर आहे.  पण विरोधी पक्ष नेता असला म्हणून आपण वाटेल ते शब्द वापरावे हे योग्य नाही.

**दिनेश नलावडे :-**

महापौर मॅडम, हे शब्द मागे घ्यायला पाहिजेत.  हे शब्द अगोदर मागे घ्यायला सांगा.

**आसिफ शेख :-**

आदेश बघा.

**मोहन पाटील :-**

बी.जे.पी. पक्षाचे मत आहे लायकीचे नाहीत असे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी मांडलेल्या प्रस्तावाला मी अनुमोदन दिलेले आहे आणि काही सदस्यांनी या नळ जोडणीच्या संख्येबाबत या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण यांनी हे सांगितले की, निदान पाचशे कनेक्शन तरी अशी दाखवून द्या. चार हजार बाजूला राहू द्या. पाचशे वरुन ते दोनशेवर आले आणि नंतर ते स्वतः असेही बोलले की, काही थोडाफार झालेला असेल म्हणजे आम्ही बारा कोटी बोलतो तर त्यांच्या मते काही कोटी असण्याची शक्यता आहे. त्याबद्दल त्यांचे धन्यवाद की, त्यांचे थोडेसे मत त्याच्यावर पटलेले आहे. उर्वरीत संख्येवर काय कॉम्प्रोमाईज करायचे ते त्याने नंतर ठरवून सांगावे. कारण ते पाचशे वरुन दोनशेवर आले. आपल्याला सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो. नगरपालिकेने जेव्हा नळ जोडण्या नियमानुकुल करण्याचे ठरविले तेव्हा प्रिस्क्राइब फॉर्म छापले. २१७१ अर्ज वितरित करण्यांत आले. त्याच्यामधून फक्त १७१६ अर्ज नगरपालिकेकडे प्राप्त झाले. ४५५ अर्ज प्राप्त झालेले नाहीत. अशा बिल्डींगमध्ये आजही कनेक्शन आहेत. त्यांनी म्हटले दोनशे. सांगाल तर मी ४५५ लोकांची यादी या सभागृहामध्ये वाचून दाखवतो. ४५५ ची यादी माझ्याकडे आहे. तुम्हांला ती सादर करतो. दुसरी बाब आहे. आपण हे विसरता कामा नये की, हे शहर अनधिकृत नळ जोडणीकरिता नावाजलेले शहर होते. आपल्या शहराची फार ख्याती होती. मागच्या कारकीर्दीत आमच्या कारकीर्दीत नेहमी आम्हांला ठसा लागलेला की, या शहरामध्ये पाणी नाही त्याच्यावर अनधिकृत नळ कनक्शन जिल्हाधिकाऱ्यांनी पण तोडायची कारवाई केली होती. परत लागली तेव्हा सभागृहाने तत्कालीन माजी नगराध्यक्ष मेन्डोंसा साहेब त्यांच्या कारकीर्दीमध्ये हा ठराव केला. माझ्या कारकीर्दीमध्ये तो ठराव पुढे गेला. जिल्हाधिकाऱ्यांनी याला स्थगिती दिली. कोकण कमिशनरसुद्धा हे अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्याच्या विरोधात होते. परंतु केवळ त्यावेळी नगरपालिकेने अशी भुमिका घेतली की, आमचे १५ कोटी रुपये दंड आकारणी पोटी कारण ३५ हजार ही आम्ही ठरविलेली संख्या आहे. या सभागृहाने ठरविलेली आहे. १५ कोटी रुपये आम्हांला मिळतील असे जेव्हा आम्ही ठासून सांगितले तर ते रेकॉर्डवर घेतले आहे आणि मुख्यमंत्र्यांच्या तत्कालीन उपसचिव गंगराजी साहेबांनी गोषवारा दिलेला आहे. त्याची नोंद मी ह्यामध्ये दिलेली आहे. त्यांनी स्पष्ट त्यामध्ये म्हटले आहे की, सदर नळजोडण्या नियमित न केल्यास मिरा भाईंदर शहरासाठी नवीन पन्नास दशलक्ष लीटर वाढीव पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यावर सदर अनधिकृत नळ जोडणी धारक स्वतःहूनच या नळ जोडण्या बंद करतील व अधिकृत नळ जोडणीसाठी नगरपालिकेकडे अर्ज करतील. पर्यायाने नगरपालिकेस अनधिकृत नळ जोडणी नियमित केल्यामुळे मिळणारी दंडाची रक्कम रुपये १५ कोटी प्राप्त होणार नाही. असा गोषवारा मा. उपसचिव यांनी शासनाला दिल्यानंतर शासनाने हे आदेश काढले. मग आता आम्ही गंगराजी साहेबांची पण थट्टा करायची का की, त्यांना कुठले स्वप्न पडले होते.

**मा. आयुक्त :-**

मी उत्तर देतो. आपण या ठिकाणी फिगर दिलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

एक सदस्य जेव्हा आम्ही प्रस्ताव आणला उत्तर चुकीचे असू शकते असे त्यांचे म्हणणे ठिक आहे. त्यांनी एवढेच म्हटले की, ५०० कनेक्शन दाखवून द्या. ५०० नाही तर २०० द्या. आम्ही नुसती दाखविली नाहीत. याचा कॉमीन झोन शासनाने घेतलेला आहे आणि आपण असे म्हणायचे की, शासनाला अक्कल नव्हती. उपसचिव बिनडोक होता म्हणून तर तसे रेकॉर्ड करा की, उपसचिवांनी येऊन कधी पाहिले होते. ही एक आमच्यावर मेहेरबानी केली. समजा शासनाने आम्हांला अनधिकृतची अधिकृत करायला दिली. आज १०-१५ कोटी रुपये आम्हांला मिळाले. अजून काही मिळायचे ते मिळवा आणि कृपा करून ह्यामध्ये प्रामाणिकपणे जाऊ दे. उगाच त्यांनी आणखीन चिंध्या करायच्या आणि मी कापूस करायचा. या भूमिकेतील आम्ही लोक नाही आहेत आणि म्हणून साहेब मी आपल्याला सांगितले पण आहे की, याच्यामध्ये आमचे कोणावरसुद्धा वैयक्तिक कोणाच्यावरही आरोप नाही आहे. हे जे काही झाले आणि आताही काही घडते आहे ते केवळ आपण धोरण ठरवू शकत नाही. आज जर मी धोरण ठरविले नवीन कनेक्शन देण्याचे तर ते झाले नसते. आजही लोकांना पाणी पाहिजे. तुमच्या शहरात ७१ दशलक्ष लीटर पाणी येते. किती लोकांना तुम्ही पाणी देता असे विचारले तर? म्हणून तुम्ही नवीन नळ कनेक्शन दिली तर असे होणार नाही. हे पुढे थांबेल. तरी कुठच्या तरी ह्याला कंट्रोल येईल आणि म्हणून आम्ही जो ठराव मांडला आहे. त्याच्यामध्ये असे म्हटले आहे,

प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी यांचेसुद्धा नांवे समाविष्ट करुन घ्यावीत आणि या ठरावाला अनुमोदन झालेले आहे. हा ठराव यापुढे आपण सर्वकष चौकशी करावी, अशी मी आपणांस विनंती करतो.

**रिटा शहा :-**

साहेब, जरा महत्वाचे आहे. मोदी पटेलला द्वारकेश बिल्डींगमध्ये काहीतरी गॅस सिलेंडरचा प्रॉब्लेम झालेला आहे. मला फोन आला. मला ताबडतोब फायर ब्रिगेड पाठवायला सांगितले आहे.

**लिओ कोलासो :-**

मी मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, शशिकांत भोईर यांनी जो प्रस्ताव पाठविलेला आहे. या प्रस्तावावर सर्व बाजूंनी व्यापक दृष्टीने चर्चा झालेली आहे. पण याच्यामध्ये एक अशी त्रुटी दिसत आहे की, हे सगळे आमच्या आमच्यामध्येच चाललेले आहे. आम्ही सभासदच बोलतोय आणि याच्यात खरं तर प्रशासनाची काय भुमिका आहे. प्रशासनाची काय खरी माहिती आहे. याचीसुद्धा चिकित्सा या सभागृहामध्ये होणे आवश्यक आहे. सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी सांगितले की, सगळ्यांनाच कनेक्शन देऊन टाका. तर खरोखरच या शहरामध्ये सगळ्यांनाच मग तो कुठला पण असू दे. बेकायदेशीर घर बांधणारा असू दे, झोपडीत राहणारा असू दे आणि बिल्डींगमधील. नियमांचे उल्लंघन करुन पाणी देणे ही मुलभूत गरज आहे. या गरजेवर या सभागृहाला कधीतरी विचार करावा लागेल. म्हणून हा ठराव पारित करण्यापुर्वी किंवा ठरावावर मतदान घेण्यापुर्वी किंवा एखादी उपसुचना पुढे आणण्यापुर्वी मी प्रशासनाला मा. महापौरांच्या माध्यमातून विनंती करतो की, आपण या ठिकाणी किती फॉर्म दिले? किती वाटले? आले किती? रक्कमा किती जमा झाल्या? आले तर का आले नाहीत? आले नाहीत तर त्यांच्याकडची काय पोझीशन आहे? या सगळ्या गोष्टी आपण आम्हांला सांगायला पाहिजेत. तरच याबाबतीतमध्ये निश्चित स्वरुपाचे विचार व्यक्त करतांना आणि अंतिमरित्या ठराव करतांना किंवा उपसुचना मांडताना त्याचा वापर आम्हांला करता येईल. म्हणून आयुक्त साहेब आपण याच्यावर बोलायला पाहिजे अशी आपल्याला विनंती आहे.

**रिटा शहा :-**

महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते, अधिकृत आणि अनधिकृत कनेक्शन हा विषय मला निवडून आलेल्याला अकरा वर्ष झाली. ९३ ला कनेक्शन बंद झाले. कारण पाण्याचा अभाव होता. त्यानंतर पण सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब जेव्हा नगराध्यक्ष होते तेव्हाही मी मुद्दा उठविला होता. आता तर ठिक आहे. महानगरपालिका झाल्यानंतर आपण एक चांगली सिस्टीम काढली, फॉर्म काढले. फॉर्ममध्ये अमुक हे जोडा ते जोडा. कर आकारणी आहे की नाही. १९९४-९५ चा आता मुद्दा आलेला आहे. ते सर्व आपण रितसर जातो. कुठल्याही परिस्थितीने जेव्हा लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर आम्ही लोकांना बोलतो की, आम्ही निवडून आल्यानंतर आम्ही तुम्हांला पाणी देणार आणि पाणी द्यायचे आमचे कर्तव्य आहे. आम्ही जे तुमच्याकडे पुटअप केले आणि आपण आमची फाईल करुन दिली आणि आमच्या लोकांना कनेक्शन दिले. ते सर्व लिगली झालेले आहे. आता कुठलाही नगरसेवक बोलणार की, ते इलिगल झाले ते खोटे आहे. इलिगल खरे कुठे झाले, मी तुम्हांला सांगते. चोरी कुठे झाली ते तुम्हांला सांगतो. चोरी तेव्हा झाली जेव्हा ९३ ला कनेक्शन बंद झाले. ९३ ला कनेक्शन बंद झाले तेव्हा रात्री बेरात्री आपले मुख्य पाईप लाईन खोदून स्वतःची सर्व साधनसामुग्री रोड खोदायचे. सर्व इलेक्ट्रिक आणि रात्री बेरात्री खोदून चोरुन सर्व कनेक्शन घ्यायचे, एक पैसा न भरताना, फॉर्म पुटअप करताना ना फाईली पुटअप करताना, नाही कुठला शेरा आणि कुठला रिमार्कस् घेताना. ते खरे चोरीचे आणि अनधिकृत ते कनेक्शन आहेत. आता जे नगरसेवक आपण काढतो की, त्या अमुक अधिकाऱ्यांनी ते केले, तमुक अधिकाऱ्यांनी ते लिहिले, अमुक अधिकाऱ्याने ते जोडले. मी स्वतः तुमच्याकडे एक आणून दिले होते. कारण पण मी एक नगरसेविकेच्या नात्याने असे मान्य करते की, कुठलेही त्या माणसाने केले असेल पण त्या बिल्डींगला कनेक्शन दिले. ९४-९५ चा कायदा महाराष्ट्र शासनाने आपल्यावर लादलेला आहे. त्या हिशोबाने काही लोकांनी कनेक्शन पाहिजे, बिल्डींग लिगल झाले की इलिगल झाले, त्याच्यामध्ये राहणारी लोक इलिगल नाहीत. ती पण माणसंच आहेत. इलिगल बांधले कोणी? आम्ही आणि तुम्ही मिळून इलिगल बांधले. अधिकाऱ्यांनी बांधले आणि लोकप्रतिनिधींनी डोळे बंद केले की, लोकप्रतिनिधींनी बांधले आणि अधिकाऱ्यांनी डोळे बंद केले असे नाही आहे. आपल्या समन्वयाने या मिरा भाईंदर शहरामध्ये जे काही घडले आहे त्याच्यामध्ये आम्ही पण कुठेतरी गप्प राहिलो. कुठेतरी आपण पण गप्प राहिलो. खरी चोरी ९३ नंतर झाली ४३ नंबरच्या रजिस्टरमध्ये. ४३ नंबरचे रजिस्टर जेव्हा सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील नगराध्यक्ष होते तेव्हा पण मी

हा प्रश्न विचारला होता. तेव्हा चीफ आफिसर म्हणून नाईक साहेब होते. मला ४२ साठी जवाब मिळाला होता. सॉरी ४३ नंबर नाही ४२ चे रजिस्टर. तेव्हा नाईक साहेबांनी मला उत्तर दिले होते की, नगरपालिकेमध्ये ते रजिस्टर चोरीला गेलेले आहे. ते सापडतच नाही. ही दुःखाची गोष्ट आहे. अशा मोठ्या-मोठ्या जेव्हा चोऱ्या झाल्या, हजारोंच्या संख्येने ते कनेक्शन झाले तेव्हा आम्हीपण इथे मौजूद होतो. काही ग्रामपंचायतीच्या काळातील अधिकारी पण हजर आहेत. ते पण होते आणि आम्हीपण होतो. चोऱ्या झाल्या आणि झाल्या नाही. आपले नुकसान झाले. त्या सर्व गोष्टी मान्य आहेत. काही झाले ते सर्वांच्या नजरेसमोर आहे. महत्वाची गोष्ट अशी आहे की, चोऱ्या कशाला होतात. पाणी ही जीवनावश्यक वस्तु आहे. महाराष्ट्र शासनाने ९४/९५ चा मुद्दा आपल्यासमोर ठेवलेला आहे. त्या मुद्याला कशा पद्धतीने रद्दबादल करुन मिरा भाईंदरमध्ये लिगल किंवा इलिगल जिथे माणसं राहतात तिथे पाणी कनेक्शन कसे द्यायचे? त्याबद्दल आपण विचार करायला पाहिजे आणि तसा बदलचा ठराव अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी मिळून करुन तसा ठराव सभागृहामध्ये आणायला पाहिजे. असा ठराव करुन त्याला अनुमोदन देऊन हा मुद्दा शेवटी सुटेल असे मला वाटते.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. महापौर महोदया आणि सर्व सन्मा. सदस्य या ठिकाणी सन्मा. सदस्य शशिकांतजी भोईर यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे आणि या प्रस्तावामध्ये जे वेगवेगळे आयटम्स त्यांनी दिलेले आहेत. त्याचे एक साधारणपणे दोन-तीन भाग मी करतो. पहिला जो याचा भाग आहे तो म्हणजे कोट्यावधी रुपयाचे जे नगरपालिकेचे नुकसान झालेले आहे ते अधिकाऱ्यांनी व्यवस्थित अनधिकृत नळ कनेक्शन नियमित करण्याच्या संदर्भामध्ये कारवाई केली नसल्यामुळे झालेले आहे. या संदर्भामध्ये मी आपल्या निदर्शनास काही गोष्टी आणू इच्छितो. शासन निर्णय १६ ऑगस्ट २००१ नुसार या महानगरपालिकेमध्ये अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करण्याच्या संदर्भामध्ये शासनाने निर्णय घेतला. त्याच्या अगोदरची सर्व पार्श्वभूमी आपल्याला सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब आणि अगोदरच्या वक्त्यांनी सांगितलेली आहे. त्यामुळे मी ती पुन्हा रिपीट करीत नाही की, आपलाच ठराव जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द केला. आयुक्तही त्याच्या फेवरमध्ये नव्हते. परंतु शासनाने मानवतेच्या दृष्टीकोनातून आणि या शहराची विशिष्ट अशी पाण्याची परिस्थिती लक्षात घेतली. या ठिकाणी प्रचंड मोठे जन आंदोलन झाले. या सगळ्या गोष्टींचा विचार करुन थोडेसे लिबरल धोरण स्विकारुन शासनाने हा १६ ऑगस्टचा जी.आर. पारित केला आणि त्याच्यामध्ये साधारण जे उत्पन्न मिळेल असे गृहित धरलेले होते. ते जे गृहितकावर आधारित होते त्याच्यामध्ये चार हजार कनेक्शन अनधिकृत आहेत. अशा प्रकारचे ते निवेदन होते. १५ कोटी रपये उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा होती. आपल्याही ठरावामध्ये तशा प्रकारचा उल्लेख आहे. त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. तो ठरावच आहे. मात्र कागदोपत्री तपासणी केली असतांना मला असे आढळले की, प्रशासन त्याच्याशी सहमत नव्हते. कागदोपत्रावरुन सांगतो, मी त्यावेळी नव्हतो. तत्कालीन मुख्याधिकाऱ्यानी जे रिपोर्ट पाठविले आहेत त्याच्यामध्ये अंदाजे अडीच हजार नळ कनेक्शन अनधिकृत असण्याची शक्यता आहे. अशा प्रकारचे पत्र शासनाला ऑफिशिअली पाठविलेले आहे. त्याच्यामध्ये चार हजारची फिगर नव्हती. एखाद्या वेळेला अशीच सभागृहामध्ये चर्चा झाली असेल आणि सर्व सदस्यांनी एकत्रितरित्या एक फिगर कदाचित सांगितली असेल किंवा अडीच हजार नाही तीन हजार, तीन हजार नाही चार हजार आणि मग गव्हर्नमेंटने याबाबतीत सहानुभूतीने बघावे या दृष्टीकोनातूनसुद्धा आकडा बघून आपण सांगितले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तो काही गुन्हा नाही, तो अंदाज होता. कारण त्यावेळी ॲक्युरेट काही सर्व्हे झालेला नव्हता. त्या शासन निर्णयामध्ये असा उल्लेख होता की, दोन महिन्याच्या आत सर्व नागरिकांनी संबंधित फॉर्म भरुन त्याची जी फिज आहे, एक इंच कनेक्शन असेल तर पस्तीस हजार, अर्धा इंच कनेक्शन असेल तर पंधरा हजार रुपये फि भरुन आणि तीन वर्षाची पाणीपट्टी अशी सगळी एकत्रित रक्कम दिल्यानंतर त्याचे अनधिकृत कनेक्शन हे नियमित करण्याची तरतुद त्या जी.आर.प्रमाणे होती. त्याला रिस्पॉन्स म्हणून २१९८ अर्जाची खरेदी झालेली आहे. आतापर्यंतच्या सगळ्याच फिगर्स मी सांगतो आहे. १९४१ अर्ज हे प्रतिज्ञापत्रासह आपण एक नागरिकांचे ॲफिडेव्हीट घेतो की, माझी इमारत ९५ च्या अगोदरची आहे. त्याच्यामध्ये जो फॉरमॅट आहे त्यानुसार आणि त्यामध्ये १६३० ही दंडात्मक तरतुदीनुसार नियमित झालेली प्रकरणे आहेत. बाकीचे कदाचित चौकशीच्या वेळी योग्य सापडली नसतील म्हणून रिजेक्ट झाली असतील. एक बेसीक प्रश्न जो माझ्या अगोदर ही अनेक सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केला. खास करुन चौहाण साहेबांचा उल्लेख मी करीन. इतरही काही सदस्यांनी हा उल्लेख केला की, चार

हजारांच्या हिशोबाने जर पंधरा कोटी रुपये मिळणार असते तर त्याचे स्वागत करायला कोणाला काही हरकत असण्याचे काही कारण नव्हते. मग हा दोन महिन्याचा अर्ज देण्याचा जो कालावधी होता या कालावधीमध्ये इतक्याच नागरिकांनी का अर्ज करावा. हा एक मुद्दा थोडा तपासण्यासारखा आहे. आपण कुठल्याही नागरिकाला अर्ज करायला प्रतिबंध केलेला नव्हता. आपण त्या त्या संबंधित प्रभागाचे सर्व सन्मा. सदस्य आपण ही कदाचित त्याच्यामध्ये फार उत्साहाने, हिरीरीने भाग घेऊन आपल्या प्रभागातील नागरिकांना न्याय मिळावा, कुठलेही अनधिकृत कनेक्शन नियमित व्हायचे राहू नये अशी दक्षता घेतली असणारच आहे. मग इतके सर्व असतांना वृत्तपत्रामध्ये तशा प्रकारची जाहिरात दिली होती की, नागरिकांनी दोन महिन्यामध्ये आपले अनधिकृत कनेक्शन नियमित करुन घ्यावे. इतका सगळा प्रचार झाला असतांना देखील आपल्याकडे प्रत्यक्षात जे अर्ज प्राप्त झालेले आहेत ते आता मी जो आकडा वाचून दाखविला तेवढे आहेत आणि त्यानुसार जी रक्कम मिळालेली आहे ती रक्कम मी आपल्याला सांगतो की, साधारणतः नऊ कोटींच्या आसपास प्राप्त झालेली आहे. चार हजारच्या हिशोबाने असते तर कदाचित आपण पंधरा कोटी पण क्रॉस केला असता. परंतु, चार हजार अर्ज आलेली नाहीत ही वस्तुस्थिती आहे आणि याच्यासाठी कुठल्या अधिकाऱ्याला जबाबदार धरायचे आणि का धरायचे? हा माझ्यापुढे एक प्रश्न आहे. त्यानंतर अशी एक परिस्थिती निर्माण झाली की, याची मुदत दोन महिन्याची संपली. दोन महिन्यांची मुदत संपल्यानंतर आमच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, साहेब शासन निर्णयाची मुदत संपलेली आहे आणि आता जे प्रलंबित अर्ज आहेत, या प्रलंबित अर्जावर आपल्याला कुठल्याही प्रकारचा निर्णय घेता येणे शक्य नाही. काही सन्मा. सदस्यांनी सांगितले की, जे या मुदतीत अर्ज करणार नाहीत त्यांचे कनेक्शन तोडून टाकावेत आणि आणि तशा प्रकारची कारवाई प्रशासनाने करावी असे अपेक्षित होते. ती कारवाई झाली नाही. खरे म्हणजे योग्य हेच होते की, त्यांनी केलेले जे अर्ज होते त्या अर्जामध्ये जी नियमितता, अनियमितता तपासून द्यायचे होते ते दिले होते. परंतु, तरीदेखील काही नागरिक कदाचित बाहेरगावी असतील किंवा अन्य काही अडचणीमुळे त्या मुदतीत आपल्याला अर्ज करु शकले नव्हते. अशा नागरिकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून एक मंत्री महोदयांच्या बरोबरही अशी चर्चा झाली. कारण बरेचसे नगरसेवकही माझ्याकडे यायचे की, साहेब जुने म्हणजे ९५ च्या अगोदरचे त्यांच्याकडे रेशनकार्ड आहे, लाईट बिल आहे, टेलिफोन बिल आहे. परंतु, अर्ज करायच्या वेळेला त्यांनी अर्ज केलेला नव्हता आणि म्हणून त्या संबंधितांना पाण्याचे कनेक्शन मिळू शकत नाही. तर आम्ही मंत्री महोदयांच्या कानावर ही गोष्ट घातली. सन्मा. सदस्य दिनेश नलावडे देखील बरोबर होते आणि नगर विकासच्या सचिवांशीही चर्चा केली. तर नगरविकासच्या सचिवांशीही हे मत झाले की, दोन महिन्याची मुदत या कामासाठी द्यायची काय आवश्यकता नव्हती. कारण शेवटी मेरिट बघूनच याच्यामध्ये मधूनच निर्णय घ्यायचा होता. ९५ च्या अगोदरच्या अनधिकृत कनेक्शनना रेग्युलराइज करायचा निर्णय घेतल्यानंतर तो दोनच महिन्यात घ्यायला पाहिजे असे काही कालबंधन मर्यादा घालण्याची आवश्यकता नव्हती आणि म्हणून शासनाने ७ मे २००३ पुन्हा एक निर्णय घेतला की, या १६ ऑगस्ट २००१ ची कालमर्यादा घातली होती, ती उठविण्यात येत आहे. सन्मा. सदस्यांना ही संधी पुढे मिळणार व पुर्ण त्याची पब्लीसिटी झालेली आहे. अशा प्रकारचे बंधन उठलेले आहे. अजूनही लोक अर्ज करु शकतात. त्यानंतरही मला मिळालेल्या रेकॉर्डनुसार ही १५१ लोकांनी अर्ज केलेले आहेत आणि त्या अर्जामध्ये ८५ लोकांना दिलेले आहेत. बाकीच्यांची तपासणी चालू आहे. ही जर परिस्थिती असेल आता कालमर्यादा देखील बंधन नाही. आज अशी परिस्थिती आहे की, ९५ च्या अगोदरच्या कुणीही या ठिकाणचा नागरिक त्याला जर आपले अनधिकृत कनेक्शन अधिकृत करुन घ्यायचे असेल तर तो आजही अर्ज करु शकतो आणि त्याला मेरीटवर त्याची केस डिसाईड होऊ शकते. असे असतांना हा रिस्पॉन्स कमी का मिळावा हे एक मला न उलगडलेले कोडे आहे. आपण याच्यामध्ये आम्हांला मदत करावी. सर्व सन्मा. सदस्यांना या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, अजूनही आपल्या वॉर्डामध्ये जर ९५ च्या अगोदरचे काही अनधिकृत कनेक्शन धारक असतील तर त्याला शासनाने मान्यता दिलेली आहे. आपण आपल्या वॉर्डामध्ये बैठका घ्या, आढावा घ्या आणि जर अशी काही व्यक्ती असतील तर त्यांना आमच्याकडे अर्ज करायला सांगा. त्याचा आम्ही विचार करु. त्यामुळे हा जो १२ कोटीचा लॉस झालेला आहे. कोट्यावधी रुपयांचा लॉस झालेला आहे. हे जे सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी आपल्या निवेदनामध्ये म्हटलेले आहे त्याच्याशी मी सहमत नाही. त्याची कारणे ही मी दिलेली आहे. दुसरा जो मुद्दा होता तो काही बिलामध्ये खाडाखोड केलेली आहे. ७५ हजाराचे बिल लिहिलेले आहे. पुन्हा खोडून ५३ हजार, ५५

हजार असे काही केल्याचे मी देखील एक-दोन-तीन केसेस पाहिल्या. या सभागृहापासूनही मला काही लपवून ठेवायचे नाही. जी तीन वर्षाची पाणीपट्टीची रक्कम आहे. ती रक्कम अगोदर वेगळी लिहिलेली होती आणि परत खोडून पुन्हा वेगळी लिहिलेली आहे. दोन-तीन प्रकरण मी पाहिली. जास्त वेळ मी त्यासाठी देऊ शकलो नाही. कारण पुन्हा आपल्याला त्याची सविस्तर चौकशी नक्कीच करायची आहे. कदाचित त्याचे कारण असे असू शकते की, कमर्शिअलचे जे पाण्याचे दर आहेत. तीन वर्षाच्या वापराचे ते दुप्पट होते आणि जर कदाचित असे लक्षात आले असेल की, ते रेसिडेन्शीअल आहेत. कारण कमर्शिअल आपण ऑथोराइज करतच नाही. त्यामुळे कमर्शिअलचा मुद्दाच नाही. जर तसे झाले असेल आणि जर ती एक घोडचूक मध्ये झालेली चुक असेल तर ते तसे झालेले आहे की, जाणूनबुजून केलेले आहे हे चौकशीशिवाय आपल्याला कळणार नाही. नाईक साहेबांकडे अशीही काही प्रकरणे मी दिलेली आहेत की, काही सन्मा. सदस्यांनी तक्रारी केलेल्या आहेत. सन्मा. सदस्य दिनेश नलावडेही त्याच्यामध्ये आहेत की, १९९५ नंतरच्या इमारतींना ९५ च्या अगोदरच पाणी पुरवठा केला गेलेला आहे. आता हा मुद्दा अतिशय विस्तृत आहे. कदाचित अनेक वॉर्डामध्ये असे झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. मी आपल्याला विनंती करीन की, आपल्या माहितीमध्ये जर अशी काही उदाहरणे असतील तर आपण त्याची नक्कीच सखोल चौकशी करु अणि मग त्याच्यामध्ये काय निर्णय घ्यायचा हा पण एक भाग राहील. म्हणजे संबंधितांचे पाणी कट करायचे की चालू करायचे? आणि मग संबंधित अधिकारी तसा का वागला? याचीदेखील वेगळी चौकशी आपल्याला करता येणे शक्य आहे. तिसरा जो मुद्दा होता तो जलवाहिन्यांच्य बाबतीतील होता की, जलवाहिन्या ६६ किलोमीटरच्या जवळपास ज्या भागासाठी मंजुर झालेल्या होत्या त्या भागात न टाकता दुसऱ्या भागामध्ये टाकल्या गेल्या. अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित झालेला होता. हाही मुद्दा एक तांत्रिक स्वरुपाचा आहे. तत्कालीन जो ठराव होतो तो ठराव मी काढून पाहिन आणि प्रत्यक्षात ठराव कुठल्या भागासाठी झाला होता आणि कार्यवाही कुठल्या भागासाठी झाली याचादेखील तपास करुन आपल्याला त्याच्यामध्ये निर्णय घेता येणे शक्य आहे. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनीदेखील बरेचसे मुद्दे या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. १९४ बिल्डींगची नांवे त्यांनी दिलेली होती आणि त्या बिल्डींगला अनधिकृत कनेक्शन लागलेले आहे ते कसे लागले, काय झाले? याची चौकशी करावी अशी त्यांची मागणी होती. त्या मागणीनुसार मी माझ्या अधिकाऱ्यांना सर्व्हेचे आदेश दिले होते. बराचसा सर्व्हे आटोपता आलेला आहे. कदाचित या आठवड्यामध्ये तुमचा रिपोर्ट मला प्राप्त होईल. आपल्याकडे असेल तर तो तुम्ही नंतर सांगा जी काही परिस्थिती आहे ती परिस्थिती सभागृहापुढे नक्की आणली जाईल. याच्यामध्ये कुठल्याही प्रकारची लपवून ठेवण्याचा भाग नाही. प्रशासन पारदर्शी असायला पाहिजे आणि ते नक्की आहे. याच्यामध्ये आपल्या सगळ्यांचे सहकार्य आम्हांला मिळावे. काही सदस्यांनी अर्ज करुनही त्यांना उत्तर दिली जात नाहीत. हे जरी खरे असले तरी त्या मागची जी कारणे आहेत ती सकाळपासून संध्याकाळपर्यंत एक तर मेन्टेनन्सच्या पाठीमागे लागायचे किंवा मग ऑफीसमध्ये एवढी व्यस्तता असते की, या प्रश्नाकडे लक्ष द्यायला खरोखरच वेळ मिळत नाही. ही वस्तुस्थिती आहे. तरीदेखील या संदर्भामध्ये आम्ही नियोजन करु आणि लवकरात लवकर आपण जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याची मी नोंद करुन घेतलेली आहे. त्याच्यामध्ये मी स्वतः माझ्या यंत्रणेमार्फत चौकशी करीन आणि जर अधिकारी दोषी आढळले तर त्याच्यावर कार्यवाही देखील माझ्या स्तरावर मी करेन किंवा जर धोरणात्मक निर्णयासाठी जर प्रस्तुत करायचे असेल तर तेही आपल्यापुढे प्रस्तुत केले जाईल. सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी जे सांगितले की, कार्यवाही करण्यासाठी म्हणून अशा ठरावाची गरज पडत नाही. ती एक प्रशासकीय बाब आहे आणि चौकशीनंतर अधिकारी दोषी आढळत असतील तर त्यांच्या विरुद्ध नक्की चौकशी केली जाईल. तर या गोष्टीचा विचार करुन मला वाटते हा खुलासा आपण मान्य करावा आणि जो निर्णय सभागृहाला घ्यायचा असेल तो घ्यावा.

**दिनेश नलावडे :-**

आयुक्त साहेब, मी थोडासा खुलासा मागितलेला होता. आपण ९४ च्या नंतर आजपर्यंतच्या ज्या बिल्डींग आहेत त्यांना कनेक्शन देण्यासाठी आपण नियोजन काय करणार आहोत? याचा जरा थोडासा आम्हांला खुलासा पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

हा मुद्दा थोडा महत्वाचा आहे. हा थोडासा खुलासा राहून गेला होता की, शासनाने अपवादात्मक बाब म्हणून या शहरासाठी नळजोडण्या अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्याची

परवानगी आपल्याला २००१ च्या जी.आर.प्रमाणे दिलेली आहे. परंतु एक शासनाचा असा एक कॉमन जी.आर. आहे की, अतिक्रमणे जास्त वाढू नयेत. या दृष्टीने तो जी.आर. शासनाने पारित केलेला आहे. त्याच्यामध्ये असे म्हटले आहे की, ९५ नंतरचे जे अनधिकृत धारक असतील त्यांना कुठल्याही प्रकारची सोयी-सवलती मग ते पाणी असो किंवा विद्युत कनेक्शनसाठी एन.ओ.सी. देण्याचा प्रश्न असो. हे ९५ नंतरच्या बांधकामांना देऊ नये. आता हा जी.आर. २००१ चा आहे. त्याच्यामध्ये त्या जी.आर.चा कुठेही उल्लेख नाही आहे आणि एक अपवादात्मक बाब असा त्याच्यामध्ये उल्लेख आहे. या गोष्टीचा परत शासनाकडे संदर्भ करुन जर शासनाने ९५च्या जी.आर.मधून आपल्याला सुट दिली तर मग नक्की कुठल्या तारखेपर्यंतचे अनधिकृत कनेक्शन्स रेग्युलराइज करायचे आहेत हा एक मुद्दा येईल. तर अशी जर शासनाने आपल्याला सुट दिली तर त्यावेळी मी सभागृहापुढे पुन्हा हा मुद्दा मांडेन. पण दरम्यान आपण ज्या भावना या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. त्या शासनाला नक्की आमच्यामार्फत कळविल्या जातील.

**आसिफ पटेल :-**

महापौरांच्या परवानगीने बोलत आहे. महासभा दि. १९/१२/२००३, प्रकरण क्र. ६०, विषय सन्मा. गटनेते श्री. शशिकांत भोईर यांनी दिनांक १३/१०/२००३ च्या पत्राने दिलेला प्रस्ताव अनधिकृत जल जोडण्या प्रकरणी दंड आकारुन अधिकृत करणे व त्यांची वसुली संबंधितांनी न केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत. महासभा दिनांक १७/१०/२००३ रोजीचे प्रकरण क्र. ४८ सन्मा. गटनेते शशिकांत भोईर यांनी अनधिकृत जलजोडणी प्रकरणी दंड आकारुन अधिकृत करणे व त्याची वसुली संबंधितांनी न केल्यामुळे महापालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे व त्यासाठी संबंधितांवर कारवाई करावी असे प्रस्तावाद्वारे व्यक्त केलेले आहे. सदर प्रस्तावावर आजच्या महासभेत जी चर्चा झाली तसेच संबंधित प्रश्नकर्ता, प्रस्तावक व इतर सन्मा. सदस्य यांनी उपस्थित केलेले मुद्दे व त्यावर पाणीपुरवठा खाते तथा मा. आयुक्त साहेब यांनी दिलेली उत्तरे पाहता अनधिकृत जलजोडण्या नियमित करण्यासाठी महापालिकेने एकूण उत्पन्न महापालिकेसाठी वसुल करुन घेतले आहे. तसेच खात्याने सादर केलेली सांख्यिकी माहिती बरोबर आहे. असेही या सभागृहाचे मत झाले आहे. म्हणून सन्मा. गटनेते शशिकांत भाईर यांनी त्यांच्या प्रस्तावात व्यक्त केलेले सर्व मुद्दे हे अपुऱ्या माहितीवर आधारित तसेच अतिरंजित स्वरुपाचे आहेत. असे या सभागृहाचे मत झाले आहे. त्यामुळे त्यांच्या प्रस्तावाशी ही सभा सहमत नाही. तथापि, या प्रकरणी काही चुका झाल्या असल्यास मा. आयुक्त पातळीवर त्याचा तपास करुन काही रकमा वसुल जन्य असल्यास त्या वसुल करण्यात याव्यात असे निर्देश सभा मा. आयुक्त यांना देत आहेत. तसेच सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी बेकायदेशीर जलजोडण्या यादी किंवा ज्यामध्ये काही गैरव्यवहार झाला आहे अशी यादी आयुक्तांकडे सादर करावी तसेच या शहरात प्रस्ताव करणाऱ्यांच्या मताप्रमाणे जर नव्याने अनधिकृत जलजोडण्या होत असतील तर त्या पाण्यासारख्या मुलभूत गोष्टीसाठी नागरिक चुका करित आहेत असे या सभेस वाटते करिता संपूर्ण शहरातील लोकांचा मुलभूत हक्क सन्मानित करणेच्या दृष्टीने यापुढे असे सर्व बेकायदेशीर जलजोडण्या नियमित कराव्या व बेकायदेशीर इमारतीस लावलेल्या जलजोडण्या जेव्हा अशा इमारती पाडून टाकण्यात येतील तेव्हा त्यांनी दिलेल्या जलजोडण्या तोडून टाकण्यात याव्यात. बेकायदेशीर जलजोडण्या महापालिकेत होणारे नुकसान टाळण्यात यावे आणि आजही जे बेकायदेशीर जलजोडण्या करित आहेत. प्रशासनही त्याच्यामध्ये जर सहभागी असेल किंवा नगरसेवकही सहभागी असतील तर आयुक्तांकडे माझी विनंती आहे सभागृहाचीही विनंती आहे की, आपण चौकशी करुन संबंधितावर कठोर कारवाई कराल अशी मी सभागृहातर्फे अपेक्षा बाळगतो. धन्यवाद

**हॅरल बोर्जीस :-**

उपसुचना मांडली त्याला मी अनुमोदन देतो.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम मी जे सेक्शन ७६ सांगितले आहे त्यामध्ये पूर्णपणे शास्तीच्या नियमामध्ये जे जे तुम्ही म्हणता हे सगळे येते वाटल्यास ५६ पूर्णपणे वाचून दाखववे. सचिवांनी सगळ्या सदस्यांचा जो भ्रमनिरास झाला आहे ती सत्यता बाहेर येईल. त्याच्यामध्ये ज्याच्यावर तुम्ही आरोप ठेवलेले आहेत त्याच्या सर्व रेमिडिज त्यामध्ये उपलब्ध आहेत. आम्ही असे म्हणत नाही की, ५६ नुसार घरी पाठवा. पण ५६ नुसार निरनिराळे कायदे आहेत. या इकडच्या सभागृहाचा जो आम्ही पहिला ठराव पास केलेला आहे हा ठराव मताला टाकावा अशी माझी इच्छा आहे. असे मी मत मांडतो. पहिला ठराव

मताला टाकावा अशी आमच्या चार नगरसेवकांची मागणी आहे. चारपेक्षा जास्त सदस्यांनी मतदानाची मागणी केलेली आहे हे रेकॉर्ड करावे. ठराव मतदानाला घ्यावा. नगरपालिकेच्या आर्थिक फायद्याच्या दृष्टीकोनातील ठराव आहे. कारण सन्मा. सदस्य आसिफ पटेल यांच्या वक्तव्यामध्ये सभागृहाला हे मंजूर नाही असे त्यांनी वक्तव्य केलेले आहे. म्हणून हा ठराव आम्ही मताला टाकायला लावतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी आता जी काही माहिती दिली आता ती माहिती आपल्याला प्रशासनाने नक्कीच दिली असेल. पण आपण सांगितले की किती अर्ज नेले? आपण किती अर्ज अनधिकृत नळ कनेक्शन देण्यासाठी लोकांना दिले. आपल्याकडून २१९८ लोकांनी अर्ज नेले आणि १६३० लोकांनी फक्त भरून दिले म्हणजे इथेच ५०० चा फरक पडलेला आहे आणि दुसरी गोष्ट आम्ही जेंव्हा नवीन नळ कनेक्शन दयायला सुरुवात केल्यानंतर लोक कशाला अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करायला येतील? म्हणून उर्वरित लोक आले नाहीत मला वाटते काही सदस्यांना भीती का वाटते? सदस्यांवर आम्ही यामध्ये कुठे संशय व्यक्त केला नाही. त्यामुळे सदस्यांना अशी भिती का वाटावी चौकशी व्हावी तुम्ही चौकशी अधिकारी तुमच्या नियंत्रणेखाली व्हावी आमचा तुमच्यावर विश्वास आहे सदस्यांना अशी भिती का वाटायला लागली? की असे झालेले नसावे आम्ही म्हटले एवढया कोटीचे नुकसान झाले याला आकडेवारी आहे. २१९८ अर्ज तुम्ही नेले आणि १६३० अर्ज जमा केले ५०० अर्ज तर तिथेच आहेत ते आलेले नाहीत शांती पार्कचे सुध्दा बघा ना किती गंमतीशीर आहे शांतीपार्कच्या बाबतीत आम्ही कोर्टात निवेदन केले आहे या लोकांना म्हणे असे कनेक्शन लावायची सवयच आहे. आणि एकीकडे आम्ही बोलतो की अशी इललिगल कनेक्शन लावलेलीच नाहीत याच्यावरुन जर आमचा ठराव मान्य नसेल तर मतदानाला टाकावा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी सभागृहात जो ठराव मांडलेला आहे विषय आणला ठराव मांडला त्याच्यावर बरीचशी चर्चा झाली मी तीन गोष्टींवर आपल्या सगळयांचे लक्ष वेधू इच्छितो. आयुक्तांवर सगळयांनी विश्वास व्यक्त करण्यासारखी परिस्थिती आहे. अविश्वास व्यक्त करण्याचे काही कारण नाही. आयुक्त सक्षम आहेत असेही पुन्हा पुन्हा म्हणण्याची काही गरज नाही. पण एक सभागृहाच्या कामकाजाच्या निमित्तीने जसे हे अनधिकृत कनेक्शन अजूनही अर्ज करू शकता हा ७ मे २००३ रोजी आलेला म्हणजे या शहराशी अत्यंत निगडीत असलेला आदेश ही एखादी कोणाची चिठ्ठी आली नव्हती. कोणी नगरसेवकाने दिलेली सुचना नव्हती किंवा आपल्या पाणी खात्याचा खालच्या अधिकाऱ्याने दिलेली ती सुचना नव्हती. हा शासनाचा आलेला आदेश या सभागृहाच्या कोणत्याही पटलावर आणलेला नाही आयुक्त साहेब बोलले मी कित्येकांना सांगितले ते कोणाला सांगितले ते त्यांना माहिती पण आमच्यासारख्यांना माहितीच पडले नाही तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासकीय कामकाजातील अत्यंत महत्वाचे येणारे आदेश या सभागृहासमोर यायला पाहिजेत किंवा ते तसे पोहचवायचे आदेश त्यांच्या प्रतीसहीत व्हायला पाहिजेत ही एक बाब आहे आता मघाशी सांगितले तर अधिकाऱ्यांची हिम्मत वाढते याचा आपल्यालाही संशय का आला नाही? याचे आम्हाला दुःख होते कारण मी त्यातील आहे. मी भारतीय जनता पार्टीच्या भूमिकेतून ९३ पासून स्पष्ट भूमिका मांडत आलेलो आहे आणि ९० नंतर ज्या ज्यावेळी अनधिकृत कनेक्शनचे फॉर्म मागितले त्यावेळी आम्ही पुन्हा पुन्हा अर्ज केलेले आहेत. विनंती केलेली आहे की, त्यांच्या अर्जाची यादी मिळावी संख्या मिळावी आम्हाला मुख्याधिकाऱ्यांनी दिलेली नाही कलेक्टरतर्फेसुध्दा मिळाली नाही नगरविकास सचिवांकडे सुध्दा मी स्पष्ट बैठक घेऊन सांगितले की, यादी मिळूच शकत नाही हे तिवारी साहेबांना सांगितले होते ती यादी यासाठी मिळाली नाही की, ज्याच्यामुळे महापालिकेचे आज नुकसान झाले हा एक बिझनेस नाही याच्यामध्ये कोण कोण आहे ते तुम्ही शोधा. आजही विश्वास आहे तुम्ही मनावर घेत नाहीत म्हणून हे असे होते. हे ज्यावेळी सन्मा.सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी हा विषय दिला होता की, जर तुम्ही या गोष्टीचे जर मनावर घेतले तर आजही या सभागृहात तुम्ही ठणकावून उत्तर देऊ शकले असते की, इतकी कनेक्शन मी कापलेली आहेत. इतक्या कनेक्शनचे अर्ज आलेले होते. ज्यांना ७६ हजाराची डिमांड नोटीस दिली होती. अधिकाऱ्यांच्या संगनमताने ती ५३ हजार किंवा ४३ हजार रूपये केली असे तुम्हीच सांगता माझ्यासमोर आणले मग ते प्रकरण आणले होते त्याचे सँपल म्हणून तुम्ही तीन उदाहरणे काढली असती या सभागृहाला आणखी बरे वाटले असते. हे एकमेकांकडे बघतात बघायची पाळी आली नसती कोणी ह्यांनी दिली. त्याला सवय, ह्याला सवय, इथे सवय कोणालाच

नाही आहे.  सवयी पाडून घ्यायची सवय आहे.  जसे म्हणतात की, पोटाला दारू बरी आणि पिऊन निघाल्यावर सांगायचे की, दारूडया आहे.  तशातील हे या महापालिकेमध्ये कामकाजामध्ये चालले आहे या महापालिकेतील कोणतेही नगरसेवक महापालिकेतून पैसे मिळेल म्हणून पोट भरणारा कोणीही नाही आहे.  पण उगाच त्याच्यामागे अशी पाटी लावली जाते.  त्यांनी तेवढी कनेक्शन काढली आणि त्याच्यातून जे निघतात ते सूत्र कोण शोधत नाही.  मी आपणास विनंती करतो की, ज्या पध्दतीने ही बाजू मांडलेली आहे ही जी यादी आहे आपल्याकडे त्या यादीतील एक अभियान चालवतो.  जसे त्यावेळी नाईक साहेबांनी अभियान चालविले होते.  त्यांनी सगळ्या वॉर्ड ऑफीसर्सना सुचना केली होती की, तुमच्याकडे किती अनधिकृत कनेक्शन्स आहेत ती शोधून आणा.  ह्यांना पहिल्यांदा उत्तर दिले होते. आमच्याकडे काही नाही.  दोन आहेत तीन आहेत पुन्हा सांगितले की, मी पुन्हा चेक करीन त्याचे किती एक दोन तीन नाही, १५, २० पटीने ती कनेक्शन वाढत गेली.  त्याच पध्दतीने आता तुमच्याकडे जर मिळाले की, ज्यांचे आधी जी कनेक्शन होती ती किती?  आम्हाला काही बोलण्याचे कारण नाही.  हा प्रशासनाचा भाग आहे की, ज्यांचे कनेक्शन कलेक्ट केलेले आहे त्यांच्या नोंदी आहेत.  डिपार्टमेंटची चौकशी करा.  आपण फक्त एक आग्रह करतो की, सफाईचे अभियान चालविले, पल्स पोलिओचे अभियान चालवितो, साक्षरतेचे अभियान चालवितो, पाणी खात्यातील जो अंतर्गत भ्रष्टाचार आहे मग त्याच्यात माझ्यासारखा कोण असेल तर तुम्हाला जसे योग्य वाटेल ते या शिक्षेस पात्र या सभागृहात येऊ दे.  कोण किती तास सभागृहात कनेक्शन काढायला बसतो वगैरे सगळी माहिती पडेल पण उगाच एखादा चांगल्या कामासाठी आला असेल तर त्याला ते पालुपद लावायचे.  हे सगळे कनेक्शनसाठी येतात आणि हा बिझनेस चालतो आणि आता अधिकाऱ्यांची जी उत्तरे आहेत मी सांगतो की, ज्यांनी आता महापालिकेने अनधिकृत बिल्डिंग तोडल्या त्यांनाही कनेक्शन दिली, त्याचेही पत्र तुमच्याकडे दिले होते.  तुम्ही मनावर घेतले नाही आणि तुम्ही मनावर घेतले नाही याचा परिणाम आर्थिकदृष्ट्या किती नुकसान झाले?  जशी आकडयाची मोड आहे.  साहेब चार हजार आकडा नाही आहे.  तुम्हाला आता कोणीतरी खालून सांगितले असेल चार हजार आकड्यांसाठी आलाच नव्हता.  चार हजार आकडा पकडून बारा कोटी केलेले नाही.  तो आकडा २१७७ किंवा १८९ असाच होता आणि त्यांच्यातीलच फिगर केली होती.  पण तो आकडा पूर्ण का येत नाही की, ज्याच्यामुळे ज्यांनी अनधिकृत म्हणून अर्ज केले होते ते संबंधितांनी सांगितले की, ते दाबून ठेवा आता ते परत दाखवू नका आणि नविन कनेक्शनचे ७६ हजार कोटी आणि २८ हजार कोटीचे केले आहे.  एक कनेक्शन फक्त लागले गेले की, हे अनधिकृत आधीचे आहे, बेकायदेशीर लावलेले आहे तर त्याला ७८ की ७१ हजार रुपये भरायला लागत होते आणि त्याच बिल्डिंगला जर नवा अर्ज केला आणि सांगितले मागचे सगळे वॉक आऊट केले तर ते २८ किंवा ३२ हजारामध्ये होते आणि या सिस्टिमने जी कामे झाली असतील जर तुम्हाला सांगता येईल की, जी अशी नविन कनेक्शन लागली तर त्या सोसायटीमध्ये तुम्ही विचारा की, त्याचे पाण्याचे बिल कोणते होते?  त्यांचे कोणतेही टँकर येत नव्हते, पाणी पित होते, सर्व काही होते आणि आता तो नवा अर्ज आला.  हा एक बिझनेस चालला.  ज्याच्यामुळे महापालिकेचे अत्यंत मोठे नुकसान झालेले आहे.  एका व्यक्तीवर कोणावर दोष देण्यासारखा विषय नाही हे रॅकेटने काम केलेले आहे आणि त्याच्यामध्ये अधिकाऱ्यांचे मोठे संगनमत आहे असे आमचे स्पष्ट मत आहे

**लिओ कोलासो:-**

मा. महापौर साहेब मुळ ठराव सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आणि सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी मांडलेला आहे त्याचा प्रस्ताव.

**रोहिदास पाटील :-**

आम्हाला बोलायला बंद केले आहे की, कसे काय केले?

**लिओ कोलासो :-**

ठराव झालेला आहे ठराव मांडलेला आहे आणि त्याच्यावर उपसुचना मांडलेली आहे.  आता प्रक्रियेला सुरुवात करायला पाहिजे.  ठराव मांडलेला आहे.  त्याच्यावर सुचक झाले, अनुमोदन झाले. त्यामुळे आता पुढची प्रक्रिया व्हायला पाहिजे.  तुम्ही बोलत रहाल तर याला एन्डच राहणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

याच्यावर माझी अशी विनंती आहे की, यामध्ये जसे पाणी खात्यातील हा एक भ्रष्टाचार म्हणा किंवा अनागोंदी कारभार म्हणा किंवा अत्यंत हलगर्जीपणा की, ज्याला बेपर्वाई म्हणजे जसे अन्य सर्व नगरसेवकांनी सांगितले की पाणी खात्यातून ही ही उत्तरे मिळाली आहेत.  म्हणजे उत्तर देते वेळीसुध्दा

त्याला गांभिर्य वाटत नाही की, ह्या एक विषयाचा हा ह्या सभागृहापुढे विषय येणार आहे. तरी त्यावर कारवाई करुन उत्तर द्यावे असेही त्यांना वाटले नाही. हा जो निर्भिडपणा आहे, हा निर्भिडपणा हा सभागृहाच्या किंवा ह्या महानगरपालिकेच्या हिताचा नाही. तरी त्याच्यावर नक्की कुठेतरी ब्रेक लागला पाहिजे आणि उगाच कोणाही काही सांगितले की, अधिकाऱ्यांवर कारवाई करा असे आम्ही मताचे नाही. पण त्याचे सुत्र कुठे आहे आणि त्याला औषध काय आहे, उपाय काय. जसे आता मघाशी सांगितलेली १९९५ नंतरच्या बिल्डिंगवर वेळेवर शासनाचा आदेश जर तसा असेल तर त्याचे तुम्ही उल्लंघन करणार का? की माणूसकीच्या दृष्टीने तुम्ही आयुक्त म्हणून सांगणार हे स्पष्ट व्हायला पाहिजे की, त्यांना पाणी हवे होते. म्हणून त्याना कनेक्शन दिलेले आहे आणि ते आता दिलेले कनेक्शन जरी अनधिकृत असतील तर त्यांचे अठ्ठावीस हजार रुपये की, एकाहत्तर हजार रुपये ह्या सगळया गोष्टीचा तुम्हाला मुद्देसुद अभ्यास करुन घ्यावा लागेल. या ठिकाणी ज्या ज्या ठिकाणी तुम्हाला आमची मदत हवी असेल तुम्हाला योग्य वाटली तर आम्ही मदत करु. आम्ही सांगू की, आमचे हे मत मांडायचे आहे आणि जसे मघाशी म्हटले की, चौकशी करतेवेळी चौकशीच करायची असेल तर ती गटनेत्यांच्या बैठकीची वगैरे चौकशी नाही. ज्यांना पाणीखात्याच्या कामाचा अनुभव आहे किंवा आवड आहे अशांची समिती नेमा. त्याच्यात सर्व पक्षाचा समावेश असावा. एक दोघांचा नाही.

**प्र. सचिव :-**

प्रकरण ६० करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक शशिकांत भोईर, अनुमोदक प्रफुल्ल पाटील आणि दुसऱ्या ठरावाची सुचना आलेली आहे सुचक आसिफ पटेल, अनुमोदक हॅरल बोर्जीस. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांच्या मतदानाची चार सदस्यांनी मागणी केली आहे. आपण प्रथम सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांचा ठराव मतास टाकायचा आहे. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आणि सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील याच्या ठरावाच्या बाजूने जे सदस्य असतील त्यांनी कृपया उभे रहावे.

**जयंत पाटील :-**

या गोष्टीवर ठराव मांडण्याची काय गरज आहे का? ठरावाचा काही प्रश्नच येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव पास होऊन जाऊ दे. मग बघू मागणी केलेली आहे आपण उभे आहात. कृपया सभागृहाचे दरवाजे बंद करावे. मतदान चालू आहे आत बाहेर चालणार नाही. सचिवांनी घोषणा केल्यानंतर दरवाजे बंद करायचे असतात. सभाशास्त्राचा नियम आहे मी सुचना देत नाही.

**प्र. सचिव :-**

ठरावाच्या बाजूने असलेल्या सदस्यांची नावे वाचून दाखवितो. संगिता विजय म्हात्रे, मिलन म्हात्रे, तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर, म्हात्रे नयना गजानन, अग्रवाल धनराज नंदलाल, अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी, करंबळे प्रियंका प्रकाश, सिंग मदन उदितनारायण, पाटील रोहिदास शंकर, भुदेका शिवप्रसाद प्रल्हादराय, भोईर गजानन लक्ष्मण, पाटील लिला गुरूनाथ, पाटील प्रफुल्ल काशीनाथ, नरावत भवरी कुवर चेनसिंह, रतन कृष्णा पाटील, पाटील शरद केशव, गोयंका सुधा लक्ष्मीकांत, भोईर शशिकांत जगन्नाथ, अनंत पाटील, शुभांगी नाईक, जेम्स कोलासो, जोजफ घोन्सालवीस, डॉ. जैन. ठरावाच्या बाजूने तेवीस आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यामध्ये टेक्नीकल असा मुददा उपस्थित होणार आहे की, सदस्यांनी भाषणामध्ये सांगितले आहे की, जे समर्थन आहे असे सांगितले म्हणून उभे करा. त्यांचे समर्थन आहे की, नाही ते कळू दे. आमच्या भाषणानंतर त्यांनी सांगितले या प्रस्तावाला आमचे समर्थन आहे. सन्मा. सदस्या रिटा शाह बोलल्या, सन्मा. सदस्य महेंद्रसिंह चौहान बोलले, हे सगळे बोलले आहेत. ते आमच्या बाजूने येणार आहेत. ते जरी उभे राहिले नाही तरी आमच्या बाजूने आहेत.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापैार साहेब मतदानाची यांनी मागणी केली. मतदानाची मागणी केल्यानंतर त्यांच्या मताप्रमाणे उभे राहिले. बाकी सर्व बसलेले विरोधक आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांच्या प्रत्येक संभाषणाची इतिवृत्तांतामध्ये नोंद झालेली आहे.

**मोहन पाटील :-**

याची रूलिंग महापौरांनी द्यायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जे नगरसेवक बोलले ते नगरसेवक कुठे पकडले जातील. हे महापौरांनी रुलिंग द्यावे.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी आता जे सांगितले की, सन्मा. सदस्या रिटा शाह आणि इतर सभासदांनी त्या गोष्टीचे पूर्ण समर्थन केले होते. परंतु आयुक्त साहेबांनी जी आम्हाला योग्य माहिती दिली आणि त्या माहितीने मी प्रभावित झालो आणि आमचे मत परिवर्तन झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण आयुक्तांनी आम्ही केलेल्या आरोपांचे खंडन केलेले नाही. आयुक्तांनी हे सांगितले नाही की, मी दिलेली लिस्ट चुकीची आहे.

**रोहिदास पाटील :-**

नियमानुसार ठरावाच्या बाजूने जेवढे उभे राहिले, ठरावाच्या विरोधात किती तेही उभे राहून त्यांची नांवे घेतली पाहिजे.

**मा. महापौर :-**

उभे रहायची काही गरज नाही. तुम्हाला कळते किती आहे किती नाही?

**रोहिदास पाटील :-**

हे उभे राहिल्यानंतर त्यांना समर्थन कोणाला द्याल व विरोधी कोण आहेत ते द्यायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

जी मतदानाची पध्दती आहे ती आहे उभे रहायला सांगायचे. काही लोक तटस्थ राहत असतील.

**मा. महापौर :-**

सगळ्यामध्ये तुम्ही जिद्द करता असे पाहिजे, तसे पाहिजे एकतरी शांतपणे करा. तुम्ही सगळे हे पाहिजे ते पाहिजे असे करता. तुम्हाला सांगितले हात वर करा. आता उभे राहायला सांगता नंतर बसायला सांगता.

**मिलन म्हात्रे :-**

एका मतदानाला तुम्ही आम्हाला उभे राहायला सांगितले तेही तुमचे रुलिंग होते. दुसऱ्या मतदानाला तुम्ही हात वर करायला सांगता. ते रुलिंग लागू शकत नाही. बाजूने आणि नंतर त्याच्या विरोधात आणि फेव्हरमध्ये तुम्ही उभे राहायला सांगायचे. तुम्ही आम्हाला उभे राहायला सांगितले. आम्ही उभे राहिलो. आम्ही रुलिंग पाळलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

या सभागृहात त्याची नोंद तुम्हाला तटस्थ घ्यावी लागेल.

**दिनेश नलावडे :-**

ठरावाच्या विरोधात महापौर मॅडमचे नाव आलेले आहे. मॅडम ठरावाच्या विरोधात आहेत.

**मा. महापौर :-**

ठरावाची तुम्ही नावे वाचा नंतर सभा संपवा.

**प्र. सचिव :-**

मायरा मेन्डोंसा, पाटील चिंतामण कमलाकर, डिसोझा ज्युडी थॉमस, आसिफ गुलाब शेख, ठाकुर नितीन गोपीनाथ, गोहिल शानु, पाटिल प्रभात प्रकाश, डी डी नलावडे , हंसुकुमार पांडे, सुनिता कैलाश पाटील, जयंत महादेव पाटील, ज्योत्स्ना जालींदर हसनाळे उर्फ पुजा प्रताप शिंदे, जिवी हिरा वाडे, अनिता जयवंत पाटील, गावंड हरेश लक्ष्मण, पटेल आसिफ गुलाब, सुरेखा यशवंत गायकवाड, चंद्रकांत भिकालाल मोदी, शफिक अहमद खान, उमा विश्वनाथ सपार, मेन्डोसा स्टीवन जॉन, रोहिदास आत्माराम पाटील, कुरेशी याकुब इस्माईल, कोलासो लिओ इजिदोर, अल्मेडा जेन्वी युस्टस, भामरे उर्मिला कोमल, जैन गीता भरत, शाह रिटा सुभाष, चौहान महेन्द्रसिंह, पाटील मोहन मधुकर, सौ. रांजणकर मुक्ता प्रविण, परशुराम दामोदर पाटील, नरेंद्र मेहता, तुळशीदास दत्तु म्हात्रे, पाटील मिलन गोविन्द.

**मिलन म्हात्रे :-**

महापौर मॅडम, आयुक्त साहेब आपली सभाशास्त्राची जी नियमावली रजिस्टर केलेली आहे त्यानुंसार तुम्हाला या ठरावाचे वाचन करुन जो ठराव तुम्ही मंजूर केला तो कायम करावा लागणार आहे. तुमच्या नियमावलीमध्ये ती तरतुद आहे तो कायम करा आणि त्यांच्या सत्यप्रती आम्हाला हव्या आहेत. आता दुसऱ्याचेसुध्दा वाचन झाले पाहिजे. कारण तुमच्या नियमावलीमध्ये तशी तरतुद आहे.

**प्र. सचिव :-**

ठरावाचे वाचन करुन दाखवतो. सन्मा. गटनेते शशिकांत भोईर यांनी दि. १३/१०/०३ रोजी पत्राने दिलेला प्रस्ताव - सन्मा. गटनेते श्री. शशीकांत ज. भोईर यांनी अनधिकृत जलजोडण्या प्रकरणी दंड आकारुन अधिकृत करणे व त्याची वसुली संबंधितांनी न केल्यामुळे महापालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे व त्यासाठी संबंधितांवर कारवाई करावी असे प्रस्तावाद्वारे व्यक्त केले आहे. सदर प्रस्तावावर आजच्या महासभेतही चर्चा झाली. तसेच संबंधित प्रश्नासाठी प्रश्नकर्ते, प्रस्तावक व इतर सन्मा. सदस्य यानीं उपस्थित केलेले मुद्दे व त्यावर पाणीपुरवठा खाते तथा मा. आयुक्त साहेब यांनी दिलेली उत्तरे पाहता अनधिकृत जलजोडण्या नियमित करण्यासाठी महापालिकेने एकूण रुपये उत्पन्न महापालिकेसाठी वसुल करुन घेतले आहे. तसेच खात्याने सादर केलेली सांख्यिकी माहिती बरोबर आहे असेही या सभागृहाचे मत झाले. म्हणून सन्मा. गटनेते श्री. शशिकांत ज. भोईर यांनी त्यांच्या प्रस्तावात व्यक्त केलेले सर्व मुद्दे अपुऱ्या माहितीवर आधारित तसेच अतिरंजित स्वरुपाचे आहेत असे या सभागृहाचे मत झाले आहे. त्यामुळे त्यांच्या प्रस्तावाशी ही सभा सहमत नाही. तथापि या प्रकरणी काही चुका झाल्या असल्यास मा. आयुक्त पातळीवर त्यांच्या चुका तपासून काही रकमा वसुली करणे असल्यास त्या वसुल कराव्यात असे निर्देश ही सभा मा. आयुक्त यांना देत आहे. तसेच सदस्य शशिकांत भोईर यांनी बेकायदेशीर जलजोडण्या यादी यामध्ये किंवा ज्यामध्ये काही गैरव्यवहार झाला आहे अशी यादी आयुक्तांकडे सादर करावी. तसेच या शहरात प्रस्ताव करणाऱ्यांच्या मताप्रमाणे जर नव्याने अनधिकृत जलजोडण्या होत असतील तर त्या पाण्यासारख्या मुलभूत गोष्टीसाठी नागरिक चुका करित आहेत असे या सभेस वाटते. करिता संपूर्ण शहरातील लोकांच्या मूलभूत हक्क सन्मानित करणाऱ्या दृष्टीने यापुढे अशा सर्व बेकायदेशीर इमारतीस लावलेल्या जलजोडण्या नियमित कराव्या व बेकायदेशीर इमारतीस लावलेल्या जलजोडण्या जेव्हा अशा इमारती पाडून टाकण्यात येतील. तेंव्हा त्यांनी दिलेल्या जलजोडण्या तोडून टाकण्यांत याव्यात. बेकायदेशीर जलजोडण्याकामी महापालिकेचे होणारे नुकसान टाळण्यात यावे. सुचक असिफ पटेल, अनुमोदन हॅरल जॉर्ज बोर्जीस

**मिलन म्हात्रे :-**

आपण जो ठराव फेटाळलेला आहे त्याचे आम्ही वाचन करायला सांगितले हा तुम्ही दुसरा वाचला दोन ठराव ठेवले गेले. जो पहिला ठराव आहे त्याचे वाचन करा. तो ठराव इकडे नामंजूर करण्यात आला असे घोषित करा आणि त्याची आम्हाला कॉपी पाहिजे. तुमच्या सभासदांच्या नियमावलीनुसार बोलतोय.

**प्र. सचिव :-**

प्रकरण ६० करिता सन्मा. सदस्य शशिकांत भोईर व सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांचा आलेला ठराव तो वाचन करतो. तत्कालिन नगरपालिका ठराव क्र. १९८ अन्वये दंडापोटी एक इंची नळजोडणीस ३५ हजार व अर्धा इंची नळजोडणीस रु. २५ हजार प्रमाणे व तीन वर्ष सरासरी आकारण्यास सदर नळजोडण्या अधिकृत करण्यास मंजुरी दिली होती. सदर नळ जोडण्या नियमानुकुल करताना रु. १५ कोटींचे उत्पन्न तत्कालिन नगरपरिषदेने गृहीत धरले होते. सदर नळजोडण्या नियमित न केल्यास मिरा भाईंदर शहरासाठी नवीन ५० दशलक्ष वाढीव पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यास सदर अनधिकृत नळजोडणीधारक स्वतःहूनच या नळ जोडण्या बंद करतील व अधिकृत नळजोडणीसाठी नगरपालिकेकडे अर्ज करतील. पर्यायाने नगरपालिकेस अनधिकृत नळजोडणी नियमित केल्यामुळे मिळणारी दंडाची रक्कम रु. १५ कोटी प्राप्त होणार नाही. असा गोषवारा मा. उपसचिव यांनी दिल्यानंतर महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एम.यु.बी. ७०००/१८४१/प्र.क्र.९३/२००० नवी वि, दिनांक १६/८/२००१ नुसार अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर निर्णयातील प्रस्तावनेत अनधिकृत नळजोडणी नियमित करण्यासाठी उत्पन्नात रु. १५ कोटींची अपेक्षित वाढ विचारात घेऊन शासनाने एक अपवादात्मक बाब म्हणून सदर निर्णय घेतला आहे. सन १९९३ पासून नगरपरिषद क्षेत्रामध्ये नवीन नळजोडणी देण्याचे बंद केले आहे. त्यानंतर आजतागायत नळ

जोडण्या केल्या जात आहेत.  नगरपालिकेने नळजोडण्या नियमानुकुल करण्यासाठी मोहिम हाती घेतली असता २१७१ अर्ज अनधिकृत नळजोडणीधारकांना वितरित करण्यात आले.  त्यापैकी ४५५ अर्ज  दंड बिल आकारणीसाठी अर्जदाराकडून भरण्यात आले नाहीत.  नगरपालिकेने वेळोवेळी केलेल्या सर्व्हेनुसार एकूण ४००० नळ जोडण्या अनधिकृत गृहीत धरल्या होत्या परंतु प्रत्यक्षात १७१६ अर्ज प्राप्त झाले. याचा अर्थ उर्वरित २२८४ धारकांनी अर्ज नळ जोडण्या नियमानुकुल करण्यासाठी अर्ज केलेले नाहीत त्यामुळे रु. ८.०० कोटी दंडाच्या रक्कमेवरील रुपये ४.५७ कोटी पाणी वापराच्या सरासरी बिलापोटी असे एकूण १२.५७ कोटी रूपयाचे आर्थिक नुकसान झाले आहे.  ज्या २१७१ धारकांनी नळजोडणी नियमित करण्याचे अर्ज नेले आहेत त्यापैकी ४५५ अर्ज पुन्हा महानगरपालिकेकडे प्राप्त झाले नाहीत. त्यावर दंड आकारणी व सरासरी बील आकारणी करावयाची आहे.  महानगरपालिकेने नवीन नळजोडण्या देण्याची स्थायी समिती ठराव क्र. ९३ दि. १८/०१/२००३ व ठराव क्र. ५२ दि. २८/०५/२००३ अन्वये मंजुरी दिल्याने दि. १२/१०/२००३ पर्यंत सुमारे १३७०८ नवीन कनेक्शन मिळण्यासाठी नागरिकांना नमुने अर्ज वितरीत केले आहेत.  त्यामुळे २२८४ अनधिकृत नळजोडणी धारकांनी नवीन नळजोडणी मंजुरीकरिता अर्ज केलेले असल्याने एकूण रु. १२.५७ कोटी नुकसान होणार आहे.  त्यामुळे नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन नळ जोडणी चोरीने घेणाऱ्या समाजकंटकांने रु. १२.५७ कोटींचे दंड आकारणीपोटी व पाणी बील आकारणी पोटी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे.  अशा अनधिकृत नळजोडणी धारकांना शासनाच्या आदेशानुसार कायदेशीर कार्यवाहीस पात्र धरणे आवश्यक आहे.  मीरारोड येथील काही अनधिकृत नळजोडणी धारकांना प्रत्येक जोडणीमागे दंड आकारणी व सरासरी बीलापोटी रु. ७५,०००/- इतक्या रक्कमेची बिले मनपाने पाठविली ती नंतर मनपाच्या अधिकाऱ्यांनी लाच घेऊन सदर बिलाची आकारणी कमी करुन त्याच जावक क्रमांकाने नवीन बिल दिली आहेत.  ५० द.ल.लि. पाणी पुरवठा योजने अंतर्गत प्रस्तावित केलेल्या ५४ कि.मी. अंतर्गत जलवाहिनी व्यतिरिक्त सदर योजनेत समाविष्ट न केलेल्या परंतु नव्याने वसलेल्या इमारतींना आणि पुर्वी वगळण्यांत आलेल्या इमारतींना पाणी पुरवठा व्हावा या दृष्टीकोनातून तत्कालीन नगरपरिषदेने आराखडे तयार करुन अतिरिक्त ६६.६ कि.मी. वितरण व्यवस्थेसाठी जलवाहिन्या टाकण्यांस मंजुरी दिली होती.  परंतु सदर ६६.६ कि.मी. वितरण व्यवस्थे व्यतिरिक्त अनेक ठिकाणी अधिकाऱ्यांच्या संगनमताने नकाशात अंतर्भुत नसलेल्या रहिवाशी संकुलांना अनधिकृतरित्या जलवाहिन्या टाकण्यांत आल्या.  वरील बाबींचा विचार करता अनधिकृत नळ जोडण्या दंड आकारणी करुन नियमानुकूल न करणे, दंड आकारणीच्या रकमांमध्ये फेरबदल करणे व समाविष्ट नसलेल्या भागामध्ये वितरण व्यवस्थेतील अनधिकृत जलवाहिन्या टाकणे तसेच शासनाच्या आदेशाची पायमल्ली करुन नवीन नळजोडणीसाठी कोणतेही कायदेशीर निकष न ठरविता किंवा नवीन नळजोडणीसाठी उपविधी / नियम तयार न करता नवीन नळ जोडण्या देणे यामध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे.  वरील कामांसाठी वेळोवेळी तयार करण्यांत आलेल्या नोंदवह्या मनपाच्या दफ्तरातून गहाळ झालेल्या आहेत.  व तसे वृत्तपत्रातही छापून आलेले आहे.  वरील सर्व बाबींची सर्वकष चौकशी सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत करण्यांत येऊन संबंधितावर प्रतिनियुक्त अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यांत यावी असा ठराव मांडत आहे.  सुचक शशिकांत भोईर, अनुमोदन प्रफुल्ल पाटील.  सदरचा ठराव मतदानाने फेटाळण्यांत आलेला आहे.

**प्रकरण क्र. ६० :-**

सन्माननिय गटनेते श्री. शशीकांत ज. भोईर यांनी दिनांक १३/१०/०३ चे पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

(अ)  अनधिकृत जलजोडण्या प्रकरणे दंड आकारुन अधिकृत करणे व त्याची वसुली संबंधितांनी न केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत - मा. महासभा दि. १७/१०/०३ रोजीचे प्रकरण क्र. ४८.

**ठराव :-**

तत्कालिन नगरपालिका ठराव क्र. १९८ अन्वये दंडापोटी एक इंची नळजोडणीस ३५ हजार व अर्धा इंची नळजोडणीस रु. २५ हजार प्रमाणे व तीन वर्ष सरासरी आकारण्यास सदर नळजोडण्या अधिकृत करण्यास मंजुरी दिली होती.  सदर नळ जोडण्या नियमानुकुल करताना रु. १५ कोटींचे उत्पन्न तत्कालिन नगरपरिषदेने गृहीत धरले होते.  सदर नळजोडण्या नियमित न केल्यास मिरा भाईंदर शहरासाठी नवीन ५० दशलक्ष वाढीव पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यास सदर अनधिकृत नळजोडणीधारक स्वतःहूनच या नळ जोडण्या बंद करतील व अधिकृत नळजोडणीसाठी नगरपालिकेकडे

अर्ज करतील. पर्यायाने नगरपालिकेस अनधिकृत नळजोडणी नियमित केल्यामुळे मिळणारी दंडाची रक्कम रु. १५ कोटी प्राप्त होणार नाही. असा गोषवारा मा. उपसचिव यांनी दिल्यानंतर महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एम.यु.बी. ७०००/१८४१/प्र.क्र.९३/२००० नवी वि, दिनांक १६/८/२००१ नुसार अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर निर्णयातील प्रस्तावनेत अनधिकृत नळजोडणी नियमित करण्यासाठी उत्पन्नात रु. १५ कोटींची अपेक्षित वाढ विचारात घेऊन शासनाने एक अपवादात्मक बाब म्हणून सदर निर्णय घेतला आहे. सन १९९३ पासून नगरपरिषद क्षेत्रामध्ये नवीन नळजोडणी देण्याचे बंद केले आहे. त्यानंतर आजतागायत नळ जोडण्या केल्या जात आहेत. नगरपालिकेने नळजोडण्या नियमानुकुल करण्यासाठी मोहिम हाती घेतली असता २१७१ अर्ज अनधिकृत नळजोडणीधारकांना वितरित करण्यात आले. त्यापैकी ४५५ अर्ज दंड बिल आकारणीसाठी अर्जदाराकडूंन भरण्यात आले नाहीत. नगरपालिकेने वेळोवेळी केलेल्या सर्व्हेनुसार एकूण ४००० नळ जोडण्या अनधिकृत गृहीत धरल्या होत्या परंतु प्रत्यक्षात १७१६ अर्ज प्राप्त झाले. याचा अर्थ उर्वरित २२८४ धारकांनी अर्ज नळ जोडण्या नियमानुकुल करण्यासाठी अर्ज केलेले नाहीत त्यामुळे रु. ८.०० कोटी दंडाच्या रक्कमेवरील रुपये ४.५७ कोटी पाणी वापराच्या सरासरी बिलापोटी असे एकूण १२.५७ कोटी रूपयाचे आर्थिक नुकसान झाले आहे. ज्या २१७१ धारकांनी नळजोडणी नियमित करण्याचे अर्ज नेले आहेत त्यापैकी ४५५ अर्ज पुन्हा महानगरपालिकेकडे प्राप्त झाले नाहीत. त्यावर दंड आकारणी व सरासरी बील आकारणी करावयाची आहे. महानगरपालिकेने नवीन नळजोडण्या देण्याची स्थायी समिती ठराव क्र. ९३ दि. १८/०१/२००३ व ठराव क्र. ५२ दि. २८/०५/२००३ अन्वये मंजुरी दिल्याने दि. १२/१०/२००३ पर्यंत सुमारे १३७०८ नवीन कनेक्शन मिळण्यासाठी नागरिकांना नमुने अर्ज वितरीत केले आहेत. त्यामुळे २२८४ अनधिकृत नळजोडणी धारकांनी नवीन नळजोडणी मंजुरीकरिता अर्ज केलेले असल्याने एकूण रु. १२.५७ कोटी नुकसान होणार आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन नळ जोडणी चोरीने घेणाऱ्या समाजकंटकांने रु. १२.५७ कोटींचे दंड आकारणीपोटी व पाणी बील आकारणी पोटी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे. अशा अनधिकृत नळजोडणी धारकांना शासनाच्या आदेशानुसार कायदेशीर कार्यवाहीस पात्र धरणे आवश्यक आहे. मीरारोड येथील काही अनधिकृत नळजोडणी धारकांना प्रत्येक जोडणीमागे दंड आकारणी व सरासरी बीलापोटी रु. ७५,०००/- इतक्या रक्कमेची बिले मनपाने पाठविली ती नंतर मनपाच्या अधिकाऱ्यांनी लाच घेऊन सदर बिलाची आकारणी कमी करुन त्याच जावक क्रमांकाने नवीन बिल दिली आहेत. ५० द.ल.लि. पाणी पुरवठा योजने अंतर्गत प्रस्तावित केलेल्या ५४ कि.मी. अंतर्गत जलवाहिनी व्यतिरिक्त सदर योजनेत समाविष्ट न केलेल्या परंतु नव्याने वसलेल्या इमारतींना आणि पुर्वी वगळण्यांत आलेल्या इमारतींना पाणी पुरवठा व्हावा या दृष्टीकोनातून तत्कालीन नगरपरिषदेने आराखडे तयार करुन अतिरिक्त ६६.६ कि.मी. वितरण व्यवस्थेसाठी जलवाहिन्या टाकण्यांस मंजुरी दिली होती. परंतु सदर ६६.६ कि.मी. वितरण व्यवस्थे व्यतिरिक्त अनेक ठिकाणी अधिकाऱ्यांच्या संगनमताने नकाशात अंतर्भुत नसलेल्या रहिवाशी संकुलांना अनधिकृतरित्या जलवाहिन्या टाकण्यांत आल्या. वरील बाबींचा विचार करता अनधिकृत नळ जोडण्या दंड आकारणी करुन नियमानुकूल न करणे, दंड आकारणीच्या रकमांमध्ये फेरबदल करणे व समाविष्ट नसलेल्या भागामध्ये वितरण व्यवस्थेतील अनधिकृत जलवाहिन्या टाकणे तसेच शासनाच्या आदेशाची पायमल्ली करुन नवीन नळजोडणीसाठी कोणतेही कायदेशीर निकष न ठरविता किंवा नवीन नळजोडणीसाठी उपविधी / नियम तयार न करता नवीन नळ जोडण्या देणे यामध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे. वरील कामांसाठी वेळोवेळी तयार करण्यांत आलेल्या नोंदवह्या मनपाच्या दफ्तरातून गहाळ झालेल्या आहेत. व तसे वृत्तपत्रातही छापून आलेले आहे. वरील सर्व बाबींची सर्वकष चौकशी सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत करण्यांत येऊन संबंधितावर प्रतिनियुक्त अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यांत यावी असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. प्रफुल्ल पाटील.**

**ठराव मतदानाने फेटाळला (नामंजुर)**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य :-**

१) संगिता विजय म्हात्रे
२) मिलन म्हात्रे
३) तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
४) म्हात्रे नयना गजानन
५) अग्रवाल धनराज नंदलाल
६) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर
७) करंबेळे प्रियांका प्रकाश
८) सिंग मदन उदितनारायण
९) पाटील रोहिदास शंकर
१०) भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
११) भोईर गजानन लक्ष्मण
१२) पाटील लिला गुरुनाथ
१३) पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१४) नरावत भवरीकुंवर चेनसिंह
१५) रतन कृष्णा पाटील
१६) पाटील शरद केशव
१७) गोयंका सुधा लक्ष्मण
१८) भोईर शशिकांत जगन्नाथ
१९) अनंत पाटील
२०) शुभांगी नाईक
२१) जेम्स कोलासो
२२) जोजफ घोन्सालवीस
२३) डॉ. रमेश जैन

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य :-**

१) मायरा मेन्डोंसा
२) हॅरल जॉर्ज बोर्जीस
३) पाटील चिंतामण कमलाकर
४) डिसोझा ज्युडी थॉमस
५) आसिफ गुलाब शेख
६) ठाकुर नितीन गोपीनाथ
७) गोहिल शानु
८) पाटिल प्रभात प्रकाश
९) डी डी नलावडे
१०) हंसुकुमार पांडे
११) सुनिता कैलाश पाटील
१२) जयंत महादेव पाटील
१३) ज्योत्स्ना जालींदर हसनाळे
उर्फ
पुजा प्रताप शिंदे
१४) जिवी हिरा वाडे
१५) अनिता जयवंत पाटील
१६) गावंड हरेश लक्ष्मण
१७) पटेल आसिफ गुलाब
१८) सुरेखा यशवंत गायकवाड
१९) चंद्रकांत भिकालाल मोदी

२०) शफिक अहमद खान
२१) उमा विश्वनाथ सपार
२२) मेन्डोसा स्टीवन जॉन
२३) रोहिदास आत्माराम पाटील
२४) कुरेशी याकुब इस्माईल
२५) कोलासो लिओ इजिदोर
२६) अल्मेडा जेन्वी युस्टस
२७) भामरे उर्मिला कोमल
२८) जैन गीता भरत
२९) शाह रिटा सुभाष
३०) चौहान महेन्द्रसिंह
३१) पाटील मोहन मधुकर
३२) सौ. रांजणकर मुक्ता प्रविण
३३) परशुराम दामोदर पाटील
३४) नरेंद्र मेहता
३५) तुळशीदास दत्तु म्हात्रे
३६) पाटील मिलन गोविन्द

**मिलन म्हात्रे :-**

उपसुचना मांडली नाही मी उपसुचना मांडायला लावली आहे. उपसुचना त्याच्याबरोबर मांडा. आमची उपसुचना फेटाळली आहे त्याचे वाचन करा.

**मा. महापौर :-**

मुळ ठराव फेटाळण्यात आला असून उपसुचना बहुमताने मंजुर झाला आहे. सभा संपली.

**प्रकरण क्र. ६० :-**

सन्माननिय गटनेते श्री. शशीकांत ज. भोईर यांनी दिनांक १३/१०/०३ चे पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.

(अ) अनधिकृत जलजोडण्या प्रकरणे दंड आकारुन अधिकृत करणे व त्याची वसुली संबंधितांनी न केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत - मा. महासभा दि. १७/१०/०३ रोजीचे प्रकरण क्र. ४८.

**ठराव क्र. ४८ :-**

सन्माननिय गटनेते श्री. शशीकांत ज. भोईर यांनी अनधिकृत जलजोडण्या प्रकरणी दंड आकारुन अधिकृत करणे व त्याची वसुली संबंधितांनी न केल्यामुळे महापालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे व त्यासाठी संबंधितांवर कारवाई करावी असे प्रस्तावाद्वारे व्यक्त केले आहे. सदर प्रस्तावावर आजच्या महासभेतही चर्चा झाली. तसेच संबंधित प्रश्नासाठी प्रश्नकर्ते, प्रस्तावक व इतर सन्मा. सदस्य यानी उपस्थित केलेले मुद्दे व त्यावर पाणीपुरवठा खाते तथा मा. आयुक्त साहेब यांनी दिलेली उत्तरे पाहता अनधिकृत जलजोडण्या नियमित करण्यासाठी महापालिकेने एकूण रुपये उत्पन्न महापालिकेसाठी वसुल करुन घेतले आहे. तसेच खात्याने सादर केलेली सांख्यिकी माहिती बरोबर आहे असेही या सभागृहाचे मत झाले. म्हणून सन्मा. गटनेते श्री. शशिकांत ज. भोईर यांनी त्यांच्या प्रस्तावात व्यक्त केलेले सर्व मुद्दे अपुऱ्या माहितीवर आधारित तसेच अतिरंजित स्वरुपाचे आहेत असे या सभागृहाचे मत झाले आहे. त्यामुळे त्यांच्या प्रस्तावाशी ही सभा सहमत नाही. तथापि या प्रकरणी काही चुका झाल्या असल्यास मा. आयुक्त पातळीवर त्यांच्या चुका तपासून काही रकमा वसुली करणे असल्यास त्या वसुल कराव्यात असे निर्देश ही सभा मा. आयुक्त यांना देत आहे. तसेच सदस्य शशिकांत भोईर यांनी बेकायदेशीर जलजोडण्या यादी यामध्ये किंवा ज्यामध्ये काही गैरव्यवहार झाला आहे अशी यादी आयुक्तांकडे सादर करावी.

तसेच या शहरात प्रस्ताव करणाऱ्यांच्या मताप्रमाणे जर नव्याने अनधिकृत जलजोडण्या होत असतील तर त्या पाण्यासारख्या मुलभूत गोष्टीसाठी नागरिक चुका करित आहेत असे या सभेस वाटते. करिता संपूर्ण शहरातील लोकांच्या मूलभूत हक्क सन्मानित करणाऱ्या दृष्टीने यापुढे अशा सर्व बेकायदेशीर इमारतीस लावलेल्या जलजोडण्या नियमित कराव्या व बेकायदेशीर इमारतीस लावलेल्या

जलजोडण्या जेव्हा अशा इमारती पाडून टाकण्यात येतील. तेंव्हा त्यांनी दिलेल्या जलजोडण्या तोडून टाकण्यांत याव्यात. बेकायदेशीर जलजोडण्याकामी महापालिकेचे होणारे नुकसान टाळण्यात यावे.

**सुचक :- श्री. आसिफ पटेल.** **अनुमोदन :- श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य :-**

१) मायरा मेन्डोंसा
२) हॅरल जॉर्ज बोर्जीस
३) पाटील चिंतामण कमलाकर
४) डिसोझा ज्युडी थॉमस
५) आसिफ गुलाब शेख
६) ठाकुर नितीन गोपीनाथ
७) गोहिल शानु
८) पाटिल प्रभात प्रकाश
९) डी डी नलावडे
१०) हंसुकुमार पांडे
११) सुनिता कैलाश पाटील
१२) जयंत महादेव पाटील
१३) ज्योत्स्ना जालींदर हसनाळे
उर्फ
पुजा प्रताप शिंदे
१४) जिवी हिरा वाडे
१५) अनिता जयवंत पाटील
१६) गावंड हरेश लक्ष्मण
१७) पटेल आसिफ गुलाब
१८) सुरेखा यशवंत गायकवाड
१९) चंद्रकांत भिकालाल मोदी
२०) शफिक अहमद खान
२१) उमा विश्वनाथ सपार
२२) मेन्डोसा स्टीवन जॉन
२३) रोहिदास आत्माराम पाटील
२४) कुरेशी याकुब इस्माईल
२५) कोलासो लिओ इजिदोर
२६) अल्मेडा जेन्वी युस्टस
२७) भामरे उर्मिला कोमल
२८) जैन गीता भरत
२९) शाह रिटा सुभाष
३०) चौहान महेन्द्रसिंह
३१) पाटील मोहन मधुकर
३२) सौ. रांजणकर मुक्ता प्रविण
३३) परशुराम दामोदर पाटील
३४) नरेंद्र मेहता
३५) तुळशीदास दत्तु म्हात्रे

३६) पाटील मिलन गोविन्द

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य :-**

१) संगिता विजय म्हात्रे
२) मिलन म्हात्रे
३) तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
४) म्हात्रे नयना गजानन
५) अग्रवाल धनराज नंदलाल
६) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर
७) करंबेळे प्रियांका प्रकाश
८) सिंग मदन उदितनारायण
९) पाटील रोहिदास शंकर
१०) भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
११) भोईर गजानन लक्ष्मण
१२) पाटील लिला गुरुनाथ
१३) पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१४) नरावत भवरीकुंवर चेनसिंह
१५) रतन कृष्णा पाटील
१६) पाटील शरद केशव
१७) गोयंका सुधा लक्ष्मण
१८) भोईर शशिकांत जगन्नाथ
१९) अनंत पाटील
२०) शुभांगी नाईक
२१) जेम्स कोलासो
२२) जोजफ घोन्सालवीस
२३) डॉ. रमेश जैन

(हजर मा. सदस्यांपैकी ठराव मतदानाच्यावेळी एकूण ११ सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते.)

**प्र. सचिव :-**

इकडे दुःखवट्याचा ठराव आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

उपसुचनेबददल काय निकाल दिला आहे. त्यांनी मान्य केले आहे ते जरा क्लिअर करा. मुळ ठराव आणि उपसुचना त्यांच्याबददल व्यवस्थित रुलिंग द्या. ठराव दोन आले, उपसुचना एक आली. उपसुचनेचे वाचन करा. मग ती फेटाळा.

**असिफ शेख :-**

लेखी आलीच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

रेकॉर्डवर उपसुचना आली.

**रोहित सुवर्णा :-**

उपसुचना वाचून फेटाळा तरच कायदेशीर आहे आणि सेक्शन ७१ च्या अंतर्गत आम्हांला सर्टिफाईड कॉपी द्या.

**मिलन म्हात्रे :-**

माझी अशी उपसुचना होती, अभी तक आप लोगोने उपसुचना किया वो कैसे मंजुर हो गया। वो लिख के दिया था क्या?

**महेन्द्रसिंग चौहान :-**

उपसुचना लिख के दिया था।

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

मौखिक सुचना ह्या मान्य केल्या जात नसतात. उपसुचना जर सुचना असेल त्याच्यावर सुचक आणि अनुमोदकाची सही असेल त्या सुचना डायसवरुन मान्य करण्यात येतात.

**प्र. सचिव :-**

दुःखवट्याचा ठराव आहे आपल्या ठाणे जिल्हयातील विधानसभा मतदारसंघाचे गेली पंधरा वर्ष सतत प्रतिनिधीत्व करणारे विधानसभा सदस्य आमदार मा. मो.दा. जोशी ठाणे यांचे निधन झाले त्यावर या सभागृहात अति दुःख होत असून ठाणे जिल्हयातील एक सोज्वळ, विनम्र व्यक्तिमत्व अस्तगत झाल्याने जिल्ह्याचे राजकीय व सामाजिक क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाली आहे. ही हानी ठाणे शहर व जवळच्या परिसरात कधीही भरून निघण्यासारखी नाही हे सभागृह नोंद करीत आहे. मृत आत्म्यास देव चिरशांती देवो. या दुःखद निधनामुळे ज्या मो. दा. जोशी कुटुंबावर दुःखाची कुऱ्हाड कोसळली त्या दुःखातून निभावण्यास देव मो. दा. जोशी कुटुंबास शक्ती देवो. ही नम्र विनंती ही विनम्र प्रार्थना.

**रतन पाटील :-**

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे कनिष्ठ बंधू सुप्रसिध्द संगीतकार श्रीकांतजी ठाकरे यांचे सुध्दा दुःखद निधन झालेले आहे त्याबद्दलचा शोकप्रस्ताव.

**आसिफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ४९ :-**

आपल्या ठाणे जिल्हयातील विधानसभा मतदार संघाचे १५ वर्ष सतत प्रतिनिधीत्व करणारे विधानसभा सदस्य आमदार मान. मो. दा. जोशी, ठाणे यांचे दि. ०६/१२/२००३ रोजी दुःखद निधन झाले. याबाबत ह्या सभागृहात अति दुःख होत असून ठाणे जिल्हयातील एक सोज्वळ, विनम्र व्यक्तीमत्व अस्तंगत झाल्याने जिल्ह्याच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाली आहे. ठाणे शहर व जवळच्या परिसरासाठी ही पोकळी कधीही भरून येण्यासारखी आहे. याची सभागृह नोंद करीत आहे. त्यांच्या मृत आत्म्यांस देव चिरशांती देवो व ह्या दुःखद निधनामुळे जोशी कुटुंबावर जो दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ते दुःख पेलवण्याचे देव जोशी कुटूंबियांना शक्ति देवो ही विनम्र प्रार्थना.

**सुचक :- श्री. लिओ कोलासो. अनुमोदन :- श्री. जयंत पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**दुःखवटा ठराव क्र. ५० :-**

महाराष्ट्रातील जेष्ठ संगीतकार व साहित्यकार तसेच शिवसेनाप्रमुख आदरणिय श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे कनिष्ठ बंधू मान. श्री. श्रीकांत ठाकरे यांचे दि.    /१२/२००३ रोजी दुःखद निधन झाले. याबाबत ह्या सभागृहात अति दुःख होत असून एक सोज्वळ, विनम्र व्यक्तीमत्व अस्तंगत झाल्याने संगीत व साहित्य क्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे याची सभागृह नोंद करीत आहे. त्यांच्या मृत आत्म्यांस देव चिरशांती देवो व ह्या दुःखद निधनामुळे ठाकरे यांच्या कुटूंबावर जो दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ते दुःख पेलवण्याचे देव, ठाकरे कुटूंबियांना शक्ति देवो ही विनम्र प्रार्थना.

**सुचक :- श्री. रतन कृष्णा पाटील. अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांची सुचना आहे नाताळ सणानिमित्त महापौरांनी दि. २४/१२/२००३ सकाळी १०.३० वाजता त्यांच्या कार्यालयामध्ये सर्व नगरसेवक सर्व अधिकारी पत्रकार यांना शुभेच्छांसाठी निमंत्रित केलेले आहे. तरी सर्वांनी हजर राहावे असे महापौरांतर्फे जाहिर करतो.

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित असलेले मा. उपमहापौर, मा. आयुक्त, मा. प्र. सचिव अधिकारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ**
**सायं. ०५.२५ वाजता**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**